शब्द

# रुची

४४



बीएमएम डॅलस अधिवेशन विशेषांक

जुलै २०१९


मूल्य १० रुपये

पृष्ठे १३२

ZEE मराठी

BMM 2019 ★ DALLAS - FORT WORTH







मी जिरवते,
सगळ्यांची जिरवते
B-TEX
Mrs. मुख्यमंत्री
सोम-शनि
संध्या. 7 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आता बदल दिसतोय
महाराष्ट्र
घडतोय
स्वच्छ आणि गतिमान कारभार
नव्या कल्पना नवे विचार
सुसंवादाचे आपले सरकार
जनसामान्यांचा बनले आधार
सुशासनाचं
सरकार
कामगिरी
दमदार


POSCO
MAHARASHTRA
Speedy
Tenacious
Creative
Detail
"Making World Premium Steel In India"
No.1 Best Quality Steel Supplier


Global
POSCO
we are heading towards a global
POSCO beyond Korea.
in terms of business scales by fortune Global
Ranked 100 th
as sustainable company by world Economic Forum
Ranked 20 th
Ranked 1 St
as admired company by world's Most Admired Companies


India No. 1
Best Quality Steel Supplier
ACL
PLTCM
CAL
CGL
POSCO
MAHARASHTRA


Union Bank of India
युनियन बँक ऑफ इंडिया
100 वर्षे YEARS
हर सपना साकार हो अपना
MAKING EVERY DREAM COUNT
1919 - 2019
साजरी करत आहोत
वचनबद्धतेची 100 वर्षे
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
Union Bank of India
Good people to bank with
भारतीय बँकिंग कोड आणि प्रमाणित बोर्डाचे सदस्य
Member of Banking Codes & Standards Board of India
DDB Mudra 4615 Mar
Proud to be associated with
Digital India Power To Empower
स्वच्छ भारत
Helpline Nos.: 1800 208 2244 / 1800 22 2244 (Toll free no.)
080 2530 0175 (Chargeable) +91 80 2530 2510 (for NRIs)
www.unionbankofindia.co.in
Connect with us: @unionbankofindia @UnionBankTweets
@UnionBankInsta YouTube UnionBankofIndiaUtube Unionbankofindia

A

Well

Wisher

# Samarth Petroleum

**Malang Road, Adivali Kalyan (East)**


Connecting you to your motherland with
NKGSB Bank NRI Services
NRI Deposit [NRO, NRE & FCNR(B), RFC Accounts]
Foreign remittances at competitive rates
Foreign Exchange at attractive rates
Portfolio investment Scheme
Purchase & sale of shares on Repatriation & Non Repatriation basis (Recognized stock exchange in India)
NRE-PIS Account, NRO-PIS & Demat Account
• NKGSB BANK has correspondent banking relations worldwide
• Competitive Exchange Rates on all your Forex transactions
• All the above services are subject to prevailing directives issued by Reserve Bank of India under Foreign Exchange Management Act, 1999, as amended from time to time
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century
AUTHORIZED CATEGORY - I DEALER
Registered Address: Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
Customer Care: 022 28602000 I www.nkgsb-bank.com I customercare@nkgsb-bank.com

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**बीएमएम डॅलस अधिवेशन विशेषांक**
**जुलै २०१९, वर्ष सातवे**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
अभ्यागत संपादक : **आल्हाद गोडबोले**
मुखपृष्ठ : **पुंडलिक वझे**


---


**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**


---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

---


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com


---

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ एप्रिलपासून १२ ते ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**
**वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

---


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम








समन्वयवादी (**अरुणा ढेरे** यांची मुलाखत) / ११
इथे चातुर्य शहाणे झाले (**डॉ. रविन थत्ते** यांची मुलाखत)/२०
आनंदाचे झरे / **आल्हाद गोडबोले** / २८
ग(द्य) दि(वाण) माडगूळकर / **विनय हर्डीकर** / ३६
या नात्याला काय म्हणावे / **आनंद माडगूळकर** / ४६
गीतरामायणचं रामायण / **ग.दि. माडगूळकर** / ५०
गीतरामायण केलेलं नाही; झालेलं आहे / **सुधीर फडके** /५२
सखेसोबती पुढती गेले / **पु. ल. देशपांडे** / ५४
'तिघीं'च्या नजरेतून / **वंदना बोकील-कुलकर्णी** / ५८
बहुरूपीची रूपे (पुल चरित्रातून)/ **मंगला गोडबोले** / ६२
कभी तनहाईयों में... / **अशोक हांडे** / ७२
मराठी सातासमुद्रापार / ८०
**अशोक पत्की, संजय मोने, मकरंद अनासपुरे, हृषिकेश जोशी, संकर्षण कऱ्हाडे, हेमांगी कवी, समीर चौघुले, विशाखा सुभेदार आणि डॉ. निलेश साबळे**
मुसाफिर हूँ यारों... (**वसंत वसंत लिमये** यांची मुलाखत)/९०
आर्त उद्याच्या विश्वाचे (**दीपक करंजीकर** यांची मुलाखत)/१००
माझे बाबा / **श्रीहर्ष वसंत फेणे** / ११२
आग व्हेनेझुएलात; झळ भारतात / **मोहन द्रविड** / ११६
थोर लोकांचे सामान्य गुण / **डॉ. अंनत लाभसेटवार** / १२२
**पुस्तक पुरस्कार** / १२६
ग्रंथाली ग्रंथपाने / **चांगदेव काळे** / १२७







## संपादकीय

कोणतेही नवीन वर्ष सुरू होते, ते कुणाचे ना कुणाचे जन्मशताब्दी वर्ष असल्याची आठवण करून देतच येत असते. तसेच हेही एक वर्ष. मात्र हे 'ऑल्सो वन' छापाचे नाही. कारण ते सुधीर फडके, ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, स्नेहल भाटकर अशा चार दिग्गज कलायात्रींचे जन्मशताब्दी वर्ष आहे! याला निव्वळ योगायोग म्हणावे की, नियतीचीच योजना? तसेच असावे. कारण कल्पना करा, हे चौघे पाच-सहा वर्षांच्या अंतराने जन्माला आले असते तर? म्हणजे ते एवढेच लोकप्रिय, यशस्वी आणि लक्षावधी मराठी माणसांच्या मनामनांत वर्षानुवर्षे राहिले असतेच. नाही, असे नाही. पण 'फ्लॅशबॅक' पद्धतीने थोडे मागे जाऊन, अगदी स्वातंत्र्याच्या आसपास आणि नंतरच्या अर्धशतकात एक फेरी मारून आलो, तर एक गोष्ट निश्चित मान्य करावी लागेल की, या चौघांशिवाय ते अर्धशतक किती नीरस, बेचव, कंटाळवाणे झाले असते.

कविता, गीत, ललित लिखाण, व्यक्तिचित्रण, नाट्यलेखन, चित्रपटाचे कथा-पटकथा-संवादलेखन, अभिनय, एकपात्री प्रयोग, नाटक, चित्रपट, भावगीत, सुगम संगीत, गायन... कलेच्या आणि सांस्कृतिक वटवृक्षाच्या अशा कितीतरी फांद्या रसिकांना सावली देत असतात. एकेका कलावंताचे एकेक पानही आपापल्या परीने हे काम करीत असतेच. पण १९१९ ते २०१९ या शंभर वर्षांच्या मराठी कलेचा एक वटवृक्ष बाबूजी, गदिमा, भाई आणि स्नेहल भाटकर अशा चार भरघोस फांद्यांनी बहरून अखंड आनंदाची सावली देत राहिला, हे मराठी माणसाचे भाग्य म्हणावे लागेल. विशेषत: किमान अर्धशतकाची अथक झुंज देऊन मिळवलेल्या स्वातंत्र्यानंतर, अन्न-वस्त्र-निवारा यासारख्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी धडपडावे लागत असताना, प्रत्येक गोष्टीचे दुर्भिक्ष्य सोसूनही जिगीषा धगधगती ठेवताना, एखादा प्रसन्न सूर, फुंकर घालणारं गाणं किंवा मनावरचं मळभ घालवणारं हसू अनपेक्षितपणे आयुष्यात आलं तर आधी नकोसं वाटलेलं जगणंच हवंहवंसं वाटू लागतं ना?

बाबूजी, गदिमा, पुल, स्नेहल भाटकर यांनी नेमकं हेच दान आपल्या आणि आपल्या आधीच्या तीन-चार पिढ्यांच्या पदरात टाकलं होतं. आज गेलेला माणूस उद्या विस्मरणात जावा, अशा आजकालच्या काळात वीस-तीस-चाळीस वर्षांपूर्वी आपल्यातून गेलेल्या कलायात्रींची आठवण त्यांच्या जन्मशताब्दी वर्षातही ताजी राहावी, हे म्हणूनच विशेष आणि किमान एखादा विशेषांक करण्याएवढं खास निश्चितच. ग्रंथालीच्या 'शब्द रुची'चा हा विशेषांक याच निमित्तानं!

बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि ग्रंथाली यांचं नातं सुरुवातीपासूनचं आहे. गेल्या पंधरा अधिवेशनांत सहभागी होत ग्रंथालीनं मराठी भाषा, मराठी माणूस, पुस्तकं आणि सातासमुद्रापारही नांदणारी आपली संस्कृती यांच्याशी आपलं नातं टिकवून ठेवलं आहे. कलेकलेनं वाढवलं आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेत डॅलस येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या द्वैवार्षिक अधिवेशनात या विशेषांकाचे प्रकाशन व्हावे, हा आणखी एक दुग्धशर्करा योग. सातासमुद्रापार असलेल्या हजारो मराठी माणसांच्या मनात हे यक्ष-गंधर्व-किन्नर वर्षानुवर्षे घर करून राहिलेले आहेत. त्यांच्यासाठी ही 'डाऊन मेमरी लेन' सफर निश्चितच सुखद, अनेक जुन्या आठवणींना उजाळा देणारी ठरेल. या कलायात्रींनी स्वत: केलेल्या तसेच त्यांच्याविषयी आजवर केल्या गेलेल्या लिखाणातील काही निवडक कवडसे वेचून ते या अंकात पुनर्मुद्रित केले आहेत, ते त्यांच्यासाठीच!

याशिवाय अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सन्मानपूर्वक निवड झालेल्या साहित्यिक आणि 'बीएमएम'च्या प्रमुख पाहुण्या अरुणा ढेरे तसेच 'बीएमएम'चे बीजभाषण देण्यासाठी डॅलसला येत असलेले प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन आणि साहित्यिक डॉ. रविन थत्ते, यांच्याबरोबरच वसंत वसंत लिमये आणि दीपक करंजीकर हे आणखी दोन अवलिया साहित्यिक यांच्या तेवढ्याच्याच मुलखावेगळ्या मुलाखती या अंकात आवर्जून समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मराठी मनाच्या वैचारिक मशागतीचीही 'शब्द रुची'कडून अपेक्षा ठेवणाऱ्या वाचकांची ती मागणी निश्चित पूर्ण होईल, अशी आशा आहे.

याखेरीज बरेच काही आहेच. पण या घडणीत इतक्या जणांचे हात लागले आहेत, की त्यांचे उल्लेख करायलाही ही जागा अपुरी पडेल. शिवाय बाबूजी, गदिमा, पुल, स्नेहल भाटकर यांच्याबरोबर नामोल्लेख करण्याऐवजी लेखाच्या/अंकाच्या अखेरीलाच ते श्रेय दिलेले असावे, या त्यांच्या भावनेचीही कदर ठेवायला हवी. अर्थात त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानणे, हे आमचे मात्र कर्तव्यच होय.

**- आल्हाद गोडबोले**
अभ्यागत संपादक







Apte
FOODS
पारंपारिक पदार्थांचा घरगुती आस्वाद
मिळवा घर बसल्या!!!
Authentically Prepared
Traditional Indian Delicacies
• चिरोटे (Chirote)
• करंजी (Karanjee)
• चकली (Chakli)
• चिवडा (Chivda)
• शंकरपाळी (Shankarpali)
• बुंदी,शेव,पापडी, गाठीया (Bundi, Shev, Papdi Gathiya)
• मसाले आणि विविध प्रकारच्या चटण्या (Several Spices & Chatny)
• सर्व प्रकारचे लाडू (All types of Laddu)
• गूळपोळी (Gulpoli)
• तिळगुळ वडी (Tilgul-vadi)
• मेतकुट (Metkut)
• गव्हाची कुरडई (Gavhachi Kurdai)
5 in 1
Royal Delight Combo Pack
Now Send it
anywhere accross the world
Namkeen Shankarpale
Sweet Shankarpale
Besan Laddu
Chirote
Apte foods, Vinayak Buliding, Miraj, Maharastra, India, 416410
Mahesh Apte : +91 94226 13477 or +91 96899 13477
Dhanraj Apte, Michigan, USA : +1 804 399 9697
aptefoods@hotmail.com
www.aptefoods.com

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणूक पद्धतीत बदल होऊन निवडीची सुधारित पद्धत यंदा प्रथमच अमलात आली आणि या पदावर डॉ. अरुणा ढेरे यांची सन्मानपूर्वक निवड झाली. या निवडीला मराठी साहित्यिक इतिहासात अनेक कारणांनी विशेष महत्त्व आहे. त्यातील पहिले म्हणजे आजवरच्या ब्याण्णव संमेलनाध्यक्षपदांच्या यादीत फक्त चार महिला साहित्यिक असताना अरुणा ढेरे यांची निवड झाली, तीही सर्वसंमतीने! ज्येष्ठ साहित्यिक-संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे (उर्फ अण्णा) यांची कन्या असलेल्या अरुणा ढेरे यांनी वडिलांचा वारसा सांभाळत अवघ्या तीन दशकांच्या साहित्यिक कारकिर्दीत साठहून अधिक पुस्तके स्वतःच्या नावावर नोंदवली. त्यांच्या साहित्यिक मुशाफिरीची सुरुवात अण्णांप्रमाणे कवितेने झाली आणि त्यात त्यांचे स्थान आजही वरच्या पातळीवर आहेच, पण त्याखेरीज कथा, कादंबरी, चरित्र, वैचारिक, लोकसाहित्य, संशोधन, समीक्षा, बालसाहित्य, प्रवासवर्णन आदी साहित्यप्रकारही सहजपणे हाताळत अरुणा ढेरे यांनी या प्रांतात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविली आहे. त्यांच्या या कर्तृत्वाला मराठी साहित्यविश्वाने संमेलनाध्यक्षपदाच्या रूपात दिलेली ही पावती आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेत डॅलस इथे होत असलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अठराव्या द्वैवार्षिक संमेलनास त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त रुची मासिकास दिलेल्या मुलाखतीची सुरुवात करताना पहिला प्रश्न पडला की, अरुणा ढेरे यांचा परिचय कोणत्या विशेषणाने करून द्यावा?**


**त्यावर प्रसन्नपणे हसत त्या म्हणाल्या -**

- खरं सांगायचं तर, अगदी नकळत्या वयापासून मी वेगवेगळ्या प्रकारचं साहित्य लिहित आले. त्यामुळं कुठल्याही प्रकारच्या लेखनमर्यादा माझ्यापाशी राहिल्याच नाहीत. कशाची कविता होईल आणि कशाचा लेख होईल हे आपल्याला आतून कळतं, असं हळूहळू त्या माध्यमाच्या प्रेमात पडल्यानंतर, अधिक जाणतेपणी ते माध्यम वापरायला लागल्यानंतर, आपल्या लक्षात येतं. त्या त्या व्यक्तीच्या गाभ्यापाशी जे जे असेल ते - जगाविषयीचं आकलन असेल, स्वतःविषयीची समजूत असेल, या दोन्हीतून आपल्याला लिहावंसं वाटतं, ते आपण लिहित जातो. माझं लेखन कधी संशोधनाच्या अंगानं गेलं. कारण घरात अण्णा (ज्येष्ठ साहित्यिक आणि संशोधक रा. चिं. ढेरे) होते. त्यांच्याबरोबर हिंडताना, चर्चा करताना, पुस्तकं वाचताना मला संशोधनासोबतच ललित साहित्याच्या वाटाही दिसत गेल्या. त्यामुळं त्याही प्रकारचं लेखन झालं. सामाजिक इतिहास हा माझ्या आवडीचा विषय झाला. कारण आपण जे लिहितो, त्याला एक वेगळ्या प्रकारचं



## *लोकान्तात राहून एकान्तात वाढलेली*

# ‘समन्वयवादी’




सामाजिक भान येत गेलं – म्हणजे आपण जे पाहतो, वाचतो, व्यक्त करायचं असतं, त्या सगळ्यातून इतिहासाचं पुनर्वाचन शक्य आहे, हे जाणवत जातं, त्यावेळी परंपरा ही पूर्णपणानं टाकता येत नाही. मुळात माणसाला परंपरा किंवा इतिहास नाकारता येतो, असं मला वाटत नाही. कारण आपण त्या पायावर, त्या जमिनीवरच उभे असतो. तुमचं वास्तव जे असतं, ते त्यातून घडलेलं असतं. पण तुम्हाला तुमच्या वर्तमानात जगताना आणि भविष्याचा वेध घेताना त्या परंपरेतलं काय पुढं न्यावंसं वाटतं, हे त्या जाणत्या माणसाला कळणं आवश्यक असतं. तर परंपरा ही बेडी बनत नाही. हे लक्षात आल्यावर मी सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाकडं वळले. आणि मुख्यतः ललित लिखाण हे माझं क्षेत्र राहिलं. पण कुठल्याही एका विशेषणाकडं मला स्वतःकडं बघताच येत नाही. म्हणजे त्याच्यातच ललित लिखाण गुंतलेलं आहे, त्यातच कविता आहे, संशोधनही आहे..

**ब्याण्णव संमेलनाध्यक्षपदांच्या यादीत फक्त चार हा इतिहास लक्षात घेता आता या प्रांतातसुद्धा महिला साहित्यिकांसाठी 'आरक्षण' ठेवण्यासारखी मागणी करावी लागणार काय?**

– खरं म्हणजे मला असं वाटतं की, साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद हे स्त्री-पुरुष या भेदांपलीकडं जाऊन निरपेक्षच असावं. साहित्यिकाच्या वाङ्मयीन आणि गुणात्मक कर्तृत्वावर ते मिळावं. त्यामुळं लेखिकांसाठी अमुक टक्के आरक्षण किंवा तत्सम अटी असूच नयेत. मात्र हेही खरं आहे की, गेल्या ९२ वर्षांत माझ्याआधी फक्त चार लेखिका अध्यक्ष झाल्या. ही अपुरी संख्या लक्षात घेता हे दुर्दैव आहे. याचा अर्थ असा नाही की, लेखिका सक्षम नव्हत्या. अगदी लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरींपासून सुरुवात केली तरी.. पुढच्या काळात गीता साने होत्या, मालतीबाई होत्या.. मालतीबाई बेडेकर यांना तर समांतर संमेलनाचं अध्यक्ष करावं लागलं होतं. नंतरच्या काळात सरोजिनी वैद्य, इरावती कर्वे दिसतात. या आणि आणखी कितीतरी जणी संमेलनाच्या अध्यक्षपदास लायकच होत्या. अगदी समकालामध्ये निवड करायची झाली तरी ज्यांना संमेलनाचं अध्यक्षपद मिळायला हवं होतं अशी चार नावं सहजपणे घेता येतात. इंदिराबाई संतांसारखी मोठी कवयित्री अध्यक्ष होऊ शकलेली नाही. स्त्रियांच्या गुणवत्तेकडं दुर्लक्ष होऊन त्यांच्यावर अन्याय झाला आहे, हे निर्विवाद सत्य आहे. हे असलं तरी आरक्षणासारख्या तरतुदी नकोत. आणखी एक गोष्ट म्हणजे, केवळ अध्यक्षपदच नव्हे तर वाङ्मयाच्या इतिहासात प्रसंगी दुसऱ्या-तिसऱ्या फळीतल्या लेखकांची नोंदही घेतली गेलेली दिसते. मात्र त्या तुलनेत योग्य अशा लेखिका असूनही त्यांची नोंद घेतली गेलेली नाही. म्हणून मग स्त्रियांच्या लेखनाचे आढावे किंवा 'मागोवा'सारखे संपादनाचे प्रयत्न मला करावे लागले. इतर क्षेत्रांप्रमाणं स्त्रियांच्या बाबतीतला दुजाभाज इथंही दिसतो आहे.

**संमेलनाच्या उत्सवी स्वरूपात बदल व्हावा का ?**

– संमेलनाचं स्वरूप उत्सवी झालं आहे हे खरं आहे. ज्या काळात संमेलन सुरू झालं, त्या काळात ते एक उत्तम वैचारिक व्यासपीठ होतं. समाजाला दिशा देणं हे साहित्यिकाचं कर्तव्य आहे, अशा भावनेनं माणसं तिथं येत होती. साहित्याच्या क्षेत्रात अभिरुचीची वाढ, त्या त्या काळात ऐरणीवर येणारे प्रश्न आणि त्यांची चर्चा होणं असेल; तसंच एकूणच वाङ्मय व्यवहाराला सुघटित आणि चांगलं रुप येण्यासाठी म्हणूनही संमेलन आवश्यक होतं. लेखक आणि वाचकांना एकत्र आणणारं ते एक उत्तम व्यासपीठ होतं. पुढं कालौघात अशी अनेक व्यासपीठं निर्माण झाली. या नव्वद-शंभर वर्षांच्या काळामध्ये अनेक लहान-मोठी व्यासपीठं निर्माण

**परंपरा ही बेडी बनत नाही. हे लक्षात आल्यावर मी सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाकडं वळले. आणि मुख्यतः ललित लिखाण हे माझं क्षेत्र राहिलं. पण कुठल्याही एका विशेषणाकडं मला स्वतःकडं बघताच येत नाही. म्हणजे त्याच्यातच ललित लिखाण गुंतलेलं आहे, त्यातच कविता आहे, संशोधनही आहे..**



झाली. माध्यमं निर्माण झाली. त्यामुळं लेखक-वाचक सहजपणे अनेक ठिकाणी पुन्हा-पुन्हा भेटत राहिले. साहित्यिकही आपले प्रश्न सोडवण्याच्या नव्या-नव्या वाटा शोधत राहिले. या सगळ्यामुळं मोठं संमेलन व्हावं, अशी गरज उरली नाही. पण दुसरीकडं वाटतं की, अनेक छोट्या-छोट्या संमेलनांची गरज खूपच तीव्र झाली आहे. म्हणजे छोट्या संमेलनांमधून हाती लागणारं फलित महत्त्वाचं आहे. तसे प्रयोग सगळीकडं होत आहेत. या छोट्या संमेलनामुळं स्थानिकांना चांगलं व्यासपीठ मिळतं. वैचारिक घुसळण होते. अशा स्वरुपाची संमेलनं यशस्वी होताना दिसतात आणि ती आवश्यकही आहेत. उदाहरणार्थ, 'साधना'च्या व्यासपीठाच्या माध्यमातून आम्ही पाच वर्षं संमेलन केलं होतं. मीही त्यांच्या संयोजनात होते. एकच विषय घेऊन, मानधन न घेता येणाऱ्यांनी संमेलन करायचं, असे प्रयोगही केले. पण ही किंवा अशा प्रकारची संमेलनं करताना लक्षात आलं की, त्यांनाही किमान आर्थिक पाठबळ लागतं. उत्सवी संमेलनांना तर ते लागतंच. पण वाङ्मयाचा उत्सव एखाद्या भाषेच्या बाबतीत व्हावा असं मला वाटतं. ते होऊ नये, असं मी म्हणणार नाही. तसंच साहित्य संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाकडून वैचारिकतेची अपेक्षाही करू नका. तो लोकांनी-लेखकांनी एकत्र यायचा उत्सव आहे. मात्र हा आनंदोत्सवही निरोगी स्वरूपाचा हवा. संमेलनाचा किमान खर्च स्वयंपूर्ण होऊन करता यावा, अशी योजना महामंडळानं करायला पाहिजे.

**साहित्याचा अभ्यास करण्यासाठी महामंडळानं, साहित्यिक संस्थांनी फेलोशिप, आर्थिक सहकार्य केलं तर साहित्याची गुणवत्ता वाढू शकेल, असं वाटत नाही का?**


– निश्चितच वाटतं. अशा काही संस्था प्रयत्नही करताहेत. उदाहरणार्थ, कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे काही पुस्तकांना अलीकडंच शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. त्यामुळं चांगली साहित्यनिर्मिती होऊन गंभीरपणं काम करणाऱ्याला बळ मिळेल हे नक्की. भारंभार पुरस्कार देण्यापेक्षा शिष्यवृत्ती दिली गेली तर त्याचा उपयोग निश्चितच जास्त होईल.

**वास्तविक 'विस्मृतिचित्रे' हा तुमचा साहित्य अकादमीसारख्या पुरस्कारास पात्र असलेला ग्रंथ. पण त्यातील काही संदर्भांचा शोध घेण्यासाठी पाठ्यवृत्ती राहोच, तुम्ही स्वखर्चाने इंग्लंडला जाऊन आला होतात.. तर अशा पाठ्यवृत्ती, सन्मानाचे पुरस्कारही योग्य वेळी, योग्य साहित्यकृतीस मिळायला हवेत ना?**


– साहित्य अकादमीनं आता युवा पुरस्कारही सुरू केला आहे. मात्र आतापर्यंतची पुरस्कार, साहित्यिक कामगिरीची समीकरणं लक्षात घेतल्यास दर वेळी गुणवत्ता असलेल्या साहित्यकृतींना पुरस्कार मिळतोच असं नाही. शिवाय हा प्रश्न अभिरुचीचाही आहे. आपण कोणत्या पुस्तकांना डोक्यावर घेतो, कोणत्या पुस्तकांना मानदंड मानतो, हे वाचक-समीक्षक आणि एकूणच समाजानं पारखून घ्यायला हवं. ती पारख होऊन त्या पुस्तकांच्या मागं समाज उभा राहिला तर बदल घडू शकेल. साहित्यिक मनाला येईल ते लिहितो, असं म्हटलं जातं. प्रकाशक गावोगावी झालेले आहेत. गाठीशी थोडेसे पैसे असल्यास लेखकही स्वतःचं पुस्तक छापतो. या सगळ्यामुळं साहित्याची जी उदंड निर्मिती होते आहे, त्यातून योग्य साहित्यकृतींच्या मागं उभं राहाणं, त्यांचं महत्त्व जाणणं ही मोठी आणि वाढती जबाबदारी वाचकांवर आहे.

**कवितेपासून संशोधनापर्यंत सगळ्या वाटा चोखाळल्यानंतरही राहिलं आहे, असं काही..**

– होय, आहे, आहे.. राहून गेलेल्या गोष्टी बऱ्याच आहेत. आदिबंधात्मक समीक्षा हा माझ्या पीएचडीच्या अभ्यासाचा विषय होता. तेव्हा मिथकांचा अभ्यास करायला लागले होते. खूप वाचन केलं. त्यावेळी असं वाटलं की, मिथकांवर एक स्वतंत्र पुस्तक करावं. ते काम तसंच्या तसं राहूनच गेलं. ते अजूनही मनात आहे. मुख्यतः मिथकं हा हजारो वर्षांच्या इतिहासामध्ये अनेक घडामोडी घडवणारा घटक आहे. तो तो काळ जिवंत ठेवणारा घटक आहे. त्यामुळं समाजपरिवर्तनाबाबतीत मिथक हे कसं दिसतं, हे पाहण्यासारखं असतं. म्हणजे असं पहा, परिवर्तन घडवण्यासाठी मिथक वापरलं गेलं आहे आणि परिवर्तन घडू नये, समाज स्थिर राहावा यासाठीही मिथक वापरलं गेलं आहे. या दोन्ही अंगांनी, इतिहासाच्या अंगानं मला मिथकांचा उलगडा करावासा वाटतो. त्या संदर्भातली टिपणं काढली आहेत.





**वाङ्मयाचा उत्सव एखाद्या भाषेच्या बाबतीत व्हावा असं मला वाटतं. ते होऊ नये, असं मी म्हणणार नाही. तसंच साहित्य संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाकडून वैचारिकतेची अपेक्षाही करू नका. तो लोकांनी-लेखकांनी एकत्र यायचा उत्सव आहे. मात्र हा आनंदोत्सवही निरोगी स्वरूपाचा हवा. संमेलनाचा किमान खर्च स्वयंपूर्ण होऊन करता यावा, अशी योजना साहित्य महामंडळानं करायला पाहिजे.**






**आपण आत्ता चौथरे मोडण्याच्या प्रयत्नातली माणसं आहोत. त्यामुळं तुमच्यासमोर मोठे आदर्श उभेच राहू शकत नाहीत. सुमारांची सद्दी आहे, असं नाही म्हणत मी. पण आपण ज्याला साधारणीकरण, सपाटीकरण म्हणतो, ते फक्त सांस्कृतिक क्षेत्रात होतंय असं नाही. आपली जीवनदृष्टीच त्याप्रकारची, तशी झाली आहे. माणसं आत्मकेंद्रित होत आहेत. टिकाऊपणाची गरजच वाटेनाशी झाली आहे.**




प्रकरणांचा क्रम ठरवला आहे. पण लेखन अजिबात झालेलं नाही.

**मोठी म्हणावी अशी कादंबरी मनात..**

– मध्यंतरीच्या काळात बुद्धाचा विचार मनात होता..म्हणजे माणूस म्हणून. आज मिथक बनला आहे बुद्ध. पण तो संपूर्ण बुद्धकाळ... एक विलक्षण वैचारिक घुसळणीचा काळ आहे. त्याच्यावर कादंबरी स्वरूपात लिहिता येईल का... म्हणजे मला माहित नाही, मी अजून ती ताकद अजमावून पाहिलेली नाही. पण तो विचार मनात होता त्या काळात. बघू, काय होतंय पुढे.. आणखी एक म्हणजे, गाथा सप्तशतीचं– सुमारे तीनशेसाडेतीनशे गाथांचं भाषांतर कवितांच्या स्वरूपात केलं आहे. पण त्याला सुघटित स्वरूप देऊन ते पूर्ण करायचंय.. त्यावर अधिक काम करायचं आहे. अण्णा म्हणायचे तसं मनात असलेल्या कामांपैकी सत्तर टक्के कामं राहूनच जातात.. पण करायला हवं, हे खरं.. सध्या भारतीय संत कवयित्रींची कविता असा एक खंड आणि समकालीन भारतीय कवयित्रींची कविता असा एक खंड हे काम हातात घेतलेलं आहे.

**ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके, पु. ल. देशपांडे यांचं हे जन्मशताब्दी वर्ष. मराठी माणसाला अजून त्यांची आठवण होते.. पण पुढल्या शतकातही आवर्जून आठवण काढली जातील अशी व्यक्तिमत्वं या काळात दिसतात कुठे?**

– आताचा काळ इतक्या झपाट्यानं बदलतो आहे की हे साहित्य चिरस्थायी होईल की नाही, हे सांगताच येत नाही. आपली जीवनदृष्टी, साहित्यदृष्टीच बदललेली आहे. एके काळी माणसांना आपण मोठं म्हणत होतो. त्यांचं मोठेपण मानत होतो. त्या त्या व्यक्तिमत्वातले त्रुटी, दोष, कालविसंगती वगैरे बाजूला ठेवून त्यांचे सत्व, सामर्थ्य, गुण पाहून, ते डोक्यावर घेऊन त्यांच्यामागं आनंदानं आपण जात होतो. असा माणूस मोठा होणं हे या काळात अवघड आहे. कारण सतत माणसांचे मातीचे पायच पाहिले जातात. त्यांचा भुसभुशीतपणा तपासत राहण्यानं माणसांची उंची वाढूच शकत नाही. माणूस आदर्श म्हणून तुमच्यासमोर उभाच राहू शकत नाही. आपण आत्ता चौथरे मोडण्याच्या प्रयत्नातली माणसं आहोत. त्यामुळं तुमच्यासमोर मोठे आदर्श उभेच राहू शकत नाहीत. सुमारांची सद्दी आहे, असं नाही म्हणत मी. पण आपण ज्याला साधारणीकरण, सपाटीकरण म्हणतो, ते फक्त सांस्कृतिक क्षेत्रात होतंय असं नाही. आपली जीवनदृष्टीच त्याप्रकारची, तशी झाली आहे. माणसं आत्मकेंद्रित होत आहेत. टिकाऊपणाची गरजच वाटेनाशी झाली आहे. जे भौतिक जगातही दिसतं. म्हणजे वस्तू टिकाऊ नकोच आहेत. वापरा आणि फेकून द्या.. तेच सगळीकडे झालेलं आहे. त्यामुळं तात्पुरत्या गोष्टींनी भारावणं, वाहून जाणं होत नाही. ती गाणी चार दिवस राहतात, संपतात, विसरली जातात. मग सुधीर फडके हवेत, गदिमा हवेत असं नाहीये. चार दिवस तोंडावर रुळणारं एखादं गीत असलं तरी पुरेसं होतं. हे जे आपल्याकडे होतंय, त्यातून शाश्वत गोष्टींचं महत्त्वच वाटेनासं झालंय आपल्याला. त्या काय आहेत, याच्या शोधाचं महत्त्व वाटेनासं झालंय. ज्ञानाची जी दीर्घजीवी परंपरा आहे, त्याकडेही आपलं दुर्लक्ष होतं आहे. महाराष्ट्रात फार वैचारिक सामर्थ्य, थोरपण असणारी माणसं झाली. त्यांनी खूप मोठं काम करून ठेवलं आहे. पण त्यांच्या विचारांनी महाराष्ट्र बदलला आणि प्रगल्भ वैचारिक पातळीवर आला, असं महाराष्ट्राच्या बाबतीत झालेलं नाही, हे आपलं दुर्दैव आहे.

**मराठीत आज ना उद्या दस्तायव्हस्की (किंवा डोस्टोव्हस्की) उदयाला येईल, असं श्री. ना. पेंडसे वीसेक वर्षांपूर्वी म्हणाले होते. त्याचा पदरव त्यांना त्यावेळी दलित साहित्यात ऐकू येत होता. आज तशी पावलं दिसतात कुठे ?**

– साधारणपणं १९७५पासून पुढं २० वर्षं कविता, आत्मचरित्र, कादंबरी आदी दलित साहित्य प्रकारांची उत्तमातील उत्तम निर्मिती होत राहिली. पण त्यानंतरच्या काळामध्ये अशा प्रकारचे कुठलेच प्रवाह टिकलेले नाहीत. कारण जागतिकीकरणाचं वारं फार वेगानं आलं. विज्ञान–तंत्रज्ञानाच्या दिशेनं जे मोठे बदल झाले त्याचा प्रभाव नव्वदोत्तर साहित्याच्या प्रवाहावर पडला. त्यात दलित साहित्याचा वेगळेपणा उरलाच नाही. पुढची पिढी मध्यमवर्गीयपणाकडं सरकत गेली, सुशिक्षित झाली, महानगरांमध्ये स्थिरावत गेली. त्यात दलित साहित्याचं वेगळेपण राहिलं नाही. ती लाट साहित्यात सामावून गेली.

**पण एकूण साहित्याच्या घसरत्या दर्जाला जबाबदार कोण ?**

– त्याला अनेक घटक जबाबदार आहेत. म्हणजे फक्त प्रकाशक आहे का? तर नाही. साहित्याकडं आपण काय म्हणून पाहतो याचा, साहित्याचा दृष्टिकोन आणि वाचकाचा दृष्टिकोन बदलण्याचं हे लक्षण आहे. प्रकाशक हा त्याचाच एक अनुषंगिक भाग आहे. उदाहरणार्थ, खांडेकरांच्या काळात माणसं लिहित होती, तेव्हा माणसं घडवणं हे साहित्याचं काम आहे असं मानत होती. माणसांवर मूल्यात्मक संस्कार करणं हे साहित्याचं काम आहे, असं मानत होती. आता साहित्य कुठलीच जबाबदारी घेत नाही. साहित्य आमची कला आहे, ती स्वायत्त आहे, कलेवर कोणत्याही प्रकारचं ओझं टाकू नका, असं म्हटलं जातं. पण असं असतानाही श्रेष्ठ कलावंत त्याचं जीवनविषयक आकलन वाचकांच्या हातात देत असतो. माणूस त्यातून आपोआप शहाणा होत असतो. माणसाची आपोआप वाढ होत असते. तो समृद्ध होत असतो. हे होण्यासाठी मुळात साहित्यिकाजवळ जे संचित असावं लागतं, माणूस म्हणून जीवनाचं आकलन अधिक चांगल्या प्रकारे करू शकणारा प्रतिभावंत म्हणून असं जे संचित असावं लागतं, ते सारं आत्मकेंद्रित होताना साहित्यातून, साहित्यिकातून कमी होत चाललं आहे. त्याचा हा परिणाम आहे. त्यामुळे साहित्याची उंची कमी होताना दिसते आहे. त्याचा प्रभावही कमी होत चाललेला दिसतो. वाचकही साहित्याकडून तशी अपेक्षा ठेवताना दिसत नाहीत. अशा समाजापासून साहित्यिक काही वेगळा राहिलेला नाही. कलावंतांकडे समाजाला काही देण्याची दृष्टी, शक्ती असते. तीही आता समाजाला दिसत नाही. त्यामुळं साहित्यिक नाहीत, वाचक नाहीत आणि पूर्वीसारख्या प्रकाशन संस्थाही नाहीत. लेखक घडवणं, ही गोष्ट आता फारशी होताना दिसत नाही. शिवाय विक्रीची गणितं वेगळी आहेत. एकेकाळी साहित्यव्यवहार लेखककेंद्री होता. आता साहित्यव्यवहाराला ग्रंथविक्रीचं केंद्र असं स्वरूप आलेलं दिसतं.


**अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा वारंवार उठतो आहे.**

– काळाचा मागोवा घेताना दिसतं की, साहित्यिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या मुद्द्यासाठी वारंवार लढायला लागलेलं आहे. अशी लढाई लढायला लागणारच. कारण या सगळ्या गोष्टींचा संबंध शेवटी सत्तेशी पोहचतो. ही लढाई लढताना साहित्यिकांनी लक्षात ठेवायला हवं की, अभिव्यक्तिस्वातंत्र्य ही मिळवण्याची गोष्ट नाही. ते आपण स्वतःच वापरावं लागतं. त्यासाठी मार्गात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला बाजूला सारणं अटळ ठरतं. ज्या वेळेला साहित्यिक खंबीरपणं, प्रामाणिकपणं आणि इतर कुठल्याही वाङ्मयबाह्य प्रेरणा न मानता त्या स्वातंत्र्याकडं पाहात असतो, त्यावेळी त्याच्या लक्षात येतं की, हे मला लिहिलं पाहिजे. त्यासाठी पडेल ती किंमत चुकवली पाहिजे. आताच्या काळात असं स्वातंत्र्य मागण्याची गरज वाटणारे लेखक कमी आहेत, असं दिसतं. स्त्रीसाहित्याबाबत बोलायचं झालं तर अमूक गोष्ट लिहू की नको, सांगू का नको, अशी सेन्सॉरशिप समाजाची होतीच; शिवाय स्त्रियांना स्वतःला तसं वाटणं, दुविधेत असणं यातूनही अनेक लेखिका गेलेल्या आहेत. त्यामुळं स्वतःला घालून घेतलेली चौकट मोडणं ही खूप अवघड गोष्ट आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्य कशासाठी वापरत आहात, हीदेखील एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्यासाठीच्या मर्यादा विवेकी माणसं आणि विवेकी समाजानंच तयार करायला पाहिजेत.

**असा विवेकवाद तयार करण्यासाठीच्या यंत्रणेत, म्हणजे सत्तेत, राजकारणात साहित्यिक, विचारवंत, बुद्धिवंतांनी सामील होणं ही काळाची गरज आहे का ?**

– हो. गरज पडेल, तिथे त्यात उतरायला हवं. फक्त त्या त्या माणसाचा तसा पिंड असला पाहिजे. माझा तो पिंड नाही. मला लिहायला आवडतं. माझी प्रकृती सांस्कृतिक आहे. कुणाची प्रकृती एकट्यानं काम करायची असते. तर अनेकांना संस्थात्मक काम करायला आवडतं, जमू शकतं. व्यवस्थेत जाणं, आवाज उठवणं हे ज्यांना करता येऊ शकतं, त्यांनी व्यवस्था सुधारण्यासाठी जायला हवं. व्यवस्थेत सुजाण आणि विवेकी माणसांचा टक्का वाढेल तेवढं समाजकारण, राजकारण निरोगी आणि उपयुक्त होईल.

**– निर्भयतेनं संशोधन करावं असं वाटण्याजोगी परिस्थिती आता राहिलेली नाही. पण ती निर्माण होण्यासाठी, टिकण्यासाठी काय करावं?**





**अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या मुद्द्यासाठी वारंवार लढायला लागलेलं आहे. अशी लढाई लढायला लागणारच. कारण या सगळ्या गोष्टींचा संबंध शेवटी सत्तेशी पोहचतो. ही लढाई लढताना साहित्यिकांनी लक्षात ठेवायला हवं की, अभिव्यक्तिस्वातंत्र्य ही मिळवण्याची गोष्ट नाही. ते आपण स्वतःच वापरावं लागतं. त्यासाठी मार्गात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला बाजूला सारणं अटळ ठरतं.**






**वर्तमानाचं भान पाहता नवीन संशोधकांना काही तथ्यं मांडताना साशंकता वाटू शकते. समाज आता अविवेकी, असहिष्णू, असहनशील झाला आहे. सारख्या कुणाकुणाच्या भावना दुखावतात, मने दुखावतात, संवेदनांना धक्का पोचतो, तडा जातो. म्हणून ते रस्त्यावर येतात. हे फार भयंकर आणि भयकारी दृश्य आहे.**




– मी हा विचार केलेला नाही. पण तीस–चाळीस वर्षांत बदलत गेलेलं हे वास्तव आहे. ज्या काळात विठ्ठलाचा वाद झाला, तेव्हा अण्णा एकटे ठामपणानं समाज आणि शासनाच्या विरुद्ध उभे राहिले. त्यांनी उत्तरं दिली. त्यांनी म्हटलं होतं की, हे वैचारिक वाद आहेत, ते तसेच खेळले गेले पाहिजेत. आणि त्यांनी तसंच केलं. महानुभवांच्या वादाच्या वेळी न्यायालयात जावं लागलं. मात्र गेल्या तीस–चाळीस वर्षांत परिस्थिती फार बदलत गेलेली आहे. आठ–दहा वर्षांपूर्वी घेतलेली एक सभा मला आठवते. समाजातली विचारी मंडळी एकत्र येऊन याविषयी काही करता येईल का, यावर चर्चा झाली होती. त्यावेळी एखादं व्यासपीठ निर्माण करून काही होईल, असं वाटलं नाही. ज्याची त्यालाच त्या त्या गोष्टीची किंमत द्यावी लागते, असं काहींचं मत पडलं होतं. वर्तमानाचं भान पाहता नवीन संशोधकांना काही तथ्यं मांडताना साशंकता वाटू शकते. समाज आता अविवेकी, असहिष्णू, असहनशील झाला आहे. सारख्या कुणाकुणाच्या भावना दुखावतात, मने दुखावतात, संवेदनांना धक्का पोचतो, तडा जातो. म्हणून ते रस्त्यावर येतात. हे फार भयंकर आणि भयकारी दृश्य आहे.

**अण्णांच्या संशोधनाचा वसा पुढं चालू राहण्यासाठी, तसं 'स्कूल' उभं राहण्यासाठी...**

– असं स्कूल उभं राहणं गरजेचं आहेच. अण्णा गेल्यावर आम्ही रा. चिं. ढेरे संस्कृती संशोधन केंद्र असा न्यास सुरू केला आहे. मात्र अधिक व्यापक प्रमाणात या संदर्भात काम होण्याची गरज आहे, हेही समाजाला जाणवून द्यायची गरज आहे. कारण ज्ञानव्यवस्था आणि अभ्यास यांचा पॅटर्नच बदलला आहे. ज्या प्रकारचं संशोधन अण्णांनी केलं त्या प्रकारच्या संशोधनाचीच गरज वाटेनाशी झाली आहे. गुगलशरणता वाढली आहे. माहिती म्हणजेच ज्ञान असं एक समीकरण मांडलं जात आहे. त्यामुळं सखोलपणं संशोधन करणं, समग्रतेचं चित्र डोळ्यासमोर ठेवणं हे घडतच नाही. असेलच तर अत्यल्प प्रमाणात घडतं आहे. विद्यापीठीय संशोधनाची अवस्था वाईट आहे. अनेकदा संशोधनाचे केवळ भारे रचले जात आहेत. त्यात ठोसपणा आढळत नाही. अण्णांच्या काळात ज्ञानपरंपरेविषयी आदर होता. संशोधनाचं वातावरण होतं. कुरुंदकर, सोन्थायमर यांच्यासारखी माणसं होती. समाजात दोन प्रवाह असतात. एक उपयोजित ज्ञानावर काम करणारे आणि दुसरे शाश्वत पातळीवरचं संशोधन करणारे. जे झिरपत येतं आणि समाजाला उपयोगी पडत असतं. त्याचं महत्त्व आता रोजच्या जगण्यात वाटेनासं झालं आहे. पण अशी माणसं समाजात असावी लागतात. या दुसऱ्या प्रकाराकडं आपलं दुर्लक्ष होतं आहे. त्याची आवश्यकता कमी होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर संशोधनाकडं कल वाढून हा वसा पुढं चालणं – म्हणजे विचाराच्या दृष्टीनं – ही गोष्ट थोडी अवघड दिसते आहे. अगदीच निराश व्हायचं कारण नाही. काही तरूण या क्षेत्राकडं वळत आहेत. या तरुण संशोधकांना हुडकून त्यांच्या मागं उभं राहायला हवं. यंदा पुरेसं फंडिंग मिळाल्यास काही शिष्यवृत्त्यांमध्ये वाढ करतो आहोत. 'सम्यक'सारखे उपक्रम राबवतो आहोत. अण्णांनी ज्या क्षेत्रांत काम केलं त्यातल्या नवीन घडामोडी कळून त्यातून विचारांना चालना मिळावी अशा स्वरूपाचं हे काम सुरू आहे. अर्थात हा फार लहान आणि छोटा प्रयत्न आहे. महाराष्ट्रात संशोधनाच्या पातळीवर एकत्र आणणारं कुठलं व्यासपीठच नाही. वैचारिक मासिकं–नियतकालिकं कमी होत चालली आहेत. त्यांच्यामागं कुणी उभं नाही...

**मोठं होण्यासाठी मोठ्या मनाची माणसं मिळावी लागतात, मैत्र लाभावं लागतं.. आज तुम्हाला उणीव जाणवावी, असं मैत्र...**

– मला ती दोन बाजूंनी जाणवते. शान्ताबाई आणि सुनीताबाई दोघींची उणीव जाणवते. सुनीताबाईंबरोबर निरपेक्ष संवादाचा सेतू बांधला गेला होता. अशा प्रगल्भ व्यक्तीला, मोठ्या माणसाला आपण गमावलं. एका जिवलग मैत्रिणीला गमावल्याचं हे दुःख आहे. शान्ताबाईंची उणीव अनेक कारणांनी जाणवते. त्यांच्यामुळं मला निरभ्र वाङ्मयप्रेम कळलं. कुठलेही कप्पे न करता त्यांनी वाङ्मयाकडं पाहिलं. एखादाच माणूस महावृक्षासारखा निर्माण होतो, पण शेतं तर नांगरली गेली पाहिजेतच, याची जाणीव ठेवणाऱ्या माणसांकडं त्यांनी मला वळवलं. त्यांची स्मरणशक्ती अचाट होती. त्यामुळं सारा वाङ्मयीन इतिहासच, विशेषतः कवितेचा, त्यांच्याकडून मला कळत गेला. छोटीछोटी स्फुरणं दिसणाऱ्या आडवाटेवरच्या कवींची

ओळख त्यांच्यामुळं झाली. ललित लेखन अतिशय प्रसन्नपणानं कसं करावं ते कळलं. अनुभवाची तरलता चिमटीत कशी पकडावी ते कळलं. सुनीताबाईंशीही कवितेच्याबाबतीत एक छान संवाद होताच, पण त्याच्या जोडीला ठाम वैचारिक ताकद त्यांच्यात होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात खंबीरपणा आणि कणखरपणा होता. त्यांच्या संवेदना आणि विचारांचा वसा माझ्याकडं आला आहे. अशी व्यक्तिमत्त्वं हरपल्यावर जाणवतं की, आपल्या संवादाच्या जागा कमी होत चालल्या आहेत. कालांतरानं नवीन माणसं येतात, ओळखी होतात. नवे बंध जुळतात; पण त्या रिकाम्या जागा भरून निघत नाहीत.

**भाषा-संस्कृती-परंपरांचा लोप होतोय, असं नेहमी म्हटलं जातं. त्याकडे तुम्ही कसे पाहता?**

– निरनिराळ्या भाषा आणि संस्कृती लोप पावत चालल्या आहेत, हा अनुभव आपण घेत आहोत. पण तो केवळ आपल्यापुरता नाही. हा अनुभव जगभरातली माणसं घेत आहेत. हे अटळ आहे, हेही जाणवतं आहे. हा वेग असह्य आहे. आपल्या हातात काय आहे, याची जाणीव हरवून आपण या प्रवाहात ढकलले जात आहोत. बुडतो आहोत. पण न बुडता यातून बाहेर यायचं असेल, तरायचं असेल तर इतिहास आणि परंपरेची पारंबी शोधायला हवी, तुमच्या हातात असलेली घट्ट पकडायला हवी. नव्या जगात सामील होताना आपलं असं आपल्यासोबत काय असणार आहे, हा विचार करायला हवा. त्यासाठी परंपरेतले असे काही घटक शोधायला हवेत, ज्यांच्या साहाय्यानं तरता येऊ शकतं. एक उदाहरण देते. महानगरांत शिकायला येणारी खेड्यांमधली मुलं आपण पाहतो. या अ-नागरांना औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात आणताना, नागरी शिक्षण देताना त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो आणि त्यांना चुकीच्या मार्गाला नेऊ शकतो. पण ते जिथून आले, तो त्यांचा समाज, त्यांची भाषा, वातावरण, पर्यावरण यातून त्यांच्यापाशी एक वेगळं संचिताचं गाठोडं असतंच. ते महत्त्वाचं आहे आणि या गोष्टीचा नव्या दृष्टीनं अभ्यास होऊ शकतो, असं त्यांना कळल्यास तो न्यूनगंडही नाहीसा होतो. नव्या आत्मविश्वासानं त्यांना नव्या जगाला सामोरं जाता येतं, उभं राहता येतं. म्हणजे पाय टेकायला जमीन नाही, अशा अवस्थेत पुढच्या पिढीला जावं लागता कामा नये. एकीकडे आपण संस्कृती नष्ट होत असल्याची खंत व्यक्त करतो, पण त्याचबरोबर आपल्याकडे काय आहे, ते नाही का पाहणार? ते तुमच्याच आयुष्यातून, तुमच्याच भूतकाळातून तुम्हाला मिळणार आहे. मला असं वाटतं, औषधी वनस्पतींचं ज्ञान असेल, पर्यावरणाचे वेगवेगळे आडाखे आणि जाणीव असेल, ते संचित घेऊन आदिवासी तुमच्यापर्यंत येतात. त्यांच्याकडे बघण्याची नवी दृष्टी त्यातून मिळू शकते. मौखिक इतिहासाचं भांडार असलेली ग्रामसंस्कृतीतली मुलं आपण शोधायला हवीत. अशा कितीतरी गोष्टी आहेत, ज्यातून बरंच सापडू शकतं. ते बाहेरच्या जगाला नवं असेल. असा अभ्यास व्हायला पाहिजे.

**एकटेपणाच्या वाढत्या बेटांचं प्रतिबिंब साहित्यात पडतं आहे का?**

– खरं म्हणजे आपली ती प्रकृती नाही. तरीही माणूस हा समाजशील प्राणी आहे, ही व्याख्याच आताशा चक्रावून टाकते आहे. वाढत्या आत्मकेंद्रिततेमुळं माणूस अधिकाधिक एकटेपणाकडं झुकत चालल्याचं दिसतं आहे. पण काळ असा बदलतो आहे की, हा एकटेपणा माणूस सहनच करू शकणार नाहीये. त्यामुळं मला वाटतं, काळच त्यावर उत्तर देणार आहे. ही आत्मकेंद्रितता मोडणं ही खूप आवश्यक गोष्ट आहे. ती मोडून एकमेकांचे हात धरणं, ही अटळ गोष्ट आहे. त्यावर काळ हाच उपाय आहे.

**– माणसाला सावरणारं घर, कुटुंब, मैत्र, सामाजिक परिसर लाभायलाही नशीब लागतं ना?.. 'कौतुकाच्या ओल्या दुष्काळात सापडून मी संपले असते, पण नाही संपले. याचं कारण एकूणच आमचं घर आणि मुख्यतः अण्णा..' असं तुम्ही एका ठिकाणी म्हटलंय...**

– हो, फार चांगलं कुटुंब मला मिळालं. एका आदर्श कुटुंबात जन्माला आले. भौतिक, ऐहिक सुखसोयी, समृद्धी नसली तरी त्याची जाणीवही होऊ नये, अशी वैचारिक संपन्नता लाभली. भावनात्मक ओलावा मिळाला. कुटुंबातलं प्रेम आणि आधार मिळाला. मुख्यतः विश्वास मिळाला. ही फार मोठी गोष्ट आहे. आमच्याकडे सख्खे नातेसंबंध फारसे नव्हते. पण विविध प्रकारच्या आणि स्तरांवरच्या स्त्री-



**आपण या प्रवाहात ढकलले जात आहोत. बुडतो आहोत. पण न बुडता यातून बाहेर यायचं असेल, तरायचं असेल तर इतिहास आणि परंपरेची पारंबी शोधायला हवी, तुमच्या हातात असलेली घट्ट पकडायला हवी. नव्या जगात सामील होताना आपलं असं आपल्यासोबत काय असणार आहे, हा विचार करायला हवा. त्यासाठी परंपरेतले असे काही घटक शोधायला हवेत, ज्यांच्या साहाय्यानं तरता येऊ शकतं.**






पुरुषांशी बोलताना, वावरताना ते कसे स्वीकारावे, याचं आम्हाला कुटुंबातून मिळत गेलेलं शिक्षण खूप मोलाचं होतं. तो विश्वास निभावता आला. असं उबदार, आपल्याला सतत लाह्यांसारखं फुलवत ठेवणारं घर मिळणं ही फार आश्वस्त करणारी गोष्ट होती. समाजात वावरताना किती दिशा खुणावत असतात, निरनिराळे मोह वाटेवर येत असतात. आपला कस बघतात. अशा वेळी आवश्यक असणारी वैचारिक स्थिरता; आपली प्रकृती, पिंड ओळखून विवेकाची कास धरणं यासाठी घरचे संस्कार ही खूप मोठी गोष्ट असते. आज प्रत्येकजण पैशामागे धावतोय. मुलांना स्पर्धेत टिकण्यासाठी तयार करणं किंवा पैसे मिळवण्यासाठी सक्षम करणं हीच अनेकांची वृत्ती असते. त्यापलीकडं जाऊन चांगला माणूस होणं, ही गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. आजच्या युवा पिढीनं हे लक्षात घ्यायला हवं. सर्वार्थानं बदलत्या काळात समृद्ध विचारी माणूसपण असणं हे आवश्यक आहे. भौतिक सुखाचा किती ध्यास घ्यायचा, याचं भान बाळगायला हवं.

**आज विशीत असलेल्या पिढीला काय सांगाल?**

– एक म्हणजे, अभिव्यक्तीचं जे माध्यम तुमच्या हाताला लागलेलं असेल – म्हणजे उदाहरणार्थ माझं लिखाण – तर जे काही – ते फक्त खेळ, मनोरंजन, हौस म्हणून हाताळू नका, त्यापलीकडे जा. त्यात स्वतःला उत्कटतेनं झोकून द्या. वेळप्रसंगी त्यासाठी किंमत द्यावी लागली तर तीही मोजा. त्यातून आपल्याला खूप काही गवसत जातं. आपोआप ते समाजाच्या उपयोगी पडतं. आपण मराठी माणूस म्हणून, भारतीय म्हणून, अजूनही जगाला पुष्कळ काही देऊ शकतो. वाडवडिलांनी केलेली डोंगराएवढी कामं दुर्लक्षून नव्या गोष्टींकडं अनेकजण चालले आहेत. ते सोडून, त्या ज्ञानाच्या शिदोरीचा योग्य वेळी योग्य तो उपयोग करून घेणं आवश्यक आहे. पुढं जाण्यासाठी त्यातली फोलपटं काढून टाकणं आवश्यक आहे. यासाठी थोडी निष्ठा असणं, थोडं स्वतःमध्ये उतरून आत्मचिंतन करणं हेही गरजेचं आहे. म्हणजे लोकान्ताची खूप सवय असते आपल्याला, पण त्यातून एकान्ताकडे जायला हवं. लोकान्त आणि एकान्त यांचा एक महासन्मवय राखण्याची वेळ येऊन ठेपली आहे. म्हणजे लोकान्त हवाच, कारण त्याशिवाय समाजाचं आकलन होणार नाही, सामाजिक भानही टिकणार नाही. पण त्याच्यातून तुम्हाला एकान्तात येऊन थांबावंच लागेल. त्याची तयारी नसते. घाबरतात साहित्यिक. एकटे घाबरतात किंवा नकोच वाटतं. कारण लौकिकाची  खूप आकर्षणं भुलवत असतात. नव्या पिढीनं हे दोन्ही बाजूला ठेवलं तर मला असं वाटतं, या दोन्हीची एक छान सांगड घालून, समन्वय साधून समाजसमृधदीचं दालन उघडू शकतं.

**हे धाडस नवीन पिढी करू शकेल?**

– नक्कीच. मला विश्वास आहे असा. त्यांच्याबद्दल मी मुळीच निराशावादी नाही. दोन्ही प्रकारची माणसं कुठल्या समाजात नसतात? त्र्यं. वि. सरदेशमुखांचं एक छान विधान मला नेहमी आठवतं. ते म्हणायचे, 'जेवढी कणसं तेवढी धाटं असणारच' त्याचाही उपयोग असतोच. तर असा समन्वय राखायला हवा. काळाविषयी, नव्या मुलांविषयी तक्रार नका करू. माझ्या मनात तर नाहीच आहे. मला असं वाटतं, होईल, सारं चांगलं होणारच आहे..

**– मला वाटतं, 'लोकान्तात राहून एकान्तात वाढलेली समन्वयवादी' याच शब्दांत तुमची ओळख सांगायला हवी आणि असाच पसायदानाचा संदेश घेऊन तुम्ही अमेरिकेला जाताय..**

(मुलाखत संवादक : आल्हाद गोडबोले,
शब्दांकन : अदिती आनंद, राधिका कुंटे
भ्रमणध्वनी : ९८६९१०४२०८, ९८२००८९३७६)



**लोकान्ताची खूप सवय असते आपल्याला, पण त्यातून एकान्ताकडे जायला हवं. लोकान्त आणि एकान्त यांचा एक महासन्मवय राखण्याची वेळ येऊन ठेपली आहे. म्हणजे लोकान्त हवाच, कारण त्याशिवाय समाजाचं आकलन होणार नाही, सामाजिक भानही टिकणार नाही. पण त्याच्यातून एकान्तात येऊन थांबावंच लागेल. त्याची तयारी नसते. घाबरतात साहित्यिक. एकटे घाबरतात किंवा नकोच वाटतं. कारण लौकिकाची खूप आकर्षणं भुलवत असतात. नव्या पिढीनं हे दोन्ही बाजूला ठेवलं तर मला असं वाटतं, या दोन्हीची एक छान सांगड घालून, समन्वय साधून समाजसमृधदीचं दालन उघडू शकतं.**



*प्रसिद्ध कवयित्री ही अरुणा ढेरे यांची सर्वात पहिली ओळख. त्यांच्या कविता या पिढीतील श्रेष्ठ कवींच्या पंक्तीतील निश्चित आहेत. तिचा पैस खूप मोठा आहे. विलक्षण संवेदनशील मनाने त्यांची कविता मनाचा तळ आणि अंतराळ कसा शोधते, याचे एक उदाहरण म्हणून सोबत त्यांच्या या दोन कविता...*

## कृष्ण

तुला नाही सूर्य झाकता आला
आणि घूँघट ओढून अंधार झाला,
असा देखावाही नाही करता आला
राधे, तुझ्या चेहऱ्यावर त्या दिवशी प्रत्येकाने पाहिली –
मुकी कासाविस संध्याकाळ,
आणि नंतर दूर डोंगरात धडाडून पेटला...
वणव्याचा केशरी जाळ

अर्ध्या रस्त्यात सोडला हात तुझा, घात केला त्यानं
बिनमोलाचं केलं अवघं आयुष्य एक निरोप घेण्यानं..
हात हललेला तू पाहिलास!
रथ चाललेला तू पाहिलास!
पण खिळून राहिलीस ठायीच, नाही धावलीस मागे आवेशानं..

कळलं न तुला
शेवटी मनापासून मन दूर जातं
तेव्हा कुणाला कशाचाच अडसर उरत नसतो ..
ना अंगाचा, वासना-शपथांचा फास
श्वास अडतो की घुसमटतो याचा विचारही नसतो,
जाणाऱ्याच्या मनात .
काल होते हात हातात, आज नाहीत.
संबंधाचा अर्थ सामावतो एवढ्याच साध्या वस्तुस्थितीत.

हवं ते हवं तेव्हा घेतो तो, मिळवतो, खेळवतो, मालावतो.
त्याच्यातून त्याच्याचसाठी उगवतात स्वीकार..नकार
जग त्याच्याभोवती तो सहज वळवतो

त्याच्या ओळखीआड असते एक अदय अनोळख
तो यमुनेच्या जळात कधी कान्हा होऊन हसतो..
तर कधी कालिया होउन डसतो..
राधे, पुरूष असाही असतो ...

## अनय

नक्षत्रांच्या गावातून उतरली होतीस तू त्याच्या घरात;
मेघश्याम आभाळाची ओढ तुझ्या रक्तातच होती
हे समजलं होतं त्याला, अगदी पहिल्यापासून,
तुझ्या बाईपणाची जात विजेची, शेजेला घेता न येणारी
ओळखून होता तो आतून, आतून, खोल मनातून
तुझ्या झिळमिळ स्वप्नांच्या मोरपिसांना
त्याने कधी देऊ पाहिले नाहीत आपले डोळे
आणि नाही गढूळ केले कधी तुझ्या देहात हिंदकळणारे
धुंदमदिर निळे तळे.

त्याच्या मृण्मय आयुष्यात उमटली होती
अमराचा अळता लावलेली तुझी पावले
घरात तुझ्या असण्याचा अविनाशी गंध होता;
काठोकाठ भरून होता तो नुसत्या तुझ्या आसपास वावरण्याने
तुझ्याशी खोलवर कृतज्ञ होता
पाहिलं त्यानं तुला उंच बेभान उसळताना
रात्रीच्या रसज्ञ काळ्या अंधारात मिसळताना
मधुर विषाचे घोट खुळ्या ओठांनी आकंठ घेताना
पिसावताना, रसावताना,
अस्तित्वाचा कणन्कण
प्रेमाच्या चेहऱ्यावर उत्कट उधळून देताना.

कळली त्याला तहान तुझ्या तृप्तीला लागलेली अतृप्तीची
दुःखाचं नख लागलेल्या काळजाची तडफड कळली शर्थीची
कळली कशी असते प्रेमात स्त्री भरतीची आणि सरतीची.
तू हरलीस हे त्याला कळलं, पण निरर्थाच्या वाटेवर
हरवली नाहीस, स्वत्व सांभाळून उरलीस तशीच, हेही कळलं
त्यानं पुढे होऊन तुझ्या पापणीवरचा शोक टिपला,
त्या क्षणी, राधे तुला तुझा पुरुष भेटला.
पुरुष-जो क्षमा करून नाही ऋणी करत
पाठ फिरवून नाही उणी करत
घेतो समजून, सावरतो, आवरतो, उराशी धरतो
आपल्या नसलेल्या स्वप्नांसाठीही आपल्या काळजाचं घर करतो.
राधे, पुरुष असाही असतो!



# ...इथे चातुर्य शहाणे झाले!

प्लास्टिक सर्जरी आणि ज्ञानेश्वरी अशा दोन अगदी भिन्न क्षेत्रांत अधिकार मिळवलेले **डॉ. रविन थत्ते** हे प्रसिद्ध साहित्यिकही आहेत. डॅलस येथे होत असलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १९व्या द्वैवार्षिक अधिवेशनात त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा लाभ अमेरिकेतील मराठी बांधवांना होणार आहे. अशा या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाच्या वैचारिक अंतरंगात डोकावणारी – **धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, दीपक करंजीकर, अरुण जोशी, रंजन जोशी** यांच्याबरोबरच्या मैफलीत रंगलेली – मुलाखत

**तुम्ही व्यवसायानं प्लास्टिक सर्जन आहात. तुमचं एकंदरच आयुष्य बघता आणि तुमचं अध्यात्मावरचं लिखाण बघता तुम्ही सर्जनशील आहात हे ध्यानात येतं. शस्त्रक्रिया करणं आणि सर्जनशील असणं ह्यात विरोधाभास आहे का? ही सर्जनशीलता कशी, कुठून निर्माण होते?**

जसा सुतार, लोहार, माळी किंवा कुंभार सर्जनशील असतो तसाच शरीरावर शस्त्रक्रिया करणारा सर्जनशील असतो. प्लॅस्टिक सर्जरीचे


संस्कृत-मराठीतलं, नाव सुघटन शल्यचिकित्सा असं आहे. वर म्हटलेले सगळे कारागीर सुघटनच करत असतात. म्हणजे ते घाव घालत असतील किंवा काटछाट करत असतील, पण त्यातून सुघटनच होते. कुंभार मातीतून घट करतो तसाच प्लास्टिक सर्जन शरीराचा एखादा भाग अपघाताने मातीमोल होऊन विस्कळीत झाला असेल किंवा जन्मत: बेढब असेल तर त्यावर सुघटन करून तो पूर्ववत करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा तुम्ही म्हणता तसा त्यात विरोधाभास नाही. मी केलेल्या लिखाणातल्या सर्जनशीलतेबद्दल एवढंच म्हणेन की माझे एक मामा, कवी मायदेव, आणि माझी आई मी शाळेत होतो तेव्हा लघुकथा लिहीत असे. मला वाटतं मी लिखाण केलं ते सगळं तिथून आलं. 'वाहतो ही दुर्वांची जुडी' असं एका नाटकाचं नावं होतं. तसंच आपणही 'वाहतो ही जनुकांची जुडी' असे असतो. आपण जे करतो त्याचं श्रेय स्वत: घेऊ नये, त्यांची कारणमीमांसा शोधावी. त्यात पूर्वजांचं संचित, तत्कालीन आपल्या आयुष्यातली परिस्थिती आणि अचानक जुळून आलेले योगायोग ह्याकडे बारकाईनं बघावं आणि मगच आपल्या तथाकथित कर्तबगारीबद्दल हिशोब मांडावेत असं मला ज्ञानेश्वरांनी शिकवलं. निसर्गाच्या प्रवाहात आपला दिवा लागतो, त्याची वात आणि तेल ह्याकडे आपण लक्ष देऊ शकतो, परंतु आपणच दिवे लावतो आहोत असं समजणं घातक असतं.

**तुमच्या बालपणाबद्दल थोडं सांगा.**

माझा जन्म १९३९ सालचा. आता मी ऐंशी वर्षांचा आहे. त्या काळातल्या पांढरपेशा, सुशिक्षित, पुरोगामी ब्राह्मण कुटुंबात माझा जन्म झाला. हे माझं प्रारब्ध. त्यावरच सगळं पुढचं घडलं. अशा तऱ्हेनं जन्माला येणं हे सुदैवच म्हणायला हवं. त्याकाळात शिक्षणासाठी मुलांनी चुलत-मावस कुटुंबाकडे राहणं हे रूढ होतं. माझे एकूणच सगळे नातेवाईक राष्ट्रप्रेमानं भारित आणि साधी राहणी असणारे होते. व्यवसायानं आणि चारित्र्यानं निष्कलंक होते. त्यांचा प्रभाव माझ्यावर पडणे अपरिहार्य होते. पुढे माझ्या आयुष्यात जे घडलं त्याचं श्रेय या प्रभावांना. त्या काळात माझ्या सगळ्याच नातेवाईकांच्या घरात टिळक आणि गांधींचं (त्या क्रमानं) अस्तित्व प्रखरतेनं जाणवत असे. आंबेडकर, फुले नंतर भेटले. बहुतांश नातेवाईकांचा कल डावीकडे होता. समाजवादी एस.एम. उपाख्य अण्णा जोशी आणि साम्यवादी डांगे ह्यांना आप्त म्हणावं इतकी त्यांची आणि आमच्या कुटुंबाची जवळीक होती. तेव्हा समाजातल्या विषमतेबद्दल त्यांच्या त्यांच्या परीने कानावर पडत होतंच. आंबेडकर-फुले प्रत्यक्षपणे चाळिशीत पुढे आल्यावर कळले. परंतु तोवर सगळ्याच स्तरावर ह्या सगळ्यांनाच आपापल्या जातींमध्ये वाटून घेतलं गेलं आणि त्यातल्या बहुतेक जणांचा राजकारणासाठी उपयोग करण्यापलीकडे विचारही झाला नाही. अशा स्थितीत ज्ञानेश्वर भेटले आणि त्यांनी त्यांच्या परीनं मला माझीच ओळख पटवून दिली. आणि त्यामुळे मला शांतता मिळाली आणि ज्याला तुम्ही सर्जनशीलता म्हणता तो प्रवास जास्त सुखकारक झाला. ज्ञानेश्वरीला सुद्धा विषमतेचे गालबोट आहे आणि गाथा आणि दासबोधही त्याला अपवाद नाहीत. त्या-त्याकाळची प्रतिबिंबं त्या त्या काळच्या वाङ्मयात पडतातच. आइनस्टाइनसारखा प्रखर वैज्ञानिकही त्याच्या धार्मिक विचारांना तिलांजली देऊ शकला नाही. वर्ण, वंश, प्रांत, भाषा, ज्ञाति, देश ह्या गोष्टी माणसाला त्याचं अस्तित्व बहाल करतात, परंतु त्या शापही ठरू शकतात. पण, ह्या किंवा तत्सम गोष्टी माणूसजात असेपर्यंत टिकणार आहेत. तथाकथित सुशिक्षित पुरोगामी आणि उत्क्रांत कुटुंबांनी त्यांच्यापलीकडे जाऊन इतरांशी किती घरोबा केला आहे हे बघणं मोठं उद्बोधक ठरेल. मला वाटतं, असले घरोबे इथेच नाही तर परदेशातही अपवादात्मकच आहेत. म्हणतात तसं अपवादच नियम ठरवतात. ती वस्तुस्थिती आहे. आपल्या परीनं त्यापलीकडे जाणं एवढंच उरतं. त्या परिस्थितीमुळे उदास होणं निसर्गाला डावलण्यासारखं आहे.

**तुम्ही पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना योगायोग हा शब्द वापरला आहे, त्याबद्दल थोडं सांगा.**

ज्या आईबापाच्या पोटी मी जन्मला आलो त्याचं चित्र माझ्यात उमटणं स्वाभाविकच. माझ्या आईनं विश्वास बसणार नाही इतक्या प्रतिकूल परिस्थितीत गुजरातमधल्या एका मागास जिल्ह्यात १९५० साली कुटुंबनियोजनाचा प्रचार केल्याचे आठवतं. माझे वडील एक देखणे, उमदे, सगळ्या




**त्या-त्याकाळची प्रतिबिंबं त्या त्या काळच्या वाङ्मयात पडतातच. आइनस्टाइनसारखा प्रखर वैज्ञानिकही त्याच्या धार्मिक विचारांना तिलांजली देऊ शकला नाही. वर्ण, वंश, प्रांत, भाषा, ज्ञाति, देश ह्या गोष्टी माणसाला त्याचं अस्तित्व बहाल करतात, परंतु त्या शापही ठरू शकतात. पण, ह्या किंवा तत्सम गोष्टी माणूसजात असेपर्यंत टिकणार आहेत. तथाकथित सुशिक्षित पुरोगामी आणि उत्क्रांत कुटुंबांनी त्यांच्यापलीकडे जाऊन इतरांशी किती घरोबा केला आहे हे बघणं मोठं उद्बोधक ठरेल.**

**मी विद्वान नाही, नव्हतोही आणि होणारही नाही. मात्र मी एक चाणाक्ष, खटपट्या माणूस आहे. आपण जे करतो आहोत ते गरीब देशांसाठी उपयुक्त आहे, हे कळल्यावर माझ्या चलाख डोक्यातून कल्पनांचं भरपूर पीक उगवलं. सगळ्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये माझा राबता सुरू झाला. अनेक परिषदांमध्ये निमंत्रणं आली आणि एकेकाळी नापास झालेल्या मला एका फार मोठ्या परदेशी विद्यापीठानं पुढे त्यांची अत्युच्च पदवी माझ्या गळ्यात माळेसारखी अडकवली. ह्या प्रवासात माझा एकच ध्यास होता. मला अपघातानं आणि नियतीनं दिलेलं यश भारताचं आहे हे सांगण्यासाठी परदेशच्या वाऱ्या करणं, तिथे लोकसंग्रह करणं आणि त्यातून माझ्या विद्यार्थ्यांना संधी प्राप्त करून देणं. त्यात मी यशस्वी ठरलो.**

सहकाऱ्यांना वाव देणारे, भ्रष्टाचाराचा स्पर्शही न झालेले एक अतिशय चाणाक्ष सरकारी डॉक्टर होते. मुंबईत कामगारस्वास्थ्य विमा योजनेत भ्रष्टाचार माजला होता तेव्हा त्याचं निराकरण करण्यासाठी माझ्या वडिलांची नेमणूक झाल्याचं आठवतं. लहानपणी मी खूप व्रात्य आणि चतुर पण अभ्यासात ढ होतो. वार्षिक संमेलन, खेळ, सहली ह्यामध्ये मी प्रवीण होतो. मॅट्रिकला मी पास झालो तेव्हा वर्गात शेवटाहून पहिला आलो. आईला माझ्या काळजीनं ग्रासलं होतं. एका वर्षात ती गेली. जायच्या आधी तिनं मला एक पत्र पाठवलं. त्यात अभ्यासाशिवाय तरणोपाय नाही असं एक वाक्य होतं. ती गेल्यावर मी अभ्यासाच्या प्रांतात शिरलो. इंटर सायन्सला विज्ञानविषयांपेक्षा भाषेच्या (इंग्रजी आणि मराठी दोन्ही) पेपरमध्ये जास्त गुण मिळवून मुंबईला मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. तिथे परीक्षेत मार्क कसे मिळवायचे ह्याचं तंत्र मला हळूहळू कळलं. मेडिकल कॉलेजेसमध्ये तोंडीपरीक्षा असत, त्यात माझा हातखंडा होता. पुढे एमबीबीएस, एमएस असा प्रवास झाला. पण पुढे आई गेल्यानंतरचा दुसरा झटका बसला. एक सर्जन म्हणून प्लास्टिक सर्जरीकडे माझा कल होता. त्याचे वर्ग मी भरत होतो तेव्हा त्या पदव्युत्तर परीक्षेला मी बसावं असं माझ्या शिक्षकांचं म्हणणं होतं. तेव्हा व्यवसायाकडे दुर्लक्ष करून, अभ्यास करून मी त्या परीक्षेला बसलो आणि नापास केला गेलो. मला अंधारून आलं, परंतु जवळजवळ लगेचच तिसरा योगायोग व्हायचा होता. परदेशात प्लास्टिक सर्जरी शिकवण्यासाठी त्या काळात मी डझनावारी पत्र पाठवत असे, पण सगळ–ीकडून नकार घंटा वाजत असत, मात्र ह्या परीक्षेतल्या अपयशाच्या अंधारात असताना– जिथे मी अर्ज केला नव्हता, तिथून 'मला तुमच्याबद्दल माहिती कळली आहे, तुम्ही कधी रुजू होता ते कळवावं' असं पत्र अमेरिकेतून आलं आणि अपयशाला गिळंकृत करून मी माझ्या बॅगा भरल्या.

**अमेरिकेत जे शिकलात त्याचा भारतात येऊन तुम्ही काय उपयोग केलात?**

या प्रश्नाचं उत्तर 'शून्य' असं आहे. याचं कारण तिथल्या आणि इथल्या परिस्थितीत जमीन–अस्मानाचा फरक होता हे एक, आणि दुसरं कारण मी तथाकथित शिक्षण घेऊन परत आलो खरा पण मला प्लास्टिक सर्जरी विभाग मिळायला त्यानंतर पाच वर्षं लागली. त्या काळात टिळक रुग्णालयात शंभर रुपये महिना एवढ्या मानद भत्त्यावर आणि दुपारनंतर खाजगी व्यवसाय करत मी संसार केला. परिस्थिती बिकट होती. मी प्लास्टिक सर्जन पण अधिकृत नाही म्हणून ते काम येत नसे आणि जनरल सर्जन ही ओळख माझ्या प्लास्टिक सर्जन ह्या अमेरिकन शिक्क्यामुळे पुसली गेली होती. तीही पाच वर्षं गेली. मात्र त्या काळात जेव्हा केव्हा विभाग मिळेल तेव्हा अमेरिकेत शिकलेलं पुसून इथे काय करता येईल ह्याचे पाढे मी मनात वाचत असे आणि झाले तसंच. तिथेही एक विलक्षण योगायोग घडला. मला विभाग मिळाल्यावर सगळ्यात मोठा प्रश्न होता तो जखमी रुग्णांच्या हातापायावरच्या त्वचारोपणाचा. त्वचा इकडून तिकडे नेण्यासाठी कधी कधी दोन पाय एकमेकांना तीन आठवडे बांधून ठेवावे लागत आणि तिसऱ्या वर्गाचा स्लीपर कोच असावा, त्याप्रमाणे रुग्णांची चळत लागत असे. ह्या परिस्थितीवर मला एक उपाय सुचला, तो यशस्वी झाला आणि मी आनंदानं नाचायचाच बाकी राहिलो होतो. हे तंत्र वैज्ञानिक नियतकालिकात देण्याचा विचारही मनामध्ये नव्हता, पण एका मित्राच्या आग्रहाखातर मी ती पद्धत एका परिषदेत मांडली. मी नवखा होतो. आदल्या रात्री परिषदेची समुद्रसफर झाली होती. मंडळींनी भरपूर घेतली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आठला मी बोलायला उभा राहिलो तेव्हा सभागृहात फक्त पाचच इसम हजर होते. त्यातला एक फिरंगी होता. माझे सचित्र निवेदन संपलं. तो फिरंगी माझा पत्ता घेऊन गेला. तीन दिवसांनी टिळक रुग्णालयात आला आणि त्यानं त्यांची ओळख करून दिली. तो होता एका सगळ्यात मातब्बर इंग्रजी पुस्तकाचा संपादक. तो म्हणाला, मला तुमची पद्धत माझ्या पुस्तकात छापायची आहे; मला परवानगी द्या. मला कॉपीराइट म्हणजे काय तेच माहीत नव्हतं. मी दिली सही ठोकून. ते संशोधन पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत आलं आणि एकेकाळचा ढ आणि प्लास्टिक सर्जरी परीक्षेत नापास झालेला एक तरुण एकदमच नावारुपाला आला. सगळेच सर्जन माझ्याकडे आदरानं बघू लागले. मग मात्र मी मागे वळून बघितलं नाही.

**तुमच्या पुढच्या वैज्ञानिक प्रवासाबद्दल काय सांगाल?**

त्या एका योगायोगाच्या घटनेनंतर हे लक्षात आलं की आपण भारतीयसुद्धा असलं काही करू शकतो. मी विद्वान नाही, नव्हतोही आणि होणारही नाही. मात्र मी एक चाणाक्ष, खटपट्या माणूस आहे. आपण जे करतो आहोत ते गरीब देशांसाठी उपयुक्त आहे, हे कळल्यावर माझ्या चलाख डोक्यातून कल्पनांचं भरपूर पीक उगवलं. सगळ्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये माझा राबता सुरू झाला. अनेक परिषदांमध्ये निमंत्रणं आली आणि एकेकाळी नापास झालेल्या मला एका फार मोठ्या परदेशी विद्यापीठानं पुढे त्यांची अत्युच्च पदवी माझ्या गळ्यात माळेसारखी अडकवली. ह्या प्रवासात माझा एकच ध्यास होता. मला अपघातानं आणि नियतीनं दिलेलं यश भारताचं आहे हे सांगण्यासाठी परदेशच्या वाऱ्या करणं, तिथे लोकसंग्रह करणं आणि त्यातून माझ्या विद्यार्थ्यांना संधी प्राप्त करून देणं. त्यात मी यशस्वी ठरलो. माझे अनेक विद्यार्थी माझ्यामुळे परदेशात शिकले आणि त्या शिकवणीचं त्यांनी इथे भारतात येऊन सोनं केलं. शेवटी आपला मास्तर जर परदेशातून परत येऊन इथे काहीतरी करू शकतो तर मग आपण का नाही, असा विचार त्यांच्या मनात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. हे माझं सगळ्यात मोठं यश. मला लौकिक अर्थानं जे सन्मान मिळाले त्याची यादी देणं ज्ञानेश्वरांच्या मते योग्य ठरणार नाही. एका मित्रानं खूप मेहनत घेऊन मला विकिपीडियात प्रवेश दिला आहे. तिथली नोंद बघून तुमचं सोडा, मलाच बोटं तोंडात घालावीशी वाटतात आणि तिथली माहितीही अपूर्ण आहे.

**तुमच्या बोलण्यात ज्ञानेश्वरांचा उल्लेख वारंवार येतो. तुम्ही ज्ञानेश्वरीवर दहाएक पुस्तकं लिहिली आहेत, त्याबद्दल थोडं सांगाल?**

तुमचा विश्वास बसो अथवा न बसो, माझ्यासारख्या स्वभावाच्या माणसाच्या आयुष्यात ज्ञानेश्वरीनं प्रवेश करावा हीदेखील एक अकल्पित घटना होती. मी चाळिशीत होतो तेव्हा माझ्या कुटुंबात एक भयानक घटना घडली. माझं वैज्ञानिक/ व्यावसायिक आयुष्य भरभराटीला येत असताना हे भयंकर घडलं आणि असं काहीतरी घडणार आहे असं मला माझं मन सांगत होतं. त्या विचित्र परिस्थितीनं मी हतबुद्ध होऊन गांजल्यासारखा झालो, तेव्हा औषध घ्यावं तसं हातात ज्ञानेश्वरी घेतली आणि तेव्हापासून मला त्या पुस्तकांचा नाद लागला आहे. त्याला व्यासंग म्हणणं जरा अतिशयोक्तीचं होईल. व्यासंगी माणसाचा स्तर जरा उंच असतो. शिवाय धर्माचं पुस्तक म्हणून मी तिकडे वळलो नव्हतो. कारण घरात लहानपणी धर्मांचे संस्कार शून्य होते. मी उत्तरं शोधत होतो. सर्वप्रथम ज्ञानेश्वरांच्या भाषेनं मला मोहिनी घातली. अशी मोहिनी पडेल असं विधान ज्ञानेश्वरांनी स्वत:च केलं आहे. परंतु त्यानंतर त्याच ओळीत केवळ काही अधिकारी व्यक्तींनाच माझ्या लिखाणाचा अर्थ समजेल असंही सांगून ठेवलं आहे. ते तसं समजणं अवघडच होतं. एक मात्र नक्की, ज्ञानेश्वर मला माझी गोष्ट मात्र समजावून सांगत होते हे लक्षात येत होतं. परंतु त्यातलं तत्त्वज्ञान म्हणजे काय हे ध्यानात येईना.

माझ्या आयुष्यात एका-दोघांना विचारण्याचा प्रयत्न केला पण मला वाटतं त्यांना माझ्यामधली आंतरिक ओढ लक्षात आली नाही. म्हणून मी एकलव्य झालो. व्यवसायाला मुरड घालत जवळजवळ सगळी ज्ञानेश्वरी अर्थासकट वर्ष-दोन वर्षांत मोठमोठ्या बाडांत लिहून काढली आणि म्हणतात ना ज्ञानेश्वरीबद्दलचं माझं दैव मला शोधत आलं. मी ज्या खाजगी रुग्णालयात काम करत होतो त्यांनी एक अंक काढायचं ठरवलं. मला म्हणाले, तुम्ही लिहा. माझं डोकं तिरपं असल्यामुळे मी त्यांना म्हटलं, मी मराठीत लिहीन, कारण इथले सगळे कर्मचारी मराठी वाचतात. इतर डॉक्टरांनी इंग्रजीत लिहिलं. 'चातुर्य शहाणे झाले' ह्या ज्ञानेश्वरीतल्या तीन शब्दांवर मी निबंध लिहिला. ते लिहिताना मला त्या शब्दांमधला फरक पहिल्यांदा जाणवला आणि त्या रुग्णालयाच्या कामगारांनाही कळला. तिथे होऊ घातलेला संप कामगारांच्या वतीनं मी मध्यस्थ होऊन टाळला. दोन्ही बाजू शहाणपणानं वागल्या आणि मला एक नवं क्षितिज खुणावू लागलं. पाच-सहा वर्षांची तपश्चर्या पन्नासएक निबंधांत माझ्या लेखणीतून अवतरली. ते एका प्रकाशकानं तत्परतेनं स्वीकारलं आणि ते पुस्तक प्रसिद्ध झालं. मी नवखा लेखक होतो म्हणून त्या पुस्तकाचा खर्च मीच केला. परंतु दीडदोनशे मित्रांना प्रकाशन समारंभाला बोलवून पहिल्याच दिवशी पुस्तकाचा खर्च वसूल




**ज्ञानेश्वरीबद्दलचं माझं दैव मला शोधत आलं. मी ज्या खाजगी रुग्णालयात काम करत होतो त्यांनी एक अंक काढायचं ठरवलं. मला म्हणाले, तुम्ही लिहा. माझं डोकं तिरपं असल्यामुळे मी त्यांना म्हटलं, मी मराठीत लिहीन, कारण इथले सगळे कर्मचारी मराठी वाचतात. इतर डॉक्टरांनी इंग्रजीत लिहिलं. 'चातुर्य शहाणे झाले' ह्या ज्ञानेश्वरीतल्या तीन शब्दांवर मी निबंध लिहिला. ते लिहिताना मला त्या शब्दांमधला फरक पहिल्यांदा जाणवला आणि त्या रुग्णालयाच्या कामगारांनाही कळला. तिथे होऊ घातलेला संप कामगारांच्या वतीनं मी मध्यस्थ होऊन टाळला. दोन्ही बाजू शहाणपणानं वागल्या आणि मला एक नवं क्षितिज खुणावू लागलं.**




**वीस वर्षं लढा दिल्यावर तो भूखंड आम्ही सगळ्यांनी परत वाचवला. पुढे झोळी घेऊन माहीम उपनगरात मी प्रदक्षिणा घातल्या. पैसे जमवले. एक ट्रस्ट स्थापन केला आणि तिथे पहिला वृक्ष लावला. आज त्या भूखंडावर शंभर वृक्ष उभे आहेत. खुर्च्या आहेत. व्यायामाची साधनं आहेत. चालण्यासाठी–पळण्यासाठी मार्ग आहे आणि स्केटिंग रिंक आहे. मी तिथे एक-दोन फूट उंचीचा वड लावला होता त्याचा एक प्रचंड वृक्ष झाला आहे. त्याच्या सावलीत बसतो आणि त्याला म्हणतो, आठवतंय तुला किती लहान होतास, तू तरुण झाला आहेस आणि मी म्हातारा. पण हा निसर्गक्रम आहे आणि तो मला ज्ञानेश्वरांनी शिकवला आहे.**

केला ते माझं पहिलं पुस्तक. पहिलं अपत्य. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्या पुस्तकाचं नाव 'जाणीव'. त्याचे हक्क मी पुढे विकले आणि ते पैसे माझ्या एका पर्यावरणाच्या लढ्यासाठी वापरले. परंतु त्या आधी इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या माझ्या मुलांकडे बघत आणि एकंदरच महाराष्ट्रातली परिस्थिती बघता ज्ञानेश्वरीचं इंग्रजी भाषांतर करण्याचं ठरवलं. व्यवसायाला आणखी मुरड घातली. सहा वर्षं मानेवर खडा ठेवून ते भाषांतर केलं. परदेशात मी वैज्ञानिक निबंध लिहिले, तेव्हाही माझ्या इंग्रजीत चुका निघाल्या नव्हत्या. तसेच इथे झाले. ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची सोनिया खरे माझी संपादक होती. तिनं अनेक उपयुक्त सूचना केल्या आणि ते पुस्तक जन्माला आलं. मग मी ज्ञानेश्वरांना थोडा वेळ बाजूला ठेवलं आणि ह्या पुस्तकासाठी पैसे उभे करण्याच्या मागे लागलो. त्यात अनेक किस्से घडले. त्या किश्श्यांची एक छोटीशी पुस्तिका होईल; पण ते टाळतो. अध्यात्मावरचं इंग्रजी पुस्तक आणि त्यासाठी केलेले व्यावहारिक उपद्व्याप आणि लटपटी एकाच परिच्छेदात सांगणे म्हणजे रसभंग होईल.

**निरनिराळ्या क्षेत्रांत एवढा संचार झाला; त्यातल्या अनुभवाबद्दल काय सांगाल?**

मी केलेला आणखी एक प्रयोग म्हणजे, कोकणातल्या त्या काळच्या एका खेड्यातल्या रुग्णालयात जवळजवळ दहा वर्षं केलेल्या विनामूल्य शस्त्रक्रिया. त्या अनुभवानंही मी समृद्ध झालो. तिथे जात असे तेव्हा पनवेल ते रत्नागिरी रस्त्यावर एकदा असं लक्षात आलं की ह्या रस्त्यावर फार थोर माणसं होऊन गेली. वासुदेव बळवंत फडके, विनोबा, शिवाजी, आंबेडकर, रामदास, टिळक, कर्वे, केशवसुत, गोळवलकर आणि शेवटी सावरकरही इथेच राहिले होते. त्या काळात मी हा सगळा प्रदेश पिंजून काढला. सगळ्यांची चरित्रं वाचली. त्यावरही सचित्र पुस्तक लिहिलं. त्यासाठी मदत केली त्या कोकणातल्या रुग्णालयानं आणि एका श्रेयसाचं दुसऱ्या श्रेयसात रूपांतर झालं. एकंदर माणसं खूप भेटली. निरनिराळ्या संदर्भात भेटली. निरनिराळ्या स्वभावाची होती, पण एकही भांडण झालं नाही. कारण मनुष्यस्वभावाचं विश्लेषण करणारी ज्ञानेश्वरांची शिकवणी होती. माझ्यातल्या ऊर्जेला त्यांनी वळण लावलं होतं. असं म्हणतात की चाळिशीनंतर नव्या मैत्र्या होत नाहीत, पण मी त्याला अपवाद ठरलो. बरेच नवे मित्र झाले. त्यातले दोन थोर होते– एक दिनकर गांगल आणि दुसरे शरद काळे. दोघंही सात्त्विक आणि मवाळ तर मी रजोगुणी आणि आक्रम क. सत्त्वगुणी माणसं कशी असतात त्याचं ज्ञानेश्वरांनी केलेलं वर्णन ह्या दोघांना तंतोतंत लागू पडतं. दोघंही क्रियाशील विचारवंत. गांगल पत्रकार, संपादक तर काळे प्रशासकीय सेवेतले, पण त्यांनी कोठल्या क्षेत्रात काम केलं, त्यांनी त्यांचं काम किती निष्ठेनं आणि सुसंस्कृतपणे केलं हे बघितलं की त्यांचं मूल्य कळतं. गांगलांनी महाराष्ट्राला लिहितं केलं आणि ग्रंथाली ह्या चळवळीला खऱ्या अर्थानं उभं केलं. त्यांनी सुदेश हिंगलासपूरकर ह्या तरुणाला घडवला. तो आता ग्रंथालीला नव्या उंचीवर नेत आहे. काळे ह्यांनी प्रशासकीय सेवा सोडल्यावर चव्हाण प्रतिष्ठान आणि एशियाटिक सोसायटी ह्या संस्थांना सांभाळलं. मी केलेल्या उपद्व्यापात काळे यांनी कधी कधी धोका पत्करून सक्रिय हातभार लावला. गांगलांनी माझी पुस्तकं जशीच्या तशी स्वीकारली. ती दोघं माझ्यापेक्षा वयानं कणभर लहान आहेत, पण मधूनमधून माझं मन मोकळं करण्यासाठी त्यांचा मी बिनदिक्कत वापर करू शकतो हे माझं भाग्य.

**ह्याच काळात तुम्ही मुंबईतली पर्यावरणासाठीची पहिली लढाई दिली, तो इतिहास आता पुसट झाला आहे. ते कसे काय घडलं?**

इथे योगायोग, दैव वगैरे काही नव्हतं. मी स्वत:वर ते ओढवून घेतलं. याला मराठीत उपद्व्याप असा शब्द आहे. मी राहतो त्या–लगत महानगरपालिकेचा एक भूखंड ओसाड पडला होता. उद्यानासाठी राखीव असलेल्या तो भूखंड पण महानगरपालिका काहीच करत नव्हती. आणि गुळाच्या ढेपेला मुंगळा लागावा तसा एक बहुराष्ट्रीय समूह तो भूखंड गिळंकृत करण्यास पावलं उचलू लागला. शेजारपाजाऱ्यांना मी सगळं काही समजावून सांगितलं आणि लढा उभारला. त्या समूहाला तिथे एक अद्ययावत रुग्णालय उभारायचं होतं. मी लढा मागे घ्यावा यासाठी मला अनेक प्रलोभने दाखवण्यात आली. तुला या सुंदर, सुसज्ज रुग्णालयात प्लास्टिक सर्जरीचा प्रमुख करतो हे त्यातलं

एक प्रलोभन. मी लढा मागे घेतला असता तर मला त्या रुग्णालयातल्या व्यवसायातून घबाड मिळालं असतं, पण, त्या काळात माझ्या आईवडिलांच्या निष्कलंक चारित्र्याची वारंवार आठवण येत असे. शेवटी तो लढा नागरिक जिंकले. परंतु तोच लढा काही वर्षांनी मला परत लढावा लागणार होता. कारण मी तो भूखंड वाचवला, परंतु तसाच सोडून दिला. तोच समूह मी बेसावध असताना परत चंचुप्रवेश करू लागला. परत तेच तसंच रामायण घडलं. ह्यावेळेला युद्ध जास्त प्रखर होतं. कोर्टकचेऱ्या झाल्या. निदर्शनं–उपोषणं करावं लागलं, पण एकंदर वीस वर्षं लढा दिल्यावर तो भूखंड आम्ही सगळ्यांनी परत वाचवला. पुढे झोळी घेऊन माहीम उपनगरात मी प्रदक्षिणा घातल्या. पैसे जमवले. एक ट्रस्ट स्थापन केला आणि तिथे पहिला वृक्ष लावला. पहिल्यांदा मी माळी झालो. भूखंड सुधारला, तसा लोकसंग्रह वाढला आणि पैसे वाढू लागले. आज त्या भूखंडावर शंभर वृक्ष उभे आहेत. खुर्च्या आहेत. व्यायामाची साधनं आहेत. चालण्या–साठी–पळण्यासाठी मार्ग आहे आणि स्केटिंग रिंक आहे. त्या लढ्याच्या वेळचे माझे सहकारी आता पांगले आहेत. काही गेले. त्या उद्यानात आता मला फारच थोडे ओळखतात. एके काळी तिथे माझा वट होता. परंतु माझी त्याबद्दल तक्रार नाही. अधूनमधून तिथे जातो. मी तिथे एक–दोन फूट उंचीचा वड लावला होता त्याचा एक प्रचंड वृक्ष झाला आहे. त्याच्या सावलीत बसतो आणि त्याला म्हणतो, आठवतंय तुला किती लहान होतास, तू तरुण झाला आहेस आणि मी म्हातारा. पण हा निसर्गक्रम आहे आणि तो मला ज्ञानेश्वरांनी शिकवला आहे. आधी म्हटल्याप्रमाणे मी 'जाणीव' ह्या पुस्तकाचे हक्क विकले तेव्हा आलेल्या पैशांनी मी माझ्या माळ्यासाठी एक खोली बांधली होती. त्याचं पुढे लग्न झालं. त्याची मुलगी आता वनस्पतिशास्त्रात पदवीधर झाली. ती आता शिकवण्या घेते आणि गुगलही वापरते.

**तुम्ही तुमच्या वैवाहिक आयुष्यबद्दल बोलण्याचं टाळता आहात का?**

त्याबद्दल बोलायलाच हवं. माझं आणि आशाचं लग्न दोन मित्रांच्या मुलांमधलं लग्न आहे. रीतसर मुलगी बघून वगैरे लग्न झालं. वर्तमानपत्रामध्ये यशस्वी जोडपी मुलाखती देतात आणि आम्ही कसे गोडीगुलाबीनं वागतो वगैरे सांगतात, तसं आमचं लग्न नाही. दिवसाकाठी एखादं भांडण आणि कुरबुर होतेच– चौपन्न वर्षं झाली तरी. तसं बघायला गेलं तर मी आणि आशानं खूप आघात सहन केले आहेत. त्यांचा तपशील कोणालाही विषण्ण करेल असा आहे. लग्नानंतर पहिल्यांदा गुलाबी पहाट होती. मग प्रसन्न सकाळ आली. त्यानंतर माझ्या चाळिशीनंतर (ती माझ्याहून चार वर्षं लहान) एक भयंकर दुपार आली. त्याचे असह्य चटके बसले. पण आम्ही दोघं तावूनसुलाखून निघालो असलो तरी एकमेकांचा हात सोडलेला नाही. पुढे सूर्य उतरला आणि उसंत मिळाली. आता संध्याकाळ झाली आहे आणि ती सुखावते आहे. संध्याछायांना भिण्याचा आमचा दोघांचाही स्वभाव नाही. मुलं मोठी होऊ लागली तेव्हा तिनं कर्णबधिर मुलांच्या शिक्षणासाठीचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि शिक्षक–मुख्याध्यापक आणि आता विश्वस्त म्हणून एका संस्थेला आधार देऊन त्या संस्थेला नव्या उंचीवर नेलं आहे. ती ज्याला प्रकाशातील महिला म्हणतात तशी झाली आहे. मी गावभर उपद्व्याप करत होतो, तेव्हा तिनं माझं ऐकलं आणि नाती सांभाळली. सारांशानं, पहिली पंचवीस–तीस वर्षं तिनं माझं ऐकलं आणि आता मी तिचा प्रत्येक शब्द पुरा करण्याचा प्रयत्न करतो आहे. तिला ज्ञानेश्वरी न वाचता आयुष्य समजलं. लहान लहान गोष्टींनं तिला होणाऱ्या आनंदानं मी आश्चर्यचकित होतो. मी ज्ञानेश्वरी वाचूनही अजून धडपडतोच आहे. एक मात्र नक्की, आपल्या नवऱ्याला अमेरिकेतून भाषणाचे बोलावणे आले आहे हे ती सगळ्यांना सांगत सुटली आहे. मी तिथे काय कपडे घालायचे ह्याची तजवीज करत आहे. आधी म्हटलं तसं मी हल्ली तिच्या शब्दाच्या बाहेर नाही.

**तुम्ही ज्ञानेश्वरीवर विज्ञानाच्या अंगानं लिहिता तेव्हा तुमच्यावर छद्मविज्ञान वापरल्याचा आरोप केला जातो, त्याबद्दल तुमचं म्हणणं काय?**

टीकाकारांनी शब्द जपून वापरावेत. छद्म ह्या शब्दाचा अर्थ अर्धमिथ्या–सत्य असा नसून त्याचा अर्थ कपट करून केलेली फसवणूक किंवा FRAUD असा दिला आहे. पतंजलींचंच उदाहरण घेऊ. त्यांनी मन एक इंद्रिय आहे, त्याला विश्रांतीची गरज असते, म्हणून ते नियमितपणे रिकामं करण्याची सवय लावावी




**अनुभवाचे परिशीलन करण्याचं तंत्र आधुनिक विज्ञानाकडे नाही. म्हणून ती पद्धतच छद्मविज्ञान आहे हे म्हणणं कोतेपणाचं लक्षण आहे. बऱ्याच वेळा विज्ञानाचं शिक्षण न घेतलेले आणि तरीही विज्ञानानं भारित झालेले लोक आधुनिकतेच्या नावाखाली उगीचच चिखलफेक करतात, त्यातला हा प्रकार आहे. तसंच विश्वाच्या उगम ाबद्दल आहे. पहिल्याप्रथम केवळ चैतन्य होतं. मग त्याचं वस्तूत रूपांतर झालं आणि त्यातून जीव अवतरला अशी वेदांताची भूमिका किंवा अटकळ आहे. तेच आता आधुनिक विज्ञान म्हणत आहे. परंतु त्याबद्दलचा वेदांताचा नुसता उल्लेख केला तर अर्ध्या हळकुंडानं पिवळे झालेले हे विज्ञानमुख लोक राडा करतात.**




असं सांगितलं. त्यांनी आसनं सांगितली नाहीत. ती पुढे सयुक्तिकपणे योगासनांना जोडली गेली आणि मग सूर्यनमस्कार आले. ह्या तिन्ही गोष्टींचा कोट्यवधी लोकांना फायदा होतो असा स्वानुभव सांगितला आहे. ह्या अनुभवाचे परिशीलन करण्याचं तंत्र आधुनिक विज्ञानाकडे नाही. म्हणून ती पद्धतच छद्मविज्ञान आहे हे म्हणणं कोतेपणाचं लक्षण आहे. बऱ्याच वेळा विज्ञानाचं शिक्षण न घेतलेले आणि तरीही विज्ञानानं भारित झालेले लोक आधुनिकतेच्या नावाखाली उगीचच चिखलफेक करतात, त्यातला हा प्रकार आहे. तसंच विश्वाच्या उगमाबद्दल आहे. पहिल्याप्रथम केवळ चैतन्य होतं. मग त्याचं वस्तूत रूपांतर झालं आणि त्यातून जीव अवतरला अशी वेदांताची भूमिका किंवा अटकळ आहे. तेच आता आधुनिक विज्ञान म्हणत आहे. परंतु त्याबद्दलचा वेदांताचा नुसता उल्लेख केला तर अर्ध्या हळकुंडानं पिवळे झालेले हे विज्ञानमुख लोक राडा करतात. असो. पतंजली लोकांना फसवू बघत होते ह्यावर माझातरी विश्वास बसत नाही. आणि छद्मविज्ञानावर प्रच्छन्नपणे टीका करणारे संपादक त्यांच्या वर्तमानपत्रात छद्मविज्ञानांनी ठासून भरलेल्या जाहिराती पहिल्या पानावर छापतात आणि राशीभविष्यही छापतात. मी समजू शकतो, शेवटी त्यांचा पगार त्या जाहिरातींवर अवलंबून असतो. एकंदरच माध्यमांनी गुरू होण्याचा आव आणू नये.

**सध्याच्या राजकीय ढवळाढवळीबद्दल तुमचं मत काय?**

एकतर सगळेच राजकारणी छद्मी असतात हे म्हणणं जरा अतिच झालं. चाणक्यानं म्हटल्याप्रमाणे समाजात दहा टक्के लोक लुच्चे, भामटे असतात हे खरंच असणार. निसर्गातल्या विविधतेची ती एक सरासरी असते. आणि तेच राजकारण्यांमध्ये दिसतं. समाजाला राजकारण्यांची जरुरी असते ही दुसरी गोष्ट. तो आता एक व्यवसाय आहे, ही तिसरी गोष्ट. जनतेला रोटी-कपडा-मकान आणि इतर सुखं ह्यांची गरज असते ही चौथी गोष्ट. ती तुम्हाला आम्ही देऊ असं राजकारण्यांनी म्हणणं ही त्यानंतरची पायरी. सत्तेच्या सोपानावर चढण्यासाठी राजकारण्यांना अनेक कसरती कराव्या लागतात. त्यात अर्धी क्रयशक्ती खर्ची पडते. मग वेळ मर्यादित असते ही अडचण. अशा तऱ्हेनं यापूर्वी भारतात एका अशाच चांगल्या पण प्रवाहपतित आणि आत्मकेंद्री घराण्यानं मोहिनी शस्त्र वापरून, कारभार करून थोड्याफार सुधारणा नक्कीच केल्या. निसर्गक्रमानं ते घराणं आता क्षीण झालं आहे. निसर्ग बहुतेक वेळा दोन-तीन पिढ्यांच्या पुढे कोणाचीही सद्दी चालू देत नाही. आणि एक नवी पुढाऱ्यांची पिढी एका विशिष्ट अस्मितेला साद घालून सत्तेवर आली आहे. रोटी-कपडा-मकान आणि इतर सुखं ही घोषणा तीच आहे. काय होतं ते आता बघायचं आहे.

**सत्तेच्या सोपानावर चढण्यासाठी राजकारण्यांना अनेक कसरती कराव्या लागतात. त्यात अर्धी क्रयशक्ती खर्ची पडते. मग वेळ मर्यादित असते ही अडचण. अशा तऱ्हेनं यापूर्वी भारतात एका अशाच चांगल्या पण प्रवाहपतित आणि आत्मकेंद्री घराण्यानं मोहिनी शस्त्र वापरून, कारभार करून थोड्या-फार सुधारणा नक्कीच केल्या. निसर्गक्रमानं ते घराणं आता क्षीण झालं आहे. निसर्ग बहुतेक वेळा दोन-तीन पिढ्यांच्या पुढे कोणाचीही सद्दी चालू देत नाही. आणि एक नवी पुढाऱ्यांची पिढी एका विशिष्ट अस्मितेला साद घालून सत्तेवर आली आहे. रोटी-कपडा-मकान आणि इतर सुखं ही घोषणा तीच आहे. काय होतं ते आता बघायचं आहे.**

**हल्ली झुंडशाही वाढली आहे असा हाकारा दिला जातो. त्याबद्दल काय वाटतं?**

असेलही कदाचित. माध्यमं अतिरंजित करून असलेल्या गोष्टी छापत असण्याचीही शक्यता आहे. त्यानं खप वाढतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे विरोधक त्या चळवळीला झुंडशाहीच म्हणत असत. साम्यवादी सरकारं झुंडशाहीचा वापर करूनच राज्यावर बसली. त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, अहिंसा आणि लोकशाहीबद्दल बोलणं हास्यास्पदच. तसंच भांडवलशाहीचं. भांडवलदार हुशार असतात. त्यांच्या झुंडी मोठ्या शिताफीनं पडद्यामागून सूत्रं हलवत असतात. त्याबद्दलच दीपक करंजीकर ह्यांनी लिहिलेलं आणि ग्रंथालीनं प्रसिद्ध केलेलं 'घातसूत्र' हे पुस्तक मोठं मार्मिक आहे. रोटी, कपडा आणि मकान पुरवण्यात हे लोक मोठे वाकबगार असतात. अचाट, बाष्कळ बडबड करायला ते परवानगी देतात. निवडणुकीचा आभास निर्माण करत त्यांच्या नाड्या आपल्या हातात ठेवतात आणि आपण स्वातंत्र्य गमावून बसलो आहोत आणि आपण कळसूत्री बाहुल्या झालो आहोत हे लोकांना समजतच नाही अशी परिस्थिती तयार होते. अशा तऱ्हेनं साक्षीभावानं बघण्याची सवय मला ज्ञानेश्वरांनी लावली. त्यांना माउली म्हणण्याएवढी जवळीक नाही आणि वारी करेन एवढी निष्ठा नाही. परंतु त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेनं आणि निष्पक्ष लिखाणानं मला एक नवंच स्वातंत्र्य बहाल केलं हे नक्की.

**– डॉ. रविन थत्ते**
भ्रमणध्वनी : ९८२०५२३६१६

# नमस्कार डॅलसकर

आपली मायबोली वाढावी, समृद्ध व्हावी या उद्देशाने मराठी आणि इतर
अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आखणारी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी हवी असल्यास

हा संपर्क लक्षात ठेवा !




addfizz@gmail.com
विनोद पवार +९१ ९८२०४००५९३

**स्वरगंधर्व सुधीर फडके ऊर्फ बाबूजी, महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर ऊर्फ गदिमा आणि महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे ऊर्फ बहुरूपी पुल हे तिघेही समकालीन, पण अनेक बाबतीत परस्परपूरक तसेच परस्परावलंबीही असून एकमेकांना समांतर प्रवास केलेले कलायात्री होते. कविता, गीत, ललित लिखाण, व्यक्तिचित्रण, नाट्यलेखन, चित्रपटाच्या कथा-पटकथा-संवादांचे लेखन, अभिनय, एकपात्री प्रयोग, नाटक, चित्रपट, भावगीत, सुगम संगीत, गायन, संगीत... बहुविध कलांच्या एकाच वटवृक्षावरच्या तीन महान फांद्या... वृक्षाच्या अनेक फांद्या एकाच मातीतून उगवून येऊनही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्त्व राखतात, तसे हे तिघे! सुधीर फडके, गदिमा आणि पुल या तीन कलायात्रींच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचा प्रवास अनेकांना अनेक बाजूंनी पाहायला मिळाला. तसाच हाही एक. त्यांचे वास्तव्य मुख्यत: कोल्हापूर-पुणे-मुंबई येथे झाले. त्या वास्तूंची एक 'हॅरिटेज वॉक'वजा सचित्र भेट... आणि त्यातून आपल्या हाती काय येते, काय निसटते याचा आढावा.**

**श्री**राम, श्रीराम, श्रीराम...

हे तीन शब्द मराठी माणसाच्या डोळ्यांपुढे कधीही नुसते येत नाहीत, तर पहाटेच्या नीरव शांततेत सनईचा सूर कानी पडावा, तसे ते सुधीर फडके यांच्या कंठातून बाहेर पडलेल्या गीतरामायणाच्या पहिल्यावहिल्या सुरावटीतच कानात गुंजतात.

हा श्रीराम जणू 'श्रीऽऽराऽऽऽम' असाच ऐकायचा असतो, असाच लिहायचा असतो आणि असाच आयुष्यभर मनात साठवायचा असतो.

ग. दि. माडगूळकर नावाच्या यक्षाने हे शब्द कागदावर लिहिले आणि सुधीर फडके नावाच्या गंधर्वाने ते असे ऐकवले, हे तुम्हा-आम्हां मराठी माणसाचे भाग्य म्हणायला हवे.

पण श्रीराम एकच असताना माडगूळकरांना तो असा त्रयीच्या रूपात का रेखाटावासा वाटला असेल?

केवळ लय साधण्यासाठी? की स्वातंत्र्योत्तर काळात मराठी माणसाचे जगणे फक्त सुसह्य नव्हे तर सुंदर, सुरेल करण्यासाठी नियतीने एकाच वर्षात ज्या यक्ष, किन्नर आणि गंधर्व अशा तिघांना मराठी मातीत जन्म घेण्यासाठी पाठवले होते, त्यापैकी पु. ल. देशपांडे नामक कलायात्रीचे रूपक म्हणून हा 'तिसरा श्रीराम' असेल? तो पुढच्या पिढ्यांच्याही आठवणीत राहावा म्हणून तर अशी रचना झाली नसेल?

कोणास ठाऊक? पण एक मात्र खरे की, इंग्रज राजवट संपून भारतात स्वातंत्र्याची पहाट उगवली तरी ना पुरेसं अन्न, ना अंगभर वस्त्र, ना तिन्ही ऋतूंत पुरेसं छत्र पुरवणारा निवारा, अशा अवस्थेत नव्या युगाला तेव्हाची पिढी सामोरी जात होती. स्वतंत्र झालो, पण जगायचं कसं, अशा भ्रांत अवस्थेत ती मूलभूत गरजा







**दादरचे शंकर निवास म्हणजे सुधीर फडके यांच्या भरभराटीचा साक्षीदार. तसेच '१ रुपाली, शिवाजीनगर पुणे-४' हे पुलंचे घर तर**







# आनंदाचे झरे

## आल्हाद गोडबोले

भागवण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत होती; धडपडत होती, घाम गाळत होती, कधी हताश-निराश होऊन जात होती. अशा वेळी तिला दुःखाचा विसर पडून जगण्याचं बळ मिळावं, म्हणून नियतीनं तब्बल तीन दशकं आधीच काही तजवीज करून ठेवली असावी. म्हणूनच तिनं एकाला पंचगंगेकाठच्या ऐतिहासिक करवीर नगरीत, दुसऱ्याला गिरणगावाच्या रूपात ओळखल्या जाणाऱ्या उद्यमनगरी मुंबईतील गिरगावात, तर तिसऱ्याला कायम दुष्काळी अशा माणदेशातील माडगूळजवळच्या शेटेफळ नावाच्या खेड्यात जन्माला पाठवलं असावं.

१९१९ या एकाच वर्षात या तिघांचा जन्म व्हावा, हा निव्वळ योगायोग वाटू नये. आज शंभर वर्षांनंतरही यक्ष-किन्नर-गंधर्वांच्या रूपांत

**आज शंभर वर्षांनंतरही यक्ष-किन्नर-गंधर्वांच्या रूपांत त्यांची आठवण राहावी, असे अक्षय आनंदाचे झरे मागे ठेवून हे तिन्ही कलायात्री खरं तर केव्हाच निघून गेलेले आहेत.**







**शिवाजीनगर स्टेशनजवळची 'पंचवटी' हा गदिमांचा बंगला. तिघांचे सर्वाधिक वास्तव्य या वास्तूंमध्ये झाले आणि सर्वोत्कर्षही!**



माडगूळच्या शेतातील 'बामणाचा पत्रा'. गदिमांच्या प्रतिभेला इथेच धुमारे फुटले!

**सुधीर फडके यांच्या पहिल्याच रेकॉर्डमधील गाण्यासाठी आवाज दिलेल्या कुमारी पद्मा पाटणकर हिच्याशी गदिमा विवाहबद्ध झाले. त्यानंतर काही दिवसांनी कोल्हापूर सोडून पुण्यात प्रथम आले ते प्रभात रस्त्यावरील 'एकनाथ धाम' या बंगल्यात.**

त्यांची आठवण राहावी, असे अक्षय आनंदाचे झरे मागे ठेवून हे तिन्ही कलायात्री खरं तर केव्हाच निघून गेलेले आहेत. तारीखवाराच्या भाषेत सांगायचे तर रामचंद्र विनायक उर्फ सुधीर फडके यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर इथे आणि निर्वाण मुंबईत २९ जुलै २००२ रोजी. गजानन दिगंबर माडगूळकर १ ऑक्टोबर १९१९ रोजी माडगूळशेजारच्या शेटेफळ इथे अवतरले आणि बुधवार, १४ डिसेंबर १९७७ रोजी पुण्यात वयाच्या अवघ्या ५९व्या वर्षी निवर्तले. तर ८ नोव्हेंबर १९१९ रोजी गिरगावात जन्मलेले पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांनी आपल्या विवाहाच्या ५४ व्या वर्धापनदिनी, सोमवार दि. १२ जून २००० रोजी जगाचा निरोप घेतला. सतरा, बेचाळीस आणि एकोणीस वर्षांपूर्वी



आपल्यांतून गेलेल्या माणसांची आठवण आज न राहणं खरं तर स्वाभाविक. पण लौकिकार्थानं नसलेले हे तिघे आज – मराठी माणूस अगदी साता समुद्रापार जिथंजिथं पोचलेला असेल, तिथेसुद्धा – शब्द-सुरांच्या आणि अक्षरांच्या रूपात – 'जिवंत' आहेत! गदिमांचं काव्य, सुधीर फडके उर्फ बाबूजींचं गाणं कानावर आलं नाही आणि दिवसभरात एखादा तरी हसरा क्षण पुलंच्या आठवणीनं उजळला नाही, असा एकही दिवस अजून जात नाही, इतके हे तिघे मराठी माणसाचं जग व्यापून उरले आहेत!

अशा या यक्ष-किन्नर-गंधर्व त्रिमूर्तींच्या जन्मशताब्दी वर्षात, अमेरिकेत टेक्सासमधील डॅलस इथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १९ वे द्वैवार्षिक अधिवेशन होत असताना, त्यांची आठवण उजळणं अगदी स्वाभाविक आहे. पण ग्रंथालीच्या 'शब्द रुची' मासिकाचा विशेषांक यानिमित्ताने करावा, असा प्रस्ताव सुदेश हिंगलासपूरकर यांनी मांडला, तेव्हा पहिला 'यक्षप्रश्न' हाच पडला की, त्यांच्यावर नव्याने कोण आणि काय लिहिणार?

हे तिन्ही कलायात्री तसे भाग्यवान. तिघांबाबत आजवर सर्व बाजूंनी उदंड लिखाण प्रसिद्ध झाले आहे. तरीपण जन्मशताब्दी विशेषांकाची पूर्वतयारी करताना सुधीर फडके, गदिमा आणि पु. ल. देशपांडे यांच्या संदर्भातले डझनावारी ग्रंथ आणि कुठेकुठे चाललेले उपक्रम यांचा धांडोळा घेतला, तेव्हा जाणवले ते असे की, हे तिघेही समकालीन, पण अनेक बाबतीत परस्परपूरक तसेच परस्परावलंबी असून एकमेकांना समांतर प्रवास केलेले कलायात्री होते. कविता, गीत, ललित लिखाण, व्यक्तिचित्रण, नाट्यलेखन, चित्रपटाच्या कथा-पटकथा-संवादांचे लेखन, अभिनय, एकपात्री प्रयोग, नाटक, चित्रपट, भावगीत, सुगम संगीत, गायन, संगीत... बहुविध कलांच्या एकाच वटवृक्षावरच्या या जणू तीन महान फांद्या ... वृक्षाच्या अनेक फांद्या एकाच मातीतून उगवून येऊनही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्त्व राखतात, तसे हे तिघे! कोल्हापूर-पुणे-मुंबई या वाटेवरचे!


असेच आणखी एक रूपक माझ्या डोळ्यांपुढे आले. कोल्हापूर-पुणे-मुंबई या मार्गाचे! तेही रस्त्यापेक्षा लोहमार्गाचे. कोल्हापूर ते पुणे हा आजही एकेरी मार्ग आहे.

त्यावरून एका वेळी एकच गाडी जाते. पुणे-मुंबई मार्ग मात्र दुहेरी (आणि खंडाळ्याच्या घाटात तर तिहेरी) आहे. पुढे कल्याणपासून तो चौहेरी आणि ठाण्यापासून बोरीबंदरपर्यंत सहा मार्गिकांचा किंवा सहा रुळांचा होतो. कोल्हापूर, पुणे आणि मुंबई या तिन्ही शहरांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. करवीर नगरीने आजवर अनेक मोठे कलावंत दिले. पुणे ही तर सांस्कृतिक राजधानी मानली जाते. पण या दोन्ही ठिकाणच्या कलावंतांना मुंबईच्या सहापदरी वाटांवर उतरून आपले नाणे वाजवून दाखवल्यावरच बाहेरच्या जगाची आणि यश-संपत्ती-नावलौकिकाची दारे खुली होतात. या वाटेवर एकाच क्षेत्रातले कलायात्री कधी एकाच तर कधी विरुद्ध दिशेने प्रवास करतात. कधी एखाद्या स्टेशनात किंवा एखाद्या मुक्कामात एकत्र येतात, पुन्हा बाजूला होऊन पुढे जातात.. कधी समोरून येणाऱ्या गाडीला वाट करून देण्यासाठी बाजूला थांबतात, तर कधी एकाच दिशेचा प्रवास असूनही एकत्र न येता आपापल्या वाटेने जात राहतात!

सुधीर फडके, गदिमा आणि पुल या तीन कलायात्रींच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांचा प्रवास अनेकांना अनेक बाजूंनी पाहायला मिळाला. तसाच हाही एक. समकालीन, तसेच समांतर...

* * *

पुलंचे बालपण मुंबईत गिरगावात, विद्यार्थीदशा जोगेश्वरीत, तसेच दहाव्या वर्षांपासून वयाच्या पंचविशीपर्यंत पार्लई (विलेपार्ले) इथे वास्तव्य झाले. पुलंनी स्वतःच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात ते किमान सात गावांमधल्या बावीस घरांमध्ये राहिले. त्यापैकी ५, त्रिंबक निवास, अजमल रोड, पार्ले (प), मुंबई हा त्यांच्या अनेक पुस्तकांवरचा पत्ता असला तरी सुनीताबाईंबरोबरच्या वैवाहिक जीवनाच्या सुरुवातीच्या पंचवीसेक वर्षांत (१९४६ ते १९७१) किमान एक-सव्वा डझन घरांमध्ये त्यांनी बिऱ्हाड थाटल्याच्या नोंदी मिळतात. यादीच करायची म्हटले तर पुणे, सांगली, बेळगाव, मालेगाव, वरळी, सांताक्रुझ, पार्ले ही ठिकाणे ठळकपणाने दिसतात. मात्र १९७१ पासून ते पुण्यात स्थायिक झाले ते अखेरपर्यंत. उतारवयात, जून १९९७ मध्ये, प्रकृतीच्या कारणासाठी पुल भांडारकर रस्त्यावरच्या 'मालती माधव' या मोठ्या आणि सोयीच्या निवासस्थानी राहायला गेले, पण जेमतेम तीन वर्षेच. कागदाचे व्यापारी नाना जोशी यांचा एक छान, प्रशस्त दगडी बंगला या ठिकाणी होता. पुल सांगत त्याप्रमाणे आपल्या पहिल्या पुणे भेटीत त्यांचे वास्तव्य या वास्तूत होते, त्यामुळे त्याच्याशी त्यांची भावनिक जवळीक होती आणि म्हणूनच या जागेत अपार्टमेंट्स बांधली जात असताना ते रुपाली सोडून या जागेत स्थलांतरित झाले. तरीही पुलंचा सर्वात बहारीचा आणि स्थैर्याचा काळ होता तो '१ रुपाली' या निवासस्थानाचाच. पंचखंडात पसरलेल्या त्यांच्या लाखो चाहत्यांच्या लेखीही, १९७१ ते ९७ या काळातील १ रुपाली, ७७७ शिवाजीनगर, जोशी हॉस्पिटलशेजारी, पुणे - ४, हाच पत्ता अधिक परिचयाचा राहिला. '१ रुपाली' हा त्यांच्या जिवलग मित्रांच्या सहवासाचा, अविस्मरणीय घटनांचा, भरभरून लिखाणाचा, मैफलींचा, अनेकविध बहुमान लाभलेला असा 'पत्ता' ठरला, हेही खरे. पण पुलंचा खरा धडपडीचा - स्ट्रगल म्हणावा असा काळ - त्याआधीच्या डझनभर घरांतील वास्तव्याचाच आहे. किंबहुना 'बहुरूपी पुल' घडले, नावारूपाला आले, ते या घरांमध्ये असताना. पण त्या ठिकाणी ना एखादी पाटी दिसते, ना 'नीलफलक'. पुलंच्या निकटवर्तीयांच्या चर्चेमध्ये येणारे उल्लेख किंवा तुरळक ठिकाणी आलेल्या नोंदी वगळता या घरांबाबत सामान्य माणसाला त्याचा काहीच 'पत्ता' नसतो!




**सुहृदांच्या गाठीभेटी, अनेक गाण्यांना जन्म देणाऱ्या मैफली जेथे झडत ती जागा अपुरी पडू लागल्यावर गदिमा-विद्याताईंचे कुटुंब भांडारकर रस्त्यावरील पवारांच्या वास्तूत स्थलांतरित झाले.**






**व्हायोलिन वादक प्रभाकर जोग हे सुधीर फडके यांचे केवळ साथीदार नव्हते तर संगीत कारकिर्दीचे सहप्रवासी होते. जोग स.प. महाविद्यालयात विद्यार्थी असताना लेडी रमाबाई सभागृहात झालेले त्यांचे व्हायोलिन वादन फडके यांनी समोरच्या बंगल्यातून ऐकले होते.**

पुलंनी आत्मचरित्र लिहिले नाही, पण त्यांच्या नावावर असलेल्या किमान ३५ पुस्तकांत, डझनभर नाटकांत/चित्रपटांत, एकपात्री प्रयोगात, कवितावाचनात, भाषणांत, अनुवादात, पत्रोत्तरात, निखळ आणि निर्विष विनोदांत... ठायीठायी पुल भेटत होतेच. आजही 'असा मी असामी'सारखे व्यक्तिचित्रण असो, अपूर्वाईसारखे प्रवासवर्णन असो वा 'साठवण'सारखा गौरवग्रंथ असो, पानापानातून खुद्द पुलच भेटल्याचा प्रत्यय वाचकाला येत राहतो. तरीही 'अमृतसिद्धी'सारखे व्दि-खंडात्मक ग्रंथ आणि आणि त्यांच्याविषयीचे स्मृतिग्रंथ म्हणावेत, अशी डझनभर पुस्तके त्यांच्या पश्चात प्रसिद्ध झाल्यावरही पुल 'संपले' नाहीत. मंगला गोडबोले यांना त्यांचा जीवनपट एखाद्या चरित्रात्मक ग्रंथातून सलग उभा करावासा वाटला आणि त्यातून 'पुल : चांदणे स्मरणाचे' नावाचा चरित्रग्रंथ नुकताच साकार झाला. त्यात या घरांचा 'घटनाक्रम' शोधता आला. अर्थात या सर्व घरांवर नीलफलक लावावेत, असे मुळीच नाही, पण पुण्या-मुंबईतून किंवा कोल्हापुरातून फिरताना, म्हणजेच सुधीर फडके, गदिमा आणि पुल ही महाराष्ट्राची लाडकी व्यक्तिमत्त्वं जिथे घडली, त्या रस्त्यांवरून चालताना/जाताना 'अरे, सुनीताबाईंच्या आत्मकथनात नोंदलेल्या, वसंतराव देशपांडे आणि भीमसेन जोशी यांच्या, एकापाठोपाठच्या अविस्मरणीय मैफली या आश्रम बंगल्यात झडल्या होत्या होय?' असा सुखद आश्चर्याचा धक्का बसण्यासाठी तरी का होईना, ही नोंद झालेली असावी. त्यामुळे होते असे की,



औंधच्या संस्थानिकांनी पोरगेल्या माडगूळकरच्या काव्यप्रतिभेला दाद म्हणून पंतसचिवाच्या गोठातील, टिळक रस्त्यावरची, जागा भेट म्हणून दिली आणि पुढे गदिमांनी त्यांच्या कारकिर्दीत जणू 'अद्वैत' बनलेल्या आपल्या सर्वात जवळच्या मित्राला – सुधीर फडके यांना – हाच प्लॉट भेट देऊन टाकला, असे आपल्या वाचनात येते, तेव्हा याच टिळक रस्त्यावरून पाच-पन्नास वेळा जाऊनही त्या ठिकाणचा 'चित्रकुटी' बंगला कधी लक्षातच आलेला नसतो, याची मनोमन कबुली तरी द्यावीशी वाटते. तसेच प्रभात रस्त्यावरच्या पोलीस चौकीतून दंड भरून दुचाकी सोडवून निघताना समोरच असलेल्या 'एकनाथ धाम'कडे आपले कधी लक्ष गेलेले नसते. पण याच बंगल्यात गदिमांना स्फुरलेल्या 'पाऊस पाड गा'सारख्या गीतांचा अनुभव पुलंच्या लिखाणात वाचायला मिळतो. किंवा इथे राहत असताना डेक्कन जिमखान्यावरच्या सर्व दुकानदारांशी विद्याताईंनी जोडून ठेवलेले नाते पुढे अनेक वर्षे कसे टिकून होते, हे त्यांच्या 'आकाशाशी जडले नाते' या आत्मकथनात वाचायला मिळते, तेव्हा मन नकळत भूतकाळात जाऊन त्या भागात फिरून येतेच.

ही जागा कमी पडायला लागल्यावर पलीकडच्या भांडारकर रस्त्यावर कॉन्ट्रॅक्टर पवारांच्या बंगल्यात पहिल्या मजल्यावरच्या प्रशस्त फ्लॅटमध्ये माडगूळकर कुटुंब राहायला गेले. तिथल्या तीन वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी केवढे मैत्र जुळवले, हेही विद्याताईंच्या लिखाणात येते. 'पुल आणि सुनीताबाई अधूनमधून गप्पा मारायला येत' असे त्या लिहितात, त्याचबरोबर 'बाबूजींशिवाय तर ह्यांचे पान हालायचे नाही. त्यांच्या घरीही (चित्रकुटी बंगल्यावर?) हे वरचेवर जायचे' असेही त्या लिहितात. हे वाचल्यावर आणखी काही संदर्भ आठवतात.

पाध्येबुवांच्या तालमीत शास्त्रीय संगीताचे धडे घेत असताना कौटुंबिक अडचणींमुळे ते सोडावे लागून, दहा वर्षांचा राम (ऊर्फ सुधीर) मुंबईला जातो, तिथे अब्दुल करीम खाँसाहेबांकडून वाहवा आणि 'और एक चीज सुनाओ' अशी दादही मिळवतो. 'बशीर खाँ यांच्याकडे शेवटपर्यंत शिकलो असतो, तर आज आहे तसा त्या स्वरूपात कदाचित नसतोही!' असे हृद्गत

ते 'जगाच्या पाठीवर'मध्ये व्यक्त करतात.आणखी काही वर्षांनी अब्दुल करीम खाँ यांच्याकडून आलेल्या निरोपानुसार जमखंडीला जाण्याच्या तयारीत असताना अचानक खाँसाहेबांचे निधन होते आणि त्यामुळे ती संधी हुकल्याने हळहळणारे बाबूजी 'पाध्येबुवांच्या आणि खाँसाहेबांच्या गायकीचे सुरेख मिश्रण करून एक अनोखी गायकी मी निर्माण करू शकलो असतो' असेही नोंदवून जातात. कुमार गंधर्वांच्या मैफलीत हजर असलेल्या आणि त्या विलक्षण गायकीने अस्वस्थ झालेल्या सुधीर फडक्यांना कुमारांसारखी मैफल कधी जमली नाही, याची खंत कशी बोचत राहिली, हे माणिक वर्मा यांनी एका लेखाच्या सुरुवातीलाच हृद्य शब्दांत लिहून ठेवले आहे. अफाट लोकप्रियता, यश, नावलौकिक आणि पैसाही मिळालेल्या बाबूजींना शास्त्रीय संगीताची पारंबी आपल्या हातून निसटल्याची रुखरुख अखेरपर्यंत राहिली, याचे असे अनेक दाखले वाचनात येतात.

जन्मशताब्दी विशेषांकासाठी अनेक ग्रंथांची पाने चाळताना हे तुकडे एकत्र जोडल्यावर माझ्या मनात प्रश्न आला की, बाबूजी आणि पुल हे समकालीन, म्हटले तर एकमेकांना पूरक अशा क्षेत्रातले दिग्गज. तसे गीतकार गदिमा आणि संगीतकार बाबूजी हेही जणू एका रथाची दोन चाके म्हणावीत, असे एकमेकांना पूरक. एकमेकांमध्ये मतभेद किंवा वाद होऊनही त्यांचे नाते किती जवळीकीचे होते, हे आनंद माडगूळकर यांनी एका लेखात फार छान शब्दांत लिहून ठेवले आहे (या अंकात तो संक्षिप्त स्वरूपात आवर्जून पुनर्मुद्रित केला आहे). मुद्दा हा की, हे तिघेही तसे समकालीन, एकमेकांना पूरक असे कलायात्री. पण कारणे काहीही असोत, बाबूजी आणि गदिमा यांचे वारंवार भांडूनही सख्य जसे जुळले, तसे बाबूजी आणि पुल यांच्यांत वाद झाले नसतील, पण जवळीकीचे नातेही जुळले नसावे. पुण्यातील वास्तव्यात या तिघांच्या भेटीगाठीही होत. पण 'वंदे मातरम' (पुल आणि सुनीताबाईंचा अभिनय, गदिमांची गीते आणि बाबूजींचे संगीत लाभलेल्या) चित्रपटाच्या निमित्ताने त्यांच्यामध्ये ऋणानुबंध जुळण्याची संधी आली तरी या त्रिमूर्तीचा एकत्र कलाप्रवास नंतर फारसा झाला नाही. पुल आणि बाबूजींचा तर त्याहून नाहीच. काय कारण असेल? आर्थिक, व्यावसायिक की आणखी काही? पुल पुण्यात, बाबूजी मुंबईत, असे भौगोलिक अंतर उभयतांत असले, तरी खुद्द सुनीताबाईंनी लिहून ठेवल्याप्रमाणे संगीत आणि गायनात सुधीर फडके हे भाईपेक्षा वरचढ होते, हे वास्तव पुलंना स्वीकारणे जड गेले असेल का? की चित्रपटसृष्टीतील हितसंबंधी मंडळींनी त्यांना फारसे एकत्र येऊच दिले नसेल? 'सबकुछ पुल' असलेल्या गुळाचा गणपती चित्रपटाचा पहिला खेळ पाहण्यासाठी स्वत: पुलंना रांगेत उभे राहून तिकिट काढावे लागले होते. अशा काही अनुभवानंतर तर त्यांनी चित्रपटसृष्टीकडे पाठ फिरवली. संगीत आणि गायन क्षेत्रातील स्पर्धेचा प्रश्न त्यानंतर अर्थात आलाच नाही. पण त्यापूर्वी पुण्यातील वास्तव्यात पुल आणि गदिमा यांच्या भेटीगाठीचे रंगलेल्या मैफलींचे अनेक संदर्भ मिळतात. तसे पुल आणि बाबुजी यांच्यातील रंगलेल्या मैफलीचे मात्र आढळत नाहीत. अन्यथा शास्त्रीय संगीताचे जणू आनंदवन असलेल्या भाईंच्या घरी होणाऱ्या मैफलींतील नुसत्या उपस्थितीनेही बाबूजींच्या आयुष्यात 'अनोख्या सुरांचे' दान पडले नसते का? संदर्भग्रंथ धुंडाळताना असे काही प्रश्न मनात येऊन जातात, पण त्यांची उत्तरे देण्यासाठी तिघेही या मैफलीत नाहीत, ही जाणीव मात्र प्रश्न तसेच सोडून देतात. असो. मुद्दा हा की, या कलायात्रींचे वास्तव्य ज्या-ज्या वास्तूंमध्ये झाले, त्या-त्या जागांना भेट देताना हा सांस्कृतिक इतिहास नकळत मनात उलगडत जातो किंवा जावा!




**माडगूळचा पोरसवदा गजानन कुलकर्णी उर्फ औंधकर याच्या कविता औंध संस्थानचे राजे पंतप्रतिनिधी यांनी ऐकल्या, तेव्हा हा पोरगा पुढे आपले आणि संस्थानचेही नाव काढणार हे ओळखून औंधच्या राजाने पुण्यातील पंतांच्या गोठातील आपली एक जागा पुढे गदिमांना भेट देऊन टाकली. पुढे गदिमांनी ती सुधीर फडके यांना भेट देऊन टाकली. या जागेवर बाबुजींनी 'चित्रकुटी' बंगला उभारला मात्र त्यांचा सहवास या वास्तूला फारसा लाभला नाही.**









पुल जसे किमान अर्धशतकाहून अधिक काळ सामान्य माणसाचे आयुष्य व्यापून उरले होते, तसेच सुधीर फडके उर्फ बाबूजी आणि 'गदिमा'ही भावगीतांतून, सुगम संगीतातून, गीतरामायणासारख्या गीतमालिकेतून आणि आजही रेडिओवर कुठे ना कुठे ऐकू येणाऱ्या गाण्यातून रोज मराठी माणसाला भेटत असतातच. या दोघांबाबतीत आणखी एक म्हणण्यापेक्षा अर्धी बाजू जमेची होती. बाबूजी आणि गदिमा या दोघांनीही आत्मचरित्र लिहिण्याचा घाट घातला, तो अर्धा पूर्ण केला. आणि अर्ध्यावरच सोडूनही दिला!

सुधीर फडके उर्फ बाबूजी यांचा जन्म कोल्हापूरचा. दहाव्या वर्षापर्यंतचे वास्तव्य कोल्हापुरात, पण आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर नशीब अजमावण्यासाठी घराबाहेर पडले आणि बारा वर्षे पुणे-मुंबईपासून संपूर्ण उत्तर भारतात वणवण करून अखेरीस मुंबईत स्थिरावले ते कायमचे.

लहानपणापासून आयुष्याला कलाटणी देणारे पहिले गाणे ध्वनिमुद्रित होऊन 'संगीत दिग्दर्शक' असा पहिला शिक्का सुधीर फडके या नावावर बसण्यापर्यंतच्या, पंचवीसेक वर्षांच्या विलक्षण प्रवासाचे चित्रण 'जगाच्या पाठीवर या 'अपुऱ्या' आत्मचरित्रात शब्दांकित झालेले आहे. 'किर्लोस्कर' मासिकात सुमारे चाळीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले हे मालिकास्वरूप लिखाण. विशी-पंचविशीतील खडतर किंबहुना जीवघेण्या घटनांच्या मालिकेनंतर माधव पातकरांच्या कवितेला चाल लावून देण्याच्या निमित्ताने 'एचएमव्ही'च्या रूपात नशिबाचे दार कसे उघडले, तो प्रसंग सांगून ही मालिका तेव्हा थांबली. त्यानंतर बाबूजींच्या संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळाली आणि संगीताच्या क्षेत्रात त्यांनी अफाट म्हणावे असेच यश मिळवले. पण ते शब्दांत उतरवून ठेवायला त्यांना वेळच मिळाला नाही. आधी गोवा, दादरा-नगरहवेली मुक्तिसंग्रामात आणि नंतर स्वा-तंत्र्यवीर सावरकरांवर चित्रपट काढण्याच्या महत्त्व-ाकांक्षी प्रकल्पात बाबूजींनी स्वतःला झोकून दिले. त्यात आत्मचरित्र बाजूला पडले ते पडलेच. 'अपुरं' आत्मचरित्रही बाबूजींच्या निधनानंतर २९ जुलै २००३ रोजी प्रकाशित झालं, म्हणून ते त्यांच्या चाहत्यांना उपलब्ध तरी झालं. तसंच बाबूजींवरही त्यांच्या सुहृदांनी खूप लेख लिहिले, पण ते विस्कळीत होते. या लेखांसह बाबूजींच्या सर्व गाण्यांची, चित्रपटांची, सांगीतिक कामगिरीची एकत्र, संदर्भग्रंथांच्या स्वरूपात नोंद असणे आवश्यक होते. विश्वास नेरुरकर आणि विश्वनाथ चॅटर्जी यांनी संपादित केलेल्या आणि 'जीवनगाणी' फेम प्रसाद महाडकर यांच्या पुढाकारातून प्रसिद्ध झालेल्या 'स्वरगंधर्व' या संदर्भग्रंथाने ती उणीव भरून काढली. आता जन्मशताब्दी वर्षा-निमित्ताने बाबूजींच्या आत्मचरित्राचा उत्तरार्ध प्रकाशित करण्याचा संकल्प त्यांच्या निकटवर्तीयांनी सोडला आहे. ते प्रकाशित होईल, तेव्हा बाबूजींच्या आयुष्याप्रमाणे त्यांचे आत्मचरित्रही पूर्णत्वास जाईल.

* * *

गदिमा मात्र कोल्हापूर-पुणे-मुंबईच्या






वर्तुळाबाहेर फारसे गेले नाहीत. किंबहुना या वाटेवरच अधिक फिरून पुण्यात स्थिरावले.

बाबूजींप्रमाणेच गदिमांना अफाट यश-कीर्ती लाभली. पण दुर्दैवाने अकाली म्हणावे असे, अवघ्या एकूणसाठाव्या वर्षी, ते हे जग सोडून गेले. गदिमा हे गीतकार म्हणून प्रसिद्ध झाले, पण चित्रपटसृष्टीत अभिनय, संवाद, पटकथाच्या क्षेत्रातही त्यांची मुद्रा उमटली आहे आणि त्याहीपेक्षा 'वाटेवरल्या सावल्या' या (दुर्दैवाने अपूर्ण राहिलेल्या) आत्मचरित्राखेरीज कथा-व्यक्तिचित्रणादी लिखाणही त्यांच्या खात्यावर आहे. पुल आणि बाबूजींप्रमाणे गदिमांनाही आणखी दोन दशकांचे आयुष्य लाभले असते, तर त्यांना गीत-कवितेतर लिखाणासाठी सवड मिळाली असती आणि त्यांनी ते केलेही असते. कदाचित त्यांच्यातील कसदार ललित लेखक उत्तरार्धात अधिक बहराला आला असता. पण तसे नियतीच्या मनात नव्हते. त्यामुळे झाले असे की, कवितेपेक्षाही चित्रपटगीते आणि गीतरामायण यांनी त्यांच्या पदरात पडलेल्या अफाट यश-कौतुकाच्या सावलीत त्यांच्या गद्य लिखाणाकडे काहीसे दुर्लक्षच झाले. जन्मशताब्दीच्या निमित्ताने रणधीर शिंदे यांच्या संपादकत्वाखाली गदिमांवर एक स्मृतिग्रंथ संकल्पित आहे. त्यासाठी विनय हर्डीकर यांनी गदिमांमधील गद्य लेखकावर प्रकाश टाकणारा लेख लिहिला आहे. गदिमा स्मृतिग्रंथाची सिद्धी करीत असलेल्या एस एस मंडळाने तो 'शब्द रुची'च्या या अंकात देण्यास परवानगी दिल्यामुळे त्यातील काही भाग या अंकात प्रसिद्ध केला आहे. गदिमांमधील गद्य साहित्यिक गीतकारापेक्षा काकणभर सरसच होता, हे त्यातून लक्षात यावे.

अभिनय, एकपात्री प्रयोग, संगीत आदी कलाप्रांतात मनसोक्त विहरून आपले 'बहुरूपी' व्यक्तिमत्त्व सिद्ध केलेल्या पुलंची खरी ओळख 'साहित्यिक' हीच म्हणावी लागेल; तीही केवळ विनोदी नव्हे! त्यांची अक्षरसंपदा टिकून राहणार आहे. गीतकार म्हणून नावाजलेल्या गदिमांमधील कवी आणि ललित लेखक काहीसा मागे राहिला, पण ते 'अक्षर' राहणारे आहे. संगीतकार आणि गायक सुधीर फडके यांचे संगीत क्षेत्रातील कर्तृत्व निर्विवाद मोठे आहे. त्यांनी संगीत दिलेले चित्रपट, गायलेली गाणी याची नुसती यादी करताकरता 'स्वरगंधर्व'सारखा भलामोठा संदर्भग्रंथ सिद्ध झाला. बाबूजींचे हे गीत-संगीतही पुढील शतकात टिकून राहण्यासारखे आहे. मात्र बाबूजींनी लिहायला हवे होते. विशेषत: 'जगाच्या पाठीवर' हे अपूर्ण आत्मचरित्र वाचणाऱ्या प्रत्येकाला अशी रुखरुख वाटल्यावाचून राहणार नाही.

पहिली रेकॉर्ड एच.एम.व्ही. कंपनीकडून तयार होऊन 'संगीतकार सुधीर फडके' अशी ओळख मिळेपर्यंतचा राम फडके ऊर्फ बाबूजींचा जीवनप्रवास 'जगाच्या पाठीवर'मध्ये चित्रमय पद्धती-ने चितारला गेला आहे. तो वाचतानाही आपण अजमेरपासून कलकत्त्यापर्यंत आणि देवासपासून लखनऊपर्यंत प्रवास करून येतो. तसेच या शहरातून फिरताना एखादी ओळखीची जागा दिसते, तेव्हा थबकतो. लखनऊमार्गे हिमालयातील ट्रेकला नुकतेच जाऊन आलो, तेव्हा काही ठरवलेले नसताना, वाटेत लखनऊला चार-सहा तास थांबण्याचा योग आला. रिक्षा करून नूरी गेट, बडा इमाम, रेसिडन्सी पाहून स्टेशनकडे परत येताना वळणावर एक पाटी दिसली. त्यावरील 'भातखंडे' नाव दिसताच रिक्षा थांबवून उतरलो. बाबूजींची आठवर झालीच. याच वास्तूतील त्यांचे गायन, तेव्हाची भटकंती, अनुभव डोळ्यांपुढून सरकत गेले. 'जगाच्या पाठीवर'ची पाने उलटत राहिली... सांज उतरत गेली. पुढचा प्रवास बोलावत होता, म्हणून निघालो...

या कलायात्रींचा सुरेल प्रवास असाच सर्वांना आठवत राहावा...

(छायाचित्रे : ज्योती भालेराव-बनकर)
(भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८)

**करवीर नगरीने आजवर अनेक मोठे कलावंत दिले. पुणे ही तर सांस्कृतिक राजधानी मानली जाते. पण या दोन्ही ठिकाणच्या कलावंतांना मुंबईच्या सहापदरी वाटांवर उतरून आपले नाणे वाजवून दाखवल्यावरच बाहेरच्या जगाची दारे खुली होतात. या वाटेवरचे कलायात्री कधी एकाच तर कधी विरुद्ध दिशेने प्रवास करतात. कधी एखाद्या स्टेशनात किंवा एखाद्या मुक्कामात एकत्र येतात, पुन्हा बाजूला होऊन पुढे जातात.. कधी समोरून येणाऱ्या गाडीला वाट करून देण्यासाठी बाजूला थांबतात, तर कधी एकाच दिशेचा प्रवास असूनही एकत्र न येता आपापल्या वाटेने जात राहतात!**





# ग(द्य) दि(वाण) माडगूळकर

**विनय हर्डीकर**

**गीतकार–कवी या लोकप्रिय ओळखीमुळे झालेला परिणाम जास्त गंभीर होता; आजही आहे. माडगूळकर गद्यही तितक्याच सहजतेने लिहू शकतात हे त्यांनी कथा–कादंबरी, ललितलेख, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, आत्मचरित्रासारखं लेखन इतके प्रकार हाताळूनही, सहजपणे आठवत नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र कविता मोहक पण तिचा जीव लहान, सिनेमाची गाणी मागणी–पुरवठा तंत्रामध्ये अडकलेली, स्फूर्तीगीतांना संदर्भाची बेडी पडलेली आणि 'गीतरामायण' पद्धतीच्या काव्यात नवीन काय सांगणार! या कोंडीत सापडलेल्या माडगूळकरांना गद्यामध्ये मोकळा श्वास घेता येत होता. तो त्यांनी भरभरून घेतला.**

**मा**डगूळकरांचं गद्य दुर्लक्षित का राहिलं? ग.दि. माडगूळकर हा माणूस समजून घ्यायची धडपड फारशी झालेली नाही. मराठीत त्या प्रकारची चरित्र–समीक्षा अभावानेच आढळते. बहुतेक सर्व समीक्षा आशय, घाट (रूप) आणि शैली (तंत्र) या त्रिकोणातच अडकलेली दिसते. गजानन दिगंबर माडगूळकरचा जन्म तेव्हाच्या दक्षिण सातारा जिल्ह्याच्या दुष्काळी भागातल्या एका चेहरा/ओळख नसलेल्या खेड्यामध्ये देशस्थ ब्राह्मणाच्या घरी झाला. कुटुंबामधला हा थोरला मुलगा; नाकी–डोळी नीटस पण रंगाने ठार काळा. घरी धाकटी भावंडं, बहिणीची लग्नं, वडिलांना वैफल्य येऊ नये म्हणून या एकत्र कुटुंबाची जबाबदारी स्वतःहून पत्करणारा कर्ता, थोरला मुलगा ही त्याची सर्वांत महत्त्वाची ओळख आहे. त्याच्या हकिगती व्यंकटेश माडगूळकरांच्या लिखाणात आहेतच. हे सगळं माडगूळकरांनी अगदी मायेने केलं– त्याचं ओझं भावंडाना जाणवू दिलं नाही. त्यांचा 'बांधावरची गाय' हा बहिणीवरचा लेख त्या मायेने ओथंबला आहे. हा थोरला भाऊ कठोरही होऊ शकत असे. तात्यांच्या पहिल्या लग्नाच्या वेळी ते भयानक संतापलेही होते.

लहानशा संस्थानातलं तुटपुंज्या शेती–उत्पन्नाचं असलं तरी माडगूळकरांचं गाव हे प्रातिनिधिक भारतीय खेडं होतं; भारतातलं कोणतंही खेडं एक स्वतंत्र विश्व असतं असं अनेकांनी नोंदवलेलं आहे. माडगूळकरांनी हे विश्व कॅमेऱ्याच्या वृत्तीने मनात नोंदवलेलं होतं. तात्यांनी 'माणदेशी माणसं' पुढे चितारली खरी पण अण्णांनी ती आधीच न्याहाळली होती.

या कळत–नकळत केलेल्या सगळ्या निरीक्षणाचा त्यावेळी माडगूळकरांना उपयोग नव्हता. मॅट्रिक नापास या ओळखीवर नोकरी मिळणं शक्य नाही, घरच्या जबाबदाऱ्यांच्या जाणिवेनं जीवाला घोर लागलेला, अशा अवस्थेत माडगूळकर कोल्हापूरला आले (१९३८). शाहुपुरीच्या दुसऱ्या गल्लीत हेरवाडे नावाच्या सद्गृहस्थांनी त्यांना

स्वतःच्या मुलांना इंग्रजी शिकवण्याचं काम दिलं. स्वतः गजाननाला तेव्हा इंग्रजी किती येत होतं हा संशोधनाचा प्रश्न आहे. पण महिन्याला १० रूपये मिळाले हे मुख्य ! १९३८ सालचं कोल्हापूर हे खऱ्या अर्थानं 'कलापूर'ही होतं. शास्त्रीय संगीत, शिल्पकला, चित्रकला असे अभिजनांचे आणि कुस्तीसारखे बहुजनांचे आवडते मनोरंजनाचे प्रकार कोल्हापुरात होते. त्यातच सिनेमाही होता. 'वाटेवरल्या सावल्या' लेखामध्ये लिहिल्याप्रमाणे अत्र्यांना भेटायला म्हणून 'हंस'च्या स्टुडिओत गेलेले माडगूळकर योगायोगाने मा. विनायकांना भेटले. अचानक त्यांना अभिनयाची संधी मिळाली. नट, नट्या, दिग्दर्शक, कॅमेरामन, सुतार, हरकामे, हिशेबनीस, ही सर्व सर्कस सांभाळणारे मॅनेजर्स, स्वयंपाकी, हमाल, नट-नट्यांच्या घरची मंडळी (काही नट-नट्यांचे तर दोनदोन, तीन-तीन संसार असायचे), सिनेमात पैसे गुंतवणारे, हौशी निर्माते, सावकार यांचं जग- आत्तापर्यंत सिनेमा फक्त क्वचित थेटरात जाऊन पाहणाऱ्या- माडगूळकरांसाठी खुलं झालं.

'प्रत्यक्षाहूनी प्रतिमा उत्कट' असं पुढे गीत रामायणात माडगूळकरांनी लिहिलं. पण इथे तर मोहक प्रतिमेच्या मागचं प्रत्यक्ष अत्यंत किचकट, गुंतागुंतीचं, फसवणुकीचं, वेळप्रसंगी खुनशीपणाचं आणि तरीही एका शहाण्या/वेड्या उत्कटपणाने भारलेलं जग त्यांना दिसलं. माडगूळकरांच्या गद्य लिखाणाचा दुसरा पाया त्यांच्या गीत, काव्य लिखाणाच्या आधी घातला गेला तो असा! बाणभट्टाने आपण निदान २६ प्रकारच्या व्यक्तींना भेटलो असं लिहून ठेवलं आहे. माडगूळकरांचंही तसंच झालं. सिनेमाबरोबर कालांतराने ते मुंबईला, पुण्याला आले आणि कोल्हापुरात जे बीजरूपाने पाहिलं होतं, त्याचं जंगल झालेलं त्यांनी अनुभवलं. ते सादर करताना मार्मिकता आणि रसिकता या दोन्ही रूळांवर माडगूळकरांची गाडी वेगाने धावते. काही अपवाद सोडले- जे अगदीच कौटुंबिक वैयक्तिक निमित्ताने लिहिलेले लेख आहेत- तर माडगूळकरांच्या गद्यलेखनाचा महिरपी कंस एकीकडे ते माणदेशामधलं गाव आणि दुसरीकडे सिनेमाव्यवसाय असाच आहे.

* * *

मी माडगूळकरांचं गद्य पहिल्यांदा केव्हा वाचलं? १९६२-६३ मध्ये माडगूळकरांचा 'मंतरलेले दिवस' हा ललित लेखसंग्रह आमच्या मराठीच्या मीना देशपांडे बाईंनी विकत घेतला. त्यावेळी तो आवडला त्यातल्या ४२च्या चळवळीसाठी माडगूळकरांनी लिहिलेल्या पोवाडे-स्फूर्तिगीतं यांच्यावरच्या दीर्घलेखामुळे! घरच्या जबाबदारीमुळे माडगूळकरांना आंदोलनात सामील होणं शक्य नव्हतं. पण त्यांच्या शाहीर मित्रांनी त्यांच्यासाठी जास्त चांगला पर्याय निवडला. माडगूळकरांकडून गाणी लिहून घेतली आणि नाना पाटलांच्या पत्री सरकारने काही काळापुरत्या स्वतंत्र केलेल्या इलाख्यामध्ये ती जनतेच्या गळ्यामध्ये जाऊन बसली.


शब्दांच्या ताकदीचा पहिला साक्षात्कार आपल्याला त्यावेळी झाला हे त्यांनीही नोंदवलं आहे. त्याच पुस्तकातले 'औंधाचा राजा', 'पंतांची किन्हई', 'वेडा पारिजात' हे लेख नववी दहावीत असलो तरी मला 'समजले' होतेच, पण 'मोहरलेला कडुनिंब' या ललित लेखात माडगूळकरांनी म्हटलं आहे, 'माझं गाव गोकुळासारखं आनंदी आहे असं मी म्हणत नाही. तिथं दुःखं आहेत. हेवेदावे आहेत; पण मला ते दिसत नाहीत. मला माझ्या गावाचं मोठेपण तेवढं दिसतं. कारण मी स्वतःला त्या गावाचं लेकरु म्हणवतो, दुःखकष्टातूनही जीवनानंद वेचण्याची वृत्ती मला त्या गावाच्या मातीनं दिली आहे. माझ्या गावाभोवती तट नाही, गर्द झाडीही नाही. तरी मला वाटतं, माझं गाव बंदिस्त आहे. त्याला एक मोठा दरवाजा आहे. तो दरवाजा भल्या पहाटे निळ्या हातांनी उघडला जातो. शुक्राची चांदणी उगवली की माझ्या गावात ये-जा सुरू होते. मला वाटतं, माझ्या नगरीचं द्वार शुक्रच उघडतो. मग कोवळी उन्हं आत येतात, गाई धारा देतात. हा भास नाही; हा साक्षात्कार आहे. मी ईश्वराचं अस्तिव मानतो. त्याच्यापाशी मागितलेलं मिळतं. अशीही माझी धारणा आहे.'

पहिलं वाक्य सोडलं तर हा उतारा रोमॅन्टिक कवीने लिहिला आहे आणि इथे माडगूळकर चक्क सत्य लपवत आहेत. आपल्या गावातली दुःखं, हेवेदावे त्यांनी गद्य लेखनासाठी राखून ठेवले होते, एवढाच त्याचा अर्थ.


त्याच सुमारास केव्हा तरी माडगूळकरांची 'भाताचं फूल' ही कथा मी वाचली. अनावर काम वासना असलेला नवरा आणि त्याची नाजूक,




**गीतकाराच्या झगझगाटामध्ये कवी मागे पडला; ती पदवी माडगूळकरांना मिळाली पुढे 'गीतरामायण' लोकप्रिय झाल्यानंतर (इथेही 'गीतरामायण' नुसतंच छापील स्वरूपात राहिलं असतं तर महाराष्ट्राने इतकं उचलून धरलं असतं का, हा प्रश्न विचारण्यासारखा आहे!)- पण त्यातलं माडगूळकरांचं श्रेय सुगम मराठी रचनेचं होतं, त्यातला आशय त्यांनी निश्चित केलेला नव्हता!**



**माडगूळ येथील बामणाचा पत्रा**




**मोहक प्रतिमेच्या मागचं प्रत्यक्ष अत्यंत किचकट, गुंतागुंतीचं, फसवणुकीचं, वेळप्रसंगी खुनशीपणाचं आणि तरीही एका शहाण्या/वेड्या उत्कटपणाने भारलेलं जग त्यांना दिसलं. माडगूळकरांच्या गद्य लिखाणाचा दुसरा पाया त्यांच्या गीत, काव्य लिखाणाच्या आधी घातला गेला तो असा! बाणभट्टाने आपण निदान २६ प्रकारच्या व्यक्तींना भेटलो असं लिहून ठेवलं आहे. माडगूळकरांचंही तसंच झालं.**




नवथर बायको यांच्या शोकांतिकेची ही कथा आहे. 'पंतांची किन्हई' हा लेखही वरवर स्मरण-रंजनात्मकच वाटतो. पण त्यातही एक लैंगिक भावनेकडे झुकणारा उल्लेख आहे. गावातल्या नाटकात माडगूळकरांनी काम केलं होतं. (गावाच्या मानाने) ते चांगलंच वठलं होतं. दुसऱ्या दिवसापासून गावातल्या तरुण मुली आपल्याकडे 'अर्थपूर्ण कटाक्ष' टाकायला लागल्या आणि तशा एका मुलीवर आपण भयंकर चिडलो आणि ओरडून तिला हाकलून दिलं असा उल्लेख त्या लेखात आहे. उरलेला लेख माडगूळकरांच्या कवितांसारखा साधा, सरळ, गोड आहे हे इथे नोंदवून ठेवतो.

माडगूळकर उत्तम नकलाकार होते आणि ते कथाकथन (क्वचित) करत तेव्हा त्यांच्यातला मिश्कील विदूषक आणि नेमकं टिपणारा लेखक हे एकमेकांत मिसळत असत. 'वाघाला दोरी लावणारा बामण' ही कोल्हापूर संस्थानात घडलेली सत्यकथा त्यांनी लिहिली होती आणि तिचं कथनही ते फार बहारदार करत. ब्राह्मणाने केलेली ब्राह्मणाची खोचक टिंगल त्यात होतीच. पण संस्थानी संस्कृतीचं तिच्या पोकळपणासकट उभं केलेलं चित्र विनोदाच्या आवरणातूनही स्पष्टपणे दिसत होतं. 'धुण्याचा दगड तोचि आहे' या दिवाळी अंकासाठी (आवाज) लिहिलेल्या छोट्या लेखातही स्वतः काँग्रेसचे आमदार असलेल्या माडगूळकरांनी काँग्रेसने आणलेली संधीसाधूपणाची संस्कृती मोकळेपणाने दाखवली होती. या चारही गद्य लेखांतून आलेल्या विषयांवर कवी माडगूळकरांची छाप जवळजवळ नाही. नेमकं काय झालं? गीतकाराने मागे टाकलेला कवी 'गीतरामायणा'ने तारला होता. पण गद्य लेखक मात्र कायमचाच मागेच पडणार होता?

'हॅलो मिस्टर डेथ' या लेखाने माडगूळकरां-मधल्या गद्यलेखकाची ताकद मराठी वाचकांना दाखवून दिली. या लेखातली माडगूळकरांची धिटाई सावरकरांच्या जातकुळीची आहे. वाचक, इतर लेखक, समीक्षक सगळ्यांचं लक्ष माडगूळकरांच्या गद्याकडे वळवण्याची किमया 'हॅलो मिस्टर डेथ'ने केली. आता माडगूळकरांनी भरभरून गद्य लिहावं अशी एकमुखी मागणी व्हायला लागली होती त्यावेळी नियतीने त्यांनाच ओढून नेलं.

स्वतःच्या काव्यलेखनाविषयी माडगूळकर १०० टक्के संतुष्ट नव्हते. पोटासाठी काव्यशक्ती आपल्याला खर्ची घालावी लागली याची खंत त्यांनी नोंदवली आहे. त्यांच्या गद्य लेखनाची उपेक्षाच झाली. मात्र त्यांच्या गद्य लेखनावर हा ठपका ठेवता येत नाही. माडगूळकरांच्या गद्याची निवडक वैशिष्ट्ये इथेच नोंदवून ठेवतो. सूक्ष्म निरीक्षण, साधं प्रवाही निवेदन, प्रसंग आणि व्यक्ती यांची रेखीव चित्रे उभी करण्यातली सहजता, आवश्यक तिथे संवाद (सिनेमात ते संवादलेखक होतेच) किंवा सरळसोट निवेदन करत जाणे, आपला अनुभव तितक्याच उत्कटतेने वाचकांच्या आवाक्यांत आणणे आणि आपण तात्पर्य काढत नसून ते वाचकांवर सोपवत आहोत असा आभास निर्माण करणे; ही कथा लिहिण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये त्यांच्यामध्ये आहेतच, पण मुख्य म्हणजे माडगूळकरांना किस्से सांगण्याची प्रचंड हौस आहे. आपण हे गद्यातच करू शकतो. वास्तव आणि काल्पनिक यांची बेमालूम सरमिसळ करू शकतो ('लुळा रस्ता' हा लेख आणि 'गावरान शेंग' ही कथा यांची तुलना करून पाहावी) हे त्यांना पक्क माहीत होतं. कविता मोहक पण तिचा जीव लहान, सिनेमाची गाणी मागणी-पुरवठा तंत्रामध्ये अडकलेली, स्फूर्तीगीतांना संदर्भाची बेडी पडलेली आणि 'गीतरामायण' पद्धतीच्या काव्यात नवीन काय सांगणार! या कोंडीत सापडलेल्या माडगूळकरांना गद्यामध्ये मोकळा श्वास घेता येत होता. तो त्यांनी भरभरून घेतला.

अण्णांचा स्वभाव आणि शैली कीर्तनकाराची होती. लहानपणी गावातल्या देवळात ऐकलेल्या कीर्तन-पुराणकथांचा खोल ठसा माडगूळकरांच्या गद्यामध्ये दिसतो. प्रत्येक कथा, व्यक्तिचित्रं, ललित लेख, छोट्या-मोठ्या आख्यानांसारखी वाटतात. 'उभे धागे आडवे धागे' ही कादंबरी स्वातंत्र्यपूर्व काळातल्या ग्रामीण जीवनाची बखर बनून जाते. ग.दि. माडगूळकर यांच्या नावावर १२ कथासंग्रह आहेत. म्हणजे त्यांनी सव्वाशेच्या आसपास कथा नक्की लिहिल्या. काही कथा आणि व्यक्तिचित्रे एकमेकांत मिसळून जातात. 'नेम्या', 'नागूदेव', 'औंधाचा राजा', 'माझा यवनमित्र' या रचना माडगूळकरांचे मित्र पु.भा. भावे यांना कथांसारख्याच वाटल्या म्हणून 'थोरली पाती' या २५ प्रातिनिधिक कथांच्या संग्रहात

भाव्यांनी त्यांचा समावेश केला. 'एक अज्ञात अंगुली लिहिते', 'अरे दिवा लावा रे कुणीतरी', हे खरं म्हणजे आत्मचरित्राचे भाग म्हणूनही पहाता येतील. 'पंतांची किन्हई' या लेखाचंही तसंच आहे. तीच गोष्ट 'वेडा पारिजात' मधल्या तात्यांची (कोंडीबा सावकार)– हे व्यक्तिचित्र आहे की कथा हे सांगणं कठीण आहे.

* * *

माडगूळकरांच्या कथांमध्ये लैंगिकतेचा विषय आणि लैंगिकतेचे मानसशास्त्र पुन्हापुन्हा डोकावतात. भाव्यांनी निवडेलल्या २५ कथांमध्ये ८/९ कथांचा हाच विषय आहे. आधी उल्लेख केलेली, 'भाताचं फूल' ही कथा भाव्यांनी का निवडली नाही याचं कारण मात्र कळत नाही. 'पंतांची किन्हई'मधल्या लैंगिकतेचा उल्लेख आधी केलेला आहेच. वेगवेगळ्या वयातील लैंगिकतेची उदाहरणं म्हणूनही या कथांकडे पाहता येईल. 'पंतांची किन्हई' मधली लैंगिकता ही नुकत्याच वयात आलेल्या युवक–युवतीची होती. 'माणूस अखेर माणूस आहे' या कथेमध्ये म्हातारा बाप (आबा देशपांडे), 'अंगातला उफाडा अंगात मावत नव्हता' अशी त्याची मुलगी यमुना, त्यांचं गावाबाहेरच्या काटवनातलं भयाण एकाकी आयुष्य! अतृप्त यमुनेचं भावजीवन माडगूळकरांनी असं चितारलं आहे, 'कधी कधी मात्र करडई काढून टाकलेल्या रानात कांड्याकरकुचांचा थवा उतरावा तसा दिवास्वप्नांचा मेळावा तिच्या मनी–मानसी दाटून येई. अशावेळी काहीतरी निमित्त काढून उचलल्या पावलांनी ती काटवनात जाई आणि वडाच्या गार सावलीत तासन्‌तास बसून राही. तो वड जणू तिचा कल्पवृक्ष होता. जवळजवळ अर्धा बिघा थंडगार करून टाकणारी त्याच्या पानांची पोपटी माया तिचा जीव सुखावून टाके. वडाच्या दणकट मुळयांनी आपोआप आकारलेल्या सुखासनावर ती तासन्‌तास बसून राही. चिमणचाऱ्याची काडी दातांत चावीत आपल्या डोळ्यांची पाखरं ती उंच अंतराळात भिरकावून देई. मनापेक्षाही जलद गतीनं ती पाखरं मोगलाईपर्यंत उडत जात आणि परत येत. येताना ती कसले कसले विचित्र नजराणे घेऊन येत. तरण्या श्वासांचा मादक दर्प, कामुक स्पर्शाचं बेहोष सुख, डोहाळे लागण्यातली सुस्त भीती, बाळंतपणातला ओला आळस, वात्सल्यातली बोबडी गाणी, एक ना अनेक! त्या वडाच्या झाडाखाली, कधीच जगायला मिळणार नाही तसलं आयुष्य ती जगून घेई.' यमुनाच्या मनात सुरूंगाच्या दारूप्रमाणे ठासून भरलेल्या या अतृप्तीचा स्फोट होणारच होता. एक तरुण वारकरी पाणी प्यायला तिच्या वडाखाली टेकला. दोघांनाही तरुण वयातल्या, एकाने स्वतःवर लादलेल्या आणि दुसऱ्यावर नशिबाने लादलेल्या, अनावश्यक वैराग्याची अर्थहीनता समजली. संधिप्रकाश विरळ होत गेला. अंधाराचे धागे भराभर एकमेकांत गुंतू लागले, वडाच्या सळसळीला पानागणिक अस्वस्थता आली. माणसांची बोलणी तोंडातल्या तोंडात राहिली. मनाच्या गळ्यातून लोढणी ढासळून पडली. बिथरल्या खोडांसारखी दोन तरुण मने समोरासमोर उभी राहिली. श्वासांचे फूत्कार झाले आणि तो विशाल वड सर्वांग शहारल्यासारखा झाला. कोळशासारखा अंधारावर काळजाचा एक ठिपका आपोआप उमटला. दिसले कुणालाच काही नाही. काळ्यात काळे मिसळून गेले. अनिच्छेने, असहाय्यपणे त्या काळ्या वावरात एक काळीकुट्ट घटना घडून गेली. विरक्तीचा अधःपात झाला. सतीत्व विराळले गेले.'

एकीकडे माडगूळकर 'काळीकुट्ट घटना' म्हणतात तरीही कथेच्या शेवटी वारकरी आणि यमुना दोघेही निष्पाप होते असाच त्यांचा सूर आहे. या कथेच्या शेवटी तरुण वारकऱ्याचं गळफास घेतलेलं प्रेत काटवनातल्या वडावर सापडतं आणि आबा देशपांडे आणि यमुना गाव सोडून निघून जातात. माडगूळकरांची मनःस्थिती द्विधा दिसते. नाहीतर त्यांनी आबा आणि यमुना यांना गाव सोडायला लावलं नसतं. तरीही त्यांची सहानुभूती तो वारकरी आणि यमुना यांच्याकडेच झुकली आहे. 'काशीयात्रा' या कथेमध्ये हाच विषय परत आलेला आहे. त्यातल्या दिगूदादाचे अध्यात्म ढोंगी आणि कपटी आहे पण प्रयागाची लैंगिक उपासमार ही मात्र प्रामाणिक आहे. राधाबाई त्यांच्याबरोबर काशीयात्रेला जायला निघतात. नैसर्गिक लैंगिक भूक शमवण्यासाठी प्रयागानेही आध्यात्मिकतेचं सोंग आणलंय हे त्यांना कळतं. दिगू आणि प्रयागा यांचा अनाचार डोळ्यांनी पाहून त्या हाय खातात आणि यात्रा अर्धवट सोडून घरी येऊन प्रायोपवेशन करून देह ठेवतात. इथे माडगूळकरांनी ढोंगी अध्यात्माचा स्पष्ट निषेध केला आहे. पण कुणाच्या पापाची शिक्षा कुणाला भोगावी लागली ही नैतिक हळहळ वाचकांना जाणवेल याचीही



**मार्मिकता आणि रसिकता या दोन्ही रूळांवर माडगूळकरांची गाडी वेगाने धावते. काही अपवाद सोडले– जे अगदीच कौटुंबिक वैयक्तिक निमित्ताने लिहिलेले लेख आहेत– तर माडगूळकरांच्या गद्यलेखनाचा महिरपी कंस एकीकडे ते माणदेशामधलं गाव आणि दुसरीकडे सिनेमाव्यवसाय असाच आहे.**





**माडगूळकरांनी म्हटलं आहे, 'माझं गाव गोकुळासारखं आनंदी आहे असं मी म्हणत नाही. तिथं दुःख आहेत. हेवेदावे आहेत; पण मला ते दिसत नाहीत. मला माझ्या गावाचं मोठेपण तेवढं दिसतं. कारण मी स्वतःला त्या गावाचं लेकरू म्हणवतो, दुःखकष्टातूनही जीवनानंद वेचण्याची वृत्ती मला त्या गावाच्या मातीनं दिली आहे. शुक्राची चांदणी उगवली की माझ्या गावात ये-जा सुरू होते. मला वाटतं, माझ्या नगरीचं द्वार शुक्रच उघडतो.'**



व्यवस्था केली आहे. सगळ्याच कथांचा सविस्तर विचार एका लेखात अवघड आहे. 'चोळी'मध्ये एक ब्रिटिश अधिकारी आणि त्याची वडार प्रेयसी यांची अद्‌भुत आणि अतर्क्य प्रेमकहाणी सांगताना माडगूळकर रंगून जातात. 'वीज'मध्ये मतिमंद तरुण मुलाच्या लिंगभावनेचा स्फोट होतो. तो गावातल्या एका तरुण बाईची वाळत घातलेली साडी पळवून नेतो. पुढचा भाग असा, 'त्याला जेवण सुचले नाही. पुढच्या खोलीतच आधाशीपणाने त्याने एक तरट अंथरले, त्यावर त्या साडीची चौपदरी अंथरली, दार लावून घेतले, आणि उन्हाने हैराण झाल्यावर खंडोबाच्या गार तळ्यात अलगद सुळकी मारावी तशी त्याने त्या अंथरुणावर मारली. जौंदाळ्याच्या सुनेचे ओले लावण्य, बुजरीचा नाजूक स्पर्श, तिच्या भुवईची कमान, बेलफळाचा कठीणपणा-पिकलेल्या निळुंब्यांची आंबट चव, नाना गोष्टी तो अनुभवीत होता. उन्हात तापलेल्या चिमण्या मातीत गडबडा लोळतात, पंख फडफडवितात, तसे करीत होता. लिंबांच्या मोहराचा वास, गव्हाच्या लोंब्यांवरचा ओलसर वारा, दिवाळीतली पहाट-त्याच्या अनुभूतीत ही सारी सुखे एकत्र आली होती. आपले अवघड अंग तो मनमुराद लोळवीत होता. हळूहळू लोटांगण थांबले. त्याच्या अंगातली शीरन् शीर शिथिल झाली....' तुक्याची चोरी उघडकीला येते. बाप त्याला बेशुद्ध पडेस्तोवर मारतो. जौंदाळ्याच्या सुनेला त्याच दिवशी दुपारी तुक्याने अंघोळ करताना पाहिलं होतं, हे कुणालाच माहिती नसतं.

'मद्यालयाची वाट' मध्ये स्वतःची बायको आणि जिवलग मित्र यांचा व्यभिचार पाहून अल्कोहोलिक झालेल्या गृहस्थाची कथा आहे. 'नागूदेव'मध्ये औषधाचे पैसे वसूल करण्यासाठी पेशंटच्या मुलीवर बलात्कार करणारा वैद्य आहे. 'मुकी कहाणी'-मध्ये किशी आणि गोपीनाथ यांच्या अपूर्ण प्रेमाची कहाणी सांगताना माडगूळकरांनी दाखवलेला संयम पाहिला की तेंडुलकर, खानोलकर, जयवंत दळवी या तथाकथित 'धीट' लेखकांनी लैंगिकतेचा विषय किती धसमुसळेपणाने हाताळला होता हे जाणवतं. माडगूळकरांना हे साधलं कारण त्यांचं लैंगिकतेबद्दलचं स्वारस्य सहानुभूतीमधून आलेलं होतं. त्यांना वाचकांना 'धक्कातंत्रा'च्या सापळ्यात अडकवायचं नव्हतं.

* * *

समाजाने विकृत किंवा वेडसर ठरवलेल्या विक्षिप्त व्यक्तींनीही माडगूळकरांचा कथाप्रदेश व्यापून टाकला आहे. 'वीज'मधला तुक्या, 'माझा यवनमित्र'मधला नजम नकवी, नागूदेव, 'उबळ'मधले नानासाहेब, नेमिनाथ, 'वय'मधला एकेकाळी गाजलेला पैलवान 'रामा' असे अनेक विक्षिप्त लोक माडगूळकरांच्या कथांमध्ये भेटतात. माणूस विक्षिप्त असतो म्हणून एकाकी होतो की नशिबाने एकाकीपणा लादल्यावर विक्षिप्त होतो या प्रश्नाचा निकाल माडगूळकरांनी वाचकांवर सोडलेला आहे. विक्षिप्त माणसं आसपासच्या लोकांना समजतच नाहीत. त्यांना समजून घ्यायचा कुणी प्रयत्नही करत नाही. मग खरं विक्षिप्त कुणाला म्हणावं, हा प्रश्नही या कथा वाचताना विचारात घ्यावा लागतो. सगळ्या गावाशी नागूदेव फटकून होता तरी त्याच्या मनामधला माणुसकीचा धागा कायम होता. म्हणून त्याने स्वतः होऊन कुलकर्ण्यांच्या मुलीला माया लावली, तिला आपल्या घरी ठेवून घेतलं. नागूदेव तीर्थयात्रेला गेला. इकडे सुमनचं पाऊल वाकडं पडलं. तिला दिवस गेले. कुलदेवतांची यात्रा करण्यात धन्यता मानणाऱ्या नागूदेवाने सगळा लोकापवाद गुंडाळून ठेवला. तिला पापी ठरवलं नाही. तिच्या मुलाला नागूदेव सूर्यपुत्र (कर्ण) म्हणू लागला. १० गावानं त्याला भ्रष्ट ठरवलं, त्याचं पौरोहित्य बंद केलं. 'मला नुसतं संतान पाहिजे होतं. परमेश्वरानं नातू देऊ केला!' असं स्वतःचं समाधान करणारा नागूदेव गावाला विक्षिप्त वाटला हे ठीकच होतं. पुढे सुमनला तिच्या मुलासकट स्वीकारायला तयार असलेला देशपांडे हा शिक्षक नाना कुलकर्ण्यांच्या संपर्कात आल्यावर मात्र नागूदेवाचं डोकं फिरलं. तो म्हणतो, ''वा..रे समाज! एक वैद्य रुग्णाइताच्या अवस्थेचा फायदा घेतो, औषधासाठी तोंड वेंगाडणाऱ्या पोरीवर बलात्कार करतो. आई-बाप तिच्या पोटचं पोर ठार मारू पाहतात, आणि एक महामूर्ख तरुण त्या बाटलेल्या पोरीशी लग्न करू इच्छितो. संतोष, परम संतोष. संभाळा तुमचा समाज आणि तुम्ही! आम्ही चाललो. आमच्यासारख्यांना आता जागा नाही इथं.'' इथे खरा विक्षिप्त कोण आहे?

नागूदेवाचा विक्षिप्तपणा सगळ्या गावाला माहीत होता. चर्चेचा, अचंब्याचा विषय होता. पण काही विक्षिप्त फक्त माडगूळकरांनाच माहीत होते. त्यांच्या अस्तित्वाचा भाग बनून राहिलेला निरपेक्ष

'नेम्या', 'वेडा पारिजात'मधले तात्या, यवन मित्र 'नजम-नकवी' हे त्यांचे काही नमुने. 'स्वामी आम्रानंद' हाही तसा अवलिया. नेम्याला स्वतःचं आयुष्य आहे, कुटुंबही आहे, तरीही तो माडगूळकरांची आयुष्यभर सावलीसारखी सोबत करत राहिला ते कशामुळे, हा प्रश्न वाचकाला तर पडतोच; पण माडगूळकरांनाही तो पडल्याची तीव्र जाणीव लेखाची शेवटची वाक्यं वाचताना होते. माडगूळकरांची गरज भागवण्यासाठी नेम्याने दुसऱ्याकडून उसने पैसे मागून आणले होते हे कळल्यानंतरही नेम्यावर त्या प्रकरणात आपण अन्याय केला हे माडगूळकरांनी नोंदवलं नाही याचा बाऊ करण्यात अर्थ नाही. नेम्याला गृहीत धरण्याची सवयच त्यांना जडली होती. या कथेमध्ये माडगूळकरही विक्षिप्त वाटतात; तसं असल्यामुळेच त्यांचं नेम्याशी जमतही होतं?


यवन मित्र नजम-नकवी हा उलटा नमुना आहे. नेम्या अबोल तर नकवी कमालीचा बोलका; नेम्याला साधी मराठी धड यायची मारामार तर याच्या जिभेवर वाणीने बिऱ्हाड केलेलं. उठता बसता शेरोशायरीची भरमार! प्रेमाचा देखावा करण्यात नकवी पटाईत-गळ्यात गळा घालायला तयार! असा नकवी एक दिवस पाकिस्तानात पळाला; ते सुद्धा माडगूळकरांची 'सफेद झूठ' (काय पण फिल्मी नाव!) ही कथा घेऊनच. मग त्याचं पत्र आलं. त्यात 'तुमची कथा मी आणली आहे, तिच्यावर इथे (पाकिस्तानात) सिनेमा निघण्याची शक्यता आहे. तुम्ही मला मुखत्यार पत्र द्या. काही 'देशमुख'ही (मोबदला) पाठवायची व्यवस्था करीन.' वगैरे मखलाशी होती. कथेच्या शेवटी माडगूळकरांना वाटत राहतं की ही जखम चिघळू नये म्हणून आपण गप्प राहतो आहोत; पण खरं कारण ते नसतं. त्यांना अजूनही वाटतं आहे की एवढं सगळं झालं तरी एक दिवस नकवी आपल्याला भेटायला येईलच! आता थक्क होण्याची पाळी आपल्यावर येते. ही कथा एका विक्षिप्ताची आहे की दोन विक्षिप्तांची? सम-समा संयोग जाहला?

दुसऱ्याच्या घरी जायचं, हवे तेवढे दिवस मुक्काम ठोकायचा. त्यांची सोय/गैरसोय नजरेआड करायची. एवढंच नव्हे तर त्यांच्या नावावर उधार वस्तू स्वत:साठी घ्यायच्या आणि एक दिवस त्या घरातून नोटीस मिळाली की निर्लेप (निर्लज्ज) पणे गाशा गुंडाळायचा हा बाणा असणाऱ्या 'आम्रानंद' नावाच्या विक्षिप्ताला माडगूळकर 'स्वामी' ही उपाधी जोडतात. तेव्हाही नेमका विक्षिप्त कोण, असंच वाटतं.

'वेडा पारिजात' हे गद्यकाव्यच आहे. माणसांमधून जीव काढून घेतलेल्या पण झाडं, फुलं, गुरं-ढोरं यांच्यावर उत्कट प्रेम करणाऱ्या तात्यांचा विक्षिप्तपणा अतिशय गोड आहे. त्यामुळे लेखकाबरोबर आपणही तात्यांच्या प्रेमात पडतो. माणूस आणि निसर्ग यांच्यातला नेमका फरक माडगूळकरांनी तात्यांच्या तोंडून ऐकवला आहे. काही अपवाद वगळले तर झाडं नव्या जागी रुजतात, जनावरं नव्या गोठ्यात/अंगणात/शेतात रमू शकतात. तसं माणसांचं सहसा होत नाही; झालंच तर त्या घावाचा वण राहतोच राहतो. जुळवून घेणारा पारिजात तात्यांना 'वेडा' वाटतो. त्याचा राग मात्र त्यांना येत नाही. इतकं त्याच्यावर त्यांचं प्रेम असतं!

* * *

मानवी आयुष्याचा अर्थ लावणं हे साहित्याचं एक कार्य असतं. पण प्रत्यक्षात मानवी आयुष्य कोणाला अर्थ लावणं सोपं जावं म्हणून घडत नाही; त्याला एक तर लॉजिकच नसतं किंवा ते लॉजिक आपल्याला कळत नाही. सश्रद्ध त्याला परमेश्वरी इच्छा म्हणतात, तत्त्वज्ञानी नियतीकडे बोट दाखवतात आणि बुद्धिवादी त्याची संभावना निरर्थकता (absurdity) म्हणून करतात. या अतर्क्य अनाकलनीय घटना/हकीकतींचंही कथाकार माडगूळकरांना प्रचंड आकर्षण आहे. 'एक अज्ञात अंगुळी लिहिते', 'अरे दिवा लावा रे कुणीतरी', 'अधांतरी', (लैंगिक संदर्भाकडे डोळेझाक केली तर) 'चोळी', 'तुपाचा नंदादीप' या तशा काही कथा- 'अतर्क्य' ही तर अशा कथामधली सर्वात अतर्क्य! एक महान चित्रकृती केवळ रात्री नळ बंद करायचा राहिला म्हणून या कथेमध्ये नष्ट होते. वडिलांचा अंत्यसंस्कार करून आल्या आल्या लेखकाच्या हातून घरचं कुत्रं मरतं पण नंतर त्याचं पिल्लू मात्र अंगणात खेळू लागतं. १) (अरे, दिवा लावारे कुणीतरी!) दिल्लीच्या २/४ दिवसांच्या मुक्कामात त्या घरची म्हातारी - जी एरवी या पाहुण्यांशी अतिशय प्रेमळपणाने, आपुलकीने वागली होती- आत्महत्या करते. २) (एक अज्ञात अंगुळी लिहिते) 'चोळी'मधला गोरा साहेब एक दिवस वडारी रामव्वाला तिच्यासाठीच बांधलेला बंगला बहाल करून निघून जातो आणि 'अब तुम रोज चोली पहन सकता है!' एवढंच हिंदी





**पहिलं वाक्य सोडलं तर हा उतारा रोमॅन्टिक कवीने लिहिला आहे आणि इथे माडगूळकर चक्क सत्य लपवत आहेत. आपल्या गावातली दुःखं, हेवेदावे त्यांनी गद्यलेखनासाठी राखून ठेवले होते, एवढाच त्याचा अर्थ. तरीही कलावंत आणि त्याची जन्मभूमी यांच्यातलं उत्कट जैविक नातं मोरोपंतांप्रमाणे 'स्वतोक पितरां रूचे जरिहि कर्दमी रांगले' असंच त्यांनाही वाटतं.**






**सूक्ष्म निरीक्षण, साधं प्रवाही निवेदन, प्रसंग आणि व्यक्ती यांची रेखीव चित्रे उभी करण्यातली सहजता, आवश्यक तिथे संवाद किंवा सरळसोट निवेदन करत जाणे, आपला अनुभव तितक्याच उत्कटतेने वाचकांच्या आवाक्यांत आणणे आणि आपण तात्पर्य काढत नसून ते वाचकांवर सोपवत आहोत असा आभास निर्माण करणे; ही कथा लिहिण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये त्यांच्यामध्ये आहेतच.**




पत्र तिला पाठवतो. आता नियतीने रामव्वापुढे काय वाढून ठेवलं असावं असा प्रश्न वाचकाला पडतो. ‘अधांतरी’मध्ये मराठ्यांची लाडकी मुलगी बसखाली सापडल्याची तार येते आणि देशपांडे (माडगूळकरच?) या कादंबरी लिहिण्याची धडपड करणाऱ्या लेखकाचं मन ‘मिनी वाचली पाहिजे’ असा आक्रोश करू लागतं. काही क्षणापूर्वीच ‘माणसाचं आयुष्य अधांतरी आहे’ असं मराठेच सहज म्हणाले होते, ‘हा केवळ योगायोग की नियतीने दिलेली पूर्वसूचना?’ असा प्रश्न उभा करून ही कथा संपते. कथेच्या तंत्राला अनुसरून तारेमध्ये मिनी ‘अत्यवस्थ’ असे शब्द माडगूळकरांनी सूचकपणे टाकलेले आहेत. म्हणजे पुन्हा मराठे, त्यांची पत्नी सुलभा, बसखाली सापडलेली मिनी यांची नियती काय असा प्रश्न शिल्लकच राहतो. कवी माडगूळकरांनी या प्रश्नांची उत्तरे ‘पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा’, ‘जिवासवे जन्मे मृत्यू जोड जन्मजात’ अशी दिलेलीच होती. कथा लिहिणारे माडगूळकर हा फसवा सोपेपणा टाळतात!

* * *

सिनेमाने कुटुंबप्रमुख माडगूळकरांची आर्थिक चिंता तर मिटवलीच. पण लेखक माडगूळकरासांठी मनुष्य स्वभावाचे असंख्य नमुने सिनेमानेच मांडून ठेवले होते. त्यातच माडगूळकर सिनेमात आले त्या काळात सिनेमा केवळ करमणुकीसाठीच वापरला जात होता. दाहक वास्तवाचा स्पर्श तर राहोच; त्याचा विसर पडावा म्हणूनच सिनेमा वापरला गेला. जुने पौराणिक महाकाव्यातले विषय, वरवर क्वचित सामाजिकता भासली तरी व्यक्तिरेखा पारंपरिक साच्यामधल्याच, अभिनयाचा दर्जा अत्यंत बेताचा, त्याचाही विसर पाडण्यासाठी मोठमोठे सेटस, पडदे आणि गाणी असा सिनेमा तोच–तोपणाने पछाडला असला तरी त्यात उतरणारी माणसं एकापेक्षा एक लहरी (मनस्वी?), बेपर्वा (मुक्त?) पैसे बुडवणारी (कठोर व्यावसायिक?) अशीच होती. चांगला संस्कार असलेल्या घरांतून नट–नट्यांचा पुरवठा होतच नव्हता. मुख्यतः नट्यांचा प्रवास तर अतिशय वेदनेचा/ पिळवणुकीचा होता. संस्कारांच्या अभावामुळे विकार तीव्र होते. आपलं रूप आहे तोवरच जास्तीत जास्त पैसे मिळवून कुठेतरी स्थिर होऊन इतर चारचौघींसारखा प्रपंच थाटावा, मुलाबाळांना शिक्षण देऊन या क्षेत्राच्याबाहेर पाठवावं, मुलींची लग्नं चांगल्या घरी व्हावीत अशी स्वाभाविक पण सहसा पूर्ण न होणारी अपेक्षा असलेल्या या नट्यांना ती पूर्ण करण्यासाठी स्वतःचं अस्तित्व (शरीर) जवळजवळ विकावं लागत होतं. नटीचं कूळ शोधण्यापेक्षा तिला कूळ नसलेलंच बरं, म्हणजे तिच्याबद्दल काय वाटेल ती गॉसिप पसरवता येईल असा दुष्ट विचार करणाऱ्या समाजामधल्या नट्यांची अगतिकता माडगूळकरांना न जाणवणं शक्यच नव्हतं.

‘वेग’ ही दीर्घकथा (‘गदिमा साहित्य–नवनीत’च्या पहिल्या आवृत्तीत तिला कादंबरी म्हटलं आहे.) अशा शोभा नावाच्या रूपसुंदर पण दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून सिनेमात आलेल्या लोकप्रिय नटीची कहाणी आहे. सिनेमाचंच कथनतंत्र माडगूळकरांनी इथे वापरलेलं आहे. प्रत्यक्ष आता घडणारा प्रसंग आणि फ्लॅशबॅक यामधून घटनांची लांबलचक मालिकाच शोभाच्या आयुष्याची शोकात्म नशा आपल्या वाचकापुढे उभी करते. शोभाची जीवनकथा टिपिकल आहे. लहानपणी आई मेली, वडिलांनी तिला एका ‘दूरच्या’ बहिणीकडे ठेवलं. ती ‘बहीण’ वृत्तीने वेश्याच निघाली. तिनं सुखी संसाराची गोड स्वप्नं पाहणाऱ्या तरुण शोभाचं लग्न गोपीचंदशी लावून दिलं. गोपीचंदपासून स्वत:ला मुलगा झाल्यावर सकवारबाई त्याच्याशीही संबंध ठेवून आहे हे कळल्यावर शोभा ‘घराबाहेर’ पडली. मग तिला निरंजन वर्माने आपल्या जाळ्यात ओढून सिनेमात आणलं. मात्र निरंजन वर्माने तिची परस्पर एकनिष्ठतेची अपेक्षा साफ धुडकावून लावली. मग हताश शोभा मोतीराम शेठकडे ढकलली गेली. कथा सुरु होते त्यावेळेला शोभा तिच्या बंगल्यातून स्वत:च्या आलिशान पॅकार्ड कारमधून बाहेर पडते. तेव्हा आधी संबंध आलेले तिन्ही पुरुष तिच्या गाडीत असतात. पहिला नवरा गोपीचंद आता तिचा ड्रायव्हर असतो. निरंजन तिची मर्जी सांभाळण्यासाठी धडपडत असतो. मोतीराम पाठीमागच्या सीटवर एका कोपऱ्यात अंग चोरून बसलेला असतो. कारण मधू जोशी हा तरुण देखणा नट त्याच्या आणि शोभाच्या मध्ये बसलेला असतो. आपलं शारीरिक अपील अजूनही टिकून आहे ना? याचा निकाल करण्यासाठी शोभा त्याच्याशी लगट करत असते. मधू अर्थातच हुरळून गेलेला असतो. एक दिवस या पुरुषांमध्ये आपला नंबर चौथा असेल आणि शोभाच्या आयुष्यात नवीन

पुरुष येईल हे त्याला माहीत नसतं. पण कथेचा एकूण 'वेग' पाहता त्याचं माडगूळकरांनी सूचित केलेलं भविष्य वाचकांना कळतंच. शोभाच्या या सगळ्या आत्मरतीमागे तिच्यामधली आपल्या मुलासाठी धडपडणारी आई आणि स्वतःच्या सिने-इमेजच्या प्रेमात पडलेली नटी या दोघीही आहेत, हे लेखकानं सुचवलं आहेच. त्यामुळे 'वेग' हे नावही 'सफेद झूठ' सारखं फिल्मी होऊन जातं, कारण हा वेग (मधूसाठी आवेग?) जीवघेणा ठरू शकतो.

माडगूळकरांनी एका बहुचर्चित विषयाला हात घालण्याचं धाडस इथे दाखवलं आहे. पण शोभाची हकीकत त्यांनी फार घिसाडघाईने गुंडाळून टाकली; या कथानकातली कादंबरी गुदमरुन टाकली. नटी म्हणून शोभाने कोणत्या भूमिका केल्या? तिला अभिनयाचे धडे कुणी दिले? तिच्याकडे चेहरा होता, पण संवाद म्हणायला कुणी शिकवलं? चेहऱ्याच्या, शरीराच्या, आवाजाच्या वापरातले बारकावे तिला कसे कळले? तिच्या यशस्वी सिनेमात (त्या काळच्या संकेताप्रमाणे) गाणी, नाच तर असणारच- ते कौशल्य तिच्यात कुठून आलं? हे सगळं निवेदकाने बाजूला ठेवलं आहे. तसंच पॅकार्ड गाडी आणि बंगला तिने स्वतः कमावली की कोणा धनिकाने (वाजवी किंमत वसूल करून) बहाल केली? हे आणि इतर अनेक तपशील माडगूळकरांना आणता आले असते आणि सिनेमाच्या धंद्यावर मराठीतली पहिली वाचनीय कादंबरी लिहिल्याचं श्रेय त्यांना मिळालं असतं.

एक शक्यता अशी आहे की, स्वतः त्याच व्यवसायात असल्यामुळे माडगूळकर तपशीलांच्या बारकाव्यांत शिरले नाहीत. ते तसे शिरले असते तर या कथेतले सगळे अगतिक पुरुष-जे तेव्हाही याच व्यवसायात असणार-उघडे पडले असते आणि त्यातून कदाचित माडगूळकर चित्रपटधंद्याच्या बाहेर फेकले गेले असते. 'सत्य हे कल्पितापेक्षाही अधिक विदारक असतं' अशी नटीची हकिगत 'हंसा वाडकर' यांच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मकथनात मराठीत पहिल्यांदा आली. माडगूळकरांची ही दीर्घकथा त्याच्या आधीची आहे की नंतरची? त्याच पुस्तकाशी 'वेग'चं साम्य आहे अशी चर्चा झालीच होती.

माझा अंदाज थोडा वेगळा आहे. त्या सुमारास हॉलिवूडमधून 'सनसेट बुलेवार्ड' नावाचा 'विल्यम हॉल्डन' आणि 'ग्लोरिया स्वान्सन' यांच्या प्रमुख भूमिका असलेला असाच सिनेमा (१९५०) आलेला होता. तो मुंबईत नक्कीच लागला असणार आणि माडगूळकरांनी पाहिलाही असणार. हॉलिवूडचा चांगला सिनेमा आपण बघितला पाहिजे असं नक्कीच माडगूळकरांना वाटलं असेल. शाळेमध्ये फारसं इंग्लिश न शिकल्यामुळे कदाचित त्या सिनेमातलं इंग्लिश त्यांना कळलंही असेल? पुन्हापुन्हा पहावा असा हा सिनेमा आहे. एकच साम्य नोंदवून ठेवतो -'सनसेट बुलवार्ड' मधल्या नटीचा पहिला नवरा गोपीचंदप्रमाणेच तिचा घरगडी झालेला आहे. गोपीचंद ड्रायव्हर आहे, तर तो बटलर-एवढाच फरक!


* * *


सिनेमाच्या धावपळीत कथा, ललितलेख, व्यक्तिचित्रे, आठवणी असं लेखनच माडगूळकरांनी केलं यात नवल नाही. कादंबरी लिहिण्याइतकी उसंत त्यांना कधी मिळालीच नसावी. तरीही त्यांच्या नावावर दोन कादंबऱ्या आहेत. त्यातली 'उभे धागे आडवे धागे' ही कादंबरी १९७२ मध्ये प्रकाशित झाली. शंकर पाटील यांच्या 'टारफुला'च्या पाठोपाठ ही कादंबरी यावी हे योग्यच होतं. कारण या कादंबरीमध्येही एका ओबीसी कुटुंबामधल्या सुशिक्षिताची कहाणी सांगता सांगता 'टारफुला'प्रमाणेच संपूर्ण गावाची कथा लेखक सांगून टाकतो.

रघुनाथ जगन्नाग कोष्टी हा सखू कोष्टीणीचा मुलगा, त्याचा बुळा भाऊ रघुनाथ आणि देखणी वहिनी इंद्रा यांची ही कथा अर्थातच माडगूळकर जशा गावात जन्मले-वाढले तशा गावात स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु होऊन ग्रामपंचायतींच्या निवडणुका सुरू झाल्या त्या टप्प्यावर येऊन संपते; १९६०-६५ च्या आसपास! मराठीत ग्रामीण कादंबरीत मुख्यतः सरदार, इनामदार पाटील-कुलकर्णी-देशपांडे-देसाई-देशमुख हे वतनदार, मातब्बर रोमँटिक नायकासारखे दरोडेखोर यांचाच बोलबाला असताना माडगूळकरांनी कोष्टी कुटुंबातला नायक निवडावा याचं आश्चर्य वाटतं, कदाचित त्यामागे काही घरगुती कारणही असेल. कारण 'कलाहीन तेली आणि बुद्धीहीन कोष्टी' ही म्हण वापरण्याची संधी माडगूळकरांनी अनेकदा घेतली आहे. असं हे बलुतेदाराचं घर. व्यवसाय असला तरी हातावरच पोट असणारं. त्या घरात इंद्रा नावाची सुंदर/उफाड्याची सून आली तर सगळ्या गावाचा विशेषतः गावातल्या टग्यांचा तिच्यावर डोळा असणार



**'वेग' ही दीर्घकथा शोभा नावाच्या दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून सिनेमात आलेल्या लोकप्रिय नटीची कहाणी आहे. माडगूळकरांनी एका बहुचर्चित विषयाला हात घालण्याचं धाडस दाखवलं आहे. पण शोभाची हकीकत त्यांनी फार घिसाडघाईने गुंडाळून टाकली; इतर अनेक तपशील माडगूळकरांना आणता आले असते आणि सिनेमाच्या धंद्यावर मराठीतली पहिली कादंबरी लिहिल्याचं श्रेय त्यांना मिळालं असतं.**






**'हॅलो मिस्टर डेथ' या लेखाने माडगूळकरांमधल्या गद्यलेखकाची ताकद मराठी वाचकांना दाखवून दिली. मृत्यूविषयी चिंतन करणं ही बहुतेक लेखकांची आवडती थाप असते. तसा प्रसंग स्वतःच्या आसपासच्या माणसांवर जरी आला तरी एरवी आत्मा-परमात्मा, जन्म-पुनर्जन्म, इहलोक-परलोक यांच्या चर्चेसाठी सरसावणाऱ्या भल्याभल्यांची गाळण उडते. या लेखातली माडगूळकरांची धिटाई सावरकरांच्या जातकुळीची आहे. वाचक, इतर लेखक, समीक्षक सगळ्यांचं लक्ष माडगूळकरांच्या गद्याकडे वळवण्याची किमया 'हॅलो मिस्टर डेथ'ने केली. माडगूळकर राहिले असते तर या लेखानंतरचं त्यांचं गद्य कदाचित वेगळ्या तेजाचं झालं असतं.**

आणि एक दिवस ती स्वतःच घर टाकणार किंवा तिला कोणीतरी काढून नेणार हे ठरलेलंच होतं. मात्र सखू चोथीण खंबीर निघाली. बाहेरख्याली सुनेला तिनं कायमचं टाकलं! अगदी ब्राह्मण संस्थानिकाच्या घरच्या बाईंनी दम दिला तरी तिनं सुनेला (मधल्या काळात दिवस गेलेल्या) घरात घेतलं नाही. त्याबद्दल संस्थानाने तिची मालमत्ता जप्त केली. तिचा संस्थानिक ब्राह्मण होता, पण कोल्हापूरचा राजा मराठा. आपला खटला तिने कोल्हापूर दरबारात नेला, तिला न्याय मिळाला. परत ताठ मानेनं गावात आली, 'बुळ्या' मुलाचं दुसरं लग्न करून दिलं. नात्यामधल्या एका सामान्य मुलीशी लग्न करायला जगूला भाग पाडलं. पण त्या लग्नामुळे कुणीच सुखी झालं नाही. कादंबरी संपते तेव्हा जगू लग्न न करताच एकीबरोबर राहतो आहे, त्याचा लेखक-मित्र (कदाचित स्वतः माडगूळकर?) एवढी एकच त्याला मन मोकळं करायची जागा आहे.

सखू चोथीणीवरती माडगूळकरांच्या आईची दाट छाप आहे. कादंबरीमध्ये इतर लैंगिक संदर्भही माडगूळकरांच्या कथांशी समांतर आहेत. या कादंबरीतही पाऊल वाकडं पडलेल्या इंद्राला स्वीकारणारी व्यक्तिरेखा आहे. रयतेच्या बायका-मुलींवर डोळा ठेवणारा फौजदार आहे, त्यानंच इंद्राला काढून नेलं होतं आणि त्याला गावातल्या 'महात्मा मित्रमंडळा'च्या कार्यकर्त्यांनी मदत केली होती! गावातल्या म्हातारपण ओलांडून गेलेल्या देसायाची रखेलही गावात प्रतिष्ठेने जगते आहे आणि तिच्या मुलीबरोबर जगूचं प्रेमप्रकरणही आहे. त्यामुळे त्याला लग्नाच्या बायकोची अवहेलना सहन करावी लागतेच पण गणिकेच्या मुलीचा मधेच दुसरीकडे संबंध जुळलेला असतो!

कोष्ट्याचा नायक असल्यामुळे 'उभे धागे आडवे धागे' हे प्रतीक कादंबरीच्या नावासाठी उपयोगी पडलं तरी यात नुसते उभे/आडवे नाहीत तर तिरपे/नागमोडी धागेही गोवले गेले आहेत, हे माडगूळकरांच्याही लक्षात आलेलं नसावं. 'औंधाचा राजा'मधला आदर्श संस्थानिक-लाच मागितली म्हणून एका अधिकाऱ्याला रातोरात संस्थानाच्या हद्दीबाहेर हाकलणारा-खरा की फिर्याद कोष्टीणीची आहे म्हणून तिला न्याय नाकारणारी संस्थानिकांच्या घरची उन्मत्त बाई खरी? 'मोहोरलेला कडुनिंब'मधलं जिव्हाळयानं ओतपोत भरलेलं ते माडगूळकरांचं 'माझं गाव' खरं की भानगडी, हेवेदावे, टगेगिरीनं बुजबुजलेलं, सडलेलं जगू कोष्टयाचं गाव खरं? कादंबरीच्या शेवटी जेव्हा माडगूळकर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला स्पर्श करतात तिथेही ते या नवीन 'पंचायत राज' व्यवस्थेबद्दल फारसे सकारात्मक आणि आशावादी नक्कीच वाटत नाहीत! 'मंतरलेले दिवस'मध्ये स्वातंत्र्य म्हणजे नेमकं काय हेही नीटसं न कळणारे पण नाना पाटलांच्या पत्री सरकारचा झेंडा हातात घेऊन 'गांधीबाबाचं राज्य आणण्यासाठी तरुण जिवावर उदार होतात आणि या जगूच्या गावात 'महात्मा मित्रमंडळा'चे टगे गावातल्या क्रूर, बेशरम फौजदारासाठी एका घरातली नांदती सून काढून नेतात! त्यामुळे हे तिरपे-गुंतागुंतीचे धागे माडगूळकरांनी लपवले नाहीत म्हणून त्यांचं अभिनंदन करावं की त्यांनी लिहिलेल्या आधीच्या अनेक लेखांशी या कादंबरीचा मेळ बसत नाही, म्हणून अस्वस्थ व्हावं? कल्पित कोणतं आणि सत्य कोणतं?

माडगूळकरांच्या कथा-दीर्घकथा-कादंबऱ्यांमधून त्यांची नैतिक भूमिका नेमकी समजत नाही. एकीकडे ते पारंपरिक गावगाड्याच्या प्रेमात होते, पण त्यातला अन्यायही त्यांना बोचत होता. लैंगिक विषयातही संयमाचं महत्त्व सांगणारी पारंपरिकता त्यांना पटत होती पण प्रत्यक्ष माणसं वेगळंच जगताना दिसत होती. पाप-पुण्याच्या पारंपरिक व्याख्यांमधून ते पुरते बाहेर यायच्या आधीच त्या व्याख्यांना साफ धुडकावणारी माणसंही त्यांना पावलोपावली भेटत होती. त्यातल्या बहुतेकांना त्यांच्यामधल्या गद्य लेखकानं नाकारलं तर नाहीच पण त्यांचे 'उभे आडवे धागे' वाचकांना सादर केले.

* * *

माडगूळकरांचं इतर गद्यलेखन आठवणी, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, काही मागणी-पुरवठा व्यवहाराचा मान ठेवण्यासाठी केलेलं प्रासंगिक लेखन अशा प्रकारचं आहे. कथा-दीर्घकथा-कादंबरीमधलं मानवी आयुष्याचं परस्परविरोधी वास्तव थेटपणे मांडण्याचं धाडस या लिखाणात त्यांनी कधीच दाखवलं नाही, कदाचित त्यांच्या उद्देशाशी ते विसंगत ठरेल, अकारण वादविवाद होतील म्हणूनही त्यांनी ते टाळलं असावं. मात्र हे सर्व लिखाण-एखाद दुसरा अपवाद वगळता-त्यांच्या शैलीचे बरेचसे गुण त्यात

असल्यामुळे वाचनीय आहे.

'मंतरलेले दिवस' या ललित लेख-संग्रहाची चर्चा या आधी केलेलीच आहे. 'तीळ आणि तांदूळ' हा व्यक्तिविषयक लेखांचा संग्रह आहे. त्यातले काही शुभेच्छा/ आशीर्वाद आणि इतर श्रद्धांजली'पर असे लेख आहेत. व्यक्तींमध्ये विविधता आहे. कुटुंबीय, आई आणि बहीण, साहित्यिक-पु.भा. भावे आणि बा.भ. बोरकर, राजकारणी-यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक, सिनेमातल्या वल्ली-मंगळकाका आणि बंडित बुराणिक ('कलावंताचे आनंदपर्यटन' मध्येही काहींची रेखाटने सापडतात.) आदरस्थाने-भालजी पेंढारकर आणि नाना पाटील, चटका लावणारे वसंत देसाई यांच्यावरच्या लेखांमधून ती मंडळी व माडगूळकर यांचे भावबंध कळतात. मात्र माडगूळकरांचा भर 'सर्वामुखी मंगल बोलवावे' असाच दिसतो.

* * *

१९४० च्या दशकाच्या सुरूवातीच्या माडगूळकरांना त्यांच्या कार्यकर्त्या-शाहीर मित्रांनी चळवळीसाठी गाणी लिहायचा आग्रह केला. त्यांनी ती लिहिली आणि हजारोंनी ऐकली. माडगूळकरांना आपल्या खऱ्या शक्तीचं भान आलं. संधी मिळेल तेव्हा ते गाणी लिहित राहिले. कथा-पटकथा-संवाद लिहिण्याच्या निमित्ताने चित्रपट क्षेत्रात आल्यावर त्यांना आपण गद्यही लिहू शकतो, हे कळलं आणि १९७७ डिसेंबरला अवघ्या ५९ वर्षांचं आयुष्य संपलं तेव्हा चार-पाच हजार गद्य पानांचा मजकूर त्यांच्या नावावर होता.

याच काळात म्हणे मराठी साहित्य कात टाकत होतं. 'नव' या शब्दाचा बोलबाला होता. नवकथा- कविता-कादंबरी-समीक्षा आधीच्या जुन्या लेखकांच्या मर्यादा दाखवून देत होती. आशय-घाट/ रूप - अभिव्यक्ती- शैलीमध्ये म्हणे आमूलाग्र परिवर्तन होत होतं. एक माडगूळकर या भाऊगर्दीमध्ये सापडला होताच; पण ग.दि. माडगूळकर या कळपात नव्हते. जमेल तशी आणि तेव्हा 'नव'संप्रदायाची टिंगल/टवाळीच करत होते. ते मूळ मराठी गद्याच्या साधेपणाने लिहित गेले. भाषेची मोडतोड न करता कर्ता-कर्म-क्रियापद हे प्राथमिक व्याकरण स्वीकारलं आणि नवसाहित्यातच अंतर्भाव व्हावा असे आव्हान देणारे विषय स्वतःच्या सरळ-साध्या पद्धतीने वाचकांना सादर केले.

माडगूळकरांना हे कसं जमलं? पहिलं इंगित हे की माझ्याकडे सांगण्यासारखं खूप आहे आणि ते मी माझ्या शैलीतच सांगेन हा आत्मविशास आणि सरस्वती आपल्यावर प्रसन्न आहे ही खात्री. 'बामणाचा पत्रा'मध्ये माडगूळकर लिहितात, 'तसू तसूने वाढत असलेल्या पिकाला आणि उगवत्या-मावळत्या नारायणाला साक्षी ठेवून मी येथे माझे लेखन सुरू करतो.

'...अंथरुणावर उठून बसले की पूर्वाकाशात प्रकाशत असलेला शुक्र पहिले दर्शन देतो. गावात चाललेल्या जात्यांवरील ओव्या झोपलेल्या कवित्वशक्तीला जागे करतात.

'....मी बैठकीवर येतो आणि लिहिण्यास प्रारंभ करतो. एकान्ताच्या परिणामामुळे असो की बीज अंकुरित करण्याच्या त्या भूमीच्या सामर्थ्यामुळे असो, डोक्यातल्या कल्पना साकार होण्यासाठी धडपडू लागतात.

'माझे लेखन सुरू होते. काम एकदा सुरू झाले की ते अडखळत नाही. विचारांची चाती फिरत राहते. मेंदू कापसासारखा हलका आणि फुगीर होतो. कथानकाचा पीळदार धागा अतूटपणे निघत राहतो..... कंटाळा आसपास फिरकत नाही...न्याहारीच्या वेळी सोडलेले बैल पुन्हा शिवळा खांद्यावर घेतात तसा मेंदू विचाराखाली मान देतो, आणि लिखाणाचे काम निष्ठेने सुरू होते.'

आधी उल्लेख आलेला 'हॅलो, मिस्टर डेथ' हा लेख मात्र बामणाचा पत्र्यात बसून लिहिला नव्हता हे उघड आहे. पण आपण जगतो की मरतो या विवंचनेत असतानाही माडगूळकर या नव्या अनुभवाला ज्या प्रसन्नपणे भिडले होते त्याचं काही मूळ बामणाच्या पत्र्यामध्ये असलंच पाहिजे! फुफ्फुसात ठाण मांडलेल्या सैतानाला ते धीटपणे सामोरे गेले आणि साक्षात मृत्यूला 'हॅलो' म्हणून परतले (की त्यांना तसा भास झाला?) यात स्वतःही निर्भय आहोत असं त्यांना वाटलं!

माडगूळकर राहिले असते तर या लेखानंतरचं त्यांचं गद्य कदाचित वेगळ्या तेजाचं झालं असतं.


वसंत देसाई गेले तेव्हा माडगूळकर म्हणाले होते, 'वसंतराव एवढ्यात जायला नको होते. अस्सल भारतीयत्व सांगणारे त्यांचे स्वर चित्रपटसृष्टीला हवे होते. तिला लागलेल्या बाटग्या वेडावर तोच एक उपाय होता.'

सूज्ञांस अधिक काय सांगावे?

(एस.एस. मंडळासाठी रणधीर शिंदे संपादित करीत असलेल्या आगामी गदिमा स्मृतिग्रंथातून साभार)




**माडगूळकरांनी दाखवलेला संयम पाहिला की तेंडुलकर, खानोलकर, जयवंत दळवी या तथाकथित 'धीट' लेखकांनी लैंगिकतेचा विषय किती धसमुसळेपणाने हाताळला होता हे जाणवतं. माडगूळकरांना हे साधलं कारण त्यांचं लैंगिकतेबद्दलचं स्वारस्य सहानुभूतीमधून आलेलं होतं. त्यांना वाचकांना 'धक्कातंत्रा'च्या सापळ्यात अडकवायचं नव्हतं.**





# या नात्याला काय म्हणावं?

**आनंद माडगूळकर**

**गदिमा आणि सुधीर फडके ऊर्फ बाबूजी म्हणजे मराठी माणसाचा अभिमानाचा विषय आणि म्हणूनच कुणाला भेटायचा प्रसंग आला म्हणजे मुख्य विषय बोलून झाला की एक प्रश्न हमखास येतो. ''माफ करा हं! पण गदिमांचे आणि बाबूजींचे संबंध कसे काय होते हो?'' ''खूप भांडायचे म्हणे...'' ''स्वभावानं दोघंही मनस्वीच नाही का?'' एक ना दोन, अशा अनेक प्रश्नांची फैर झडायची आणि मग... गीतरामायणाच्या अफाट यशाचं सारं श्रेय कुणाला? कवीला का संगीतकाराला? या अटळ प्रश्नाला थडकून संभाषण थांबायचं हे अगदी ठरून गेलेलं आहे.**

**ग**दिमा आणि बाबूजी या दोघांची मैत्री १९४०-४२ च्या सुमारास कोल्हापुरात जमली असावी. बाबूजी कलकत्त्याला बराच काळ राहून कोल्हापूरला परतले होते आणि गदिमा नट व्हायच्या दुर्दम्य इच्छेनं मा. विनायकांच्या प्रफुल्ल पिक्चर्समध्ये नुकतेच रुजू झाले होते. मैफल जमवण्याच्या जन्मजात स्वभावानुसार कोल्हापुरात गदिमांनी एक झकास कोंडाळं जमवलं होतं. माधव पातकर, मधुकर कुलकर्णी, पुरुषोत्तम सोळांकूरकर आणि इतर अनेक. सुधीर फडके गदिमांना इथंच भेटले असावेत. तसं पाहिलं तर दोघांमध्ये काही साम्य... काही वेगळेपण. बाबूजी लहानखुरे तर गदिमा आडमाप. एक रात्रंदिवस सुरात रमणारा तर दुसरा शब्दांभोवती रुंजी घालणारा... पण निष्ठा हा सूर पक्का जमला असावा.

त्या काळी एच.एम.व्ही. ध्वनिमुद्रण कंपनी सारा बाडबिस्तारा घेऊन कोल्हापुरात यायची आणि तिथल्या नामवंत गायक-गायिकांचं ध्वनिमुद्रण करायची. तिथं या दोघांची हजेरी ठरलेली. गंमत म्हणजे कवीला मिळणारा मेहनताना गायकापेक्षा जास्त असायचा. ध्वनिमुद्रण आटोपलं की बाबूजी गदिमांना खुणेनं विचारायचे, ''किती?'' ''दहा. तुम्हाला?'' (हेही हाताच्या खुणेनंच) ''पाचच!''

याच सुमारास कोल्हापुरात पार पडलेल्या साहित्य संमेलनात बाबूजींनी गदिमांचं 'दर्यावरी नाच करी, होडी चाले कशी भिरिभिरी' हे गीत गायलं आणि वाहवाची एकच धूम उडाली. त्या काळात त्या उसळत्या सुरांचा आणि फेनिल शब्दांचा आवेग श्रोत्यांना जाणवला असला पाहिजे. काळ थोडासा पुढे सरकला. गदिमा मा. विनायकांशी फारकत घेऊन बाबुराव पेंढारकरांच्या कंपनीत स्थिरावले. चित्रपटाचं नाव जाहीर झालं... पहिला पाळणा. कर्मधर्मसंयोगानं या चित्रपटाच्या गीतलेखनाची जबाबदारी पडली गदिमांवर! 'लागले मिटाया डोळे, अंगाईगीत गा आता' किंवा 'चाहूल घे, चाहूल घे, टाक हळूच मग पाऊल गे' अशी एकापेक्षा एक सरस गीतं गदिमांची लेखणी प्रसवू लागली. पण त्याचवेळी आपल्यासारखाच काही करून दाखवण्यासाठी तळमळणारा राम फडके (सुधीर फडक्यांचं मूळ नाव) त्यांच्या डोळ्यांसमोर तरळत असला पाहिजे. त्यांनी बाबूजींना कंपनीत त्यांच्या चालीसकट पेश केलं. बाबूजींनी लावलेल्या चाली बाबुराव पेंढारकर, दिग्दर्शक विश्राम बेडेकर प्रभृतींना बहुधा आवडल्या असाव्यात. पण त्यांनी तसं दाखवलं मात्र मुळीच नाही. गदिमा बापडे बाबूजींच्या चालींबद्दल आज कळेल, उद्या कळेल या आशेवर अदमास घेत राहिले आणि एक दिवस कंपनीनं, आधीच नियुक्त केलेल्या, संगीतकार सी. बालाजी यांच्या चाली घेण्याचं निश्चित केलं आहे, हे गदिमांच्या ध्यानी आलं. काही न बोलता कंपनीनं त्यांना त्यांची जागा

दाखवून दिली होती.

१९४५च्या सुमारास लोकशाहीर रामजोशी या चित्रपटाचे संवाद आणि गीतलेखन करण्यासाठी गदिमा मुंबईत आले. शांतारामबापूंबरोबर संवाद-लेखनाच्या, गीतलेखनाच्या बैठकी रंगू लागल्या. अप्रतिम संवाद आणि रामजोशींच्या कवनांशी स्पर्धा करतील असे सवालजबाब आकाराला येऊ लागले. या सवालजबाबांचे प्रथम श्रोते - अर्थातच बाबूजी!

पण अधुनमधून सडकून भांडणंही व्हायची. अगदी उसन्या घेतलेल्या पाच रुपयांचं कारणही पुरायचं त्यांना! एकदा असंच भांडण पेटलं आणि एच.एम.व्ही. कंपनीतून परत येताना, संतापलेल्या कविराजांनी खिशातला अख्खा खुर्दा रस्त्यावर उधळला होता म्हणे. मागाहून येणाऱ्या गजाननराव वाटव्यांनी मात्र सावधानतेनं तो खुर्दा गोळा केला आणि यथावकाश कविराजांना परत केला.

पण भांडले म्हणून एकमेकांच्या ऋणांची किंमत कमी नाही झाली. ग.रं. भिड्यांनी वंदे मातरम् या चित्रपटाचा प्रस्ताव बाबूजींसमोर मांडला मात्र, तेव्हा भांडण झालं असूनही लेखक म्हणून बाबूजींनी गदिमांचंच नाव अचूकपणे सुचवलं. लाखाची गोष्ट या चित्रपटाच्या वेळचा असाच एक गमतीदार किस्सा! कंपनीच्या मुक्कामावरच्या एका खोलीत बाबूजी हार्मोनियमवर चाली काढत बसले होते आणि पलीकडच्या खोलीत गदिमांनी लिखाणाची बैठक जमवली होती. गदिमांनी बाबूजींकडे नुकतंच तयार झालेलं ताजं गीत दिलं मात्र, बाबूजी उसळलेच! ''काय हे माडगूळकर? असली काव्यं करण्यापेक्षा तुमच्या माडगूळला जाऊन मास्तरकी करा!'' (फारच प्रेमात असले म्हणजे गदिमादेखील बाबूजींना 'बँडमास्तर' होण्याचा प्रेमळ सल्ला देत.) गदिमांनी हे ऐकलं मात्र, संतापानं फक्त लेखणी मोडायचीच बाकी राहिली. तरातरा चालत आपल्या खोलीत चालते झाले. मध्ये एक दहा-पंधरा मिनिटं झाली असतील नसतील, गेले तसेच तरातरा चालत गदिमा बाबूजींच्या खोलीत आले. बाबूजी पेटीवर काहीतरी किरकोळ वाजवत बसले होते. त्यांच्या अंगावर एक कागद भिरकावत खेकसल्यासारखे म्हणाले, ''हे घ्या गाणं!'' आणि बाबूजी काही बोलायच्या आत पाठ फिरवून खोलीबाहेर निघूनसुद्धा गेले, पण स्वत:च्या खोलीपर्यंत जेमतेम पोहोचतायत तोच बाबूजींची हाक ऐकू आली! ''माडगूळकर'' ''काय?'' ''थांबा, चाल ऐकून जा.'' बाबूजींनी सूर लावला मात्र, गदिमांचे पाय जागच्या जागीच खिळले. डोळे अश्रूंनी भरले. एका अमर चित्रपटगीताचा जन्म झाला होता. 'ऐकशील का रे माझे अर्थहीन गीत, दूरदूर जाते धरूनी उरि तुझी प्रीत.'

लहानपणापासून गरिबीचा फुफाटा तुडवत आलेल्या गदिमांवर पंचवटीनं सावली धरली होती, पण त्यांची खंत जगावेगळीच. ''माझं घर आलं, पण माझ्या मित्राच्या डोक्यावर हक्काचं छप्पर नाही!'' औंधच्या संस्थानाधिपतींना गदिमांविषयी फार माया. टिळकरोड जवळच्या पंतांच्या गोटातल्या मोकळ्या जमिनीचा एक तुकडा त्यांनी मोठ्या प्रेमानं या आपल्या गुणी प्रजाजनाच्या नावं केला होता. गदिमांनाही या राजभेटीचा मोठा अभिमान होता. पण एक दिवस त्यांनी हा जमिनीचा तुकडा सरळ बाबूजींच्या नावं करून टाकला. गीतरामायणानं अतुलनीय लोकप्रियता मिळवली आणि बोलबोल म्हणता, पंतांच्या गोटातल्या त्या मोकळ्या जागेवर 'चित्रकुटी' उभी राहिली.

तापली की हवासुद्धा वर जाते. गदिमा काय अन् बाबूजी काय... शेवटी माणूसच. त्यातून कलाकार. अहंकाराला तळहातावरच्या फोडासारखे जपणारे. धूपकाड्या लावणारी माणसंही आजुबाजूला कमी नव्हती. एक दिवस कारण काय झालं होतं कुणास ठाऊक? पंचवटीत दिवसभर दोघंही कडाकडा भांडत होते. अंधारून आलं तशी बाबूजींनी स्वत:च सामानाची




**गदिमांनी बाबूजींकडे नुकतंच तयार झालेलं ताजं गीत दिलं मात्र, बाबूजी उसळलेच! ''काय हे माडगूळकर? असली काव्यं करण्यापेक्षा तुमच्या माडगूळला जाऊन मास्तरकी करा!'' (फारच प्रेमात असले म्हणजे गदिमादेखील बाबूजींना 'बँडमास्तर' होण्याचा प्रेमळ सल्ला देत.) गदिमांनी हे ऐकलं मात्र, संतापानं फक्त लेखणी मोडायचीच बाकी राहिली. तरातरा चालत आपल्या खोलीत चालते झाले.**

## त्रिमूर्ती घडायची राहून गेली

१९५२-५३च्या सुमारास एका चमत्कारिक मंदीत मराठी चित्रपटव्यवसाय सापडला. नाईलाजानं गदिमांना मुंबईच्या 'हिंदी बाजाराकडे' वळावं लागलं. पण त्यांचं नशीब थोर. पुन्हा या वळणावर शांतारामबापू भेटले. तूफान और दिया, दो आंखें बारह हाथ, नवरंग... एकापाठोपाठ एक चित्ररत्नं झळकत गेली. अल्पावधीतच गदिमांची गणना हिंदीच्या 'टॉपच्या' पटकथालेखकांमध्ये होऊ लागली. पण या साऱ्या झगमगाटातसुद्धा गदिमा आपल्या संतापी पण सच्च्या मित्राला विसरले नव्हते. शांतारामबापूंना सांगून एक दिवस गदिमा बाबूजींना राजकमलमध्ये घेऊन आले. शांतारामबापूंचं आणि बाबूजींचं दिलखुलास बोलणं झालं. गदिमा फुलारले... गदिमांचे शब्द... बाबूजींचा सूर आणि शांतारामबापूंचा चित्रस्पर्श! एक नवीन त्रिमूर्ती आकार घेणार होती. पण बापूंनी मानधनाचा आकडा सांगितला मात्र, बाबूजींना काय वाटलं ते राम जाणे पण गदिमा मात्र विलक्षण सर्द झाले, व्यथित झाले आणि मग ती त्रिमूर्ती घडायची राहून गेली.

## चंद्र होता साक्षीला

गीतरामायणाचं आकाशवाणीवरचं प्रथम पारायण पूर्ण झालं. एक असीम लोकप्रियता दाटून आली होती, बरसात होणंच बाकी होतं. या काव्याचा पहिला कार्यक्रम बाबूजींनी केव्हा आणि कुठं सादर केला ते आता मला आठवत नाही. पण आजही माझ्या मौजीबंधनाची ती रात्र माझ्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी राहते. दिव्यांनी लखलखणाऱ्या पंचवटीसमोरच्या मंडपात जमलेले निवडक उत्सुक रसिक. निवेदनाला स्वत: गदिमा! बाबूजींनी हार्मोनियम ओढला. पंचवटीत रामकथेचे सूर दरवळले. सदैव वाहणारा मुंबई–पुणे महामार्ग चमकला..थबकला. बघता बघता मंडपाच्या कमानीतून रामभक्तांच्या झुंडीच्या झुंडी आत आल्या. हा हा म्हणता मंडप ओतप्रोत भरला. उरलेल्यांनी महामार्गाचीच भारतीय बैठक केली आणि चढत्या चंद्राच्या साक्षीनं शब्दसुरांचा सोहळा रात्रभर चालत राहिला.

**औंधच्या संस्थानाधिपतींना गदिमांविषयी फार माया. पंतांच्या गोटातल्या मोकळ्या जमिनीचा एक तुकडा त्यांनी मोठ्या प्रेमानं या आपल्या गुणी प्रजाजनाच्या नावं केला होता. गदिमांनाही या राजभेटीचा मोठा अभिमान होता. पण एक दिवस त्यांनी हा जमिनीचा तुकडा सरळ बाबूजींच्या नावं करून टाकला.**

आवराआवर केली. विद्यावहिनींनी केलेली जेवणाची सिद्धता अव्हेरून रिक्षा आणायला, घरात नोकरचारक असूनही, स्वत:च बाहेर पडले. आगाशीतील खुर्चीत बसल्याबसल्या गदिमा हा सारा प्रकार न्याहाळत होते, एकही शब्द न बोलता. बाबूजींनी रिक्षा आणली. स्वत:चं सारं सामान उचलून रिक्षात ठेवलं. दाराआडून हा प्रकार पाहणाऱ्या विद्यावहिनींचा चेहरा तांबडालाल झाला. डोळे पाणवले. गदिमांशी एक अक्षरही न बोलता बाबूजी रिक्षापर्यंत पोहोचले. एवढ्यात गदिमांची गहिवरलेली हाक ऐकू आली... ''बाबूजी! अरे कुठं निघालास मला सोडून?'' तत्क्षणीच बाबूजी परत फिरले आणि व्हरांड्यातच त्यांनी गदिमांना कडकडून मिठी मारली. विद्यावहिनींना हुंदका आवरणं

## संघवादी विरुद्ध काँग्रेस

अनेक बाबतीत हे दोन ध्रुवांवर! बाबूजी कट्टर संघवाले तर गदिमा गांधीजींच्या काँग्रेसचे सच्चे पाईक. एका निवडणुकीच्या वेळी बाबूजींनी धमाल उडवून दिली. एक दिवस सकाळचा 'तरुण भारत' पाहिला तर बाबूजींचं त्यात चक्क निवेदन – 'माडगूळकर स्वत:ला आज काँग्रेसवाले म्हणवतायत, पण ते मूळचे संघवाले. ४२च्या लढ्याच्या सुमारास आम्ही दोघं मिळून शाखेवर गेलो आहोत...' वगैरे वगैरे... बापरे! गदिमांनी त्यावेळी कै. स.गो. बर्व्यांच्या प्रचारासाठी कंबर बसली होती. ऐन वेळी काय हे बालंट म्हणून काँग्रेसवाल्यांनी धावपळ करून गदिमांना गाठलं. परिणामी दोन दिवसानंतर 'दैनिक केसरी'मधे गदिमांचं एक निवेदन प्रसिद्ध झालं– 'सुधीर फडके हे माझे परममित्र आहेत. ते थोर संगीतकार आणि गायक आहेत. मी लिहिलेल्या गीतांना ते गोड चाली लावून म्हणतात... पण म्हणून माझ्या राजकीय मतांविषयी त्यांनी बोलणं म्हणजे वक्त्याऐवजी लाउडस्पीकरनं भाषण करण्यासारखं आहे.'

मग मतभेद खूप वाढत गेले असावेत...

कठीण झालं.

असाच एक चमत्कारिक प्रसंग मनात अजून रेंगाळतोय. सुटीसाठी म्हणून आम्ही मुलं मुंबईला आलो होतो. आईही मुंबईलाच होती. त्यावेळचं आमचं बिऱ्हाड शिवाजी पार्क भागातील शंकर निवासमध्ये असायचं – तिसऱ्या मजल्यावर आणि मध्ये दोन बिऱ्हाडं सोडून बाबूजी राहत असत. सकाळी दहा–साडेदहाचा सुमार असेल. बाबूजी घरी आले. त्यांनी पायात १–१।। इंच उंचीच्या जाड टाचेच्या कोल्हापुरी चपला घातल्या होत्या. दारात उभं राहून आईला म्हणाले, ''वहिनी, या चपला कशा काय दिसतायत?'' ''छान आहेत की.'' गदिमा डेस्कशी काहीतरी लिहीत बसले होते. बाबूजींकडे एकवार नजर टाकत ते म्हणाले, ''बाबूजी, काय रे पोरासारखं!'' ''हो, नाहीतरी माझं चांगलं कुठं पाहवतंय तुम्हाला?'' ''बाबूजी, अहो मुलांच्या देखत तरी...'' आणि बाबूजी आल्यापावली परत गेले. गंमत म्हणजे दुपारी आम्ही सगळे सौ. ललितावहिनींनी शिजवलेलं सुग्रास अन्न जेवत होतो.


मध्यंतरीच्या काळात ते दोघं खरंच एकमेकांचं तोंड पाहेनासे झाले. मग एकत्र काम करणं तर दूरच राहिलं. त्यामुळे मित्रमंडळींची फार कुचंबणा व्हायची. निर्माते विनायकराव सारस्वत्यांनी संत गोरा कुंभार पडद्यावर आणावा असं ठरवलं. गदिमांच्या लेखणीतून उतरलेली 'तुझे रूप चित्ती राहो, मुखी तुझे नाम' किंवा 'उठ पंढरीच्या राजा वाढवेळ झाला' अशी गीतं हाती आली. आता अशा गीतांना चाली लावून ती म्हणायची ताकद फक्त बाबूजींचीच. पण हे जमावं कसं? गदिमा तर म्हणून मोकळे झाले...बाबूजी माझ्या गाण्यांना हात सुद्धा लावणार नाही. मग विनायकरावांनी एक अफलातून शक्कल लढवली. त्या गीतांच्या कुणाच्यातरी हस्ताक्षरात नकला करवून घेतल्या आणि मग तो पाचुंदा बाबूजींसमोर टाकला. अपेक्षेप्रमाणे गीतं वाचता वाचता बाबूजी खुलले. ''काय प्रसन्न गीतरचना आहेत हो...कुणाच्या या?'' ''जुन्या संतांच्या रचनांतून निवडून काढल्यात!'' विनायकरावांनी ठोकून दिलं. आणि मग बाबूजींच्या सूरस्पर्शानं एकामागोमाग एक गीतं फुलत गेली. कारण राग कवीवर होता त्याच्या प्रतिभेवर नव्हता.

असाच एक किस्सा सीता स्वयंवरच्या वेळचा. गदिमांनी एक नृत्यगीत लिहिलं होतं आणि बाबूजी त्याला चाल लावायच्या खटपटीत होते, पण काही

केल्या गणित जुळेना. मग कधीतरी ऐकलेली एक हिंदी तर्ज त्यांच्या मनात पुन:पुन्हा रिंगण धरू लागली. फुलपाखरासारखे नाचत येणारे ते सूर त्यांना वारंवार खुणावू लागले. मनोमन वाटलं, या सुरावटीवर एक झकास नृत्यगीत बांधता येईल. पण... हा पण फारच मोठा होता. ही चाल गदिमांच्या गळी उतरवायची कशी? कमी-जास्त झालं तर हा देशस्थ ब्राह्मण जानवं तोडून चालता व्हायचा. पण कसाबसा धीर गोळा करून बाबूजींनी ती चाल गदिमांना ऐकवली आणि काय आश्चर्य! पैंजण झंकारावेत इतक्या हळुवारपणे गीताचे शब्द किणकिणले... 'पैंजण पायी माझ्या रुणुझुणु बोले, आनंदाच्या नर्तनात तनमन डोले'. गदिमा स्वत:च्या गीतलेखनावर... त्याच्या चालीवर फार क्वचित खूष होत असत. बरं उतरलं आहे... सुमार... आणि अगदीच नाही आवडलं तर.. ठा! ठा!! ठा!!! या त्यांच्या कॉमेंटस्.

पण 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाला हजर राहून पुण्याला परत आले त्या दुसऱ्या दिवशीच्या डायरीत नोंद होती- ''बाबूजीनं गाणी अप्रतिम केली आहेत'' त्या दिवशी नेहमीप्रमाणे गदिमांची डायरी चोरून बघताना, ज्या चाली पपांना अप्रतिम वाटतात त्या कशा असतील या नुसत्या कल्पनेनं मी शहारलो. आणि मग तो दिवस उजाडला- जगाच्या पाठीवरचा भानुविलास चित्रपटगृहातील पहिला खेळ. चिक्कार गर्दी. सरकत्या दिव्यांनी सजलेले बॅनर्स. चित्रपट सुरू व्हायला अजून किंचित अवकाश होता. आणि एकाएकी बाबूजींच्या मधाळ आवाजानं भानुविलास चित्रपटगृह भरून गेलं. 'कुणी न येथे भला चांगला, जो तो पथ चुकलेला, जग हे बंदिशाळा...' माझ्या काळजात अक्षरश: गलबलून आलं. डोळ्यांवाटे येणारा उमाळा कसाबसा आवरत मी शेजारीच बसलेल्या गदिमांकडे... माझ्या पपांकडे पाहिलं... त्यांचे डोळे घळाघळा वाहत होते. शब्दांची सुराला ओली दाद होती ती.

(सौजन्य : पुण्याच्या 'केसरी'त प्रसिद्ध झालेला हा मूळ लेख.
विश्वास नेरूरकर आणि प्रसाद महाडकर यांनी संपादित केलेल्या सुधीर फडके यांच्यावरील 'स्वरगंधर्व' या संदर्भग्रंथात तो पुनर्प्रकाशित करण्यात आला. त्यातून साभार.)




**तापली की हवासुद्धा वर जाते. गदिमा काय अन् बाबूजी काय... शेवटी माणूसच. त्यातून कलाकार. अहंकाराला तळहातावरच्या फोडासारखे जपणारे. धूपकाड्या लावणारी माणसंही कमी नव्हती.**

## दोघांस आता हात द्या, साथ द्या!

१९७५च्या सुमारास गदिमांवर कर्करोगासाठी शस्त्रक्रिया करावी लागली. त्यांच्या आजारासंबंधी पसरलेल्या उलटसुलट वार्तांमुळं येणारं काम जवळजवळ थांबलंच होतं. भेटायला येणारे आता विश्रांती घ्या असा ठरावीक उपदेश करून जायचे. गदिमांची मानसिक अवस्था या काळात मोठी चमत्कारिक झालेली होती. एका बाजूला १५०० गीतं, आणि १५०च्या वर चित्रपटकथा लिहिल्यानंतरचा शीण त्यांच्या बोलण्यावागण्यातून जाणवायचा. तेच ते सीन्स... त्याच त्या गाण्यांच्या सिच्युएशन्स आल्या की वैतागायचे. त्याचबरोबर ज्या मराठी चित्रपटसृष्टीला २५-३० वर्षं अंगाखांद्यावर खेळवली, ती आपल्याला विसरली का? हा डंखही जाणवायचा. हे सारं बाबूजींनी कधी ताडलं होतं कुणास ठाऊक? 'या सुखांनो या' या चित्रपटाचं काम त्यांनी आवर्जून गदिमांकडे आणलं. शस्त्रक्रियेमुळे डावा खांदा किंचित झुकवत चालणाऱ्या गदिमांना घेऊन त्या दिवशी मीच बाबूजींकडे गेलो होतो. शंकर निवासमधील बाबूजींच्या बिऱ्हाडातील तीच बैठकीची खोली. ज्या बैठकीत 'माझा होशील का?', 'येणार नाथ आता', 'एक धागा सुखाचा' यांसारख्या अजरामर गीतांनी जन्म घेतला तीच ही बैठक... आजही तेच बाबूजी, हार्मोनियम त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मांडीवर ओढून बसलेले. वर्षानुवर्षं बाबूजींना साथ करणारे सुधीर रानडे तबला जुळवत होते. त्याच जुन्या भक्तिभावानं गदिमांकडे टक लावून पाहणारे लेखक मधुसूदन कालेलकर. सारं तेच होतं, पण गदिमा मात्र पूर्वीचे उरले नव्हते. अधुनमधून खोकत, स्वत:च्याच तब्येतीवर संतापत, गदिमा कसंबसं गीत पूर्ण करत होते- 'या सुखांनो या, एकटी पत चालते, दोघांस आता हात द्या, साथ द्या' आणि एरवी एवढ्या-तेवढ्यावरून संतापणारे बाबूजी शांतपणे गदिमांचा त्रागा सहन करून घेत होते.

...आणि या साऱ्यावर कळस गदिमांच्या महानिर्वाणाचा! बाबूजी कसेबसे बोलले, अगदी भांडल्यासारखे- ''माडगूळकरांनी मला फसवलं! कोल्हापुराहून आधी मी पुण्याला आलो, मग त्यांना बोलावलं. तिथून पहिल्यांदा मुंबईला मी गेलो; नंतर ते आले. आज मात्र मला चुकवून माझ्या आधी निघून गेलेत ते. या विषयावर आमचं वाजणार कधीतरी...'' मला सांगा, त्यांच्या या नात्याला काय म्हणावं?




# ‘गीतरामायणा’चं रामायण

## गजानन दिगंबर माडगूळकर

**श्रीधराची रामकथा कानी पडल्यावर तशी काही रचना करण्याची इच्छा मला का झाली? यावर मीही पुष्कळ विचार केला. कपोलकल्पित वाटावी अशीच ही कथा आहे. माझी आई देवभोळी आहे. तिनं एकदा सांगितलं, ‘‘तुझ्या आठवणीत नाही. कदाचित तू त्याला पाहिलाही नसशील. तुझा एकुलता एक मामा रामदासी होता. ऐन तारुण्यात तो गोसावी होऊन गेला. खानदेशात कोणा खानापूर नावाच्या गावी त्याचा मठ अजूनही आहे म्हणतात. त्याची रामभक्ती तुझ्या ओठी आली असेल, दुसरं काय?’’**

**गी**तरामायणाच्या निर्मितीचं मूळ बीज खूप जुनं आहे. मी अकरा-बारा वर्षांचा मुलगा होतो. माणदेशातील एका अज्ञात खेड्यात आमचं कुटुंब नांदत होतं. त्या गावातलं निसर्गसौंदर्य समृद्ध नाही हे मी अनेकदा सांगितले आहे. तिथे जे काही होतं, त्यातही निराळी सुंदरता असते ही गोष्ट वेगळी. साहित्य, वाङ्मय हे शब्दही त्या खेड्यात कुणाला माहीत नव्हते. उभा गाव निरक्षर. सात-आठ कुटुंबं ब्राह्मणांची होती. एकरोज वतनदार पाटलांची. त्यात दहा-वीस लिहिणारे-वाचणारे होते. पण त्यांच्या वाचनाला रसिकतेचा वारा नव्हता. व्यवहार आणि परमार्थसाधना इतकीच त्यांच्या वाचनाची व्याप्ती होती. निर्मितीशी सुतराम संबंध नव्हता. आमच्या घरात पोथ्या-पुस्तकं होती. आईला देवधर्माचं वेड होतं. घरातल्या कामाचा रामरगाडा संपवून मिळेल त्यावेळी ती रामरायाचं नाव घेई. संतांच्या वचनांचे पाठ तर ‘दळिता कांडिता’ तिच्या मुखी असत. गावात कुणी पुराणिक नव्हता. कथेकरी नव्हता. साहित्यसदृश असं काही कानी पडायचं, ते आईच्या तोंडून.

माझ्या गावापासून कोसा-दीड कोसावर माणनदीच्या काठी नाझरे नावाचं एक गाव आहे. तिथे एक श्रीधरस्वामी होऊन गेला. त्यानंच ‘रामविजय’, ‘पांडवप्रताप’ या पोथ्या रचल्या. त्या श्रीधरस्वामींच्या जिव्हेवर म्हणे रामदासांनीच श्रीकार लिहिला होता. रामकथेइतक्या औत्सुक्यानं मी श्रीधरस्वामींविषयीच्या कथाही ऐकल्या. त्या दोन कथांनी मला जणू पछाडून टाकलं. कसं कुणास ठाऊक, पण रात्रीच्या वेळी, निळ्या आभाळाखाली चांदण्या मोजीत पडलो असताना एकाएकी माझ्या मनात आलं, ‘आपणही श्रीधरासारखी पोथी रचावी.’ तशी पोथी रचणं फार अवघड काम आहे असं त्यावेळी मला वाटलं नाही. आई ओव्या रचीत होती. गावातल्या मराठणीही रचीत होत्या. रामाची गोष्ट तर माहीत होती. माझ्या मनातला हा विचार माझ्याकडून प्रत्यक्षात आला नाही. येणं असंभाव्यच होतं. गावातल्या खाला नावाच्या एका मुसलमानीणीने माझं ते काम आधीच करून टाकलं होतं. सारी ‘रामकथा’ तिनं ओव्यांत ओवली होती.

माझा विचार तिथेच राहिला. पुढे वडिलांच्या नोकरीच्या गावी शिक्षणासाठी राहिलो. तिथेही मी आईबरोबर असंख्य कथाकीर्तनं ऐकली. दामोदरबुवा रिसबूडकर म्हणून एक कीर्तनकार होते. त्यांची रामावरची कीर्तनं ऐकून मी खुळावल्यासारखा झालो. स्वच्छ वाणी आणि नेटका अभिनय यांच्या साहाय्यांनी ‘रामकथे’चं निरूपण करताकरता ते

एकदम संगीताच्या साम्राज्यात जायचे. 'राम जानकीला उद्देशून म्हणाले'– असा प्रस्ताव करून ते चटकन रामाच्या म्हणण्याचं 'गाणं' करून टाकीत. गायनास प्रारंभ करत. मी थक्कच होऊन जाई! रामाच्या म्हणण्याचं गाणं करण्याची किमया तरी आपल्याला यावी, असं मला तेव्हा वाटलं. पण घडलं काहीच नाही.

श्रीधरासारखी ओवी आणि रिसबूडकरांच्यासारखं गाणं रचावं, या मनातील इच्छा तशाच राहून गेल्या. पुढे औंध येथे माध्यमिक शिक्षणासाठी आल्यावर मला हवी ती हवा मिळाली. औंधाच्या राजाजवळ फार अव्वल दर्जाची रसिकता होती. ते स्वत: फार उत्तम कीर्तनं करत. पदरी कीर्तनकार बाळगीत. विद्वानांना साहित्यिकांना मुद्दाम पाचारण करून त्यांची व्याख्यानं करत. तिथे मी खूप ऐकलं.

औंधचे राजेसाहेब स्वत: चित्रकार होते. 'चित्ररामायण' नावाचा एक चित्रसंग्रह त्यांनी स्वत: सिद्ध केला होता. अवघं रामचरित्र चित्राच्या माध्यमानं सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. माझ्या मनालाही त्या चित्रांचं पुनर्निर्माण करण्याची ओढ होती. रामाची थोरवी, दशरथाचं दुबळेपण, लक्ष्मणाची निष्ठा, सीतेचं दु:ख हे विषय आता मला उमगू लागले होते. बालपणी अद्‌भुत म्हणून आवडलेलं रामचरित्र आता वेगळ्याच कारणांसाठी आवडू लागलं होतं.

विद्यालयीन शिक्षण अटकलं. वृद्ध झालेल्या वडिलांची नोकरी गेली. भावंडांची अवस्था बघून जीव तीळतीळ तुटू लागला. घरी राहवेना म्हणून बाहेर पडलो. रानभैरी झालो. वनवासी झालो. हे वनवासाचं दु:ख रामासारख्या मर्यादापुरुषोत्तमाला चुकलं नाही; मग आपण कोण? या विचाराने पुष्कळदा काळजावर फुंकर घातली. रामायणावर लिहिण्याची इच्छा पुन्हा एकदा उद्‌भवली आणि ओसरलीही. दारिद्र्याचे विनामूल्य मनोरथही फळास आले नाहीत. दोरी तुटलेल्या पतंगासारखा दिशाहीन भरकटलो.

कोल्हापुरात आलो. चित्रपटव्यवसायात प्रवेश मिळवला. पोट भरण्याची आणि पाठ टेकण्याची सोय झाली. मग मात्र लिहिण्याची ऊर्मी आवरता आली नाही. माझ्यासारखेच कवितावेडे मित्र माझ्याभोवती जमू लागले. उद्योगाचा वेळ वजा करून बाकी सारा समय वाचन, लेखन, चर्चा यांतच जाऊ लागला.

१९४० सालच्या आगेमागे माझ्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. पुढच्या पंधरा वर्षांच्या काळात पुष्कळ लिहिलं. नाटक, चित्रकथा, गीतं, कथा, आत्मकथनं, प्रवासवर्णनं, संगीतिका, कविता... नाना माध्यमांनी लिहित राहिलो. लिहिणं हा जीवनव्यवसाय केला.


पुढे पुण्यात आलो. स्थिरावलो. असंख्य अनुभव घेतले. असंख्य माणसं पाहिली. सुखकल्पनेच्या नाना तऱ्हा निरखल्या. दु:खाच्याही अगणित अवस्था पाहिल्या. साऱ्या माणसांची सुखदु:खं सारखीच असतात. त्यांच्या परी वेगळ्या असतील; पण कळा त्याच. रामकथेवर लिहिण्याची कल्पना या सव्वा तपाच्या काळातही अनेकदा मनात चमकून गेली. ती कल्पना मनी यायला काही तात्कालिक कारणंही घडत राहिली. व्यावसायिक लिखाणासाठी सीतास्वयंवराच्या निमित्तानं अनेक रामायणं पाहावी लागली. तुळसीदासाचं 'रामचरितमानस' वाचलं. मैथिलीशरण गुप्तांच्या रामचरित–रचना अवलोकनात आल्या. साधुदास कवीचं रामावरचं लिखाणही वाचलं. नरेंद्र शर्मासारख्या संस्कारी कवीशी वाङ्‌मयीन सुखसंवाद करण्याचा योग आला. रामचरित्रावरची रचना मात्र हातून झाली नाही. पुण्याला नभोवाणी केंद्र निघालं. श्री. सीताकांत लाड नावाचे माझे एक गोमंतकीय मित्र कार्यक्रम–नियोजक म्हणून पुण्यास आले. नभोवाणीसाठी काही सातत्यानं लिहिण्याचा त्यांनी आग्रह केला. कातळाखालचा झरा एकदम वर उसळावा तशी 'रामायण' लिहिण्याची इच्छा उसळली. संदर्भासाठी कुण्या एका रामायणाचं एक पृष्ठही न उघडता मी प्रथमगीत लिहिलं. संगीत–दिग्दर्शक श्री. सुधीर फडके यांच्या स्वाधीन करून टाकलं : 'स्वयें श्रीरामप्रभू ऐकती, कुश–लव रामायण गाती'.

पुढे प्रत्येक सप्ताहाला एक गीत असं लिहीत गेलो. गीताचा प्रसंग, त्यातली नाट्यविषयक आवश्यकता, वृत्तयोजना, कशाकशासाठी म्हणून थांबावं लागलं नाही. दर आठवड्याला एक गीत होत गेलं. श्रोत्यांनी दिलेला प्रतिसाद केवळ अपूर्व म्हणावा लागेल. गीतरामायणाच्या लौकिकात संगीताचाही मोठा वाटा आहे. कुठल्याही गीताच्या लोकप्रियतेत तो असतोच. अगदी बालवयात मनोभूमीत पडलेलं स्वप्नबीज अशा रीतीनं प्रत्यक्ष वृक्षरूप झालं. फळाफुलाला आलं.

(विश्वमोहिनी प्रकाशनाच्या 'गदिमा–साहित्य नवनीत'मधील हा मूळ पूर्वप्रकाशित लेख गायत्री पब्लिकेशन आणि 'जीवनगाणी' प्रस्तुत 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या संदर्भग्रंथात पुन:प्रसिद्ध करण्यात आला. त्यातून साभार)




**कातळाखालचा झरा एकदम वर उसळावा तशी 'रामायण' लिहिण्याची इच्छा उसळली. संदर्भासाठी कुण्या एका रामायणाचं एक पृष्ठही न उघडता मी प्रथमगीत लिहिलं. संगीत–दिग्दर्शक श्री. सुधीर फडके यांच्या स्वाधीन करून टाकलं : 'स्वयें श्रीरामप्रभू ऐकती, कुश–लव रामायण गाती'. पुढे प्रत्येक सप्ताहाला एक गीत असं लिहीत गेलो. गीतरामायणाच्या लौकिकात संगीताचाही मोठा वाटा आहे. कुठल्याही गीताच्या लोकप्रियतेत तो असतोच. अगदी बालवयात मनोभूमीत पडलेलं स्वप्नबीज अशा रीतीनं प्रत्यक्ष वृक्षरूप झालं. फळाफुलाला आलं.**



# गीतरामायण 'केलेलं' नाही 'झालेलं' आहे



## सुधीर फडके

**माडगूळकरांच्या काव्याचा महिमा म्हणा किंवा माझं काम उत्तम करण्याचे प्रयत्न म्हणा – कारणं काहीही असोत, पण गीतरामायणाचं संगीत आपोआप तयार होत गेलं. कुणीतरी ते काम आमच्याकडून करवून घेतलं. आता पुन्हा असं गीत–संगीत होणार नाही.**

**गी**तरामायणाचं गीत–संगीत ऐकल्यानंतर बऱ्याच रसिकांना प्रश्न पडतो की हे घडलं कसं? हा प्रश्न मीदेखील जेव्हा स्वत:ला विचारतो तेव्हा मला जाणवतं की हे जाणुनबुजून 'केलेलं' नाही तर आपोआप 'झालेलं' आहे. सीताकांत लाड नावाचे एक अतिशय कल्पक अधिकारी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर कार्यरत होते. नवीन पिढीवर काहीतरी चांगले संस्कार होतील, तिच्यापुढे चांगल्या परंपरा उभ्या राहतील अशा तऱ्हेनं काव्य आणि संगीत यांचं सुरेख मिश्रण असलेला एखादा दीर्घकाळ चालणारा कार्यक्रम माडगूळकरांनी आकाशवाणीच्या पुणे केंद्रासाठी लिहावा अशी लाडांची एक कल्पना होती. माडगूळकरांनाही ती आवडली. त्यांनी सलग कथासूत्र असलेल्या रामाची कथा गीतरूपानं सलग वर्षभर चालवण्याची कल्पना मांडली. या गप्पा चालल्या असताना रामनवमी जवळ येऊन ठेपली होती. लगेच ठरलं, रामनवमी ते रामनवमी वर्षभर कार्यक्रम करायचा. माडगूळकरांनी लिहायचं ठरवलं. अर्थातच, संगीत मीच द्यायचं हेही अपरिहार्यपणेच आलं. त्यावेळी मी मुंबईला राहत असे. पण माझं यशवंत चित्र हे वितरणाचं ऑफिस पुण्याला होतं. त्यामुळे मी वरचेवर पुण्याला येत असे आणि टिळक रोडवरील ठोकळांच्या 'कोंदण' बंगल्यात राहत असे. एकदा 'कोंदण'वर लाड आले. म्हणाले, ''बाबूजी, संगीतरामायण करायचं.'' मी म्हटलं, ''करूया.''

लाडांशी बोलणं झाल्यानंतर मला गीत–रामायणातील वेगवेगळ्या भूमिकांसाठी योग्य गायक कलावंत निवडण्यापासून सर्व कामाची जबाबदारी



**'स्वये श्रीराम प्रभू ऐकती...' हे पहिलंच गीत रामनवमीच्या पहाटे, पुणे आकाशवाणी केंद्राच्या स्टुडिओत, प्रसारणाच्या काही तासच आधी आकारास आले!**

घ्यावी लागली. माडगूळकर लिहून मोकळे होत, पुढे व्याप खूप असे. प्रत्येक भूमिकेसाठी वेगळा कलावंत घ्यायचा असं मी ठरवल्यानं मी योग्य गायकांचा शोध घेऊ लागलो. गीतरामायण हा जरी सुगम संगीताचा प्रकार असला तरी मी त्याच्या चाली शास्त्रीय संगीतावर बेतायच्या ठरवलेलं असल्यानं मला तशाप्रकारे गाणं म्हणू शकणारे गायक हवे होते. या व्यतिरिक्त आकाशवाणी हे फक्त श्राव्य माध्यम असल्यानं गाण्यातून संपूर्ण घटनेचं चित्र उभं करू शकणारे गायक मला हवे होते. मी पहिल्यापासूनच चित्रपटाचं काम करत असल्यानं माझ्या तशाप्रकारचे गायन करू शकणाऱ्या प्रतिभावान गायकांशी संबंध आला होता.

माडगूळकर प्रत्यक्षात कोणत्या प्रसंगाचं, कोणाच्या तोंडचं गीत सादर करणार हे त्यांना आणि मला दोघांनाही ऐनवेळेपर्यंत माहीत नसायचं. त्यामुळे जसजसे प्रसंग माडगूळकर लिहीत गेले, तसतसे कलाकार रेडिओला सुचवणं हे माझं एक काम झालं. त्यात आणखी गाणी वेळेत न मिळण्याचा प्रश्न होताच. मी गाणार असलेली गाणी सोडून बाकीच्यांची गाणी माडगूळकर किमान १-२ दिवस आधी देत. मला चाल लावून, दुसऱ्याकडून गाऊन घ्यायची आहेत याचं अवधान माडगूळकर बाळगीत. मात्र मी म्हणणार असलेली गाणी चुकूनही आधी देत नसत. क्वचित एखादंच गाणं वेळेत देत. अर्थात त्यांना लिहायला वेळच मिळत नव्हता, एवढं चित्रपटाचं काम त्यांना होतं. असं असलं तरी माडगूळकरांनी रचलेल्या काव्याचं असं वैशिष्ट्य होतं की गीत समोर आलं, वाचलं की पटकन त्याला अनुकूल राग, अनुकूल स्वर लगेच सुचत. माझं कौशल्य फक्त गाणी आठ-आठ अंतऱ्याची असल्यानं एकसुरी वाटू नयेत म्हणून प्रयत्न करण्यात असे. मग मी प्रत्येक अंतऱ्याला त्याच रागाच्या बंधनात वेगवेगळी आकर्षक पण अर्थानुरूप स्वररचना करण्याचा प्रयत्न करी. मनात आंतरिक तळमळ असे की हे काम माझ्या हातून चांगलं व्हावं.

गीतरामायणानं माडगूळकरांना कवी म्हणून सर्वोच्च कीर्ती मिळवून दिली. या महाकाव्यानं ते अमर झाले. आज एकटाकी योजनाबद्ध लिहिल्यासारखं वाटणारं गीतरामायण एका वेळेला न लिहिता प्रत्येक आठवड्यास एक याप्रमाणे ५६ आठवडे त्यांनी लिहिलं. सतत तेरा महिने सर्वांना बांधून ठेवेल असं काव्य रचत राहणं हे त्यांच्या असामान्य प्रतिभेचं द्योतक आहे. इतर सर्व कामं आणि प्रापंचिक नि व्यावसायिक व्याप सांभाळून हे काम सातत्यानं आणि गोडवा, रसनिष्पत्ती नि काव्यगुण जराही ढळू न देता पूर्ण करणं हे फक्त माडगूळकरच करू जाणोत.

गीतरामायणाचं पहिलं गीत आकाशवाणीवरून प्रसारित झाल्या झाल्या लोकांच्या प्रतिसादाची कल्पना आली. रेडिओच्या इतिहासात न भूतो न भविष्यति, असा पत्रांचा पाऊस पडला. काही पत्रं अशी होती की, ''आम्ही सकाळी रामायणाच्या वेळी रेडिओपुढे उदबत्ती लावतो आणि समूहानं भक्तिभावानं रामायणाचं श्रवण करतो.'' ते वाचून मला कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. खुद्द माडगूळकरांना एक क्षण असं वाटलं की आता आयुष्य संपलं तरी हरकत नाही.

गीतरामायणाच्या जाहीर कार्यक्रमाची सुरुवात होऊन २५ वर्षं पूर्ण झाली तेव्हा पुण्यात खास अयोध्यानगरी उभारून दहा दिवसांचा मोठा सोहळा पार पाडला गेला. पण गीतरामायणाचं ते यश बघायला माडगूळकर राहिले नाहीत. माडगूळकरांना आपण याचि देहा याचि डोळा पाहिलं असल्यानं आपल्याला त्यांचं काही विशेष महत्त्व कदाचित वाटलं नसेल. पण आणखीन शंभर वर्षांनी त्यांची गणना संतांमध्ये केली जाईल इतकं उत्कृष्ट दर्जाच्या काव्यरचना त्यांनी लिहून ठेवल्या आहेत. गीतरामायणाच्या यशात जेवढा वाटा माझ्या संगीताचा आहे तेवढाच तो माडगूळकरांच्या प्रासादिक काव्यरचनेचा आहे यात तिळमात्र शंका नाही. मागे वळून बघताना मला पुन:पुन्हा हे जाणवतं की गीतरामायण हे 'केलेलं' नाही तर आपोआप 'झालेलं' आहे.

('गायत्री पब्लिकेशन' आणि 'जीवनगाणी' प्रस्तुत 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या संदर्भग्रंथातून साभार)




**गीतरामायणानं माडगूळकरांना कवी म्हणून सर्वोच्च कीर्ती मिळवून दिली. या महाकाव्यानं ते अमर झाले. आज एकटाकी योजनाबद्ध लिहिल्यासारखं वाटणारं गीतरामायण एका वेळेला न लिहिता प्रत्येक आठवड्यास एक याप्रमाणे ५६ आठवडे त्यांनी लिहिलं. सतत तेरा महिने सर्वांना बांधून ठेवेल असं काव्य रचत राहणं हे त्यांच्या असामान्य प्रतिभेचं द्योतक आहे. इतर सर्व कामं आणि प्रापंचिक नि व्यावसायिक व्याप सांभाळून हे काम सातत्यानं आणि गोडवा, रसनिष्पत्ती नि काव्यगुण जराही ढळू न देता पूर्ण करणं हे फक्त माडगूळकरच करू जाणोत.**





# सखे-सोबती गेले पुढती

**पु. ल. देशपांडे**

**गदिमा, सुधीर फडके आणि पुल हे समकालीन कलायात्री. पण वयाची साठी गाठण्यापूर्वीच, म्हणजे अगदी अकालीच, गदिमा हे जग सोडून गेले. आपल्या सख्या-सोबत्यांना असे अर्ध्या वाटेवर सोडून गदिमा गेले, तेव्हा आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी पुलंनी शब्दांचा आसरा घेतला. त्यातून 'सखे-सोबती गेले पुढती' हा स्मृतिलेख आकारास आला. 'मौज'ने प्रकाशित केलेल्या 'मैत्र' या पुस्तकात हा मूळ लेख समाविष्ट आहे. पुल आणि गदिमा यांच्यातील सख्य आणि मैत्र उलगडून दाखवणाऱ्या या लेखाचा हा संक्षिप्त भाग...**

'**मा**गण्याला अंत नाही आणि देणारा मुरारी' असे मर्ढेकर म्हणून गेले आहेत. माडगूळकरांच्यापाशी गीते मागताना हे किती खरे होते. आम्हा मागणाऱ्यांचीच ताकद अपुरी पडली. शेकडो गीते त्यांनी दिली. आणखी शेकडो मिळाली असती. दोन वर्षांपूर्वी झालेल्या भयंकर आजाराने त्यांच्या शरीरावर आघात केला होता; - पण गीतप्रतिभेचा झरा मात्र अखंड वाहत होता.

लकडी पुलाजवळ जिथे टिळक रोड सुरू होतो तिथेच पंतांचा गोट होता. आता तिथे सिमेंटकाँक्रीटच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्या पंतांच्या गोटात एका दहा गुणिले दहा क्षेत्रफळाच्या खोलीत आमचा तळ असे. किती गीतांचा आणि पटकथांचा जन्म त्या खोलीत झाला आहे हे सांगायला आता ती खोलीही उरली नाही. किती चर्चा, किती नकला, किती गाणीबजावणी, किती थट्टामस्करी...

जवळजवळ तीन तपांच्या सहवासात मला अनेक प्रकारचे माडगूळकर पाहायला मिळाले. प्रौढांच्या मेळाव्यात बसलेले माडगूळकर त्यात एखादे पोर आले की एका क्षणात किती देखणा पोरकटपणा करू शकत! एखाद्या ग्रामीण पटकथेतले संवाद लिहिताना त्यांचा तो माणदेशी शेतकऱ्याचा अवतार पाहण्यासारखा असे. ते शीघ्रकवी होते तितकेच शीघ्रकोपीही होते. आणि त्या कोपाचा अवसर उतरल्यावर विलक्षण मवाळही होऊन जात.

त्यांच्या गीतांना चाली लावण्याचा योग मला लाभला. ते गीत घडत असताना त्यांचे ध्यान पाहत बसणे हा ते गीत वाचण्याइतकाच आनंदाचा भाग असे. माडगूळकर उत्तम अभिनेते होते. एखादे कडवे लिहिताना तो भाव सूक्ष्म रूपाने त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. चित्रपटातला प्रसंग सांगितला की पटकन पहिली ओळ त्यांच्या मुखातून बाहेर पडायची, आणि पेळूतून सूत निघाल्यासारखे कवितेच्या ओळींचे सूत्र प्रकट व्हायला लागायचे. यमकप्रासांसाठी अडून राहिलेले मी त्यांना कधी पाहिले नाही.

> आसुसली माती
> पिकवाया मोती
> आभाळाच्या हत्ति आता
> पाऊस पाड गा
> पाऊस पाऽऽड''

ही कविता लिहून झाली त्या दिवशी मी त्यांच्या घरी गेलो होतो. सुधीर फडक्यांनी त्या गीताला सुंदर चाल दिली आहे. ''ध्येसपांडेगुर्जी, ऐका...'' म्हणून त्यांनी ते गाणे वाचायला सुरुवात केली. सुरांचा संबंध नव्हता. छंदातच वाचन चालले होते. आवेश मात्र धनगराचा. अशा वेळी त्यांच्यातल्या त्या अभिनयगुणाचे आश्चर्य वाटायचे. क्षणार्धात त्या कवितेतल्या धनगरांतले ते धनगर होऊन गेले. त्या गाण्यातल्या 'पाऊस पाड गा'मधले 'गाऽ' हे संबोधन ऐकल्यावर 'गा', 'वो', 'वा', ह्या साऱ्या संबोधनांतले मऱ्हाटीपण डोळ्यांपुढे नाचायला लागले. त्या एका नेमक्या ठिकाणी पडलेल्या 'गा'मुळे 'एकनाथ-धाम' नावाच्या प्रभात रस्त्यावरच्या घरातली ती चिमुकली खोली माणदेशातला उजाड माळ होऊन गेली.

गीतभावनेशी तादात्म्य पावण्याच्या त्यांच्या-मधल्या गुणाच्या असंख्य खुणा त्यांच्या गीतांतून आढळतात. शब्दयोजनेतले त्यांचे अवधान सुटत

नाही. अशी शेकडो गीते त्यांनी रचली. चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिल्यामुळे आमच्या 'ऑर्डरी'ही विचित्र असायच्या. 'आर्डरी' हा त्यांचाच शब्द. कधीकधी चाल सुचलेली असायची.

''स्वामी, असं वळण हवं.''

''फूल्देस्पांडे, तुम्ही बाजा वाजवीत राहावे.''

मित्रांच्या नावांची गंमत करणे हा त्यांचा आवडता छंद असायचा. मग मधुकर कुळकर्ण्याला 'पेटीस्वारी', राम गबालेला 'रॅम् ग्याबल', वामनराव कुळकर्ण्यांना 'रावराव'.. कुणाला काय, कुणाला काय असे नाव मिळायचे. चाल पेटीवर वाजवत बसल्यावर चटकन त्या चालीचे वजन त्यांच्या ध्यानात येई. मग त्या तालावर झुलायला सुरुवात. बैठकीवर उगीचच लोळपाटणे. पोटाशी गिरदी धरून त्याच्यावर चिमट्यात अडकवलेल्या कागदाचे फळकूट पुढ्यात ठेवून सुपारी कातरायला सुरुवात. मग आडकित्त्याची चिपळी करून ताल...नाना तऱ्हा. एखाद्या अचानक तिथे आलेल्या नवख्याला वाटावे, इथे गीत आकाराला येते आहे, की नुसताच पोरकटपणा चाललाय! एखादे दांडगे मूल पाहावे तसे वाटत असे. त्यांच्यातला नकलाकार जागा झाला की मग तो मूलपणा पाहावा. खरे तर मानमरातबाची सारी महावस्त्रे फेकून शैशवात शिरलेल्या माणसाचे ते दर्शन असायचे. ह्या स्वभावगत मूलपणाने त्यांना खूप तारलेले होते. प्रापंचिक जबाबदाऱ्या फार लवकर त्यांच्या अंगावर पडल्यामुळे विशीतच फार मोठे प्रौढपण त्यांच्यावर लादले गेले होते, त्यातून ही मूलपणाकडची धाव असायची की काय, ते आता कोणी सांगावे?

माडगूळकरांना गडकऱ्यांविषयी अतोनात प्रेम. आम्ही जोडीने केलेल्या प्रवासात गडकऱ्यांच्या कवितांचेच नव्हे, तर नाटकांतील उताऱ्यांचे पठण हा आमचा आवडता छंद असायचा. हरिभाऊ आपटे, नाथमाधव, गडकरी, बालकवी, केशवसुत, फडके, खांडेकर, अत्रे ह्या आधुनिक काळातल्या साहित्यकारांते मार्ग पुसैतु आम्ही ह्या साहित्याच्या प्रांतात आलो. मी मुंबईत वाढलो आणि माडगूळकर माडगुळ्यात वाढले, तरी आमच्या साहित्यप्रेमाचे पोषण एकाच पद्धतीने चालले होते.

गडकऱ्यांच्या निधनानंतर वर्षभराच्या आतच आमचा जन्म. माडगूळकर माझ्यापेक्षा फक्त एक महिन्याने मोठे. बालपणातले आमचे इतर वातावरण मात्र निराळे होते. मी मुंबईत वाढूनही तसा मुंबईकर नव्हतो. शाळकरी वयातल्या माझ्या खूप सुट्या कोल्हापुराजवळच्याच एका खेड्यात माझ्या आत्याच्या गावी मी घालवल्या. शिवाय माझ्या लहानपणीचे पार्लेही एक खेडेवजाच गाव होते. पण आपल्याला आमचे म्हणून सांगण्यासारखे खेडे नाही याची मात्र मनाला खूप खंत वाटे.

मुंबईकर असूनही आमचे कुटुंब तसे घाटीच होते. त्यामुळे माडगूळकरांच्या ग्रामीण प्रकृतीने मला चटकन आपलेसे करून टाकले. कोल्हापूर भागातली ग्रामीण बोली फार बालपणापासून माझ्या जिभेवर चढली आहे. एवढेच नव्हे, एकूणच बोलीभाषांतल्या गोडव्याचा मी आजही भक्त आहे. माडगूळकरांना केवळ सातारी-कोल्हापुरीच नव्हे, तर त्या भागातल्या निरनिराळ्या बोलींतल्या सूक्ष्म छटाही अवगत होत्या. शब्दांचे रंगढंग ते क्षणात कंठगत करीत. एक काळ असा होता की तासन्‌तास आमचे संभाषण सातारी बोलीतच चाले. कधी कोकणी ढंगात. प्रथम ज्या बोलीतून सुरुवात व्हायची त्याच बोलीत संवाद चालू.

''कवा आलायसा म्हमयस्नऽऽ?'' म्हटले की, ''येरवाळीच आलु न्हवं का रातच्या पाशिंदरनं.''

''काय च्याऽ ह्येऽ जहालं का न्हाई?'' ह्या थाटात फाजिलपणा सुरू.

'पुढचं पाऊल' चित्रपटाच्या वेळी आम्ही संवाद लिहीत होतो. माडगूळकरांनी एक पार्ट घ्यायचा, मी दुसरा. प्रभाकर मुझुमदार संवाद टिपून घ्यायचा. आम्ही दोघे नकलाकार असल्यामुळे सोंगे वठवायला वेळच लागत नसे. त्या चित्रपटाचे शूटिंग हा तर दोनअडीच महिने त्या स्टुडिओत चाललेला सांस्कृतिक महोत्सवच होता. गेल्या कित्येक वर्षांत मी चित्रपटांच्या स्टुडिओत गेलो नाही. ते गाव एके दिवशी सोडले तर सोडलेच. त्यानंतर त्या दिशेने अनेक आमंत्रणे आली - पण नाही जावेसे वाटले. आता तिथे काय आहे, मला ठाऊक नाही. पण पंचवीसेक वर्षांपूर्वी पुण्यातल्या 'प्रभात', 'नवयुग', 'डेक्कन' वगैरे स्टुडिओत चित्रपटनिर्मिती होत होती त्यावेळी स्टुडिओ हे जणू साहित्य-संगीत-कलांचे मीलनक्षेत्र होते.


मी आणि माडगूळकर ज्या काळी पुण्यात आलो तो काळ ह्या क्षेत्रात आर्थिक दृष्टीने मुळीच लाभदायक नव्हता. 'प्रभात'चा संसार कोलमडला होता. 'नवयुग' स्टुडिओचेही तेच. पलीकडे 'डेक्कन' स्टुडिओ होता.



**माडगूळकरांना गडकऱ्यांविषयी अतोनात प्रेम. आम्ही जोडीने केलेल्या प्रवासात गडकऱ्यांच्या कवितांचेच नव्हे, तर नाटकांतील उताऱ्यांचे पठण हा आमचा आवडता छंद असायचा. हरिभाऊ आपटे, नाथमाधव, गडकरी, बालकवी, केशवसुत, फडके, खांडेकर, अत्रे ह्या आधुनिक काळातल्या साहित्यकारांते मार्ग पुसैतु आम्ही ह्या साहित्याच्या प्रांतात आलो. मी मुंबईत वाढलो आणि माडगूळकर माडगुळ्यात वाढले, तरी आमच्या साहित्यप्रेमाचे पोषण एकाच पद्धतीने चालले होते.**



**माडगूळकरांचे माडगुळ्याइतकेच औंधावर प्रेम. त्या चिमूटभर संस्थानात विद्यार्थिदशेतल्या माडगूळकरांना फार मोठा सांस्कृतिक धनलाभ झाला होता. तिथे नुसतेच अन्नछत्र नव्हते; ज्ञानछत्रही होते. फार मोठ्या अंत:करणाच्या, त्या वरपांगी करड्या वाटणाऱ्या राजाच्या हाताची दणकट थाप त्यांच्या पाठीवर पडली होती. ती ऊब त्यांनी आयुष्यभर जिवापाड जपली होती. किंबहुना सिनेमात नशीब काढायला माडगूळकर आले त्यावेळी त्यांना 'औंधकर' असेच म्हणत. बेचाळीसच्या सुमाराला त्यांची-माझी पहिली भेट झाली त्यावेळी औंधकरांचे माडगूळकर झाले होते.**



आता त्या ठिकाणी तेलाच्या गिरण्या वगैरे आल्या आहेत. पैशाच्या दृष्टीने ते दिवस ओढगस्तीचेच. पण माडगूळकराच्या सहवासातल्या तिथल्या मैफिलीत लाभणाऱ्या आनंदाला तोड नव्हती. मला तर नेहमी वाटते की, माडगूळकरांच्या तोंडून चित्रपटकथा ऐकताना होणारा आनंद ती पडद्यावर पाहताना मिळाला असे क्वचितच घडले. नाना प्रकारच्या अनुभवांच्या पुड्या तिथे सोडल्या जायच्या. वादविवाद रंगायचे. नव्या कवितांचे वाचन चालायचे. सिनेमावाले असलो तरी मनांची पाळेमुळे साहित्यात, अभिजात संगीतात, उत्तम नाटकांत रुजलेली. तशी सगळीच हुन्नरी मंडळी. आजही डोळ्यांपुढे त्या मैफिली उभ्या राहतात.

माडगूळकरांचे माडगुळ्याइतकेच औंधावर प्रेम. किंबहुना सिनेमात नशीब काढायला माडगूळकर आले त्यावेळी त्यांना 'औंधकर' असेच म्हणत. बेचाळीसच्या सुमाराला त्यांची-माझी पहिली भेट झाली त्यावेळी औंधकरांचे माडगूळकर झाले होते. 'नाट्यनिकेतना'त वल्लेमामा म्हणून तबलजी होते. त्यांचे वास्तव्य कोल्हापुरात असे. मी आणि माडगूळकर फिरायला चाललो असताना वाटेत एकदा वल्लेमामा भेटले. त्यांनी माडगूळकरांना ''कसं काय औंधकर?'' म्हटल्यावर मी जरासा चपापलोच. मग मला माडगूळकरांनी 'औंधकर' नावाची कथा सांगितली.

औंधकर-काळातले त्यांचे चित्रपटसृष्टीतले अनुभव त्यांनी लिहिले आहेत. काही व्यक्तींचे आणि स्थळांचे स्मरण त्यांना चटकन भूतकाळात घेऊन जाई. मात्र त्या प्रतिकूल काळाचे त्यांनी चुकूनसुद्धा गहिवर काढून भांडवल केले नाही. साऱ्या कडू अनुभवांना त्यांनी थट्टेत घोळून टाकले, आणि वेळोवेळी स्नेहाचा हात पुढे केलेल्या लोकांचे स्मरणही ठेवले. एक मात्र खरे की, गरिबीच्या काळात भोगाव्या लागलेल्या गोष्टींचा त्यांच्या मनावर कुठेतरी ओरखडा होता. ज्या वयात जे लाभायला हवे होते ते न लाभलेल्यांना नंतर कितीही ऐश्वर्य लाभले तरी त्याची खास चव राहत नाही. ही कटुताच असते असे नव्हे. सारे काही मिळत असताना कसलेतरी अबोध औदासीन्य मनावर मळभ आणीत असते.

सगळ्याच चांगल्या कलावंतांत किंवा भारतीय विचारवंतांतही कलेच्या आणि व्यवहाराच्या क्षेत्रांत व्यावहारिक पातळीवरून सर्व तऱ्हेच्या धडपडी, नाना प्रकारच्या तडजोडी करताना मनाच्या खोल कप्प्यात एक विरक्त दडलेला असतो असे मला वाटते. माडगूळकरही याला अपवाद नव्हते. माडगूळकरांच्या आणि माझ्या सहवासात आम्ही ऐन उमेदीच्या आणि हौसेच्या काळात अविदितगतयामा अशा रात्री घालवल्या आहेत. मनाच्या खोल अज्ञात घळीतला अंतर्यामी अशा वेळी बोलत असतो. हा खरे तर आपुला संवाद आपणाशी असाच असतो. त्या संवादातून माडगूळकरांचा हा एकतारीचा सूर प्रकट व्हायचा. कदाचित ती खुंटी पिळणारे हात ज्ञानदेव-एकनाथ-तुकारामांचे असतील. कुणी त्या क्षणांना तो त्या वेळचा त्यांचा 'मूड' असेल असेही म्हणून विश्लेषण केल्याचे समाधान मानील. काही का असेना, त्या 'मूड'मधले माडगूळकरांचे दर्शन खूप परिणामकारक असे.

''श्रीधर कविचें नजिक नाझरें नदी माणगंगा।
नित्य नांदतें खेडें माझें धरूनि संतसंगा।।''


अशी त्यांची एक कविता आहे. माडगूळकरांचे खेडे संतसंगाला धरून नांदत असायचे की नाही याला महत्त्व नाही; माडगूळकरांच्या मनात मात्र संतसंगाला धरून नांदणारा गाव वसला होता यात शंका नाही.

आमच्यात कित्येक बाबतीत मतभिन्नता होती. मर्ढेकरांच्या कविता प्रथम प्रसिद्ध झाल्या होत्या, त्या काळातही त्या कवितेविषयी आमचे खूप वादविवाद व्हायचे. खुद्द मर्ढेकरांनी त्यांची 'जत्रेच्या रात्री' ही कविता वाचल्यावर त्यांचे मनापासून कौतुक केले होते. पण माणसा-माणसांच्या जीवनातल्या तारा मतभिन्नतेला ओलांडून जुळून येणाऱ्या असतात. हा नेमका काय चमत्कार असतो हे कविकुलगुरूंनाही उमगले नाही. म्हणून तर त्या जुळण्यामागल्या अंतरीच्या हेतूला 'कोऽपि' म्हणजे 'कसलासा हेतू' म्हणून त्यांनी हात टेकले. असल्या ह्या सौहार्दाने जुळलेले आमचे धागे. त्यांत केवळ माडगूळकरांच्या कविप्रतिभेचेच आकर्षण नव्हते. आणखीही खूप काही होते. नित्य भेटीच्या आवश्यकतेच्या पलीकडले.

मी चित्रपटव्यवसाय सोडून बेळगावला गेल्यावर माडगूळकर मला म्हणाले होते, ''मित्रा, अशी मैफिल अर्ध्यावर टाकून जाणं बरं नव्हे.''

आम्ही आता काय म्हणावे? आणि कुणाला म्हणावे?

(सौजन्य : पु.ल. देशपांडेलिखित 'मैत्र'मधून)



वाचकांची पसंती
चार महिन्यांत
दुसरी आवृत्ती
चार सख्य चोवीस
संपदा जोगळेकर-कुळकर्णी
हर्षदा संजय बोरकर
निर्मोही फडके
सोनाली लोहार
ग्रंथाली

**२०१९ हे वर्ष अनेकार्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरलं. कारण हे मराठी रसिकमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या बाबूजी, गदिमा आणि पु.ल. यांचं जन्मशताब्दीवर्ष! या जन्मशताब्दीवर्षानिमित्त उदंड लिहिलं-बोललं गेलं. कार्यक्रमांची रेलचेल झाली. रसिकांनी पुन्हा एकदा त्यांच्या शब्दसूरगंगेच्या 'काठी तंबू ठोकला' आणि त्यांनी दिलेल्या अलौकिक आनंदाचा पुनःप्रत्यय घेतला. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारे लेख, गदिमा-बाबूजींची गाणी, गीतरामायण, पु.लं.च्या साहित्यावर आधारित विविध कार्यक्रम, परिसंवाद यांनी हे वर्ष अगदी गजबजून गेलं. जगभरच्या मराठी माणसांनी ही स्मरणगाथा जागवली आणि तिच्यात मनापासून सानंद अवगाहन केलं. आता जुलैत बाबूजींच्या जन्मशताब्दीची सांगता होईल. त्यानिमित्तानं या तिघांच्या सहधर्मचारिणींच्या नजरेतून त्यांच्या व्यक्तित्वाचे काही पैलू समोर ठेवण्याचा हा प्रयत्न.**

# 'तिघीं'च्या नजरेतून

**डॉ. वंदना बोकील कुलकर्णी**


**'आ**हे मनोहर तरी' हे सुनीताबाईंचं आत्मचरित्र आणि 'आकाशाशी जडले नाते' हे विद्याबाईंचं आत्मचरित्र प्रसिद्धच आहे. ललिताबाईंनी स्वतंत्रपणे आत्मचरित्र लिहिलेलं नाही पण 'जगाच्या पाठीवर' या बाबूजींच्या आत्मचरित्राला त्यांनी काही आठवणींची जोड दिली आहे. तसंच 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या विश्वास नेरूरकर आणि विश्वनाथ चटर्जी यांनी संपादित केलेल्या ग्रंथात त्यांचा 'तुला न कळले मला न कळले' या शीर्षकाचा एक लेख आहे. या सर्वांचा आधार प्रस्तुत लेखाला आहे.


डोळे दिपवून टाकणारं, भुईनळ्यासारखं कर्तृत्व गाजवणाऱ्या या तिघांचाही जन्म कनिष्ठ मध्यमवर्गीय घरात झाला. गदिमांच्या घरी अफाट दारिद्र्य. वडिलांची औंध संस्थानातली तुटपुंज्या पगाराची नोकरी आणि त्यातच गदिमा तारुण्यात पाऊल टाकताना त्यांना पेन्शन बसलेली. बाबूजी लहान वयात आधी आईचं आणि नंतर वडिलांचं छत्र गमावून अक्षरशः अनिकेत अवस्थेत वणवणत राहिलेले. पुलंना त्यामानाने सुसंस्कृत आणि खाऊन पिऊन सुखी म्हणाव्या अशा कुटुंबात वडिलधाऱ्यांची छत्रछाया लाभली खरी. पण त्यांच्यावरही महाविद्यालयात असतानाच वडिलांच्या अकल्पित मृत्यूमुळे कुटुंबाचा भार अंगावर पडलेला. या अगदी प्रतिकूल परिस्थितीतही प्रतिभेचा कोवळा अंकुर पाहता पाहता रुजला आणि बहरला.

यथावकाश तिघांनीही विवाह करून संसार थाटले. त्यांची बाह्यजगातली कर्तबगारी घरच्या मायेच्या निगरणीमुळे आणि खंबीर पाठबळामुळे होती. घरातलं त्यांचं पती, पिता, गृहस्थ म्हणून कोणतं चित्र उभं राहातं? त्यांच्या निर्मितीची प्रक्रिया कशी असेल? असं कुतूहल वाटणं स्वाभाविक म्हणावं लागेल. यासंबंधी त्यांच्या सहधर्मचारिणीच अधिक खरंखुरं आणि अधिकच सांगू शकतील. कारण तिघांनाही अखेरपर्यंत या तिघींनी डोळस साथ केली.

ललिता देऊळकर, पद्मा पाटणकर आणि सुनीता ठाकूर या तिघीही पूर्वायुष्यात स्वतःचं असं काही काम, छंद आवडी असणाऱ्या आणि त्या जोपासणाऱ्या स्त्रिया. ललिताबाई आणि पद्माताई गायिका. पैकी पद्माताईंना गायिका व्हावं अशी आंतरिक ओढ होती.










आवाज तर चांगला होताच पण त्याला गायनशाळेत संस्कारही लाभले. त्याकाळच्या (१९३५) यशवंत संगीत मेळ्यात सहभाग, एचएमव्हीसाठी ध्वनिमुद्रणे अशी त्यांची या क्षेत्रात वाटचालही सुरु होती. संगीतकार म्हणून बाबूजींचं जे पहिलं गाणं 'चांदाची किरणे विरली' ध्वनिमुद्रित झालं ते गायलं होतं पद्मा पाटणकर यांनी! ज्या सोळांकुरकर मास्तरांच्या गाण्याच्या क्लासमध्ये त्या गाणं शिकायला जात तिथेच त्यांची गदिमांशी ओळख झाली. उंच दणकट शरीरयष्टी, मागे वळवलेले कुरळे दाट केस, पायजमा व त्यावर वूलन कोट हे त्यांना झालेलं गदिमांचं पहिलं दर्शन! लवकरच दोघांनी विवाह केला.

लग्नानंतरच्या अगदी सुरुवातीच्या काळात गदिमांनी रागाच्या भरात 'थप्पड' मारल्याचा उल्लेख विद्याबाईनी केला आहे. नंतरही त्यांच्या संतापी व शीघ्रकोपी स्वभावाचे निदर्शक काही प्रसंग त्यांनी सांगितले आहेत. पण एकूणच विद्याबाईंचा सूर गदिमांविषयीच्या आदराने भारलेला आहे. त्यांच्या लेखनासाठी गादी – तक्क्याची नीटनेटकी बैठक, फुले, उदबत्ती अशी जय्यत तयारी त्या करून देत. गदिमांचा उल्लेख त्या प्रेमाने कविराज असा करतात. पहिल्या अपत्याच्या जन्मानंतर एका जीवघेण्या आजारातून उठल्यावर विद्याबाईंनी ठरवलं की 'माझे गाणे आणि ह्यांचे लिखाण यातून एकाची निवड करायला हवी. कुणीतरी एकानं त्याग करायला हवा.' आणि त्यांनी गाणं सोडण्याचा निर्णय घेतला. विद्याबाई लिहितात, लग्न झाल्यापासून कविराजांनी मला पुढे गाणं चालू ठेव, असं उत्तेजनही दिलं नाही आणि गाणे गाऊ नको असेही कधी सांगितले नाही. माझा गाणे सोडण्याचा निर्णयही त्यांना कळला. त्यावरही त्यांनी काही मतप्रदर्शन केले नाही. त्यांची पारंपरिक मते लक्षात घेता तो निर्णय त्यांना आवडला असावा, असे आज मला वाटते. माझा तो निर्णय किती योग्य होता हे कालांतराने सिद्ध झाले.

'माडगूळ'चे वडिलार्जित घर सावरणारे आणि भरभराटीला आणणारे ज्येष्ठ बंधू गदिमा, आमदारकी, लोकांच्या भेटीगाठी, सभा–संमेलने यांनी चौफेर गजबजलेलं आयुष्य जगणारे माडगूळकर विद्याबाईनी तपशिलातून रंगवले आहेत. तसेच संसारतापाने कावून जाणारे, उद्वेगानं चिडचिड करणारे पण मनातून हळवे गदिमाही! एकाचवेळी तीन तीन चित्रपटांच्या




कथा–संवाद, गीते लिहिणारे प्रतिभावंत माडगूळकर आजही आपल्याला अचंबित करतात. त्या काळात विद्याबाईंनाही याचं नवल वाटे. 'एकाचवेळी असं वेगवेगळं लेखन कसं काय जमतं' या प्रश्नाला गदिमांचं उत्तर होतं, थोडं थोडं पेरून ठेवतोय. उगवेल तेव्हा उगवेल.

काम नसेल तेव्हा मित्रमंडळीत पत्त्यांचा अड्डा जमवणारे, अधूनमधून सगळ्यांसाठी चहाची ऑर्डर सोडणारे, पु. भा. भाव्यांसह दंगामस्ती करणारे, मुले कशी वाढतात, कोणत्या वर्गात शिकतात याची दखल नसणारे, परडी परडी फुले तोडून घरात आणणारे, ज्येष्ठ जावयाच्या अनपेक्षित–अकाली मृत्यूमुळे काही काळ कोलमडून गेलेले, पन्नाशीनंतर काहीसे उदासीच्या छायेत वावरणारे, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद आणि पद्मश्री या सन्मानांनी आनंदित झालेले, 'संकटाचे आभाळ ज्या अर्थी इतके भरून आले आहे, त्याअर्थी सुखाचा श्रावणही जवळपास असणार!' असं म्हणणारे गदिमा विद्याबाईंच्या नजरेने टिपले आहेत, जे अन्यत्र कुठे सहसा सापडत नाहीत.

पु. भा. भावे ज्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष होते त्या संमेलनात दुर्गा भागवतांनी गदिमांच्या 'नागडे नातवंड' या कवितेतील काही ओळी संदर्भ सोडून म्हणून दाखवल्या आणि अनुचित उद्गार काढले. त्यामुळे व्यथित झालेल्या गदिमांविषयी विद्याबाईनी लिहिले आहे, 'मनात नसताना आपल्या काव्याचा

**गदिमांचा उल्लेख विद्याबाई प्रेमाने कविराज असा करतात. विद्याबाईंनी ठरवलं की 'माझे गाणे आणि ह्यांचे लिखाण यातून एकाची निवड करायला हवी. कुणीतरी एकानं त्याग करायला हवा.' आणि त्यांनी गाणं सोडण्याचा निर्णय घेतला. विद्याबाई लिहितात, लग्न झाल्यापासून कविराजांनी मला पुढे गाणं चालू ठेव, असं उत्तेजनही दिलं नाही आणि गाणे गाऊ नको असेही कधी सांगितले नाही. माझा गाणे सोडण्याचा निर्णयही त्यांना कळला. त्यावरही त्यांनी काही मतप्रदर्शन केले नाही.**



**गीतरामायणाच्या कार्यक्रमाला धक्काबुक्की करत आत येणाऱ्या प्रेक्षकांची कानउघाडणी करणारे, सावरकर चित्रपट जिद्दीनं पूर्णत्वाला नेणारे, फेशियल पॅरालिसिसचा आघात झाला असूनही गॉगल लावून जाहीर केलेला कार्यक्रम करणारे, मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी अथक प्रयत्न करणारे, दादरा-नगरहवेली मुक्तिसंग्रामात कृतिशील सहभाग घेणारे बाबूजी, एकदा गीतरामायणाची वही, पैसे आणि घड्याळ ठेवलेली पिशवी हरवली तरी शांतचित्ताने गाणी गाणारे, कमालीचा अशक्तपणा आला असूनही धारवाडला तीन तास कार्यक्रम करणारे, सरळमार्गी, काहीसे भाबडे पण प्रामाणिक, उदार आणि सर्वसंग्राहक बाबूजी ललिताबाईंना दिसले आहेत.**

चुकीचा अर्थ लावला गेल्यामुळे ह्यांना एकदम शारीरिक व मानसिक थकवा जाणवू लागला. कोणीही दुर्गाबाईंना प्रत्युत्तर केले नाही, याची मोठी खंत त्यांना वाटत होती. आपल्या दिव्यातील तेल आता संपत आलं असताना, हे अखेरचं पर्व निराशाजनक का होत आहे, कुणास ठाऊक', असे उद्गार त्यांनी काढल्याचं विद्याबाई लिहितात.

विद्याबाईंनी आत्मचरित्र लिहिले ते गदिमांच्या मृत्यूनंतर १८ वर्षांनी आणि ते प्रसिद्ध झाले ते विद्याबाईंच्या मृत्यूनंतर ३ वर्षांनी. एवढ्या वर्षांनीदेखील मनावर जे ठसे स्पष्ट उमटले त्यांचेच दर्शन या आत्मकथनातून घडते. त्यामुळे गदिमांच्या निळ्या कोचावर फुले वाहून रोज पूजा करणाऱ्या विद्याबाईंच्या आदराचे आणि समर्पणशील वृत्तीचे अस्तर या आठवणींना लाभले आहे.

ललिताबाई फडके 'स्वरगंधर्व'मधल्या लेखात लिहितात, 'खरं पाहता तोवरच्या आयुष्यात मी बरेच कष्ट काढले होते. सुरुवातीला पैशाच्या टंचाईमुळे आणि पुढे कामाच्या व्यापात गुंतत गेल्यानं शालेय शिक्षण तसं राहिलंच होतं, पण कुटुंबाचीही जबाबदारी डोक्यावर असल्यानं लग्नाचाही विचार कधी केला नव्हता. खडतर मार्गानं जाऊनही बाबूजींच्या मनाचा सरळपणा, थोडासा भाबडेपणा इतरांच्या वाकड्या वागण्यानं त्यांना येणारी चीड ही त्यांची वैशिष्ट्यं माझ्या नजरेत भरली होती. बहिणीच्या लग्नानंतर माझ्या डोक्यावर असलेल्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही बऱ्याच कमी झाल्या होत्या. कर्जही फिटलं होतं. बरे दिवस आले होते. त्यामुळे मी शेवटी लग्नास होकार दिला.'

ललिताबाईंच्या आठवणीतले बाबूजी मानी, तापट पण कामाप्रती आत्यंतिक निष्ठा असणारे आहेत. त्यांच्या दृढनिश्चयी स्वभावाचे, साध्या राहणीचे, सौम्य व मोजक्या जेवणाचे आणि स्वच्छतेच्या आग्रहाचे पैलू त्यांनी उलगडले आहेत. जिन्यावरच्या कठड्याची धूळ हाताला लागू नये म्हणून कागदाचा कपटा वापरणारे, अंथरुणाला एकही सुरकुती वा कपड्याला एकही डाग न खपवून घेणारे बाबूजी हे त्यांचं एक रूप. आणि दुसरीकडे गीतरामायणाच्या कार्यक्रमाला धक्काबुक्की करत आत येणाऱ्या प्रेक्षकांची कानउघाडणी करणारे, सावरकर चित्रपट जिद्दीनं आणि अक्षरशः जिवाच्या करारानं पूर्णत्वाला नेणारे, फेशियल पॅरालिसिसचा आघात झाला असूनही गॉगल लावून जाहीर केलेला कार्यक्रम करणारे, मोहन रानडे यांच्या सुटकेसाठी अथक प्रयत्न करणारे, दादरा-नगरहवेली मुक्तिसंग्रामात कृतिशील सहभाग घेणारे बाबूजी, गीतरामायणाची वही, पैसे आणि घड्याळ ठेवलेली पिशवी हरवली तरी शांतचित्ताने गाणी गाणारे, कमालीचा अशक्तपणा आला असूनही धारवाडला तीन तास कार्यक्रम करणारे, सरळमार्गी, काहीसे भाबडे पण प्रामाणिक, उदार आणि सर्वसंग्राहक बाबूजी ललिताबाईंना दिसले आहेत. गीतरामायणाचे पहिले गाणे ध्वनिमुद्रित होत असताना मुलगा श्रीधर घटसर्प झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये असताना 'मुलाला पाहिल्याशिवाय काम होणार नाही' म्हणून अपरात्री आकाशवाणीतून हॉस्पिटलमध्ये जाणारे, देश आणि समाज यांविषयी प्रखर, कृतिशील बांधिलकी मानणारे, अरुणाचल प्रदेशातील दीपक या मुलावर पुत्रवत प्रेम करणारे, त्याचा सांभाळ करणारे, 'सोन्या' या आपल्या पोपटाला जीव लावणारे बाबूजी ललिताबाईंच्या लेखनातून समोर येतात. त्या म्हणतात, 'बाबूजींच्या स्वभावाबद्दल बोलायचं म्हणजे ते सांबसदाशिवाचा अवतार होते. कुणालाही दुखावणं त्यांना सहसा पटत नसे. प्रत्येकाला नीट शब्दांत ते समजावून सांगत. प्रोत्साहन देत. त्यामुळे अनेक भिन्न भिन्न प्रकारची माणसं आमच्याकडे येत. ताल, सूर, लय, गळा नसलेली माणसंही आपलं गाणं त्यांना ऐकवण्यासाठी येत. कविताही आणून देत. एकदा तर एका कल्हईवाल्यानंही त्याची कविता आणून दिली आणि वर म्हणाला, 'तुम्ही याला चाल लावा म्हणजे

तुमचं मोठं नाव होईल.'

नेहमी ते हसतमुख असत, स्वागतशील असत. मनावर कितीही ताण असला तरी कपाळाला आठ्या पडू न देता ते समोरच्या माणसाचं बोलणं शांतपणे ऐकत. त्यांना मानणारी खूप माणसं घरी येत. कितीही थकलेले असले तरी त्यांची नीट बडदास्त ठेवण्याचा त्यांचा कटाक्ष असे. ललिताबाईंच्या या विधानांचे प्रत्यंतर बाबूजींच्या निकटवर्तीयांनाही अनेकदा आले आहे.

सुनीताबाईंच्या आत्मचरित्रातून पुलंच्या व्यक्तिमत्त्वाचे जे पैलू उलगडतात त्यावर अनेक उलटसुलट मते-मतांतरे यापूर्वी अनेकदा व्यक्त झाली आहेत. पुलंच्या 'राजस' आवडी, त्यांचा सुसंस्कृतपणा, समंजसपणा, त्यांचं संगीतप्रेम ह्याविषयी त्यांनी लिहिलं आहे. खाण्यापिण्याची, आल्या-गेल्याची आवड असलेले, मित्र जमवून गाणं - बजावणं - गप्पा यांच्या मैफली रंगवणारे, पानामागून पाने अथकपणे लिहिताना मन लावून, तहानभूक हरपून काम करणारे भाई त्यांनी आत्मीयतेने दाखवले आहेत. 'नवरा' म्हणून पुलंविषयीचे त्यांचे निरीक्षण आणि 'व्यक्ती' म्हणून पु. ल. - यांत अर्थातच फरक आहे. इथे सुनीताबाईना पु. ल. व्यक्ती म्हणून कसे दिसतात, ते मुख्यत्वे पाहू.

'साहित्य, नाट्य, वक्तृत्व, संगीतासारखे गुण अंगी असलेला, कुटुंबाची जबाबदारी घेणारा, पण ते ओझे मानून खचून न जाणारा.' 'एक मराठी लेखक म्हणून भाईचे निश्चितच एक स्थान आहे. त्याचे लिखाण सदैव ताजे, प्रसन्न वाचतच रहावे, अशा जातीचे आहे.' 'जीवनापासून फार अपेक्षा ठेवण्याचे त्याच्या स्वभावातच नाही. त्यामुळे मिळेल त्यात तो समाधानी असे.' 'जरादेखील असूयेचा स्पर्श न झालेला माझ्या पहाण्यातला हा एकमेव माणूस.' 'खोटेपणा, दांभिकपणा' असले काहीही नाही. 'भाईनं आयुष्यात कुणालाही कधीही अस्पृश्य मानलं नाही. पण ज्या समाजानं अस्पृश्यता मानली त्यात आपण जन्माला आलो ही शरम वाटायला लावणारी जाणीव त्याच्यात जिवंत आहे.' सुनीताबाईंची ही विधाने पुलंचे व्यक्तिमत्व उजळून टाकणारी आहेत.

पुलंमधल्या प्रतिभावंत कलाकाराचं सजग भान सुनीताबाईना होतं. म्हणूनच त्या म्हणतात- 'नट म्हणून भाईने काही चांगल्या भूमिका केल्या हे खरे. पण अगदी पहिल्या प्रतीच्या अभिनेत्यांत त्याची



गणना करता येईल का? संगीतदिग्दर्शक म्हणून त्याने काही फार चांगल्या चाली दिल्या. पण त्याच्याच काळातल्या मराठीतलाच संगीतदिग्दर्शक म्हणून सुधीर फडके भाईहून कितीतरी वरचढ नव्हता का? आणि पटकथा-संवाद-लेखक म्हणून? मला वाटे, लेखक म्हणून याचे एक निश्चित स्थान आहे; पण या धंद्यात राहिला तर स्वतःच्याच सोन्यासारख्या लिखाणाचा हा डोळ्यादेखत चुथडा होऊ देईल.

'अनेकांनी सिनेमाच्या धंद्यात लबाडी केलेली पाहून सुनीताबाई उद्विग्न होत असत. अशा लोकांची आमच्या दारात उभं रहाण्याची लायकी नाही, असे त्यांना वाटे. पण भाईला त्यांची दया येई. याच्या मागे खरे कारण असे होते की या व्यवसायाचा, तिथल्या वातावरणाचा भाईला इतका मोह होता, की येनकेनप्रकारेण त्यातच रहायला त्याला स्वतःलाच आवडे. काकाजी, तुम्ही सांगता तेही मला पटतं आणि आचार्य सांगतात तेही पटतं' - असे सांगणारा 'तुझे आहे तुजपाशी'मधला शाम हा मला त्याचा स्वतःचा प्रतिनिधी वाटतो, असा सुनीताबाईंचा अभिप्राय आहे.

मराठी रसिकतेच्या अवकाशात डौलानं विराजमान झालेल्या या त्रिमूर्तीविषयीची त्यांच्या सहधर्मचारिणींची ही मनोगतं त्यांच्यातील माणूस-पणाचं दर्शन घडवतात. पुल नेहमी म्हणत असत की मला दैवत बनवू नका. मला माणूसच राहू द्या. या मनो-गतांमधून कधी नाराजीचे व तक्रारींचे सूर उमटले असले तरी ते त्यांच्या माणूसपणाचेच द्योतक आहे, हे समजून घेणं म्हणजे आपल्या रसिकतेला प्रगल्भतेची जोड देणं!

(भ्रमणध्वनी : ९८२२०३३५६२)

**पुलंमधल्या प्रतिभावंत कलाकाराचं सजग भान सुनीताबाईना होतं. म्हणूनच त्या म्हणतात- नट म्हणून भाईने काही चांगल्या भूमिका केल्या हे खरे. पण अगदी पहिल्या प्रतीच्या अभिनेत्यांत त्याची गणना करता येईल का? संगीतदिग्दर्शक म्हणून त्याने काही फार चांगल्या चाली दिल्या. पण त्याच्याच काळातल्या मराठीतलाच संगीतदिग्दर्शक म्हणून सुधीर फडके भाईहून कितीतरी वरचढ नव्हता का? आणि पटकथा-संवाद-लेखक म्हणून? मला वाटे, लेखक म्हणून याचे एक निश्चित स्थान आहे; पण या धंद्यात राहिला तर स्वतःच्याच सोन्यासारख्या लिखाणाचा हा डोळ्यांदेखत चुथडा होऊ देईल.**



# बहुरूपी स्वत:च्याच काव्यरूपात



**मंगला गोडबोले**

**मी** आनंदयात्री, सोंगाड्या, विदूषक आहे; माझा मुख्य छंद झोप हा आहे, मी नॉनगॅजेटेड इसम आहे (म्हणजे मला घरगुती यंत्र – गॅजेट्स वापरता येत नाहीत), मी गल्लीतला ब्रॅडमन आहे, एक नापास आजोबा आहे, जत्रेतून रमतगमत जाणाऱ्या मुलासारखा आहे, मी सुशिक्षित बेकार आहे, माझं आयुष्य ही एक भलीमोठी सुट्टी आहे (My life is a long holiday), नोकरीव्यवसायाबाबत माझं 'एक ना धड, भाराभर चिंध्या' असं झालंय; पण प्रत्येक चिंधीनं मला खूप अनुभव दिला आहे – अशी भाष्यं पुलंनी ठिकठिकाणी केलेली आहेत. 'निघून नरजातीला रमविण्यात गेले वय' असा आपल्या जीवनाचा सारांश काढता येईल, असंही म्हटलंय.

१९६२ सालच्या 'वीणा' दिवाळी अंकामध्ये 'मी : पु.ल. दे.' ह्या कवितेत त्यांनी स्वत:लाच डोळा मारला आहे :

*मी एकदा आळीत गेलो*
*चाळ घेऊन बाहेर आलो*
*तोंडांत भरली सगळी चाळ*
*मी तर मुलखाचा वाचाळ*

*कधी पायांत बांधतो चाळ*
*उगीच नाचतो सोडून ताळ*
*वजन भारी उडते गाळण*
*पायांचीही होते चाळण*

*गाळणे घेऊन गाळतो घाम*
*चाळणीमधून चाळतो दाम*
*चाळीबाहेर दुकान माझे*
*विकतो तेथे हसणे ताजे*

*'खुदकन हसू'चे पैसे आठ*
*'खो खो खो'चे एकशेसाठ*
*हसवण्याचा करतो धंदा*
*कुणी निंदा–कुणी वंदा*

*कुणाकुणाला पडतो पेच*
*ह्याला का नाही लागत ठेच?*
*हा लेकाचा शहाणा की खुळा?*
*मग मी मारतो मलाच डोळा.*

एकूणात स्वत:ची खिल्ली उडवण्याची आणि दुसऱ्या कोणाच्या तरी तुलनेत स्वत:ला गौण, सामान्य ठरवण्याची एकही संधी पुलंनी सोडलेली दिसत नाही. प्रतिवाद करणं, प्रतिवार करणं, समर्थन करणं ह्या वाटांना ते फारसे गेलेले नाहीत. निकोप, उमद्या जीवनदृष्टीनं आणि नेहमी आशावादी राहत ते निर्मळ माणुसकीची वाट चालत राहिले, तिचाच पुरस्कार करत राहिले. लोकांमधले राहिले, लोकांसाठी राहिले, लोकांना धरून राहिले, लोकांना यथाशक्ती पुढे नेत राहिले, वेळप्रसंगी कानपिचक्याही देत गेले; पण कधीही 'परके' झाले नाहीत.

आज 'देशीवाद' हा शब्द किंवा त्याचा पुरस्कार बराच प्रचलित आहे. ह्याच्या फार पूर्वी पुल त्यांच्या अर्थानं कट्टर देशीवादी होते. जगभर फिरत होते; पण आपल्या देशाशी, मातीशी, माणसांशी, कलासंस्कृतीशी घट्ट नाळ जोडून राहिले होते. त्यांच्याइतकी एकाच वेळी 'लोकल' आणि 'ग्लोबल' राहण्याची किमया फार कोणाला साधली नसेल, पण पुल आपल्या नेहमीच्या सहजतेनं ती निभावू शकले. केवळ आंधळा किंवा भाबडा देशीवाद कुरवाळत न बसता अत्यंत डोळसपणे त्यांनी त्याचा पुरस्कार केला, अर्ध्याकच्च्या माहितीवर भलताच अभिनिवेश केला नाही. गुजराणही करायला बघितली नाही.

पुलंना आपला देश, आपलं सांस्कृतिक संचित चांगलं माहीत होतं. प्रवासातून, त्या त्या प्रदेशातल्या माणसांच्या सहवासामधून पुलंनी आपला देश चांगल्या प्रकारे समजून घेतला होता. त्या त्या प्रांतातलं महत्त्वाचं साहित्य, साहित्यिक, विचारधारा पुलंना परिचित होत्या. वाचन तर होतंच. सरकारी नोकरीत प्रांतोप्रांतीचे सहकारी मिळालेले होते. त्यांची बलस्थानं आणि उणिवा माहीत होत्या. आणि ही पार्श्वभूमी मनात बाळगून ते देशाबाहेर फिरले होते. त्यामुळे कुठून काय चांगलं आत्मसात करण्याजोगं आहे, याची पुलंना चांगली जाण होती. त्यामुळेच परदेशांवर भाळून आपल्या देशाला कमी लेखणं किंवा नसत्या परंपराभिमानातून आपणच जगात फार मोठे असल्याचं दाखवणं, ही दोन्ही टोकं पुलंना गाठावीशी वाटली नाहीत. उलट जगभरातलं जे जे गुणवान, ते ते स्वीकारून आपण कसे समृद्ध होऊ शकू, हेच ते सांगत राहिले. फाजील आत्मप्रशंसा, खोटा उमाळा, वरलिया रंगाला भुलणं किंवा न्यूनगंड बाळगणं ह्यापासून ते नेहमी अलिप्त राहिले.

(मंगला गोडबोलेलिखित 'पुल : चांदणे तुझ्या स्मरणाचे'मधून साभार)



# ... आणि 'मनोहर' आरशात!

**'आ**हे मनोहर तरी' हे पुस्तक एवढं गाजणार आहे, रान उठवणार आहे, याची कल्पना न त्या लेखिकेला होती, न त्या प्रकाशकांना. म्हणून तर त्याचं प्रकाशन एवढ्या साधेपणानं झालं. जाहीर प्रकाशन समारंभ होणं सुनीताबाईंना अजिबात मंजूर नव्हतं. त्या सदैव सावध, साशंक होत्या. पण 'आहे मनोहर...'ला महाराष्ट्रानं डोक्यावर घेतलं. ९० सालात पुलंच्या पुस्तकांपेक्षा ह्या पुस्तकाची विक्री जास्त प्रमाणात झाली. परिक्षणं, परिसंवाद, खासगी खुशीपत्रं ह्यांचा महापूर उसळला. पुलही त्या आनंदयात्रेत मनापासून सामावले. काही ठिकाणी 'आहे मनोहर...'बाबतच्या चर्चासत्रांमध्ये सामील झाले. जाहीरपणे कुठेही त्याबाबत बोलले नाहीत, पण अंतर्यामी सुखावले.

हे पुस्तक महाराष्ट्र टाइम्सच्या 'दशकातलं सर्वोत्कृष्ट पुस्तक' या यादीत निवडलं गेलं. न. चिं. केळकर पुरस्कार (१९९०), कोठावळे स्मृती पुरस्कार (१९९१) गृहिणी... सचिव... सखी पुरस्कार (१९९६) यांनी गौरवलं गेलं. यातल्या बहुतेक पुरस्कार सोहळ्यांना पुल उपस्थित राहिले, श्रोत्यांच्या पहिल्या रांगेत बसले.

ह्या पुस्तकानंतर देशपांडे दांपत्याच्या नातेसंबंधात, परस्परवर्तणुकीत काही फरक पडला असेल का, पुल दुखावले / दुरावले असतील का – अशा (नसत्या?) शंका खूप लोकांना सतावत होत्याच.

ह्या पुस्तकाविषयीची आपली सविस्तर प्रतिक्रिया पुलंनी दिली आहे, ती जब्बार पटेल दिग्दर्शित 'पुलवृत्तांत'च्या अनुबोधपटात. त्यात ते म्हणतात,

''एक तर काय आहे, की मी अतिशय विसरभोळा आहे आणि त्याच्या बरोब्बर उलट सुनीता ही ज्याला परफेक्शनिस्ट म्हणतात ना, तशी आहे... हा दोन प्रवृत्तींमधला फरक आहे... हा प्रवृत्तींमधला फरक लोकांना जर सगळ्यात कुठे दिसून आला असेल, तर तिनं जे 'आहे मनोहर तरी...' लिहिलं त्याच्यामध्ये. लोकांना निष्कारण वाटलं, की हिनं फार कठोरपणानं लिहिलं आहे. पण तसं नाही. मला विचारलं की, तुमचं काय मत झालं? मी म्हटलं, मी पहिला वाचक त्याचा... वाचल्यानंतर मात्र मी थक्क झालो. एक तर मला बरं वाटलं...

'महाराष्ट्राचं लाडकं दैवत' वगैरे विशेषणं मला लावली आहेत ना, ती ऐकून मला ओशाळल्यासारखं होतं. एकदा माणसाला दैवत केलं, की दैवतासारखं वागायची त्याच्यावर जबाबदारी पडते... त्याच्यापेक्षा साधा माणूस राहू दे – चार लोकांत असतो तसा. तसा साधा माणूस मी कसा आहे, याचं उत्तम दर्शन सुनीतानं घडवलं आहे आणि एका अर्थानं ते चांगलं झालं. हासुद्धा आपल्यासारखा एक साधा मनुष्य आहे, हे सगळ्या लोकांच्या लक्षात आलं.

'ते पुस्तक मला इतकं आवडलं... आणि त्या पुस्तकाचं स्वागतही चांगलं झालं. समीक्षकांकडून त्याच्यावर फार हल्लेही झाले. पण त्या पुस्तकाची दखल घेतली गेली. त्या पुस्तकाबद्दल चांगलं किंवा वाईट लिहिल्याखेरीज चैन पडत नाही, अशी अवस्था झाली. ते पुस्तक आवडल्याची पुष्कळ पत्रं आली सुनीताला... मध्ये असं झालं, की पुस्तकांचा त्या वर्षीचा जो सेल होता, विक्री होती; त्यात सगळ्यात नंबर एक सुनीताचं ते पुस्तक होतं अन् नंबर दोन मी होतो... मला हा माझा सगळ्यात मोठा विजय होता, असं वाटलं. खरं सांगतो, मला अतिशय आनंद झाला याचा. एवढ्यासाठी झाला, की ही जी सेट कल्पना आहे, की बाईनं घरामध्ये कसं वागावं, तिचं काय स्थान आहे, ह्याला तिनं धक्का दिला... सत्य काय आहे, हे सांगायला ती घाबरली नाही.'

('पुलवृत्तांत'मधून)
(मंगला गोडबोले लिखित 'पुल' या चरित्रग्रंथातील'तून साभार)




**सुनीता देशपांडे यांनी लिहिलेल्या 'आहे मनोहर तरी...'चे उदंड स्वागत झाले. त्यातून पुलंचे जे चित्र दिसत होते, त्याबद्दल खुद्द पुलंची काय मते आहेत, याबद्दल त्यांच्या चाहत्यांना खूप कुतूहल होते. पुस्तक प्रकाशनानंतरच्या साधारण दशकाच्या कालावधीत वेगवेगळ्या माध्यमांतून पुलंनी स्वत:च त्याबद्दल ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या, त्यातून पुलंच्या स्वभावाचे पैलू असे उलगडत गेले.**




# माणूस शोधणारी नजर

**मंगला गोडबोले**




**मराठी साहित्यात प्रवासवर्णनपर लिखाणाची पायवाट गेल्या शतकात रुळली, त्याचे श्रेय पु.ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' या ग्रंथांना द्यावे लागेल. डोळ्यांना दिसणारा नवा प्रदेश पाहताना पुलंची नजर फक्त निसर्गावर किंवा इमारतींवर नसे, तर तिथे भेटणाऱ्या माणसाचा, त्याच्या कृतींचा–विचारांचा, मनाचा ते सहजपणाने शोध घेत आणि तेवढ्याच उत्कटपणे ते शब्दांच्या माध्यमातून कागदावर उतरवत. पुलंच्या या प्रवासाने मराठी माणसाची साधी दुनिया रंगीबेरंगी केली.**

**नु**सता दीर्घ कालखंड लाभणं पुरेसं नसतं. तो सघन हवा, खूप काही त्याच्या पोटात दडलेलं असावं. त्याची भरभरून देण्याची कुवत असावी आणि व्यक्तीची ते घेण्याची पात्रता असावी. पुलंच्या बाबतीत हे सगळे योग जुळून आले. त्यांच्या कालखंडाच्या लांबीपेक्षा त्याची व्यामिश्रता आणि त्यातल्या झंझावती घटनांची उतरंड ही अधिक दखलपात्र आहे. एका आयुष्यात एका माणसानं किती वैचारिक–राजकीय–सामाजिक बदलांची पार्श्वभूमी अनुभवावी? मुळात पुलंचं बालपण गेलं पहिल्या महायुद्धाच्या परिणामांच्या छायेत. ऐन तारुण्याला लाभली स्वातंत्र्ययुद्धाची पार्श्वभूमी. त्यात आपल्या गतीप्रकृतीनं त्यांनी थोडाफार भागही घेतला. मग आलं प्रत्यक्ष स्वातंत्र्य आणि त्यानं दाखवलेली गुलाबी स्वप्नं. दरम्यान मार्क्सवादानं काही काळ जगाला भारून टाकलं. त्यात सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील हा भ्रम वितळवला समाजवादानं, जो पुलंच्या विचारसरणीला मानवणारा होता. पुढे एकेका टप्प्यावर व्यक्तिवाद, स्त्रीमुक्तिवाद ह्यांचं गारूड काहींच्या मनावर पडलं. पुलंनी त्यांच्या पद्धतीनं त्याचा कार्यकारणभाव समजून घेतला. आणीबाणी जाहीर झाली, तसं स्वातंत्र्याचं मूल्य झाकोळलं गेलं. त्यानं पुल व्यथित झाले आणि आणीबाणीचा शक्य तेवढा निषेध त्यांनी वेगवेगळ्या माध्यमांमधून केला. पुन्हा जनता पक्षानं सत्तेवर येऊन काही गुलाबी स्वप्नं दाखवली. त्याही 'स्वप्नांची समाप्ती' झाली. नव्वदच्या दशकात उदारीकरण–खासगीकरण–जागतिकीकरण स्वीकारलं गेलं. त्यानं पुन्हा संपूर्ण मूल्यव्यवस्थेलाच हादरा बसवला. माध्यमांची ढगफुटी, बायांच्या जगण्याचे वाढते बदलते आयाम, कुटुंबसंस्थेची होणारी पीछेहाट, वाढता भ्रष्टाचार–अनाचार, माणसाचं अवमूल्यन – अशा अनेक गोष्टी पुलंना साक्षित्वानं बघता आल्या. काहींशी झुंज द्यावी लागली. काहींत सहभागी होता आलं, काहींवर भाष्य करता आलं. पण तो नंतरचा भाग. पुलंसारखा बुद्धिमान आणि संवेदनशील माणूस ह्यातून विचारांचं–मतांतरांचं मोठं द्रव्य शोषत असणार ह्यात शंका नाही.

ह्या एवढ्या कालखंडामध्ये पुलंना खूप प्रवास घडला. तोही दुहेरी किंवा दोन्ही अर्थांनी. त्यातला एक, जगभराचा, वेगवेगळ्या भौगोलिक ठिकाणांचा प्रवास आणि दुसरा, नाना प्रकारच्या माणसांमधून – माणसांसोबत घेतलेल्या अनुभवांचा प्रवास. निमित्तं बदलली तरी बघण्याची, टिपण्याची दृष्टी काही बदलली नाही; उलट ती विकसित झाली, प्रवासवर्णनं लिहिण्याला पोषक झाली. त्यामुळे पुलंनी जग बघावं आणि मराठी माणसाला ते हौसेनं दाखवावं, असं वळणच पडलं. 'जावे त्यांच्या देशा' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहूनच ठेवलंय,

*'माझ्या पायावर चक्र आहे की नाही, ते मला ठाऊक नाही. पण मला येणारे प्रवासाचे योग पाहिल्यावर एखाद्या ज्योतिष्याला पाय दाखवावेसे वाटायला लागले आहे. एक गोष्ट मात्र खरी. मी मायदेशात तसा बैठा माणूस आहे. परदेशात मात्र खूप हिंडतो. कुठे काय ऐकण्यासारखे आहे ते शोधत*

*जातो. आणि जे काही ऐकले-पाहिले, ते सांगायची मला ओढ लागते. आणि त्यातूनच माझे हे लिहिणे घडते. ही फिरत्याची खोड आहे. सुटेल तेव्हा सुटेल! त्यातून माझे हे सांगणे ऐकणारेही भेटत आले आहेत, हे माझे भाग्य!*

*'ना वंशाचे, ना भाषेचे, ना धर्माचे, ना राष्ट्राचे असे कितीतरी लोक ह्या प्रवासात, 'यथा काष्ठं च काष्ठं च' म्हणतात तसे, भेटतात. स्नेहाचा हात पुढे करतात. अकारण मने मोकळी करतात. आपल्या घराची दारे मोकळी करतात. कोण कुठला जर्मन आबिल, कुठली स्कॉटिश ब्रॉमलेबाई, हंगेरीतला गेझाकाका, पोन्नानेनी, डॉ. बेंके योशेफ आणि त्याची थेट पऱ्यांच्या राज्यातून उतरलेली छोटी एस्थेर... पुन्हा दिसणारदेखील नाहीत... मन:पटलावर कायमची चित्रित केलेली पॅरिसमधल्या सीनच्या तीरावरची संध्याकाळ, कोण्या जपानी गेशाचा कानात वर्षानुवर्षे रेंगाळणारा तो 'सायोनाऽऽरा'!... अनपेक्षितपणाने दिसलेला तो रोदांचा 'थिंकर'... बर्लिनच्या ऑपेरा हाउसमध्ये 'बार्बर ऑफ सॅव्हिली'च्या नांदीचे अप्रतिम वाद्यसंगीत ऐकताना अर्जेंटिनातल्या मारियाचे डबडबलेले निळे निळे डोळे... प्रतिभेचे थोर देणे लाभलेल्या एखाद्या साहित्यकाराने ह्यातून शब्दांची कितीतरी मोठी शिल्पे उभी केली असती- ती ताकद माझ्यात नाही, याची मला जाणीव आहे. हा माझा विनय वगैरे नाही. भव्य कलाकृतींच्या दर्शनातून मला लाभलेले हे शहाणपण आहे. तरीही लिहिल्यावाचून राहवत नाही, म्हणून हे पांढऱ्यावर काळे.'*




मराठी वाचकांच्या दृष्टीनं हा त्यांचा विनयच होता. पण त्यांच्या अशा पांढऱ्यावर काळं करण्यानं मराठी माणसाची छोटी सामान्य दुनिया रंगीबेरंगी होत होती, यात शंका नाही.

(मंगला गोडबोलेलिखित 'पुल : चांदणे तुझ्या स्मरणाचे' ग्रंथातून)

# कृतज्ञ

**पु**लंमध्ये एक अत्यंत देखणा असा कृतज्ञतेचा भाव होता. ज्यांनी आपल्याला आनंद दिला, संधी दिल्या, दाद दिली, गरजेच्या वेळी हात दिला, शब्दांनी आधार दिला, कृतीनं प्रत्यक्ष पाठिंबा दिला; त्या सर्वांविषयी पुल नेहमी कृतज्ञ राहिले. ह्या कृतज्ञतेची अगदी प्राथमिक पायरी होती, ती आपल्याकडे आलेल्या प्रत्येक पत्राला स्वहस्ते उत्तर पाठवण्याची.

पुलंना वर्षाला सरासरी १००० पत्रं त्यांच्या चाहत्यांकडून येत असत. बहुसंख्य पत्रं स्तुतिपर असली, तरी काही थोडी पत्रं तक्रार करणारी, नाराजी दर्शवणारी, मतभेद नोंदवणारी आणि अपवादानं, निर्भर्त्सना करणारीपण असत. पुल काही काळ बाहेरगावी जाऊन परत आले, की अशा पत्रांचा गठ्ठा घरात साठलेला मिळे. पुल ह्यातल्या ९० टक्के पत्रांना स्वहस्ते उत्तरं देत. आपल्या राहत्या घरी असताना दररोज सुमारे दीड-दोन तास एवढा वेळ त्यांना उत्तरांवर खर्चावा लागे. पण हे आपलं कर्तव्य आहे, पत्राची दखल न घेणं हा कृतघ्नपणा आहे, मूळ पत्रलेखकाच्या भावनांचा अनादर आहे, असं ते मानत. आज महाराष्ट्रात आणि जगभरातही अनेक लोकांकडे पुलंची पत्रं आहेत. लोकांनी ती अनमोल दागिन्यांसारखी जपून ठेवली आहेत. खुद्द पुलंनी आपल्या अनेक उत्तरांचे मसुदे किंवा ट्रू-कॉपीज घरी ठेवलेल्या होत्या, ज्या अभ्यासकांना मिळालेल्या आहेत. अनेक लोकांशी पुलंचा वरचेवर पत्रसंवाद झालेला आहे. बाबा आमटेंना पुलंनी पाठवलेल्या पत्रांचा एखादा संग्रह निघू शकेल, एवढी त्यांची संख्या आहे. पण पुलंच्या पत्रांच्या संख्येपेक्षा त्यांच्यामागचा जिव्हाळा, कृतज्ञता आणि संवादोत्सुकता यांची जास्त नोंद घ्यावीशी वाटते. एवढ्या व्यग्र व्यक्तीनं छोट्या मुलापासून जर्जर वृद्धापर्यंत प्रत्येकाला उत्तर लिहिण्यामागचा दीर्घोद्योग आणि अंतरीचा उमाळा अन्य कोणा मराठी लेखकात आढळत नाही.

पुलंच्या पुस्तकांच्या अर्पणपत्रिकाही ह्याच कृतज्ञभावाची साक्ष देणाऱ्या आहेत. त्यामध्ये भावंडं, आईवडील, आजोबा, सासूसासरे असे आप्त आहेत. तसेच आडारकर, दिवाडकर, नारळकर, सोनाळकर, अरुण आठल्ये, बाबुराव रेगे, मधू गानू असे दीर्घकाळचे स्नेहीही आहेत. साहित्यक्षेत्रामधल्या अग्रणी व्यक्ती- शान्ताबाई शेळके, इंदिराबाई संत, प्रा. म.वा. धोंड, श्री.ना. पेंडसे, बा.भ. बोरकर, गोविंदराव तळवलकर, अ.भि. शहा, अण्णाभाऊ साठे, अमर शेख वगैरेंनाही पुलंनी आपली पुस्तकं अर्पण केलेली आहेत. ह्यांपैकी कित्येकांच्या जीवनातल्या वाढदिवसांसारख्या महत्त्वाच्या टप्प्यांचा उल्लेख करण्याचं औचित्यही पुलंनी सांभाळलेलं आहे. ही नावं आठवण्यात, त्यांचं कालौचित्य राखण्यात, वेळप्रसंगी त्यांना सुनीताबाईंची मदत मिळाली असणं शक्य आहे; पण कृतज्ञतेनं ओतप्रोत भरलेले शब्द पुलंचेच आहेत. तो त्यांच्या मनाचा सहजोद्गार असावा.

(मंगला गोडबोलेलिखित 'पुल : चांदणे तुझ्या स्मरणाचे'मधून साभार)

# ठोकशाही नामंजूरच



**पु**लंना ३० नोव्हेंबर १९९६ रोजी संध्याकाळी मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरामध्ये 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्यात आला. ह्या समारंभात त्यांना व्हीलचेअरवरून व्यासपीठावर आणलं होतं. वाचून दाखवण्यात आलेल्या भाषणामध्ये पुलंनी म्हटलं होतं, ''या समारंभाचं आयोजन महाराष्ट्र राज्य शासनानं केलेलं आहे. अलीकडे राज्य–राजकारण–राज्यशासन–राजकीय पक्ष वगैरे शब्द भ्रष्टाचार–गुंडगिरी–खुनाखुनी–जाळपोळ यांना पर्यायी शब्द झाल्यासारखी अवस्था झाली आहे. 'बहुजन हिताय! बहुजन सुखाय!' हे आपल्या देशाचं बोधवचन; पण प्रत्यक्षात मात्र फार विपरीत असं पाहायला, ऐकायला आणि वाचायला मिळतं. उच्चार आणि आचार यांच्यात तफावत पडताना दिसली, की जीवनातल्या चांगलेपणावरचा विश्वास उडत जातो. 'निराशेचा गाव आंदण आम्हांसी' ही संत तुकोबांची ओळ पुन:पुन्हा आठवायला लागते. कलेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाचा तर आनंदाचा अनुभव देणारी निर्मिती करण्यातला उत्साहच नाहीसा होतो. आपल्या मताला अनुसरून लिहिण्याचं, बोलण्याचं स्वातंत्र्य ही मला फार महत्त्वाची गोष्ट वाटते. आपण सतत लोकशाही, जनमानस, जनतेचा कौल वगैरेंबद्दल बोलत असतो. या सगळ्याच्या मुळाशी विचार, उच्चार आणि आचार या गोष्टींचं स्वातंत्र्य या कल्पना आहेत. लोकशाहीच्या राज्यात तर लोकांच्या हितासाठी मांडलेला विचार सत्ताधीशांना मानवला नाही, तरी सत्य लोकांपुढे आणलंच पाहिजे, असा आग्रह धरणारे विचारवंत निर्भय राहिले पाहिजेत. आपल्याला न पटलेला एखादा विचार सत्ताबळानं दडपून टाकणारे राज्यकर्ते, आणि राजकीय पक्षांचे आणि धार्मिक संघटनांचे कार्यकर्ते साऱ्या सामाजिक प्रगतीला अगतिक करून टाकतात. एखाद्या विचाराला विरोध करायचा, तर तो आपला स्वत:चा विचार मांडून करावा. विरोधकाच्या तोंडाला काळं फसणं, खोलीत कोंडून ठेवणं, विज्ञानाच्या प्रयोगशाळा जाळून टाकणं, आयुष्यभराच्या अभ्यासाचं फळ नाहीसं करणं – हे लोकशाहीला मानवणारं कृत्य नव्हे. विचारांनी सिद्ध करायचे मुद्दे सुटले, की गुद्दे सुरू होतात आणि गुद्द्यांनी काहीच सिद्ध होत नाही.

''माझ्या वयाच्या या अखेरच्या टप्प्यात मला सर्वात अधिक अस्वस्थ करणारी गोष्ट जर कोणती असेल, तर ती म्हणजे, योग्य मुद्द्यांनी सिद्ध करण्याची घटना गुद्द्यांनी दडपून टाकण्याच्या प्रवृत्तींचा वाढता जोर ही आहे. या अनिष्ट प्रवृत्तींचा प्रभाव कमी करण्याऐवजी वाढीला लावणाऱ्या संघटनाही जोर धरताना दिसताहेत. माझ्या लिखाणांतून, भाषणांतून मी विचारस्वातंत्र्याचा पाठपुरावाच करत आलो आहे. हे स्वातंत्र्य दडपून टाकू पाहणाऱ्या आणीबाणीच्या काळात मी माझ्या परीनी विचारस्वातंत्र्याच्या बाजूंनी निवडणूक लढवणाऱ्या पक्षाच्या प्रचारसभांत भागही घेतलेला आहे. अशा वेळी, केवळ लोकशाहीतच शक्य असणाऱ्या निवडणुकांत निवडून आलेले पक्ष राज्यावर आल्यावर जेव्हा 'लोकशाहीपेक्षा आम्ही ठोकशाहीच पसंत करतो' वगैरे बोलायला लागतात, तेव्हा माझ्यासारख्याला किती यातना होत असतील, ते कुठल्या शब्दांत सांगू? असो.''

(पाचामुखी : परचुरे प्रकाशन मंदिर, पृष्ठ १४५–४६–४७ वरून साभार)

**महाराष्ट्राची सांस्कृतिक–कलाविषयक भूमी समृद्ध केलेल्या कलावंताला 'महाराष्ट्रभूषण' हा सर्वोच्च राज्यसन्मान देण्याचे शिवसेना–भाजप युती सरकारने ठरविले. तेव्हा पहिल्याच सन्मानासाठी पु.ल. देशपांडे यांची निवड केली जावी, हेही स्वाभाविक होते. वास्तविक शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासह काही राजकारण्यांनी आणि पुलविरोधकांनी त्यावर नाराजीचा सूर काढला तरी त्यात बदल झाला नाही. पुरस्कार प्रदान करण्याच्या समारंभात पुलंनी ठाकरे यांच्या 'ठोकशाही' समर्थनाच्या भूमिकेस स्पष्ट विरोध करण्याची संधी सोडली नाही. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, आविष्कार–स्वातंत्र्याचा सदैव पुरस्कार करणाऱ्या पुलंच्या यावेळच्या भाषणानंतर ठाकरे आणि पुल यांच्यात काही काळ दुरावाही निर्माण झाला. पण पुलंच्या कॅसेटस् ऐकत झोपी जाणाऱ्या बाळासाहेबांनीही नंतर त्यावर पडदा टाकला आणि उभयतांचे मैत्र पुन्हा जुळले. मात्र या इतिहासातील पुलंच्या स्पष्ट भूमिकेचे हे पान वगळण्याची हिंमत 'इतिहासाचे पुनर्लेखन' करणाऱ्या कोणालाही झाली नाही!**

# WELCOME TO THE WORLD OF CDSL SERVICES!

**CDSL**
www.cdslindia.com
www.evotingindia.com

**CVL**
www.cvlkra.com
www.cvl.nad.co.in

**CIRL**
www.cirl.co.in

**CCRL**
www.ccrl.co.in

**Depository Services**

**e-Voting**
Cast your votes online on company resolutions

**e-Notices**
e-mail of various communications to Shareholders

**electronic warehouse receipts (eNWRs)**

**KYC Registration Agency (KRA)**

**e-Kyc**
electronic KYC facility.

**GSP**
GST Suvidha Provider


**NAD**
National Academic Depository

**e-Insurance Account**
to hold insurance policies in electronic form

To know more about our various products, kindly visit our website

CDSL INVESTOR PROTECTION FUND


महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी विश्वकोश
महाराष्ट्र राज्य
मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
अधिक माहितीसाठी
marathivishwakosh.org
भाषा संचालनालय
अधिक माहितीसाठी
directorate.marathi.gov.in
मराठी भाषा विभाग
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ
अधिक माहितीसाठी
sahitya.marathi.gov.in
मराठी भाषेच्या सर्वांगीण
विकासाच्या दृष्टीकोनातून
स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून
मराठी भाषा विभागाची निर्मिती.
अधिक माहितीसाठी
marathibhasha.maharashtra.gov.in
राज्य मराठी
विकास संस्था
अधिक माहितीसाठी
rmvs.in
ग्रंथालीतर्फे प्रसिद्ध शब्दरुची विशेषांक प्रकाशनास
महाराष्ट्र शासनाच्या हार्दिक शुभेच्छा...


Aamrai
ORGANIC
NATURE'S
DIVINE
GOODNESS
100% CERTIFIED ORGANIC ALPHONSO FROM RATNAGIRI
Aamrai is one of the finest brands of organic mangoes in India. Aamrai Certified by NPOP (EU), NOP (USDA), JAS (Japan) and Bio Suisse.
USDA ORGANIC
JAS
Control Union Certifications
Born in a moment so perfect, only nature could create it. From the red soils of Konkan and black rock of Western Ghats; fired by the hot Ratnagiri sun and cooled by the salty breeze from the Arabian sea, delicious, sumptuous organic mangoes are grown in Ratnagiri's Aamrai. Known for their exceptional sweetness, texture and flavor, they are a creation of divine love.
www.aamrai.com


बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या डॅलस येथील
अधिवेशनानिमित्त रसिकांना
हार्दिक शुभेच्छा!

# शिव शक्ति एन्टरप्रायजेस

## नवीन प्रभुदास मेहता

# ग्रंथाली

## लेखक : वसंत वसंत लिमये




### साद हिमालयाची


सिक्कीम ते लडाख, आठ आठवडे, १२,००० किमी थरारक आल्हाददायक प्रवास, पुणे ते पुणे १६,००० किमी अशी मजल मारणारा प्रवास, उत्तुंग हिमशिखरं, स्वच्छ सूर्यप्रकाश, गच्च धुकं, गारा, पाऊस असं लहरी हवामान, सुचीपर्ण वृक्ष, देवदार अशी घनदाट जंगलं, सुजलाम सुफलाम करणाऱ्या, अल्लडपणे खळाळत वाहणाऱ्या अनेक नद्या, रमणीय जलाशय, अवघड, खतरनाक रस्ते, दोन्ही बाजूस अंगावर येणारं उग्रभीषण सौंदर्य, डोंगराच्या वळचणीला बसलेल्या चिमुकल्या गावातील कष्टमय पण आनंदी जीवन जगणारी निर्व्याज, हसतमुख, प्रेमळ माणसं असा कलायडोस्कोप.

मूल्य : ३५० रुपये
सवलतीत : २५० रुपये 20 $

### कॅम्प फायर

गेल्या चव्वेचाळीस वर्षांत सह्याद्री, हिमालय, युरोप आणि इतर अनेक ठिकाणी केलेल्या स्वच्छंद भटकंतीतील थरारक, रमणीय आणि चटका लावून जाणारे अनुभव...

15 $ मूल्य : ३०० रुपये
सवलतीत : १८० रुपये







### लॉक ग्रिफिन

कादंबरीची जातकुळी रॉबर्ट लडलमच्या भव्य, अभ्यासपूर्ण आंतरराष्ट्रीय कथानकाप्रमाणे आहे. ह्या कादंबरीवर सहजपणे एका ब्लॉकबस्टर चित्रपटाची निर्मिती होऊ शकते.
– सचिन खेडेकर, अभिनेता

मूल्य : ५०० रुपये सवलतीत ३०० 20 $

तिन्ही पुस्तकांचा संच
६०० रुपयांत

## बीएमएम अधिवेशनात (डॅलस) हा संच ३० डॉलरना उपलब्ध

संच नोंदवा – granthali.dallas@gmail.com



**सुप्रसिद्ध संगीतकार स्नेहल भाटकर यांचेही हे जन्मशताब्दी वर्ष. वास्तविक 'स्नेहल' हे त्यांचे टोपणनाव. त्यांचे खरे नाव वासुदेव. निर्माता म्हणून प्रतिभावंत केदार शर्मा यांच्या पहिल्या चित्रपटाचा संगीतकार होता बी.वासुदेव म्हणजेच वासुदेव भाटकर. वासुदेव भाटकरांची हिंदी चित्रपटसृष्टीत गायक आणि संगीतकार म्हणून दमदार एंट्री झाली. दरम्यान एच.एम.वी. कंपनीने बी. वासुदेव या नावाला देखील हरकत घेतली. त्यामुळे त्यांची नोकरी धोक्यात आली. त्यामुळे भाटकर चिंतित होते. त्यावेळी नुकताच त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला होता. तिचं नाव स्नेहल ठेवण्यात आलं होतं. तोच धागा पकडून पक्क्या व्यावसायिक असलेल्या केदार शर्मांनी बी. वासुदेवचं 'स्नेहल भाटकर' करून टाकलं.**

# कभी तनहाईयों में...

## अशोक हांडे

**सं**गीतकार स्नेहल भाटकर, या वर्षी त्यांचं जन्मशताबदी वर्ष आपण साजरं करतोय. त्या निमित्तानं शंभर वर्षांचा सूर प्रवास. स्नेहल भाटकर म्हणजे वासुदेव गंगाराम भाटकर. रत्नागिरीच्या भाट्ये गावातील कित्ते भंडारी जातीतील. वडील गंगाराम यांच्या जीवनाची सुरुवात या भाट्ये गावातच झाली. माडाची छोटीशी बाग आणि माडी विक्रीचं दुकान असं आयुष्य चाललं होतं. पण ते मुंबईला आले अन इथेच स्थायिक झाले आणि थोड्याच दिवसात गंगाराम शेठ झाले. घरची दुकानदारी, श्रीमंती, थाटमाट, दादरच्या पालखीवाडीमध्ये घर आणि त्याकाळी स्वतःची सारट म्हणजे बैलाची बग्गी असणारे शेठ. त्यांच्या पोटी १७ जुलै १९१९ रोजी वासुदेवाचा जन्म झाला.

पण दुर्दैवानं वासुदेव ३ वर्षांचा असतानाच त्यांचं निधन झालं. दोन मुलांना वाढविण्याची जबाबदारी आई सखूबाईवर आली. पण सखूबाई म्हणजे खंबीर बाई. त्या खचल्या नाहीत. त्या काळात स्त्रीशिक्षणाची पद्धत नव्हती पण अशाही परिस्थितीत त्यांनी स्वतः शिक्षण घेऊन शिक्षिकेची नोकरी पत्करली आणि मुलांना नुसतंच वाढवलं नाही तर सुसंस्कृत केलं. त्यांच्या माहेरच्या घराण्याला संगीताची फार आवड होती. त्या स्वतःही खड्या आवाजात सुस्वर भजनं म्हणत. 'प्रभू तेरी दया है अपार । तू अगम अगोचर अविचल है', ह्या सुरांच्या संस्कारांनीच वासुदेवाच्या संगीत जीवनाची पहाट झाली.

लहानग्या वासुदेवाचा संगीताकडे प्रचंड ओढा

होता. आईने तिच्याकडे रहाणाऱ्या तिच्या भावासाठी हार्मोनियम आणली होती. वासुदेवाची चिमुकली बोटे त्या हार्मोनियमवर स्वर धरू लागली. भातखंडे यांच्या संगीत पुस्तिका वाचून तो सारेगम म्हणू लागला आणि अगदी लहान वयातच आईच्या भजनांना पेटीवर साथ करू लागला.

त्या काळी मुंबईत भजनी मंडळी असत. लहानग्या वासुदेवाची पावलं आपोआपच ह्या भजनी मंडळीकडे वळू लागली. दादरच्या पाटील मारूती मंदिरात जाऊन, भजनी मंडळीत बसण्याचा आणि गाण्याचा छंद त्याला जडला. त्यांनी विश्वंभर प्रासादिक भजनी मंडळात पेटी वाजवायला सुरुवात केली. श्रीकृष्ण संगीत विद्यालयात मनो–हरपंत पोतदारांकडे शास्त्रीय संगीताचं शिक्षण त्यानं सुरु केलं, पानसे घराण्याच्या शास्त्रीबुआंकडून पखवाजाचे धडे घेतले आणि पोरसवदा वयाचा वासुदेव आता स्वत: भजनं म्हणू लागला.

भजनी सम्राट फुलाजी बुआ नांगरे त्या काळातले खूप प्रसिद्ध भजनी बुआ होते. भाटकरांची आणि त्यांची डबलबारी म्हणजे भजनांची जुगलबंदी व्हायची. ती खूप रंगायची. लोकं प्रचंड गर्दी करायचे. काही काळानंतर ते राम तिरोडकर यांच्या नवयुग प्रसादिक मंडळी मधे गाऊ लागले. नवयुगमधे पाच–सहा बुआ एकत्र येऊन चक्रीभजनं करायचे. त्यात वासुदेव छाप सोडून जायचा. स्वत: चाली बांधून, पेटी वाजवून अतिशय मधुर आवाजात भजनं गात गात ते कधी भजनसम्राट झाले ते त्यांना स्वत:लाही कळलं नाही.

हे सगळं चाललं होतं पण हौसेखातर, बिनपैशाचं काम सगळं. त्याशिवाय या भजनाच्या नादानं शिक्षणाकडे थोडंसं दुर्लक्षच झालं होतं. पण जेमतेम मॅट्रीक झाले. अर्थार्जनासाठी त्यांच्या मामानं शाळेत शिपायाची नोकरी आणली. पण आई सखूबाईनं त्याला विरोध केला. 'तो गातोय ना गाऊदे नोकरीचं पुढं बघू.' बहुतेक वासुदेवाचं प्राक्तन काही वेगळंच होतं.

१९३९ मध्ये हार्मोनियम वादक म्हणून एच.एम.वी.त नोकरी लागली आणि एक नवं रोमांचक पर्व सुरू झालं. त्याकाळी एच.एम.व्ही. कंपनी म्हणजे गुणीजनांचं माहेर होतं. अवघ्या भारताचं संगीत तिथं नांदत होतं असं म्हणायला हरकत नाही. शास्त्रीय संगीतातील बड़े गुलाम अली ख़ाँसाहेब यांच्यासारखे दिग्गज त्यांनी तिथेच ऐकले. स्टिक वाजवणारा जयकिशन, ढोलक वाजवणारा शंकर, नौशाद, सी. रामचंद्र या कलाकारांचा सहवास लाभला. गजानन वाटवे, सुधीर फडके, दत्ता डावजेकर, ग.दि. माडगू–ळकर अशी मित्रमंडळी जमली. ह्या सगळ्या सुजनांच्या संगतीतच त्यांची काव्य–संगीताची जाण प्रगल्भ झाली आणि हा हा म्हणता ते एच.एम.व्ही.च्या रेकॉर्डस्ना संगीत देऊ लागले.

संगीतकार म्हणून एच.एम.व्ही.तलं पहिलं भावगीत म्हणजे कवी राजा बढे यांचं 'आला चांदण्याचा थवा' हे गाणं, हाफ़ीज़ अली ख़ाँ साहेबांनी गायलं. त्यानंतर मंगेश पाडगांवकर यांचं गुलाम हुसैन ख़ाँ साहेबांनी गायलेलं 'माझ्या सुरात माझ्या परी प्राण ओतला.' हे गाणं केलं.

सुधीर फडके यांनी एच.एम.व्ही.त संगीतबद्ध केलेलं पहिलं गाणं वासुदेव भाटकर यांच्या आवाजात रेकॉर्ड झालं. बाँसरी वादक हरीप्रसाद चौरसिया ह्यांना एच.एम.व्ही.त पहिली संधी भाटकरांनी दिली. गीता दत्तच्या एच.एम.व्ही.त रेकॉर्ड झालेल्या पहिल्या भजनाचे संगीतकार होते वासुदेव भाटकर.

**सुधीर फडके यांनी एच.एम.व्ही.त संगीतबद्ध केलेलं पहिलं गाणं वासुदेव भाटकर यांच्या आवाजात रेकॉर्ड झालं. बाँसरी वादक हरीप्रसाद चौरसिया ह्यांना एच.एम.व्ही.त पहिली संधी भाटकरांनी दिली. गीता दत्तच्या एच.एम.व्ही.त रेकॉर्ड झालेल्या पहिल्या भजनाचे संगीतकार होते वासुदेव भाटकर. मदन मोहन यांची एच.एम. व्ही.तील ऑडिशन भाटकरांनी घेतली. सुबलक्ष्मीने गायलेलं भजन 'पग घुंगरू बांधे मीरा नाचे' याचं संगीत, वासुदेव भाटकरांचच.**





**एच.एम.वी.तल्या नोकरीमधे एच.एम.व्ही. सोडून बाहेर कुठेही काम करायचं नाही असा नियम होता. म्हणून वासुदेव भाटकरांनी बी. वासुदेव हे नाव धारण केलं आणि त्यांनी 'वासुदेव-सुधीर' ह्या नावानं संगीत दिलं. हिंदी चित्रपटाला संगीत देणारी पहिली संगीतकार जोडी म्हणून बी. वासुदेव आणि सुधीर फडके यांचं नाव अजरामर झालं. खरं म्हणजे भाटकरांनी पहिलं हिंदी चित्रपट गीत बनवलं ते १९४१ साली 'चित्रलेखा' ह्या केदार शर्मांच्या चित्रपटासाठी.**



मदन मोहन यांची एच.एम.व्ही.तील ऑडिशन भाटकरांनी घेतली. थोर गायिका सुबलक्ष्मीने गायलेलं भजन 'पग घुंगरू बांधे मीरा नाचे' याचं देखील संगीत, वासुदेव भाटकरांचच. एकंदरीत काय बुआंच्या जीवनातून भजन सुटत नव्हतं.

भजनं करता करता तारुण्यसुलभ वयामुळे असेल कदाचित, पण लक्ष जरा वेगळ्याच ठिकाणी वळलं होतं. पाटील मारुती मंदिरात, देवजी भाटकर हे विश्वंभर प्रासादिक भजनी मंडळाचे प्रमुख होते आणि वासुदेव मुख्य गायक. भजनानिमित्त त्यांच्या घरी नेहमी येणं जाणं असे. देवजी भाटकरांचीच कन्या लिलावती, त्याच्या मनात भरली. तिनंही प्रतिसाद दिला आणि चोरुन भेटीगाठी सुरू झाल्या.

पण पुढं करायचं काय?.... अहो, लग्नाचं काय? खरं म्हणजे एच.एम.व्ही.तल्या नोकरीमुळे वासुदेव आर्थिकदृष्ट्या थोडा स्थिर झाला होता. पण घरच्यांचा या लव्ह मॅरेजला प्रचंड विरोध होता, म्हणून दोघांनी गुपचुप रजिस्टर्ड लग्न करण्याचा, बंडखोर निर्णय घेतला. तिथं रजिस्टर मॅरेजसाठी किमान एक तरी साक्षीदार आवश्यक होता. अशा वेळी एच.एम.व्ही. तला त्यांचा मित्र सुधीर फडके म्हणजे आपले बाबुजी धावून आले. त्यांनी साक्षीदार म्हणून सही केली आणि १९४४ साली, वासुदेव आणि लिलावती यांचा मधुर संसार सुरू झाला.

इकडे संसार सुरू झाला आणि तिकडे हिंदी चित्रपटाला संगीत द्यायची संधी चालून आली. ख्यातनाम दिग्दर्शक बाबुराव पेंटर यांनी १९४६ साली 'रुक्मिणी स्वयंवर' ह्या चित्रपटात मराठी आणि हिंदी ह्या दोन्ही भाषांसाठी संगीतकार म्हणून सुधीर फडके आणि वासुदेव भाटकर यांना पाचारण केलं. एच.एम. वी.तल्या नोकरीमधे एच.एम.व्ही. सोडून बाहेर कुठेही काम करायचं नाही असा नियम होता. म्हणून वासुदेव भाटकरांनी बी. वासुदेव हे नाव धारण केलं आणि त्यांनी 'वासुदेव-सुधीर' ह्या नावानं संगीत दिलं. हिंदी चित्रपटाला संगीत देणारी पहिली संगीतकार जोडी म्हणून बी.वासुदेव आणि सुधीर फडके यांचं नाव अजरामर झालं.

खरं म्हणजे भाटकरांनी पहिलं हिंदी चित्रपट गीत बनवलं ते १९४१ साली 'चित्रलेखा' ह्या केदार शर्मांच्या चित्रपटासाठी. त्याचं असं झालं की, एच.एम. व्ही.मधे त्यांची दोस्ती सिनेदिग्दर्शक आणि गीतकार केदार शर्मा यांच्याशी झाली. केदार शर्मा म्हणजे अतिशय गुणग्राहक माणूस. या सिनेमाचं गीत/दिग्दर्शन शर्मा करीत होते. झंडे ख़ाँ त्याचे संगीत दिग्दर्शक होते. सिनेमा शास्त्रीय संगीतावर आधारित होता. सगळ्या गाण्यांचं रेकॉर्डिंग झालं होतं. फक्त एक गाणं उरलं होतं. झंडे ख़ाँ त्यावेळी कलकत्त्याला असायचे. आता फक्त उरलेल्या एका गाण्यासाठी कलकत्याहून झंडे ख़ाँ यांना येणे शक्य नव्हते. तो फार मोठा कलाकार त्यामुळे काही बोलताही येईना. अशा वेळी शर्मा यांनी एच.एम.व्ही.मधल्या तरूण, गुणवान आणि प्रतिभावंत अशा वासुदेव भाटकरला ते गाणं संगीतबद्ध करण्याची संधी दिली आणि वासुदेव भाटकरांनी खुप सुंदर गाणं तयार केलं. केदार शर्मा एकदम खूष झाले. पण भाटकरांनी त्यांना विनंती केली की झंडे खाँ सारख्या दिग्गजानी सगळी गाणी केली आहेत, फक्त एका गाण्यासाठी माझं नाव संगीतकार म्हणून लावू नका, मी फार छोटा माणूस आहे. केदार शर्मा ही माणुसकीची भावना बघून गहिवरले आणि त्यांनी तिथल्या तिथे भाटकरांना वचन दिलं की, मी माझा स्वत:चा चित्रपट निर्माण करीन त्यावेळी संगीतकार म्हणून तुलाच संधी देईन आणि १९४७ साली ओरिएन्टल पिक्चर्स या बॅनरखाली निर्माता, दिग्दर्शक, गीतकार म्हणून त्यांनी स्वत:चा पहिला चित्रपट 'नीलकमल' काढला त्यावेळी हिरो-हिरोईनच्या नावाआधीच संगीतकार म्हणून बी. वासुदेव यांचं नाव घोषित केलं.

निर्माता म्हणून प्रतिभावंत केदार शर्मा यांच्या पहिल्या चित्रपटाचा संगीतकार होता बी.वासुदेव म्हणजेच वासुदेव भाटकर. हिरो होता राज कपूर आणि हिरोईन मधुबाला. त्याशिवाय राज कपूरच्या ह्या पहिल्या चित्रपटात प्रत्यक्ष राज कपूरला पहिल्यांदा प्ले बॅक देण्याचा मान गायक वासुदेव भाटकरांना मिळाला.

वासुदेव भाटकरांची हिंदी चित्रपटसृष्टीत गायक आणि संगीतकार म्हणून दमदार एंट्री झाली. दरम्यान एच.एम.वी. कंपनीने बी. वासुदेव या नावाला देखील हरकत घेतली. त्यामुळे त्यांची नोकरी धोक्यात आली. त्यामुळे भाटकर चिंतित होते. त्यावेळी नुकताच त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला होता. तिचं नाव स्नेहल ठेवण्यात आलं होतं. तोच धागा पकडून पक्क्या व्यावसायिक असलेल्या केदार शर्मांनी बी. वासुदेवचं

'स्नेहल भाटकर' करून टाकलं. केदार शर्मांचाच ठसुहाग रातठ हा स्नेहल भाटकर या नावानं केलेला पहिला चित्रपट.

ह्या चित्रपटाच्या कथेला पहाडी पार्श्वभूमी होती. म्हणून भाटकरांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदाच पहाडी धूनचा वापर केला आणि चित्रपट संगीताला एक वेगळीच संजीवनी दिली. नौशाद यांनी तर स्नेहल भाटकरांचं तोंड भरून कौतुक केलं. 'आप महाराष्ट्राके सुपुत्र, वैसे ये पहाड़ी संगीत हमारे इलाकेका संगीत है। लेकिन उसका इस्तमाल फ़िल्म में सबसे पहले पहले आपने किया। भई व्वा, हम ग़लत रास्ते से चल रहे थे। आपने बिल्कुल सही रास्ता चुना।' खरोखरच भाटकरांच्या पहाड़ी धूनची जादू रसिकांच्या ह्रदयाला भिडली. या चित्रपटातील राजकुमारी, गीता दत्त आणि शमशाद बेग़म ह्यांनी गायलेली पहाडी गाणी त्या काळात खूप गाजली.

आता केदार शर्मा आणि स्नेहल भाटकर ह्यांची जोडी खरं म्हणजे सुपरहिट झाली होती. पण केदार शर्मा यांनी त्यांच्या पुढील 'नेकी और बदी' या चित्रपटात नवीन संगीतकार 'रोशन' यांना संधी द्यायचं ठरवलं होतं. भाटकरांना बाजूला करण्याचं काय कारण असेल बरं? खरं म्हणजे केदार शर्मा हे माणुसकी असणारं व्यक्तिमत्त्व होतं. त्यांनी भाटकरांना सांगितलं, ''देखो भाटकर बुआ 'रोशन नागरथ' नाम का एक लडका पंजाबसे आया है, रेफ़्यूजी है, बहुत ही टॅलेंटेड है, मैं उसे चान्स देना चाहता हूँ, अगर आप को ऐतराज नहीं हैं तो।'' आता भाटकर म्हणजे निर्मळ मनाचा मराठी माणूस. त्यांनी अगदी खुल्या दिलानं केदार शर्मांना होकार दिला आणि रोशनला पहिला चित्रपट मिळाला.

इकडे केदार शर्मांचे चित्रपट हातातून गेले आणि तिकडे स्नेहल भाटकर या नावाचं बिंग कंपनीत फुटलं, म्हणून एच.एम.व्ही.ची नोकरीही गेली. पण प्रतिभा हा असा गुण आहे की त्याला कोणी रोखू शकत नाही. सुदैवानं त्यांना शोभना समर्थच्या 'हमारी बेटी'चं संगीत देण्याची संधी मिळाली. आणि भाटकरांच्या प्रतिभेला नव्याने पंख फुटले. विशेष म्हणजे 'हमारी बेटी'मधे त्यांनी नायिका नूतनकडून पहिल्यांदा गाणं गाऊन घेतलं आणि त्याहीपेक्षा भाग्याची गोष्ट म्हणजे लता मंगेशकर यांनी स्नेहल भाटकरांकडे पहिल्यांदाच गाणं गायलं. पुढे निर्माता दिग्दर्शक वसंत जोगळेकर ह्यांच्या 'नंदकिशोर' ह्या मराठी आणि हिंदी चित्रपटामध्ये सगळीच्या सगळी गाणी लताबाईंनी गायली. १९५३ साली केदार शर्मांच्या 'गुनाह'ची लताबाईंनी गायलेली गाणीही फार गाजली.

लतादीदींनी अनेक दर्दभरी गाणी गायली पण त्यातील काही गाणी चिरकाल टिकली. त्यापैकीच एक अतिशय गाजलेलं गाणं म्हणजे लीला चिटणीस यांची निर्मिती दिग्दर्शन असलेल्या 'आज की बात' ह्या चित्रपटातील. हे गाणं लता दीदींच्याही ह्रदयात कायम घर करून राहिलं होतं. ज्या दिवशी स्नेहल भाटकर हा इहलोक सोडून गेले त्यावेळी लतादीदींनी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'वो चली ग़म की हवा, मौसम बदलकर रह गए' हेच गाणं गायलं होतं.

चित्रपटाचा विषय, गाण्यांचे शब्द, पिक्चरमधली सिच्युएशन, गाणं कुठल्या अभिनेत्यावर चित्रित व्हायचं आहे? ते कोण गाणार आहे? हे सगळं ध्यानात घेऊन, ते सहजपणे चाली बांधीत.

ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेवांपासून ते राजा बढ़े, ग.दि.मा.पर्यंत मराठी कवींच्या आणि हिंदी सिनेमात केदार शर्मा, प्रेम धवन, भरत व्यास, हसरत जयपुरी, वहजाद लखनवी, कैफ़ उरफानी, अर्श हैदरी, नक्श लायलपुरी अशा विविध लहजा असणाऱ्या मराठी, हिंदी, उर्दू गीतकारांच्या गीतांना त्यांनी चाली लावल्या. त्या त्या भाषेचा लहजा पकडून त्याला स्वरबद्ध केलं. भजनांच्या बाऱ्यांमध्ये रमाणाऱ्या ह्या माणसानं हे सगळं कुठून बरं आत्मसात केलं असावं?

१९५५ साली अस्पी ईराणीच्या पिक्चरचं नाव होतं डाकू. त्याची पार्श्वभूमी बंजारन. आणि हिरो कोण तर शम्मी कपूर. त्याला भाटकरांनी अस्सल बंजारा बाजाचं म्युझिक दिलं.

त्याला न्याय देण्यासाठी, खास आशा भोसलेंना गायला बोलावलं. आणखी एक कमाल म्हणजे ह्या गाण्याचं म्युझिक अरेंजमेंट. भाटकर स्वतःच्या गाण्यांचं म्युझिक अरेंजमेंट स्वतःच करायचे.

भाटकर स्वत:ही गायक होते पण कुठल्या गाण्यासाठी कुणाचा आवाज वापरायचा ह्याचं अचूक भान त्यांना होतं. काही हळुवार गाण्यांसाठी त्यांनी तलम रेशमी आवाजाच्या, तलत मेहमुदला बोलावलं. इतकंच काय त्याच्याकडून, चक्क काही उडत्या चालीची गाणीही गाऊन घेतली.

तसं म्हटलं तर महेंद्र कपूरला 'दीवाली की



**प्रतिभा हा असा गुण आहे की त्याला कोणी रोखू शकत नाही. सुदैवानं त्यांना शोभना समर्थच्या 'हमारी बेटी'चं संगीत देण्याची संधी मिळाली. आणि भाटकरांच्या प्रतिभेला नव्याने पंख फुटले. विशेष म्हणजे 'हमारी बेटी'मधे त्यांनी नायिका नूतनकडून पहिल्यांदा गाणं गाऊन घेतलं आणि त्याहीपेक्षा भाग्याची गोष्ट म्हणजे लता मंगेशकर यांनी स्नेहल भाटकरांकडे पहिल्यांदाच गाणं गायलं.**





**भाटकरांकडे त्या काळातल्या, किशोरकुमार सोडून जवळजवळ सगळ्या, गायकांनी गाणी गायली. गीता दत्त, राजकुमारी, जोहराबाई, शमशाद बेगम, लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर, नूतन, सुमन कल्याणपूरपासून ते अगदी सुबलक्ष्मी, ज्योत्स्ना भोळे, मोगुबाई कुर्डीकर यांच्यासारख्या गायिका, तर हाफ़िज अली खाँ साहेब, गुलाम हुसैन खाँ, राम मराठे, वसंतराव देशपांडे, मुकेश, रफ़ी, हेमंतकुमार, महेंद्र कपूर, तलत मेहमूद ते अगदी 'या मालक' ह्या मराठी चित्रपटात मन्नाडेसुद्धा चक्क मराठी गाणं गायले.**



रात' ह्या चित्रपटात, पार्श्वगायनाची पहिली संधी दिली, ती भाटकरांनीच.

गंमत म्हणजे भाटकरांनी 'बावरे नैन' या चित्रपटात, केवळ केदार शर्मा यांच्या आग्रहाखातर अभिनय केला होता. संगीतकार होते रोशन. रोल भिकाऱ्याचा होता पण त्याच्यावर एक गाणं चित्रित झालं आणि ते गाणं गायलं होतं मोहम्मद रफ़ी यांनी. म्हणजे भाटकरांना चक्क रफ़ीसाहेबांनी प्लेबॅक दिला. रफ़ीसाहेबांनी त्यांच्याकडे मोजकीच गाणी गायली. ठेंस, हमारी याद आयेगी आणि फ़रियाद या चित्रपटांसाठी. तीही सगळी ड्युएटस्च.

भाटकरांकडे त्या काळातल्या, किशोरकुमार सोडून जवळजवळ सगळ्या, गायकांनी गाणी गायली. गीता दत्त, राजकुमारी, जोहराबाई, शमशाद बेगम, लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर, नूतन, सुमन कल्याणपूरपासून ते अगदी सुबलक्ष्मी, ज्योत्स्ना भोळे, मोगुबाई कुर्डीकर यांच्यासारख्या गायिका, तर हाफ़िज अली खाँ साहेब, गुलाम हुसैन खाँ, राम मराठे, वसंतराव देशपांडे, मुकेश, रफ़ी, हेमंतकुमार, महेंद्र कपूर, तलत मेहमूद ते अगदी 'या मालक' ह्या मराठी चित्रपटात मन्नाडेसुद्धा चक्क मराठी गाणं गायले.

'या मालक' हा त्यांचा मराठीतील एक सुपरहिट चित्रपट. भाटकरांचं वैशिष्ट्य असं की नवीन नवीन निर्मात्यांना त्यांच्याबद्दल प्रचंड विश्वास वाटत असे. शुभा खोटे आणि विजू खोटे यांचा हा पहिलाच चित्रपट. दिग्दर्शक होते नंदू खोटे आणि विशेष म्हणजे त्यावेळी हिंदी सिनेमात शिखरावर असणाऱ्या, कॉमेडी किंग मेहमूदने यात भूमिका केली होती. या चित्रपटातली सगळी गाणी गाजली आणि खास करून पी.सावळाराम यांनी लिहीलेली एक झकास मराठमोळी लावणीही तितकीच गाजली.

कुठच्याही प्रकारचं आणि कुठच्याही गोष्टीसाठी संगीत देणं म्हणजे भाटकरांसाठी खुशी का समां होता. आपल्या देशात ऑपेरा, म्हणजे संगीतिका ह्या प्रकाराला संगीत देणारा, हा पहिला संगीतकार. १९४४ साली 'शाकुंतल'वर आधारित उषा स्वप्न नावाच्या ऑपेरामध्ये, दुष्यंत होते शाहू मोडक तर शकुंतला होती, नलिनी जयवंत.

आता आपण फ्यूजन फ्यूजन खूप ऐकतो. पण भारतात सर्वात पहिलं फ्यूजन, झुबेन मेहता यांचे वडिल मेहली मेहता आणि वासुदेव भाटकर या जोडीनं केलं होतं.

संगीतक्षेत्रातील असं अष्टदिशांना गवसणी घालणारा हा अवलिया, मराठीचा मानबिंदू असलेल्या नाट्य संगीताला विसरला नाही. या क्षेत्रात देखील तितक्याच तन्मयतेने रमला. त्यांनी संगीत दिलेल्या लिलाव ह्या नाटकात, स्वतः प्रभा अत्रे नायिका होत्या. आचार्य अत्रेंच्या 'तो मी नव्हेच', 'बुवा तिथे बाया', 'मी मंत्री झालो' अशा अनेक नाटकांना त्यांनी संगीत दिलं. त्या काळात नाट्यसंगीताला भाटकरांनी एक वेगळाच आयाम दिला. नाट्यनिकेतनच्या नाटकांना खरी बहार आणली जोत्स्नाबाई भोळेंच्या कसदार, गायकीनं आणि स्नेहल भाटकरांच्या संगीतानं.

नाटकांमध्ये रमणारा हा संगीतकार, येशूख्रिस्तांची भजनंही तितक्याच तन्मयतेने गात असे.

एकदा मुंबईत जागतिक युकॅरिस्टिक कॉंग्रेस भरली होती. या मेळाव्यात ख्रिस्ती भजनं गाण्यासाठी भाटकरांना, मोठ्या सन्मानानं पाचारण करण्यात आलं होतं. वेस्टर्न म्युझिकचाही त्यांचा तितकाच अभ्यास होता आणि त्याचाच वापर त्यांनी शोभना समर्थ यांच्या 'छबिली' या चित्रपटात केला.

स्वित्झर्लंडमधून बॅले शिकून आलेल्या तनुजासाठी त्यांनी नऊ मिनिटांचा अप्रतिम बॅले बसवला, तर नूतनकडून उडत्या चालीची गाणी गाऊन घेतली. एवढंच काय 'लहरों पे लहर'सारखं धीरगंभीर गाणं स्वतः संगीतकार असलेल्या हेमंतकुमार ह्यांच्याकडून गाऊन घेतलं. १९५३ च्या 'गुनाह' नंतर मधे जवळजवळ आठ वर्षांचा काळ गेला. का कुणास ठाऊक त्या दोघांनी एकत्र काम केलं नाही. पण १९६१ मधे दोघे पुन्हा एकत्र आले. 'हमारी याद आयेगी' या चित्रपटात. ह्या चित्रपटातील लता, मुकेशच्या 'सोचता हूँ ये क्या, ये क्या किया मैंने'सारख्या डुअेट सॉंग्सनी तर लोकप्रियतेचा कळस गाठला.

त्याच काळात भाटकरांचा मराठी चित्रपटाकडे ओढा वाढला. संत तुकाराम ह्या चित्रपटाच्या निमित्ताने निर्माता ना.गो. दातार, दिग्दर्शक राजा नेने, कथा-पटकथा-संवाद-गीतकार ग.दि. माडगूळकर अशी प्रतिभावान मंडळी एकत्र जमली आणि त्यांना आठवण झाली या भजनी बुवांची! तुकारामांच्या अभंगांना खरा न्याय कोणी देईल तर तो संगीतकार म्हणजे स्नेहल भाटकर. भाटकर कामाला लागले. त्यांच्या पिंडाचे आणि अतिशय

जिव्हाळ्याचं काम त्यांना मिळालं होतं. तसं भाटकरांनी १९४७ साली प्रभात चित्रच्या 'संत तुकाराम' ह्या हिंदी चित्रपटाला संगीत दिलंच होतं आणि ते खूप गाजलं देखील होतं. आता मराठीसाठीही त्यांनी एकापेक्षा एक सरस चाली बांधल्या. पहिलं गाणं पंडितराव नगरकर यांच्या आवाजात रेकॉर्डदेखील झालं पण ते काही सगळ्यांना पसंत पडेना. पुढचं रेकॉर्डिंग थांबलं आणि सगळी मंडळी स्टुडिओतच विचार करू लागली. त्यावेळी बासरीवादक त्रिभुवन दातार, नेने आणि गदिमांना म्हणाले की, अहो भाटकरांसारखा एवढा मोठा भजन गायक स्वतः संगीतकार असताना तुम्ही दुसरा गायक का घेताय?

वास्तविक स्नेहल भाटकर स्वतः संगीतकार असूनही त्यांनी निर्मात्याकडे स्वतः गाण्याचा विषय काढला नव्हता. स्वतःच घोडं दामटवण्याचा पिंडच नव्हता ह्या प्रतिभावंताचा. पण निर्मात्यांना ती गोष्ट अतिशय पटली आणि केवळ निर्मात्यांनी गळ घातल्यामुळे एकाच दिवशी सलग पाच गाणी रेकॉर्ड केली आणि त्यांनी गायलेली 'काय तुझे उपकार पांडुरंगा', 'आपुल्या माहेरा', 'विसावा विठ्ठल', 'उचनीच' काही सर्व गाणी अक्षरशः अजरामर झाली.

संगीतातील सर्व प्रकारांना गवसणी घालण्याचा जणू चंगच त्यांनी बांधला होता. त्या काळात भावगीतांचा महाराष्ट्रात फार बोलबाला होता. सुरुवातीला भाटकरांनी एच.एम.व्ही.मधे काही भावगीतं स्वरबद्धही केली होती. त्याशिवाय गीत शाकुंतल ह्या कार्यक्रमात, कवी गंगाधर दांडेकर यांची, प्रभाकर पंडितांनी स्वरबद्ध केलेली भावगीतं देखील, ते तितक्याच उत्साहाने गायले.

इतर संगीतकारांकडे, ते चित्रपटातही बऱ्याच वेळा गायले. प्रभातचं शाहू मोडक यांच्यावर चित्रीत झालेलं 'सोनियाचा दिस अजी अमृते पाहिला' हे गाणं स्नेहल भाटकरांनी गायलंय. विष्णुपंत पागनीसांच्या हिंदी 'संत तुकाराम'मधली गाणी भाटकरांनीच गायली. हिंदीत अनिल बिस्वास, सी. रामचंद्र, भरत व्यास आणि के. दत्ता यांच्याकडे गायले. संगीतकार शंकरराव व्यास ह्यांचं 'बहु असोत सुंदर संपन्न की महान' हे महाराष्ट्र गीत भाटकर आणि जोस्ना भोळे यांनी गायलंय. त्यांच्याच सुदाम्याचे पोहे, उतावळा नवरा, मी दारु सोडली ह्या चित्रपटांमधून ते गायले. वसंत प्रभूंकडेही गायले. राम कदम ह्यांच्या संगीतातील 'एक धागा सुखाचा' ह्या चित्रपटातलं त्यांनी गायलेलं 'कशी होती रे माझी आई' हे गाणं त्याकाळात फार गाजलं.

स्नेहल भाटकर ह्या नावामुळे बऱ्याचवेळा गंमत व्हायची. बरेचजण तर स्नेहल भाटकर म्हणजे कुणीतरी स्त्री संगीतकार आहे, असंच समजत.

कमलाबाई मंगरूळकर यांचा 'रुक्मिणी स्वयंवर', शोभना समर्थचा 'हमारी बेटी' आणि 'छबिली', प्रतिमा दासगुप्ताचा 'पगले', लीला चिटणीसांचा 'आज की बात', कमला कोटणीसांचा 'ठेस' आणि शुभा खोटेंचा 'चिमुकला पाहुणा'... ह्याच चित्रपटातील लता मंगेशकरांनी गायलेलं मारुबिहाग रागातील 'तुजसाठी शंकरा' हे गीत फारच गाजलं. ह्या गीताबद्दल भाटकरांनी स्वत: सांगितलेला किस्सा म्हणजे लताजींना हे गाणं एवढं आवडलं होतं की हे गाणं गायचे एकही रूपयाचे मानधन त्यांनी घेतले नव्हते.

याच गाण्यासाठी भाटकरांना महाराष्ट्र शासनाचा कंठमणी पुरस्कार मिळाला. ६८ साली 'अन्नपूर्णा'मधल्या 'तुझ्या कांतीसम रक्तपताका' या गाण्यासाठी, सूर सिंगार अॅवार्ड मिळाला. 'गीत शिवायन' खरं म्हणजे त्यांच्या कारकीर्दीचा सर्वोच्च बिंदू. छत्रपति शिवाजी महाराजांच्या जीवनावर, कवी नारायण मोरे यांनी रचलेल्या ह्या महाकाव्याला त्यांनी इतकं अप्रतिम संगीत दिलं की, ते ऐकून अनंत काणेकर यांनी भाटकरांना, संगीत रत्नाकर ही पदवी दिली. पुढे सह्याद्री वाहिनीचा संगीतरत्न पुरस्कार मिळाला. खरं म्हणजे पुरस्कार मिळावेत ह्या अपेक्षेने त्यांनी कधीच काही केलं नव्हतं. सगळी निष्ठा फक्त स्वतःच्या कामावर ठेवली पण काम मिळावं म्हणून आपला स्वाभिमान सोडला नाही.

ह्या माणसाचे कष्ट म्हणजे काय सांगावेत? महाराष्ट्र सरकारने 'सेंटस् ऑफ महाराष्ट्रा' ही डॉक्युमेंटरी काढली. त्यात एकूण ३२ गाणी होती. विशेष म्हणजे भाटकरांनी स्वत:च्या वाट्याची २७ गाणी आणि सुमन कल्याणपूरची ५ गाणी, एकाच दिवसात रेकॉर्ड केली. हा रेकॉर्ड तर कोणीही मोडू शकणार नाही. खरं म्हणजे १९७० सालानंतर मराठी असो वा हिंदी, सिनेसंगीताचा बाज हळूहळू बदलू लागला होता. पण तोही काळ त्यांनी आव्हान म्हणून



**संगीतक्षेत्रातील असं अष्टदिशांना गवसणी घालणारा हा अवलिया, मराठीचा मानबिंदू असलेल्या नाट्य संगीताला विसरला नाही. या क्षेत्रात देखील तितक्याच तन्मयतेने रमला. त्यांनी संगीत दिलेल्या लिलाव ह्या नाटकात, स्वतः प्रभा अत्रे नायिका होत्या. आचार्य अत्रेंच्या 'तो मी नव्हेच', 'बुवा तिथे बाया', 'मी मंत्री झालो' अशा अनेक नाटकांना त्यांनी संगीत दिलं. त्या काळात नाट्यसंगीताला भाटकरांनी एक वेगळाच आयाम दिला.**





**'गीत शिवायन' खरं म्हणजे त्यांच्या कारकीर्दीचा सर्वोच्च बिंदू. छत्रपति शिवाजी महाराजांच्या जीवनावर, कवी नारायण मोरे यांनी रचलेल्या ह्या महाकाव्याला त्यांनी इतकं अप्रतिम संगीत दिलं की, ते ऐकून अनंत काणेकर यांनी भाटकरांना, संगीत रत्नाकर ही पदवी दिली. पुढे सह्याद्री वाहिनीचा संगीतरत्न पुरस्कार मिळाला. खरं म्हणजे पुरस्कार मिळावेत ह्या अपेक्षेने त्यांनी कधीच काही केलं नव्हतं. सगळी निष्ठा फक्त स्वतःच्या कामावर ठेवली पण काम मिळावं म्हणून आपला स्वाभिमान सोडला नाही.**

स्वीकारला. ७१ साली 'बहकलेला ब्रह्मचारी'ला त्यांनी, चित्रपटाच्या नावाप्रमाणेच संगीत दिलं, आणि खास करून बहकलेल्या ब्रह्मचाऱ्याच्या स्टाईलमधे, 'शुक शुक मन्या' हे गाणंही गायलं.

यानंतर मात्र त्यांचं मन ह्या झगझगत्या रुपेरी दुनियेत रमेना, पण म्हणून काम थांबलं नव्हतं. संगीतातील नवेनवे प्रयोग सुरूच होते. आकाशवाणीवर भावसरगम हा कार्यक्रम केला. गीत शाकुंतल, गीत शिवायन आणि राष्ट्रसेवा दलाच्या 'महाराष्ट्र दर्शन'चे लाईव्ह कार्यक्रम तर सुरुच होते. सपना सारंग यांची 'भीगे पलके' ही टी.व्ही सिरीयल केली, इतकंच काय सुरेश भटांच्या ग़ज़लांनाही चाली लावल्या.

या विविध क्षेत्रात संगीताची मुशाफिरी करताना कुटुंबातही ते तितकेच रमले. मोठी मुलगी स्नेहलताचं तर नावच धारण केलं होतं. अविनाश इंजिनीअर झाला. रमेश गायक व्हावा ही त्यांची फार इच्छा होती, त्याचं संगीताचं शिक्षणही सुरू होतं. पण तो अभिनय क्षेत्रात गेला, तिथं मोठा झाला. गायक झाला नाही तरी मोठा कलाकारच झाला ना? ह्याचं अण्णांना केवढं कौतुक. ९४ साली केदार शर्मांचा 'सहमें हुए सितारे' हा त्यांनी संगीत दिलेला शेवटचा चित्रपट. त्यांचा मुलगा रमेश भाटकर या चित्रपटाचा हिरो होता, ह्याचा त्यांना कोण अभिमान. मृदुला आणि अंजली ह्या सुनांवर देखील अण्णांचा खूप जीव होता. धर्मपत्नी लीलाबाईंनी त्यांना आयुष्यभर, तन्मयतेने साथ दिली. खरं म्हणजे या भोळ्याभाबड्या व्यक्तिमत्त्वाची सतत काळजी घेतली. या मोहमयी दुनियेचा काय भरवसा, म्हणून शेवटपर्यंत नोकरी करत राहिली. स्वतः कुटुंब कबिला सांभाळून या कलंदराला आभाळी उडण्याचं बळ तिनं दिलं.

पण १४ डिसेंबर २००१ रोजी, लीलाबाई गेल्यावर मात्र... अण्णा उदास झाले, एकाकी झाले.

२००४ साली त्यांना त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च सन्मान महाराष्ट्र शासनाचा 'लता मंगेशकर ॲवॉर्ड' जाहीर झाला पण तो दिला गेला २८ नोव्हेंबर २००६ रोजी, दिल्लीमध्ये.

फार मोठा समारंभ झाला. पण दुर्दैवानं, ॲवार्ड घ्यायच्या नेमकं आदल्याच दिवशी ते दिल्लीच्या हॉटेलमधे पडले. त्यांना अक्षरशः स्ट्रेचरवरून ॲवार्ड स्विकारण्यासाठी स्टेजवर नेलं. ॲवार्ड स्विकारताना टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता, हीच रसिकांनी त्यांना दिलेली मानवंदना.

दरवर्षी ज्येष्ठ महिन्यामध्ये, पाटील मारूती मंदिरात, दशहरा उत्सव म्हणजेच भगवान विष्णू पुण्य सोहळा असतो. त्या दिवशी सगळे भजनी गायक तिथं सेवा म्हणून हजेरी लावतात. वयाच्या ८८व्या वर्षी, दिल्लीला पडल्यामुळे आजारी असताना आणि पाठीचा कणा मोडलेला असतानाही, भाटकर पायपेटीवर बसून तिथे भजन गायले, अगदी समरसून गायले, तेच त्यांचं शेवटचं गाणं.


२८ मे रोजी हे गाणं गायले आणि २९ मे २००७ रोजी अगदी कृतार्थ भावनेने ते आपुल्या माहेरा, कायमचे निघून गेले. शेवटच्या श्वासापर्यंत गात राहिले. हेच त्यांचं प्राक्तन.

पण भाटकर म्हटलं की सर्वात आधी आठवतं, ते एक गाणं. खरं म्हणजे लता मंगेशकर रेकॉर्डिंगला पोहचू शकल्या नाहीत आणि शूटींग अडलं होतं म्हणून हे गाणं मुबारक बेग़म यांनी गायलं. अगदी अंगात ज्वर असून देखील गायलं. पण गाण्यातला ज्वर तिनं कुठंही कमी पडू दिला नाही. वेळ आणि बजेट नसल्यामुळे ह्या गाण्याचं एकच कडवं रेकॉर्ड झालं. पण ते इतकं गाजलं, इतकं गाजलं की पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराण, इराक इथेही तितकंच पॉप्युलर झालं. थिएटरमधे हे गाणं संपल्यावर प्रेक्षक त्याला स्टँडींग ओवेशन देत असत. असं भाग्य चित्रपटसृष्टीच्या इतिहासात फक्त ह्या एकाच गाण्याला लाभलं. इतकं उत्तुंग यश मिळालं, इतके पुरस्कार मिळाले, पण स्वतःच्या आभाळाएवढ्या प्रतिभेचा कधी गर्व नाही केला. किंबहुना त्या प्रतिभेची फुलं सामान्य कष्टकऱ्यांना देव मानून अभंग, भजनं, गवळणीच्या रुपानं त्यांच्या पायावर वाहत राहिला. संगीतकार होता, गायक होता, पण त्याहीपेक्षा एक निर्मळ माणूस होता. या चराचरात जोपर्यंत सप्तसुर आहेत तोपर्यंत वासुदेव भाटकर उर्फ बी. वासुदेव उर्फ भाटकर बुवा उर्फ स्नेहल भाटकर, या कलंदर कलाकाराला आपण विसरूच शकत नाही. त्यांच्याच गाण्यात सांगायचं तर 'कभी तनहाईयों में हमारी याद आएगी'.

**– अशोक हांडे**
chaurang.ashokhande@gmail.com

ग्रंथाली

[redacted]









ग्रंथाली

[redacted]



# मराठी सातासमुद्रापार

**अमेरिकेत डॅलस येथे दि. ११ ते १४ जुलै दरम्यान बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अठरावे द्वैवार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम असलेल्या या अधिवेशनात अमेरिकेतील भारतीय कलावंतांबरोबरच अनेक 'स्वदेशी' नामवंत कलावंत सहभागी होत आहेत. त्यापैकी काहीजणांनी प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त केलेली ही मनोगते...**



## आपल्या मातीतल्या माणसांसाठी

**– अशोक पत्की**

**संगीतकार म्हणून सिनेमा, नाटक, टीव्ही मालिका, जिंगल्स असा गेल्या पन्नास वर्षांचा माझा प्रवास आहे. त्यामुळे बीएमएममध्ये जाऊन आपली कला सादर करणं हे नक्कीच स्वप्न आहे.**

**मी** पहिल्यांदाच बीएमएमसाठी जातोय त्यामुळे खरंच खूप आनंद झालेला आहे. इथे मी तुम्हाला एक किस्सा सांगतो. माझे मित्र सुधीर भट यांनी माझ्या मागे लागून बीएमएमचा फॉर्म माझ्याकडून भरून घेतला होता. तुझा कार्यक्रम तिथे नक्कीच हिट होईल असं म्हणत त्यांनी मला तो फॉर्म भरण्यास सांगितले होते. पण काही कारणास्तव अगदी ऐनवेळी जाणं झालंच नाही. दुसऱ्यांदा सुद्धा असंच झालं. त्यांच्याकडूनच जाणं रद्द झालं. असं माझ्याबाबतीत दोनदा होऊन यावर्षी तिसऱ्यांदा मी बीएमएमसाठी जाण्यास आता सज्ज झालोय.

संगीतकार म्हणून सिनेमा, नाटक, टीव्ही मालिका, जिंगल्स असा गेल्या पन्नास वर्षांचा माझा प्रवास आहे. त्यामुळे बीएमएममध्ये जाऊन आपली कला सादर करणं हे नक्कीच स्वप्न आहे. आपल्या माणसांसमोर आपल्या कलेला मिळणारी दाद हीच एखाद्या कलाकारासाठी खूप मोठी गोष्ट आहे. बीएमएमतर्फे एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचं सादरीकरण केलं जातं. खूप मोठ्ठी गोष्ट आहे. परदेशस्थ मराठी माणसांना तिथे अनेक गोष्टी बघायला मिळत नसल्याने ते आपल्या भाषेतील कार्यक्रम पाहण्यास आसुसलेले असतात. मी ६९ सालापासून सुमन कल्याणपुर ताईंसोबत परदेशी गेलोय. त्यामुळे परदेश बघणं किंवा तिथे कार्यक्रमाचं सादरीकरण करणं हे काही वेगळं नाही. परदेश बघणं हा काही उद्देश नाही. पण तिथे जाऊन आपल्या मातीतल्या माणसांसाठी कला सादर करणं हे खूप आनंदाचं आहे. याआधी अनेक देशांची टुर झाली, तिथल्या प्रेक्षकांनी खूप प्रेमानं वागवलं. अक्षरशः आम्ही भारतात परत येताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू येतात हे पाहताना मन हेलावतं.

'सप्तसूर माझे' या कार्यक्रमात मुलाखतीच्या माध्यमातून माझ्या कार्याचा प्रवास उलगडत जाणार आहे. या कार्यक्रमासह तिथल्या गाण्यांच्या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणूनही काम करणार आहे. अनेकदा फॅन्स येऊन बोलतात, 'तुमची बोटं दाखवा.. इतकं हार्मोनियम कसं छान वाजवता?' असं विचारतात. या छोट्या गोष्टीच खूप काही देऊन जातात. खूप प्रेम आणि खूप आदर मिळतो यात काही वादच नाही.

झी मराठी सोबतचा माझा प्रवास हा दोन दशकांपेक्षा जास्त आहे. काळाचा यंदा तर मला जीवनगौरव पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आलंय. त्यामुळे आपल्या कार्याची पोचपावतीही एका कलाकाराला मिळते. याहून वेगळं काय हवंय?

**(शब्दांकन – प्रभा कुडके)**

ZEE मराठी



# मराठीची ओढ, गोडी नि धडपडही

**– संजय मोने**

**परदेशस्थ भारतीय जगात काय चाललं आहे याबाबत सजग असतात. मुळात एक गोष्ट तिथे प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे आपल्या भाषेतील साहित्यामध्ये काय नवीन येत आहे याबाबत ते सतर्क असतात.**

ZEE मराठी

**आ**पल्या भाषेतील कार्यक्रम परदेशस्थ भारतीय करतात तेव्हा उत्सुकता नक्कीच असते यात वादच नाही. मी याआधी सुद्धा बीएमएमने आयोजित केलेल्या कार्यक्रमांना हजर राहिलो होतो. त्यामुळे तिथे कशाप्रकारे अगदी पूर्वनियोजित कार्यक्रम आखले जातात याची मला कल्पना आहे. आपल्या मातीत आपले लाड होणं हे खूप स्वाभाविक आहे. परंतु परदेशी गेल्यावरही आपल्याला तोच अनुभव मिळणं हे खूपच सुखावह असतं.

मला एक प्रश्न कायम पडायचा, आपल्याकडे भारतामध्ये जशी भाषा बदलत जाते, विचार बदलत जातात, राहणीमान बदलत जाते, तसं तिथंही बदलतं का, बरं बदलतं? तर मग त्याची गतीसुद्धा आपल्यासारखीच असते का? पहिल्या वर्षी गेल्यानंतर खरंच हे जाणवलं की, हो, ही माणसं गतीबरोबर बदलत असतात. त्यांच्यापरीने त्यांना भाषेसाठी करता येईल तितकं नक्कीच करतात. अनेक कार्यक्रमांचं आयोजनही यांच्याकडून होत असतं. त्यामुळे हे सर्व पाहताना एक मराठी भाषिक असल्याचा आनंद नक्कीच होतो. सातासमुद्रापार आपण गेल्यावर आपल्या भाषेची ओढ, गोडी आणि ती टिकवण्याची धडपड दिसल्यावर सार्थ अभिमान वाटतो.


एक मात्र खंत नक्की वाटते, ती म्हणजे आपल्याकडे वाचनपरंपरा खूप समृद्ध आहे. परदेशात मात्र आपल्या भाषेसंदर्भात फार वाचायला मिळत नाही. जे काही नेटवर असेल तितकेच. त्यामुळं त्यांचं वाचन थोडं मागेच राहिलेलं असतं. अर्थात आपल्याकडेही जे वाचतात ते फार थोड्या प्रमाणात आहेत. परंतु परदेशस्थ भारतीय जगात काय चाललं आहे याबाबत सजग असतात. मुळात एक गोष्ट तिथे प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे आपल्या भाषेतील साहित्यामध्ये काय नवीन येत आहे याबाबत ते सतर्क असतात. महत्त्वाची आणि सुखावणारी गोष्ट म्हणजे आपल्या भाषेतला माणूस ओळखीचा नसेल तरी त्याच्याशी ओळख वाढवणं आणि त्याअनुषंगाने कार्यक्रम आखणं, आयोजित करणं हे करण्यात मराठी भाषिक अग्रेसर आहे. नाटकांच्या दौऱ्यांच्या निमित्ताने गेल्यावर वेळ कमीच मिळतो. पण जो मिळतो, त्यामध्ये आपल्या भाषेसंदर्भात असलेले यांचे प्रेम पाहून खूप आनंद होतो. सध्या सेल्फीच्या जमान्यात फोटोमुळे नटाची जबाबदारी मात्र नक्कीच कमी झालेली आहे. पूर्वी प्रेक्षक सह्या घ्यायचे. त्यामुळे नटाला साक्षर असणं आवश्यक होतं. पण आता तसं राहिलं नाही!

परदेशस्थ भारतीयांकडून त्यांच्यापरीने भाषा टिकण्यासाठी नक्कीच खूप चांगले प्रयत्न केले जातात. परंतु कधी कधी मात्र काही गोष्टींचं वाईटही वाटते. ते म्हणजे आपण खरंच आपल्या देशात राहून आपली भाषा टिकवण्याचा प्रयत्न करतोय का? आपल्याच देशात मातृभाषेची अवस्था बिकट आहे. मग आपण परदेशस्थ भारतीयांना तुम्ही मराठी बोला किंवा बोलू नका हे सांगू शकत नाही.

भाषा टिकण्यासाठी आपल्याकडे वाहिन्यांनी सुद्धा चांगली भूमिका निभावलेली आहे. आता अनेक वाहिन्या परदेशात दिसू लागल्या आहेत.

झी मराठीशी नातं अगदी पूर्वीपासून म्हणजेच अल्फा मराठी असल्यापासूनच आहे. 'आभाळमाया'पासून सुरु झालेला हा प्रवास आजतागायत 'कानाला खडा' या कार्यक्रमापर्यंत सुरू आहे. माध्यमांचा भाषेच्या बाबतीत नक्कीच खूप मोलाचा वाटा आहे असं मला कायम वाटतं.

**(शब्दांकन – प्रभा कुडके)**



# माणसांना जोडणारी भाषेची देणगी

**– मकरंद अनासपुरे**

**भाषेशी जुळवून घ्यायला आणि तिच्यातलं रांगडेपण शोधायला मला सुरुवातीपासूनच खूप आवडतं. माझी भाषाच मला या क्षेत्रात घेऊन आली आणि तिने मला उदरनिर्वाहाचं साधन मिळवून दिलेलं आहे. माझी बोली आणि लहेजा आजही अनेकांच्या आकर्षणाचा विषय आहे.**

ZEE मराठी

**प**रदेशी जाण्याची ओढ कुणाला नसते? आपल्याला काहीतरी वेगळं पाहायला आणि अनुभवायला मिळेल याच्या मी सतत शोधात असतो. ती संधी आता बीएमएमच्या माध्यमातून मला मिळालेली आहे. तिथल्या मराठी माणसाने आपली भाषा टिकावी म्हणून खरोखर खूप चांगल्या प्रकारे एक टीम तयार केलेली आहे. हे सर्व करताना या लोकांचा उत्साह पाहताना खूप अभिमान वाटतो. काही हजारो किलोमीटरच्या अंतरावर आपल्यासारखीच आपल्याला समजणारी भाषा कानावर आली तर आनंदच होतो. मुख्य म्हणजे आपली भाषा ही आपल्याला जोडून ठेवण्याचं कार्य करते. मग त्या अनुषंगाने अनेक गोष्टी ओघानं येतातच. भाषा टिकवण्यासाठी आणि जोपासण्यासाठी अनेक प्रयत्न परदेशी होताना बघून मन सुखावतं. आपल्या मातीतली माणसं दुसऱ्या मातीत येऊनही आपली संस्कृती जपताहेत, तिथं रुजवू पाहताहेत हे बघणं खूप भाग्याचंच आहे.

भाषा माणसांना जोडण्याचं एकमेव साधन आहे. जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही जा, तुम्हाला अनोळखी ठिकाणी सुद्धा संवादासाठी त्या त्या भाषेचा आश्रय घ्यावा लागतो. त्यामुळे भाषा म्हणजे मनुष्यप्राण्याला संवादासाठी महत्त्वाची देणगी आहे. आपल्याच महाराष्ट्रात भाषेचे किती प्रकार पाहायला ऐकायला मिळतात. मराठवाडा, विदर्भ, कोकण, घाट... प्रत्येक माणसाची भाषा मराठी असली तरी बोलण्याची पद्धत मात्र निराळी आहे. त्यामुळे भाषेशी जुळवून घ्यायला आणि तिच्यातलं रांगडेपण शोधायला मला सुरुवातीपासूनच खूप आवडतं. माझी भाषाच मला या क्षेत्रात घेऊन आली आणि तिने मला उदरनिर्वाहाचं साधन मिळवून दिलेलं आहे. माझी बोली आणि लहेजा आजही अनेकांच्या आकर्षणाचा विषय आहे.

'जगावेगळी' या मालिकेने मला खरी ओळख मिळवून दिली. झी मराठीवरील माझी ही मालिका अनेकांच्या पसंतीस उतरली. कलेच्या प्रांतात भाषेची महती खूप मोठी आहे. आपली मराठी भाषा सातासमुद्रापार पोहोचलेली आहे. आज हिंदी भाषिकही आपल्या भाषेची दखल घेत आहेत. अनेक मराठी सिनेमांना हिंदीमध्ये चांगली मान्यता मिळत आहे. त्यामुळे भाषा हा माणसांना जोडणारा दुवा आहे. फक्त ती अधिक चांगल्या पद्धतीने जोपासायला हवी असं मला वाटतं. आपल्या भाषेची गळचेपी आपण न करता तिला मानाचं स्थान देणं हे फक्त आपल्याच हातात आहे. जिथे गरज आहे तिथे मी इंग्रजी नक्कीच बोलतो परंतु जनमानसात मराठी बोलण्याची मला कधीच लाज वाटत नाही. माझी भाषा हे मला व्यक्त होण्याचं एक उत्तम साधन वाटतं. माणूस जर व्यक्तच झाला नाही तर तो संवाद कसा साधणार? त्यामुळे आपली भाषा जपा, तिचं संवर्धन करा. बीएमएमला जाताना खूप आनंद वाटतो, अल्फा मराठी ते झी मराठी हा नामांतरापर्यंतचा वाहिनीचा प्रवास खूप जवळून पाहिलाय. आज झी मराठी केवळ मालिकांपुरतीच मर्यादित न राहता चित्रपट, नाटक यासारख्या अनेक क्षेत्रात मार्गक्रमण करत आहे.

**(शब्दांकन – प्रभा कुडके)**



# वाहिन्या जोडताहेत मराठीची नाळ

**– ऋषिकेश जोशी**

**मराठी माणसाच्या रक्तात साहित्याची बीजं आहेत. त्यामुळे तो चार लोक एकत्र जमवून काहीना काही करणारच. नाटक, व्याख्यान, संगीत यावर काहीना काही तो कार्यक्रम करतोच. शिवाय माझ्या समुहासोबत जोडलं जाण्याचं साधन माझी भाषा आहे, म्हणून भाषा टिकवण्यासाठी धडपडही करताना तो दिसतो.**

**मी** पहिल्यांदाच बीएमएमसाठी जात असल्यामुळे आनंद, उत्साह नक्कीच आहे. परदेश दौरे अनेकदा झाले, पण बीएमएमसाठी जाण्याची ही पहिलीच वेळ... परदेशातील मराठी भाषिक हा मला कायम अभ्यासाचा विषय वाटतो. आपण भारतात असून भाषेबद्दल जितकं तळमळीने काम करत नाही ती तळमळ त्यांच्यात मला सर्वाधिक दिसते. भाषा टिकवणं, रुजवणं हे काम परदेशात उत्तमरीत्या होत आहे.

मराठी माणूस जगाच्या पाठीवर सर्व ठिकाणी विस्थापित झाला. इंग्लंड, अमेरिकेपासून विस्थापित होण्यास त्याने सुरुवात केली. पण संख्यात्मक बघायचं झालं तर अमेरिकेत मराठी माणूस जास्त स्थायिक आहे. अर्थात जगभरात सर्व ठिकाणीच आहेत. तिथे गेल्यानंतर कुठलाही विस्थापित झालेला माणूस आपली मूळ संस्कृती जपण्याचा अधिक प्रयत्न करतो. बाहेर गेल्यावर आपली मुळं अधिक घट्ट रोवली जातात. बाहेरच्या ठिकाणी गेल्यावर धर्म वेगळा असतो, माणसं वेगळी असतात, भाषा वेगळी असते. सगळ्याच गोष्टी वेगळ्या असतात. आणि त्या स्विकारल्याही जातात काळानुरुप. बाहेरच्या जगण्यामध्ये विसंगती जास्त असते. त्यामुळे आपलं मूळ कशात आहे याचा शोध घेण्याची ओढ अधिक घट्ट होते. कारण परदेशी गेल्यानंतर साधी गोष्ट पोटापासून सुरु होते. तिथे पदार्थ वगैरे बघितले की आपण भूतकाळात जातो. एरवी कधी मेतकुट भाताची आठवण होणार नाही. पण परदेशी गेल्यावर मात्र नक्की होऊ शकते. एरवी मेतकूटाकडे बघणार पण नाही. तिथे गेल्यावर त्याची आठवण जास्त होते. पोटापासून अनेक गोष्टींची सुरुवात होते.

मराठी माणूस कुठल्याही ठिकाणी विस्थापित झाल्यानंतर तो आपल्यासोबत काही गोष्टी घट्ट धरुन ठेवतो. त्या म्हणजे धर्म, देव, भाषा आणि खाद्यजीवन. म्हणून परदेशी मी अनेक ठिकाणी गेलो, तेव्हा असं पाहण्यात आलं की आपणही फार लिबरल आहोत. पण परदेशस्थ मराठी भाषिक मात्र भक्तीभावाने अनेक गोष्टी करतात. सण साजरे करतात. एकत्र येऊन एखादा उपक्रम राबवणं ही मराठी परंपराच आहे. त्यामुळे परदेशात गेल्यावर चार मराठी माणसं एकत्र येऊन काहीतरी करताहेत हे खूप सुखावणारं आहे.

मराठी माणसाच्या रक्तात साहित्याची बीजं आहेत. त्यामुळे तो चार लोक एकत्र जमवून काहीना काही करणारच. नाटक, व्याख्यान, संगीत यावर काहीना काही तो कार्यक्रम करतोच. हे सर्व करताना परदेशस्थ मराठी माणसाला मातृभाषेत मी काहीतरी करतोय याचा आनंद तर मिळतोच. शिवाय माझ्या समुहासोबत जोडलं जाण्याचं साधन माझी भाषा आहे, म्हणून भाषा टिकवण्यासाठी धडपडही करताना तो दिसतो. सिडनीसारख्या ठिकाणी आज मराठी शाळा आहेत. तिथल्या सरकारकडून मराठी भाषेचा वर्ग मान्य करुन घेतलेला आहे. आपली संस्कृती या मातीत कशी रुजेल याचा त्यांचा प्रयत्न आनंद देऊन जातो. सर्वच कार्यक्रम मनोभावे साग्रसंगीत साजरे होतात. भाषा टिकवण्याचा खरोखर चांगला प्रयत्न ते करत आहेतच. याबरोबरीने आपल्याकडील वाहिन्याही परदेशस्थ भारतीयांना मराठी भाषेशी जोडून ठेवत आहेत. झी सोबत अल्फा मराठी असल्यापासून मी संलग्न आहे. घडलंय बिघडलंयपासून ते अनेक कार्यक्रमांचं लिखाण करणं हे झीटीव्हीशी माझं जुळलेलं नातंच आहे.

ZEE मराठी

**(शब्दांकन – प्रभा कुडके)**



# आपलेपणाची ओढ

**– संकर्षण कऱ्हाडे**

**''काय रे संकर्षण, खवय्येमध्ये इतकं खाताना दिसतोस पण पोटावर तर काहीच दिसत नाही'' असं विचारणारी एखादी ताई दिसली की मन भरुन येतं. या सगळ्याला मी प्रसिद्धी कधीच मानत नाही. ही प्रसिद्धी नाहीय; ही आहे आपलेपणाची ओढ.**

**मी** आजवर अकरा देशांमध्ये नाटकाचे प्रयोग केलेत. या निमित्ताने एक गोष्ट मला जाणवली, ती म्हणजे तिथल्या लोकांना मराठी नाटकाला किंवा सिनेमाला जाणं म्हणजे एखादा सण साजरा करण्याइतकं महत्वाचं वाटतं. प्रत्येक दौऱ्याच्यावेळी मी पाहत आलोय की तिथं अनेक लोकं नाटकाला येताना आवर्जून आपल्या पारंपारिक पोषाखात येतात, बायका तर छान नटून, गजरे घालून नाटकाला येतात. मी 'आम्ही सारे खवय्ये' हा कार्यक्रम करतोय म्हटल्यावर माझ्यासाठी बेसनाचे लाडू, घरी केलेले खाण्याचे पदार्थ असं काही ना काही खायला घेऊन येतात. आमच्यासोबत काढलेले फोटो तिथं वर्षानुवर्ष लोकांच्या संग्रही राहतात. मला आठवतं २०१५ साली दिवाळीत मी आणि मकरंद अनासपुरे एका नाटकाच्या निमित्ताने ऑस्ट्रेलियाला गेलो होतो. ब्रिस्बेनचा प्रयोग आटपून आम्ही निघणार होतो. पाडव्याच्या दिवशी तिथल्या लोकांनी कणकेचे दिवे करुन आम्हाला ओवाळलं, आंघोळ घातली होती आणि नंतर आम्हाला निरोप दिला होता. इतका आपलेपणा तिथल्या प्रत्येक वेळी आम्हाला अनुभवायला मिळतो.

मला वाटतं आपण एखाद्या आवडत्या गोष्टीपासून जितकं लांब जाऊ तितकं आपण चुंबकासारखे त्याच्याकडे ओढले जातो. तसंच काहीसं तिथल्या लोकांचं होतं. लीना देवधरे या गेली तीस-चाळीस वर्ष कॅनडाला राहतात, त्यांच्या दोन्ही मुलींना त्यांनी शास्त्रीय नृत्याच्या क्लासेसला घातलं आहे. त्यांच्या मुली मराठी तर बोलतातच पण संस्कृतही शिकल्यात. आनंद ठकार यांच्याकडे कॅलगरीत आम्ही राहिलो होतो. मी त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा त्यांची पत्नी प्रणाली हिला सहावा महिना सुरु होता. प्रणाली आमच्यासाठी जेवण करायला गेली की मला फार अवघडल्यासारखं व्हायचं. म्हणून मी तिच्या मदतीसाठी किचनमधे जायचो. त्यावेळी माझ्या आईने शिकवलेला एक पदार्थ मी तिला करुन दाखवला होता. या सगळ्यामुळे आमचं एवढं घट्ट नातं झालं की तिची डिलीव्हरी झाली तेव्हा मध्यरात्री मला फोन आला की ''तू मामा झालास.'' म्हणायला गेलं तर या फार छोट्या पण आयुष्य समृद्ध करणाऱ्या गोष्टी आहेत.

हे जे प्रेम मला मिळतंय त्याचं श्रेय झी मराठीला आहे. झी मराठीच्या महाराष्ट्राचा सुपरस्टार या कार्यक्रमामुळे माझं नाव सगळीकडे पोचलं. गेल्या दहा वर्षात अभिनय लेखन, निवेदन, दिग्दर्शन अशा अनेक जबाबदाऱ्या मला यशस्वीरित्या सांभाळता आल्या, तेही झीच्या भक्कम पाठिंब्यामुळे. मी नेहमी म्हणतो माझं आणि झी मराठीचं नातं आता शब्दांच्या पलिकडे गेलंय.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन हे रियुनियन आहे असं मला वाटतं. कारण अन्न-वस्त्र-निवारा यासोबत मनोरंजन ही तिथं राहणाऱ्या लोकांची एक मुख्य गरज आहे. आपल्या देशापासून लांब राहत असताना चार लोकं एकत्र जमणं, आपल्या लोकांसोबत आपली भाषा बोलणं, मराठी ऐकणं, बोलणं ही एक पर्वणी असते. या सगळ्यापेक्षा मोठा फायदा आमचा असतो, तो म्हणजे आपल्या भेटीने, आपण सादर केलेल्या कलेमुळे तिथं राहणाऱ्या आपल्या माणसांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद. 'काय रे संकर्षण खवय्येमध्ये इतकं खाताना दिसतोस पण पोटावर तर काहीच दिसत नाही' असं विचारणारी एखादी ताई दिसली की मन भरुन येतं. या सगळ्याला मी प्रसिद्धी कधीच मानत नाही. ही प्रसिद्धी नाहीये; ही आहे आपलेपणाची ओढ. ही ओढच मला हवीहवीशी वाटत असते. त्या ओढीनेच पहिल्यांदा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनला जातोय...तिथं भेटूच.

**(शब्दांकन – विशाखा टिकले पंडित)**

ZEE मराठी



# संस्कृतीची जपणूक करणारं अधिवेशन

**– हेमांगी कवी**

**आपला समाज ज्या पद्धतीने विखुरला गेलाय त्याला एकत्र आणण्याचं काम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासारखे कार्यक्रम करतात. कामाच्या निमित्ताने भलेही आपण शरिराने लांब गेलो असलो तरी आपल्या आत जी मातीची ओढ आहे ती आपल्याला एकत्र आणतेच.**

**ZEE मराठी**

**बृ**हन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला जाण्याची ही माझी तिसरी वेळ आहे. जेव्हा मी पहिल्यांदा या अधिवेशनाला गेले होते तेव्हा तिथलं वातावरण हा माझ्यासाठी आश्चर्याचा सुखद धक्का होता. मला कल्पनाच नव्हती की एवढी मराठी माणसं तिथं जमतात आणि इतका छान कार्यक्रम करतात. अतिशय उत्साही लोक असं मी तिथल्या माणसांविषयी म्हणेन. तिथल्या आदरातिथ्याबद्दल काय बोलावं? एखादं घरचं माणूस लांबून आल्यावर आपण जसं त्याचं मायेने सगळं करतो तशी माया तिथल्या लोकांकडून मिळते.

तिथली आणखी एक गोष्ट मला विशेष करुन भावते ती म्हणजे तिथल्या कार्यक्रमांमध्ये घरातले सर्वजण सामिल होतात. मोठ्यांसोबत मुलंही उत्साहाने मदत करताना दिसतात. खरंतर तिथं जन्मलेल्या आणि वाढलेल्या मुलांचा घर वगळता मराठीशी फारसा संबंध येत नाही. तरीही ती मुलं सगळ्यात उत्साहाने मराठी कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असतात. त्यांची मित्रमंडळीही येतात. त्यामुळे इतर देशातल्या लोकांनाही आपली संस्कृती समजते. या कार्यक्रमांना येताना बाया नथ, गजरा, नऊवारी साडी नेसून येतात. आपल्या मराठी माणसांना आपल्या संस्कृतीविषयी, भाषेविषयी, परंपरांविषयी अतिशय प्रेम आहे. ते प्रेम जगाच्या पाठीवर कुठेही मराठी माणूस गेला तरी तो जपत असतो. महाराष्ट्रातल्या प्रत्येक प्रांतातल्या रितीभाती वेगळ्या आहेत, त्या सगळ्या जपण्याचा, एकत्र आणण्याचा प्रयत्न जसा इथं भारतात सुरु असतो तसा तो तिथही पहायला मिळतो.

अमेरिकेत एक मराठी शाळा आहे असं मला कळलं, तेव्हा माझा विश्वासच बसला नव्हता. इथं आपल्याकडे मराठी शाळा बंद पडत चालल्यात आणि तिथं अमेरिकेत मराठी शाळा आहे यावर विश्वास बसणं कठीण होतं.

आपला समाज ज्या पद्धतीने विखुरला गेलाय त्याला एकत्र आणण्याचं काम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासारखे कार्यक्रम करतात. कामाच्या निमित्ताने भलेही आपण शरिराने लांब गेलो असलो तरी आपल्या आत जी मातीची ओढ आहे ती आपल्याला एकत्र आणतेच.

आपले संस्कार, आपली भाषा यांना जपण्याचं काम अनेक स्तरांवर होत असतं. आपले सिनेमे, नाटक, मालिका यातूनही याची जपणूक होत असते. झी मराठी वाहिनीदेखील आपल्या कार्यक्रमांच्या माध्यमातून हा प्रयत्न करत असते.

झी मराठी आणि माझं घट्ट नातं आहे. एकीकडे ‘वादळवाट’ मालिकेतली गंभीर भूमिका तर दुसरीकडे ‘फू बाई फू’सारखा विनोदाचा प्लॅटफॉर्म मला मिळाला तो झी मराठीमुळे. मराठी भाषा आणि मराठी संस्कृती टिकवणारी, त्याचा प्रसार करणारी अशी अधिवेशनं हा एक अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमाचा भाग होण्याची संधी तिसऱ्यांदा मला मिळते आहे याचा मनापासून आनंद होतोय.

**(शब्दांकन – विशाखा टिकले पंडित)**



# आश्वासक चित्र

**– समीर चौघुले**

**मी सर्वांना सांगेन मुद्दाम वेळ काढून महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा एकदा पहा. त्यांचे विषय, त्याची मांडणी पाहिली की अचंबित व्हायला होतं. या पिढीच्या विचारांची खोली पाहिली की आनंद तर होतोच पण पुढचं चित्र आश्वासक वाटतं.**

२००९ साली मी पहिल्यांदा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला गेलो होतो. त्यावेळी 'दिवसा तू रात्री मी' नावाचं नाटक आणि अनेक नामवंत कलाकारांसोबतचा एक कार्यक्रम आम्ही सादर केला होता. गेल्या दहा वर्षात सोशल मिडीयाचा प्रभाव एवढा वाढलाय की कार्यक्रम प्रसारित झाल्या क्षणापासून लोक आम्हाला प्रतिक्रिया द्यायला सुरवात करतात. असे जगभरात अनेक मित्र मैत्रिणी सोशल मिडीयावर मला मिळालेत. त्यातल्या जवळपास पन्नास लोकांनी तरी मला सांगितलंय की डॅलसला येऊन आम्ही तुम्हाला नक्की भेटणार आहोत. आपला जवळचा माणूस अनेक वर्षं आपल्याला भेटलेला नसतो तेव्हा त्याला भेटण्याचा जो आनंद आपल्याला असतो तो आनंद या चाहत्यांना भेटल्यावर होतो.

एखादी मुलगी लग्न होऊन सासरी जाते तेव्हा माहेरुन आणलेली तुळस किंवा एखादा फोटो अतिशय प्रेमाने जपते, तसंच काहीसं चित्र परदेशात मला दिसतं. तिथल्या लोकांनी आपल्या संस्कारांना घट्ट पकडून ठेवलेलं दिसतं. तिथं बाकी सगळ्या सुविधा आहेत, पण संस्कारांची शिदोरी जी आपल्या संस्कृतीने त्यांना दिलीय ती ते खूप चांगल्या पद्धतीने जपताना दिसतात.

माझी बहिण, काही मित्रमैत्रिणी परदेशात राहतात. पण त्यांच्या मुलांना लहानपणापासूनच त्यांनी भाषेची गोडी लावलीय. इथून जाणाऱ्या नाटकांना, चित्रपटांच्या प्रिमियरला ते मुलांना आवर्जून नेतात. टीव्हीवर सातत्याने ते आपले कार्यक्रम पाहत असतातच त्यामुळे भाषा त्यांच्यापासून कधी दुरावण्याचा प्रश्नच येत नाही.

मूल कुठल्याही माध्यमात शिकत असलं तरी त्याला मातृभाषेची गोडी लावणं ही पालकांची जबाबदारी आहे. माझ्या मुलाला महिन्यातून किमान एकतरी मराठी नाटक पहायची मी सवय लावलीय. आता त्याला त्याची गोडी लागलीय. एकदा गोडी लागली की त्याची सवय होऊन जाते. तशी झी मराठी पहायची सवय मराठी माणसाला लागलीय. अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम झीवर सादर केले जातात, माझं आणि झी मराठीचं खूप जुनं नात आहे. 'फू बाई फू'सारख्या कार्यक्रमातून मी सगळीकडे ओळखला जाऊ लागलो. लोकांचं मनोरंजन करुन त्यांना घटकाभरासाठी का होईना पण ताणतणावापासून दूर ठेवणं हा टीव्हीचा मुख्य हेतू मानला जातो आणि तो पूर्ण करण्यात झी टीव्ही यशस्वी झालं आहे.

मराठी भाषा आणि संस्कृतीच्या प्रसारात टीव्हीप्रमाणे नाटकाचाही मोठा वाटा आहे. असं म्हटलं जायचं की पुल, अत्रे गेले आणि चांगल्या साहित्याची निर्मिती थांबली. पण असं नाही झालं. त्यानंतरही दर पिढ्यांमध्ये चांगली कामं करणारी माणसं येतच राहिली. एवढंच कशाला, मी सर्वांना सांगेन, मुद्दाम वेळ काढून महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा एकदा पहा. त्यांचे विषय, त्याची मांडणी पाहिली की अचंबित व्हायला होतं. या पिढीच्या विचारांची खोली पाहिली की आनंद तर होतोच, पण पुढचं चित्र आश्वासक वाटतं.

आज जगभर पसरलेल्या महाराष्ट्र मंडळांमुळे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. माणसं एकत्र आली पाहिजेत, काहीतरी नवनिर्मिती झाली पाहिजे त्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळासारखी अधिवेशनं ही काळाची गरज बनली आहेत.

**(शब्दांकन – विशाखा टिकले पंडित)**

ZEE मराठी



# भाषेचा वारसा जपायला हवा

**– विशाखा सुभेदार**

**मराठी भाषेची ताकद इतकी जबरदस्त आहे की इतर कुठल्या भाषेच्या आक्रमणाने ती कमकुवत होऊच शकत नाही. उलट साहित्य, मनोरंजन विश्व, मराठी भाषाप्रेमींनी केलेले कार्यक्रम अशा अनेक माध्यमातून ती वर्षानुवर्ष आपल्या सोबत राहणारच.**

**या** वर्षी मी पहिल्यांदा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला जातेय. त्यामुळे तिथल्या कार्यक्रमांविषयी खूप उत्सुकता आहे. यापूर्वी 'शांतेचं कार्ट चालू आहे' या नाटकाच्या निमित्ताने मी अमेरिकेत गेले होते. तिथल्या प्रयोगांची, तिथल्या माणसांच्या आपलेपणाची आठवण या दौऱ्यामुळे पुन्हा एखादा जागी झालीय. परदेशात जाऊन नाटक करणं हा एक वेगळाच अनुभव असतो. तिथं जाण्यापूर्वी अनेक गोष्टी मनात आल्या होत्या. एकतर आपल्याकडे नाटक सादर करण्यासाठी मदतीचे अनेक हात असतात. तिथं कोण असणार? नाटकाला लोक येतील पण इतर दिवशी त्यांच्या बिझी शेड्यूलमधून आपल्याला वेळ कसा देणार? दौरा संपेपर्यंत पाव खाऊनच रहावं लागणार की काय? पण तिथं गेल्यावर वेगळंच चित्र आपल्याला दिसतं. आमच्या दौऱ्याच्या वेळी दिवाळी होती. परदेशात असल्यामुळे इथल्या दिवाळीसारखी दिवाळी साजरी करता येणार नाही असं वाटत असतानाच अगदी फराळासकट साग्रसंगीत दिवाळी तिथेही आम्ही साजरी केली होती.

नाटकाच्या नेपथ्याची चिंता करावी तर आधीच अनेक जण मदतीला हजर असायचे. त्यांना फक्त काय आणि कसं हवं सांगितलं की ते त्यांच्या पद्धतीने सगळं उभारुन द्यायचे. इथून गेलेल्या मंडळींना कशाचीही कमतरता भासू न देण्याचा ते प्रयत्न करत असतात. खाण्यापिण्याच्या बाबतीत बोलायचं तर पाव राहिला लांबच, उलट रोज आपले मराठमोळे पदार्थ आम्हाला खायला मिळायचे.

सांस्कृतिक देवाणघेवाण आणि भाषेच्या संवर्धनासाठी अशी अधिवेशनं होणं गरजेचं आहे. यामुळे तिथल्या नव्या पिढीला आपल्या मराठमोळ्या संस्कृतीशी एकरुप होण्याची संधी मिळते. तिथलीच नव्हे तर इथली नवी पिढीदेखील इंग्रजी माध्यमात शिकल्यामुळे त्याचा प्रभाव त्यांच्या बोलण्यावर दिसतोच. कधी उच्चार चुकतात, कधी दुसऱ्या भाषेचा आधार घ्यावा लागतो, अशावेळी त्यांना प्रोत्साहन देणं गरजेचं आहे. टोकण्याने न्यूनगंड वाढतो आणि चुकण्यापेक्षा टाळलेलंच बरं असं वाटायला लागतं. बोलणं टाळल्यामुळे चुका तशाच राहतात, भाषा आणि आपल्यामधला दुरावा वाढत जातो. त्यापेक्षा आपल्या भाषेकडे वळणाऱ्या प्रत्येकाला प्रोत्साहित करणं ही आपली जबाबदारी आहे. भाषेची गोडी वाढण्यासाठी टीव्ही हा एक चांगला पर्याय ठरतोय. माझ्याबाबतीत बोलायचं तर झी मराठीवरच्या 'फू बाई फू' या कार्यक्रमामुळे खरंतर विशाखा सुभेदार हे नाव रसिकांपर्यंत पोहोचलं. झी मराठीला मी माझं माहेर म्हणते. माहेर म्हटलं की जसं खेळणं–बागडणं आठवतं तसंच झीच्या मंचावरचा माझा वावर मला आठवतो. तिथून मला एक वेगळी ओळख मिळाली.

मराठी भाषेची ताकद जबरदस्त आहे. इतर कुठल्या भाषेच्या आक्रमणाने ती कमकुवत होऊच शकत नाही. उलट साहित्य, मनोरंजन विश्व, मराठी भाषा प्रेमींनी केलेले कार्यक्रम अशा अनेक माध्यमातून ती वर्षानुवर्ष आपल्या सोबत राहणारच. आज माहितीचा, वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा इतका भडिमार होतोय तरीही लहानपणी ऐकलेली बडबड गीतं, बोधपर गोष्टी, शिवरायांचा इतिहास, आपल्या परंपरा यांना आपल्या हृदयात आपण जपलंय ना, तोच संपन्न वारसा जोपासण्याची आणि नव्या पिढीकडे सोपवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. आपण ती निश्चितच पार पाडू असा मला विश्वास आहे.

**(शब्दांकन – विशाखा टिकले पंडित)**



# अमेरिकेतूनही जरा 'हवा येऊ द्या!'

**– डॉ. निलेश साबळे**

**काही पालकांनी आम्हाला सांगितलं की त्यांची मुलं घराबाहेर आणि घरातही इंग्रजी बोलतात. त्यांना मराठीची गोडी लागावी म्हणून त्यांनी 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रम घरात लावायला सुरुवात केली.**

'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाच्या परदेशदौऱ्याच्या निमित्ताने आम्ही जवळपास दहा-अकरा देश फिरलो. दुबईतला एक किस्सा मला सांगावासा वाटतो. तिथे एका थिएटरमध्ये आमचा कार्यक्रम होणार होता. सगळे पासेस विकले गेले होते, थिएटरच्या बाहेर प्रवेशासाठी इतकी गर्दी झाली, की थेट रस्त्यापर्यंत गेली होती. त्या रांगेत लोक जल्लोष करत होते. तिथल्या पोलिसांना कळत नव्हतं हे नेमकं काय चाललंय. हे लोक गोंधळ घालतायत की कसलं आंदोलन सुरू आहे! रांग वाढत चाललेली पाहून पोलिसांची गाडी तिथं आली आणि त्यांनी चौकशी केली. जेव्हा त्यांना कळलं की भारतातून आलेल्या एका कार्यक्रमासाठी एवढी सगळी मंडळी जमलीत तेव्हा त्यांचा विश्वासच बसेना. शेवटी त्यांनी तिथल्या झी टीव्हीच्या ऑफिसला फोन करून खातरजमा केली. कार्यक्रम संपेपर्यंत मात्र त्यांचा बाहेर पहारा होता. त्यांना कार्यक्रमाबद्दल उत्सुकता होती, काही पोलिस तर कार्यक्रम बघायलाही आले होते, की असा काय कार्यक्रम आहे ज्याच्यासाठी एवढी गर्दी झाली.

आमचे जिथं जिथं कार्यक्रम झाले तिथं तिथं लोक आपल्या पारंपरिक वेशात जायचे. रांगोळ्या काढल्या जायच्या. तिथली त्यांची विदेशी मित्रमंडळीही आवर्जून आमचे कार्यक्रम पाहायला यायची, तीसुद्धा भारतीय पोषाखात. तिथल्या लोकांचं प्रेम हा एक सुखद अनुभव होता.

इथून परदेशात गेलेली पिढी आपली संस्कृती उत्तमप्रकारे जपण्याचा प्रयत्न करतेय. पुढच्या पिढीला हे संस्कारांचं देणं सोपवण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशानासारखे कार्यक्रम होणं आवश्यक आहे. या नव्या पिढीला भाषेची आवड निर्माण होण्यासाठी पालक प्रयत्न करताना दिसतात. काही पालकांनी आम्हाला सांगितलं, की त्यांची मुलं घराबाहेर आणि घरातही इंग्रजी बोलतात. त्यांना मराठीची गोडी लागावी म्हणून त्यांनी 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रम घरात लावायला सुरुवात केली. मुलांना कार्यक्रम आवडायला लागला आणि मराठी शब्द कानावर पडायला लागले. हे ऐकून आम्हाला अतिशय आनंद झाला.

काही वेळा आपण अशी ओरड ऐकतो, की टीव्ही, मोबाइल याच्या वेडापायी वाचनसंस्कृती संपत चाललीय, मासिकं कोण विकत घेणार, इंग्रजीमुळे मराठी भाषेकडे दुर्लक्ष होणार. या गोष्टींवर माझा मुळीच विश्वास नाही. तुम्ही काहीतरी चांगलं देण्याचा प्रयत्न केलात तर लोक त्याला प्रतिसाद देतातच. याबाबतीत 'झी मराठी'च्या काही उपक्रमांचं मी उदाहरण देईन. बालनाट्य संपत चाललंय असा सूर असतानादेखील त्यांनी 'अलबत्या गलबत्या' आणलं, ॲनिमेशनचं वेड बालजगतात असूनही ही स्टेजवरची चेटकीण लोकप्रिय ठरतेय. हाऊसफुलच्या पाट्या झळकताहेत. तसंच हे सगळीकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळांचं प्रस्थ वाढत चाललंय, मग मुलं मराठी वाचणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात असताना 'खाली डोकं वर पाय' हा सुट्टी विशेषांक घराघरात पोचतोय.

आता बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन होतंय. या कार्यक्रमाला मी शुभेच्छा देतो, माझी अशी इच्छा आहे की परदेशातल्या मराठी मुलांमधली कला फक्त तिकडच्या कार्यक्रमांपुरती मर्यादित राहता कामा नये. त्यांना घेऊन आपण एखादा सिनेमा किंवा नाटक केलं पाहिजे. भाषेची संपन्नता जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्याचा एक कलाकार म्हणून मी नेहमीच प्रयत्न करत असतो.

**शब्दांकन –विशाखा टिकले पंडित**

ZEE मराठी

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या डॅलस येथील**
**अधिवेशनानिमित्त रसिकांना**
**हार्दिक शुभेच्छा**

# EXCEL INDUSTRIES LIMITED

184/87, SWAMI VIVEKANAND ROAD,
JOGESHWARI (W), MUMBAI-400 102
TEL. : 6646 4200 / 2678 8258
CIN NO. L24200MH1960PLC011807

# मुसाफिर हूँ यारों...

काही व्यक्तींविषयी आपण सतत ऐकत, वाचत, बघत असतो. त्यांच्याशी आपला परिचय व्हावा, असं वाटत असतं. अनेकदा आवडीनिवडीचे अनेक समान धागेही असतात. पण बहुधा तो योग यावा लागत असावा. असा योग 'ग्रंथाली'तर्फे प्रकाशित होणाऱ्या 'साद हिमालयाची' या पुस्तकाच्या निमित्तानं जुळून आला. ज्येष्ठ गिर्यारोहक आणि साहित्यिक **वसंत वसंत लिमये** यांच्याशी प्रसिद्ध अभिनेत्री–दिग्द–र्शिका–लेखिका **मृणाल कुलकर्णी** आणि 'ग्रंथाली'चे **धनंजय गांगल** यांनी साधलेला सुसंवाद.

**'प्रसिद्ध लेखका'आधी वसंत वसंत लिमये हे 'गिर्यारोहक' म्हणून प्रसिद्ध होते. डोंगर–पर्वतांची ओढ नेमकी कधी, कशी, कुठे निर्माण झाली?**

– गोनीदा अर्थात गो. नी. दांडेकर (मृणाल यांचे आजोबा) यांचं बहुतांशी साहित्य मी अधाशा–सारखं वाचलं होतं. गिर्यारोहणाचा श्रीगणेशा करताना बाबासाहेब पुरंदरे किंवा अप्पा (गोनीदा) हे आकर्षणाचे मुद्दे होते. माझ्या संदर्भात गिर्यारोहण ही गोष्ट थोडी अपघातानं सुरू झाली. मुळात शाळेत असताना मी फारसा मैदानी खेळ खेळणारा नव्हतो. रूईया महाविद्यालयात हायकिंग क्लब होता. त्यांच्याबद्दल उगाच एक कुतुहल वाटू लागलं होतं. चेहऱ्यावर एक मस्ती असणाऱ्या या मुलांविषयी चौकशी केल्यावर ते हायकर्स असल्याचं कळलं. १९७१च्या अखेरीस पहिल्यांदा हाईकला म्हणून त्यांच्यासोबत गेलो. गिर्यारोहणाच्या डोंगरी ढेकणानं आणखी एकाला कडकडून चावा घेतला होता. एका नव्या मनस्वितेची सुरुवात झाली होती. त्या काळात गिर्यारोहण, इतिहासाशी संबंधित पुस्तकांचं वाचन खूपच झालं. शाळेत इतिहास–भूगोल हे तसे नावडते विषय होते. मात्र डोंगरात भटकायला लागल्यानंतर इतिहास–भूगोल एकत्र येतात. मग ते अतिशय इंटरेस्टिंग वाटायला लागतात; हे त्या काळात उमगलं.

**तुम्ही वडिलांचेच नाव घेतलेत. मराठीत तरी असे नाव दिसत नाही. पण या दोन्ही 'वसंता'त साम्य काय? आणि फरक काय?**

– माझे वडील वसंत लिमये हे करिअरच्या चौकटीत फारसे अडकले नाहीत. ते कम्युनिस्ट विचारसरणीचे होते. १९४२ च्या चळवळीत सहभागी झाले होते. ठाण्यात पहिले कोचिंग क्लास त्यांनी सुरू केले. मात्र परीक्षा, अभ्यासक्रमासाठी ठराविकच मुद्दे शिकवायचे नाहीत. तर अनेक पूरक बाबींचा त्यात समावेश असायचा. इंग्रजी साहित्याचे वेळोवेळी त्यांनी दिलेले संदर्भ आणि पडद्याआड उभा राहून ते ऐकणारा मी, हे दृश्य आजही डोळ्यांसमोर येतं. आमच्या क्लासची दरवर्षी ट्रिप काढायचे. यातूनच भटकणं, सायकलिंग, फोटोग्राफीचा छंद आदी गोष्टी कळत–नकळत अनुभवास आल्या. त्या गोष्टींचे त्या अर्थानं संस्कार झाले. आमच्या तीन खोल्यांच्या छोटेखानी घरातल्या पुढल्या खोलीत क्लास चालायचे. मधल्या खोलीत जागा करून बाबांनी डार्करुम तयार केली होती. रात्ररात्र त्यांच्या–सोबत फोटो प्रिंटिंगला बसायचो. हे सगळं कुठंतरी



डोक्यात मुरत गेलं असावं. पुढं उगाच स्वतःची कॉलर टाईट करून घ्यायला लागलो की, बाबांना ट्रेकिंगची आवड मी लावली! त्यांनी बऱ्याच उशीरा म्हणजे जवळपास सत्तरीच्या घरात कैलासमानसरोवर यात्रा केली. आपल्याला आवडते ती गोष्ट बिनधास्तपणं करायची, यासाठी माझ्यासमोर बाबांचंच उदाहरण होतं. ते क्लास चालवत होते. दुसरीकडं त्यांना रशियन भाषा शिकवायला मुंबईहून शिक्षक यायचे. त्याच्यावर अवलंबून न राहता त्यांनी स्वतः अभ्यास करून दोन परीक्षा दिल्या. त्यांना मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीची शिष्यवृत्ती मिळाली. पुढं ते रशियाला जाऊन आले. एकदा निर्णय घेतल्यावर ते त्या त्या कामात स्वतःला झोकून द्यायचे. आता विचार करताना जाणवतं की त्यांची ही वृत्ती माझ्या अंगीही आहे. त्यामुळं बऱ्याच गोष्टी घडल्या. रूईया किंवा आयआयटीमध्ये जाईपर्यंत माझे बरेचसे निर्णय मला 'काय नको' यावर आधारलेले होते. आयआयटीतून बाहेर पडत असताना मला 'काय हवं', यावर माझे निर्णय आधारलेले होते. गिर्यारोहणाला आपलं म्हणताना फार विचार केला नव्हता. तो वृत्तीचा एक भाग होता. कष्ट करायची, मेहनतीची तयारी होती. काही अंशी तो नशीबाचा भाग होता किंवा काही वेळा योग्य संधी त्या त्या वेळी मिळायला लागतात, त्या मिळत गेल्या.

**ट्रेकिंगमुळं निर्णयक्षमता वाढीस लागते का? जबाबदारीचं भान येतं?**

– मला ट्रेकिंगचं उदाहरण द्यायला आवडेल. एखादा पावसाळी ट्रेक. ढग उतरून आलेले असतात. डोळ्याला ढोरवाटा, मुख्य पाऊलवाटा, पुसटलेल्या वाटा दिसतात. कोणत्या वाटेनं जावं, असा संभ्रम निर्माण होतो. अनिश्चितता वाटते. कितीही अंधारलेलं असलं तरी दिशा पक्की असल्यावर ती वाट निवडायची हे डोक्यात पक्कं ठरवलेलं. अगदी वाईटात वाईट काय होईल की पुन्हा माघारी येऊन दुसरी वाट निवडावी लागेल. हे करायची तयारी असल्यास बऱ्याच गोष्टी घडतात. बरेच पर्याय असल्यावर ठाम निर्णय घेता न आल्यानं सगळंच ठप्प होतं. आयआयटीचा एक ट्रेक होता. कमळगडावर १६ जणांचा ग्रुप गेला होता. रात्रीच्या चिकनच्या बेतासाठी बांधावर कोंबड्या बांधून ठेवल्या होत्या. आम्ही गावकऱ्याशी बोलत होतो. तेवढ्यात त्यांनी सुटका करून घेतली नि त्या उधळल्या. त्यांना पकडायला आम्ही धावलो. कॉ–लेजच्या त्या दिवसांतलं बजेट फार टाईट असायचं. गावकऱ्याला म्हटलं, 'मदत करा जरा.' तो म्हणाला, 'नाही. आता त्या तुमच्या आहेत.' बरीच धावपळ करून आम्ही वर गेलो. तर आधी पोहचलेले ग्रुप भलतीकडं पांगले होते. दुपारचं जेवण लांबलं होतं. म्हणून वाटेतच थांबून खिचडी करायचा निर्णय घेतला. दिशा माहिती होती, त्या रोखानं खिंड शोधायला दोघांना पाठवलं. खिंड सापडल्याचा इशारा आला. मंडळी मुक्कामी पोहचली. आजच्या मुलांना आधुनिक साधनांमुळं बरंच काही आधीच वाचायला–पाहायला मिळू शकतं. माहिती काढता येते. पर्याय वाढले की दिशानिश्चितीत थोडा संभ्रम वाटतो. अशा वेळी 'आतला आवाज' लक्षपूर्वक ऐकणं आणि आपल्या ध्येयाच्या रोखानं वाटचाल करणं हे केव्हाही चांगलं.

**सह्याद्री आणि हिमालय यांच्यात बर्फीपेक्षा वेगळा फरक काय?**

– एका अर्थानं सह्याद्री प्रेमळ आहे. तिथं काहीही आचरटपणा करायला वाव असतो. हिमालयात तो वाव नसतो. भान ठेवायला लागतं. पण स्केल–चा हिमालयातला अँडव्हाटेंज फार अचाट आहे. त्या स्केलमुळं तो आवडतो. परंतु सर्वाधिक काळ जाणं झालं ते अर्थातच सह्याद्रीत. आयआयटीमध्ये असताना दर वीकएण्डला मी बाहेर असायचो. कधी दोन डोंगरही व्हायचे. मी आयआयटीबाहेर पडेपर्यंत पाच वर्षं माझा रेकॉर्ड कुणी तोडला नव्हता. पुढं एका पीएचडीच्या विद्यार्थ्यानं तो तोडला. कारण तो आठ वर्षं आयआयटीत होता. हिमालयात जाणं सहजसाध्य नसल्यानं तिथं जाणं त्यावेळी कमी झालं.

**'कुण्या प्रेयसीकडं पाहावं, तसा गिर्यारोहक शिखराकडं बघतो. शिखर आणि गिर्यारोहकात एक प्रकारचा रोमान्स सतत चालू असतो,' असं एका लेखात तुम्ही लिहिलं आहे...**

– डोंगरांकडं पाहात असताना काहीतरी वाटतं, हे खरं. हिमालयातल्या शिखराकडं ते सर करण्याचा पहिलाच प्रयत्न असताना–पाहताना सुरुवातीच्या काळात जाणवायचं की, आयला, हे शिखर. आता ते कुठून सर करूया? त्यासाठीचे पर्याय चाचपडत




**डोंगरांकडं पाहात असताना काहीतरी वाटतं, हे खरं. हिमालयातल्या शिखराकडं ते सर करण्याचा पहिलाच प्रयत्न असताना–पाहताना सुरुवातीच्या काळात जाणवायचं की, आयला, हे शिखर. आता ते कुठून सर करूया? त्यासाठीचे पर्याय चाचपडत राहणं, तोच विचार डोक्यात घोळवत राहणं आणि प्रत्यक्ष मोहिमेमध्ये ते शिखर सर करणं यात जाम मजा असायची.**






**योगायोगानं आयआयटीमधला मित्र राजा देशपांडे घरी आला होता. त्याला म्हटलं की, 'हे आयआयटीचं प्रमाणपत्र भिंतीवर फ्रेम करून लावायचं, दुसरं आत्ता फाडून टाकलंस तरी चालेल कारण तो माझ्या आवडीचा विषय आहे.' हिमालयाचं पहिलं दर्शन झाल्यावर 'आऽऽह' वाटलं आणि मुख्य म्हणजे या क्षेत्रात आपल्याला काहीतरी करता येईल, हे जाणवायला लागलं होतं. हे जाणवणं पुढं प्रत्यक्षात उतरलंही.**



राहणं, तोच विचार डोक्यात घोळवत राहणं आणि प्रत्यक्ष मोहिमेमध्ये ते शिखर सर करणं यात जाम मजा असायची. अनेकदा गिर्यारोहकाला पुन्हापुन्हा शिखर सर करायला का जाता, हे हमखास विचारलं जातं. मान्यवर गिर्यारोहक मॅलरी याचं प्रसिद्ध वाक्य आहे की 'बिकॉज ही इज देअर!' हा प्रवास फार एक्सायटिंग असतो. डोंगरात भटकायला लागलो, तेव्हा हे जाणवायला लागलं. हळूहळू भटकंती हा अंगीभूत भाग झाला माझा. या गोष्टी आवडत गेल्या आणि रोमान्स बहरत गेला.

**आयआयटी आणि नंतरचे काही दिवस...**

– तेव्हा मी फार उनाड विद्यार्थी होतो. तिथं आजूबाजूला समवयस्क मंडळी होती. अभ्यासा– इतकाच बाकीच्या ॲक्टिव्हिटीजना प्रचंड वाव होता. या सगळ्या गोष्टींमुळं जणू मी उधळलोच. गिर्यारोहणाच्याबाबतीत हे मंतरलेले दिवस संपले आणि नोकरी लागली. गिर्यारोहणासाठी दोन सीझन असतात. प्री–मान्सून म्हणजे मे–जूनचा काळ आणि पोस्ट– मान्सून म्हणजे सप्टेंबर–ऑक्टोबरचा काळ. तेव्हा डोक्यात पक्कं होतं की वर्षात दोन एक्सपिडिशन झाल्याच पाहिजेत. सुट्टी मिळवणं हे अवघड काम असायचं. एका एक्सपिडिशनला सुट्टी मिळायची, दुसऱ्यासाठी सुट्टी मागायला जाण्याची शक्यता शून्यच असायची. मग त्यांनी आपल्याला काढण्याऐवजी दुसरी नोकरी पकडायची. अशा पाच–सहा वर्षांत पाच–सहा नोकऱ्या झाल्या. नोकरी पोटापाण्याचं साधन होतं आणि मोहिमा हा ध्यास होता.

**पहिली हिमालय मोहीम अजून आठवते?**

– १९७६ मध्ये पहिल्यांदा हिमालयात गेलो. आयआयटीतल्या वंडरिंग क्लबकडून ही मोहीम आखली गेली. आमचेच २६ जण असल्यानं स्पेशल बेसिक कोर्स अरेंज केला होता. त्या मोहिमेची आखणी वगैरेही आमच्याच गळ्यात येऊन पडली. हवामानाचा फरक होता आणि मुख्य म्हणजे स्केल. त्या उंचीची सुरुवातीला वाटलेली भीती किंवा हुरहुर आणि प्रत्यक्षात चढाई करायला लागल्यानंतर त्यातलं थ्रील अनुभवलं. तेव्हा शितिधर आणि फ्रेण्डशिप ही दोन शिखरं सर केली. त्यावेळी लक्षात आलं की, आपल्याकडं स्टॅमिना आहे. बेसिक कोर्समध्ये काही गमतीही झाल्या. मी त्या मोहिमेचा समन्वयक होतो. तिथल्या सरांशी माझा काही वाद झाला. मला बी ग्रेड दिली गेली. खरी ए ग्रेड मिळायला हवी होती. ॲडव्हान्स कोर्ससाठी ए ग्रेड हवी असते, तरच प्रवेश मिळतो. मी उत्तरकाशीतल्या नेहरू माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटमधल्या कोर्ससाठी अर्ज केला. मला माहिती होतं की प्रवेश मिळणार नाही. त्यामुळं मी ग्रेडच कळवली नाही. तिथं गेल्यावर पहिल्या दोन–चार दिवसांत ग्रेडवरून हेटाळणी झाली होती. रॉक क्लाइंबिंग करायला लागल्यावर सगळ्यांची बोलती बंद झाली. मग ए ग्रेड मिळाली. पुढं स्कॉटलंडला जाऊन टीचर्स डिप्लोमा इन आऊटडोअर एज्युकेशन ट्रेनिंग घेतलं. १९८३ मध्ये या अभ्यासक्रमाचं प्रमाणपत्र आणि आयआयटीचं उशीरानं आलेलं प्रमाणपत्र पोस्टानं पाठोपाठ आली. योगायोगानं आयआयटीमधला मित्र राजा देशपांडे घरी आला होता. त्याला म्हटलं की, 'हे आयआयटीचं प्रमाणपत्र भिंतीवर फ्रेम करून लावायचं, दुसरं आत्ता फाडून टाकलंस तरी चालेल कारण तो माझ्या आवडीचा विषय आहे.' हिमालयाचं पहिलं दर्शन झाल्यावर 'आऽऽह' वाटलं आणि मुख्य म्हणजे या क्षेत्रात आपल्याला काहीतरी करता येईल, हे जाणवायला लागलं होतं. हे जाणवणं पुढं प्रत्यक्षात उतरलंही.

**आपल्यापेक्षा काय वेगळं असतं ब्रिटनमधलं आणि आल्प्सवरचं गिर्यारोहण?**

– त्या अभ्यासक्रमामुळं ब्रिटनमध्ये गिर्यारोहण करता आलं. त्यानंतर युरोपातल्या भटकंती दरम्यान आल्प्सवर चढाईची संधी मिळाली. आल्प्सवर जास्ती टेक्निकल क्लाइंबिंग आहे. सहजपणं करता येतं. कारण ते डोंगर एकदम बुटके आहेत. इन्फ्रास्टक्चर चांगलं आहे. रस्ते अगदी सहजपणं डोंगराच्या पायथ्यापर्यंत पोहचतात. चांगलं क्लाइंबिंग तिथं सहजपणे करता येतं. हिमालयात उंची महत्त्वाची ठरते. रस्ता सोपा असला तरी ती उंची गाठायची असते. तांत्रिकदृष्ट्या अवघड असणाऱ्या चढाया हिमालयातही झालेल्या आहेत. पण त्यांचं प्रमाण खूप कमी आहे.

**परदेशी गिर्यारोहकांना हिमालयातल्या गिर्यारोहणाची गोडी तुम्ही कशी लावली?**

– स्कॉटलंडमधल्या 'हाय प्लेसेस'

कंपनीमार्फत काम करायला लागलो. तिथं सहभागी झालेल्या लोकांना हिमालयाची सैर घडवून आणण्याची जबाबदारी पार पाडली. तेव्हा माझ्याकडं हिमालयातला अनुभव होता. मोहिमा झालेल्या होत्या. ब्रिटनमधल्या अभ्यासक्रमामुळं पाश्चिमात्य गिर्यारोहकांच्या आवडीनिवडींची जाणीव होती. त्यामुळं या सगळ्या गोष्टींची चांगली सांगड घालता आली. उदाहरणार्थ- गढवालमधलं हॉटेल किती किंमतीचं आहे, सजावट वगैरेंशी त्यांना कर्तव्य नसतं. तर स्वच्छता अधिक गरजेची असते. हाय प्लेसेसच्या उद्योगातला महत्त्वाचा भाग हॉस्पिटॅलिटी बिझनेस इन माऊंटन्स हा होता. डोंगर-दऱ्यांमधल्या वास्तव्यात लोकांच्या आवडी-निवडी ओळखून त्यांना चांगली सेवा देता येणं आवश्यक होतं. हे ध्येय आम्ही साधलं.

**पॅशनमुळं कमावलेल्या अनुभवांच्या श्रीमंतीविषयी काय सांगाल?**

– चौकसपणा आणि माणसांबद्दल जाणून घ्यायचं कुतुहल, हा माझ्या स्वभावाचा भाग आहे. जगभरात कुठंही गेलो तरी या गुणांमुळं चार ओळखी वाढताततच. त्यात मजा येते. आपण भटकंतीच्या निमित्तानं थोड्या काळासाठी गेलेलो असतो. त्यांच्यासारखं, त्यांच्याबरोबरीनं जगायचा वेगळा अनुभव घ्यायला नेहमीच आवडतं. हिमयात्रे-दरम्यान सचिन खेडेकर, सुनील बर्वे आणि मी मुक्तीनाथला गेलो होतो. देवळाच्या वाटेवर असताना देवळात खूप गर्दी आणि गजबजाट असेल म्हणून थोडं लांब राहायचा निर्णय घेतला. तिथं एक तीन-चार खोल्यांचं नेपाळी जोडप्याचं हॉटेल होतं. आम्ही चौकशी करून राहायला येतो सांगितलं. मुक्तीनाथ करून खाली परतलो. जेवण आम्ही करणार, असं सांगून तिला आणि तिच्या नवऱ्याला जेवायला बोल-ावलं. कांदा-बटाट्याचा रस्सा (केबीआर- सचिनचा शब्द), पुऱ्या, आमरस असा बेत होता. ती फार कुतुहल आणि उत्साहानं बघत होती. तिनं बहुधा आयुष्यात पहिल्यांदा आंबा खाल्ला असेल. ते क्षण आम्ही खऱ्या अर्थानं जगलो...

माझ्या पूर्वीच्या मोहिमांमध्ये (१९७८-८९) स्वयंपाकी म्हणून आलेला तेजसिंग राणा आज ७१ वर्षांचा आहे. तो सात किलोमीटरवरच्या खेड्यातून मला भेटायला आला. तसा निरोप त्यानं ठेवला होता. गंगोत्रीला जाऊन परत आल्यावर तो भेटला. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंदच सगळं काही बोलत होता. त्यानं मिठी मारल्यावर बरगडी मोडते की काय असं वाटलं होतं क्षणभर! अफाट प्रेम. जुने फोटो बघताना आठवणींना उजाळा दिला गेला. अशी प्रेमानं – आपुलकीनं माणसं भेटणं ही गोष्ट शहरांत दुर्मीळ झाली आहे. हे निर्व्याजपण, तो ओलावा हा मला तरी डोंगरातच अधिकांशी अनुभवायला मिळाला आहे.

**रुटस्, हाय प्लेसेस आणि गरुडमाचीबद्दल...**

– आयआयटीतून बाहेर पडल्यावर मुख्यत्वे ठाणे-डोंबिवलीतल्या मंडळींचा ग्रुप होता. आपल्याला डोंगरात जाऊन बरंच काही मिळतं, आनंद मिळतो, ही जाणीव शाळकरी मुलांनाही द्यायला काय हरकत आहे? म्हणून ८ ते १४ वयोगटातल्या मुलांसाठी साहस शिबिरं भरवायला सुरुवात केली. १९७८ मध्ये सुरू केलेल्या या उपक्रमाला पहिल्याच वर्षामध्ये विविध अडचणींवर मात करून विविध कॅम्पमध्ये जवळपास हजारांहून अधिक मुलं आली. त्यामुळं या क्षेत्रात काहीतरी करता येईल असा विचार डोक्यात आला. मनातल्या कल्पनारम्य गोष्टी लगेचच प्रत्यक्षात आणायचे दिवस होते. मग स्कॉटलंडम धला अभ्यासक्रम शिकून आलो. 'रुट' म्हणजे रानफूल ऑर्गनायझेशन फॉर आऊटडोअर ट्रेनिंग अँण्ड स्टडीज हे उभं राहिलं. नलेश पाटील यांनी त्याचा लोगो डिझाईन केला होता. काहीतरी करायचं झपाटलेपण आहे हे दिसल्यावर खूप मंडळी आपल्या पाठीशी उभी राहतात, असा आजवरचा अनुभव आहे. 'आऊटडोअर एज्युकेशन' ही संकल्पनाच आपल्याकडं नवीन होती. या ॲक्टिव्हिटीज एक्स्ट्रा करिक्युलर समजल्या जातात. तर पाश्चिमात्य देशांत त्या को करिक्युलर ॲक्टिव्हिटीज समजल्या जातात. पूरक समजल्या जातात. त्या अनुषंगानं केलेला तेव्हाचा प्रयत्न होता.

'हाय प्लेसेस' हा व्यावसायिक उद्योग आहे. प्रोफेशनल मॅनेजमेंट प्रोग्रॅम कंडक्ट करणारा भारतातला हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग १९८९ मध्ये आम्ही केला. त्याला जवळपास ३० वर्षं होत आली आहेत. एका वर्षात दोन-तीन प्रोग्रॅम अशी सुरुवात करून आज वर्षात सातशे-साडेसातशे प्रोग्रॅम होतात. सुरुवातीला त्यासाठी सेंटर वगैरे




**'हाय प्लेसेस' हा व्यावसायिक उद्योग आहे. प्रोफेशनल मॅनेजमेंट प्रोग्रॅम कंडक्ट करणारा भारतातला हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग १९८९ मध्ये आम्ही केला. त्याला जवळपास ३० वर्षं होत आली आहेत. एका वर्षात दोन-तीन प्रोग्रॅम अशी सुरुवात करून आज वर्षात सातशे-साडेसातशे प्रोग्रॅम होतात.**






**साहसाचा अनुभव मॅनेजमेंट ट्रेनिंगसाठी वापरला जातो. त्याचं एक स्वरुप आपल्या आर्मीतही वापरलं जातं. विशेषतः भरती प्रक्रियेत या मुद्यांचा विचार केला जातो. टीमवर्क, लीडरशिप वगैरे गुण पडताळले जातात. आऊटडोअर असेसमेंट प्रोग्रॅममध्ये हेच माध्यम त्या त्या सदस्यांच्या विकासासाठी वापरलं जातं.**



काही नव्हतं. कधी एमटीडीसीची जागा, कधी रिसॉर्ट वगैरे भाड्यानं घेत होतो. प्रशिक्षार्थींची संख्या वाढत गेली तशी जागेची मर्यादा जाणवायला लागली. मग गरुडमाची ही पुण्यापासून जवळची जागा एकेक तुकडा घेतघेत विकसित केली. माझ्या बायकोनं– मृणालनं डिझाईन केलेल्या सेंटरची इमारत असलेली ही जागा सुमारे पन्नास एकर आहे. शहरी गजबजाटापासून दूर असलेल्या या जागेत अनेक ॲक्टिव्हिटीज केल्या जातात. इथल्या उपक्रमात मुलांच्या अनुभवविश्वाच्या कक्षा रुंदावल्या जातात. साहसाचा अनुभव मॅनेजमेंट ट्रेनिंगसाठी वापरला जातो. त्याचं एक स्वरुप आपल्या आर्मीतही वापरलं जातं. विशेषतः भरती प्रक्रियेत या मुद्द्यांचा विचार केला जातो. टीमवर्क, लीडरशिप वगैरे गुण पडताळले जातात. आऊटडोअर असेसमेंट प्रोग्रॅममध्ये हेच माध्यम त्या त्या सदस्यांच्या विकासासाठी वापरलं जातं. ॲक्टिव्हिटी केल्या–नंतरच्या चर्चा आणि सेशनमध्ये त्या अनुभवाकडं वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवलं जातं. या प्रशिक्षणामुळं जादूची कांडी फिरावी आणि अचानक त्या त्या व्यक्तीमध्ये बदल घडावेत असं काही होत नाही; पण ती व्यक्ती या प्रशिक्षणाच्या कालावधीनंतर अंतर्मुख होते. तिला आपल्यातल्या गुणदोषांची जाणीव होते. पुढं हळूहळू या गोष्टी त्यांच्या आयुष्याच्या प्रवासात प्रतिबिंबित व्हायला लागतात. आजच्या अस्थिर आणि स्पर्धात्मक जमान्यात या प्रशिक्षणाची गरज आहे.

**पण अशा प्रशिक्षणातून माणूस बदलतो का? आणि ते बदल कशा स्वरूपाचे असू शकतात?**

– मॅनेजमेंट ट्रेनिंगच्या संदर्भात बोलताना वागण्यात बदल आणायचा असतो. ते करताना विशेषतः लहान मुलांच्या, मोठ्या माणसांच्या संदर्भातला दृष्टीकोन वेगळा आहे. तो महत्त्वाचा अशासाठी की, मोठ्या माणसांना जजमेंटस् आणि डिस्क्रिप्शन्स आवडत नाहीत. या दोन गोष्टींबद्दलचं पथ्य पाळून तरीही त्याच्या वागण्यातला बदल त्याला सांगणं, जाणवून देणं हे या उपक्रमात घडतं. बऱ्याचदा माणसांना जाणवतही नाही की हे घडतं आहे. पण मार्गदर्शकाची भूमिका बजावणारा तिऱ्हाईत हे सहजपणं त्याच्या निदर्शनास आणून देऊ शकतो. बऱ्याचदा आपल्याला काय वाटतं आहे हे मांडता येत नाही. त्यांचं वाटणं समोरच्यापर्यंत नीट पोहचायला मदत करता येते. बऱ्याचदा काही वाटलेलं असतं, ते स्वीकारून मांडायचं कसं हे कळत नाही. त्यासाठी मदत करणं. बऱ्याचदा बरंच काही वाटतं पण प्रत्यक्षात काहीच करता येत नाही. ते करण्यासाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या उंबरठ्यापर्यंत आणणं हेही काम केलं जातं. कामगारापासून ते सिनिअर मॅनेजरपर्यंतच्या पातळ्यांवर हा फरक दृष्टीस पडण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागतात. काम गारांच्या पातळीतला बदल झटकन जाणवण्याजोगा असतो. हे प्रशिक्षण ग्रुपमध्ये दिलं जातं. एका चांगल्या आणि सुरक्षित वातावरणात आम्ही लोकांना मोकळेपणानं व्यक्त व्हायला मदत करतो. त्यामुळं त्या व्यक्तीचं मन हलकं होतं. लोकांच्या मनात कळत–नकळत साचलेल्या गोष्टी, त्यांची कृतीप्रवणता आणि विचारांच्या डोहात शिरून या सगळ्या गोष्टींचा चांगल्या रितीनं निचरा केला जातो.

**तुम्हाला प्रत्येक गोष्ट उत्कृष्ट हवी असते. किंबहुना उत्कृष्टतेचा ध्यासच असावा तुम्हाला. हे कुठून आलं?**

– एक आठवण आहे बाबांशी निगडित. नववीत वर्गात एकतिसावा नंबर आला होता. त्या काळात प्रगतीपुस्तकावर पालकांची सही घेण्याचा समारंभ असायचा. दिवसभर घरच्यांचं ऐकून घ्यायची मानसिक तयारी करत होतो. संध्याकाळी बाबांची सही घ्यायला गेलो आणि कदाचित काहीच घडलं नाही, हा ॲण्टीक्लायमॅक्स होता म्हणून तो मनावर कोरला गेला. गपचूप सही करून बाबा म्हणाले की, 'बाळ्या आयुष्यात काही बनायचं असेल तर जो नंबर आला आहे, त्यातून तीन काढून टाकता आला तर बघा' प्रयत्न करणं आपल्या हातात असतं. मला त्या अर्थानं छंद नाहीत. म्हणजे त्या गोष्टी केवळ छंद या चौकटीत राहात नाहीत. म्हणजे कुठलीही गोष्ट करताना ती जास्तीत जास्त चांगली करून पाहू असं होतं. नाटक, छायाचित्रण प्रदर्शनं, मोहिमा, ट्रेकिंग वगैरे वगैरे. उदाहरणार्थ– लेखन. लिहायला धडपडत सुरुवात झाली. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी मला लिहायला प्रवृत्त केलं. 'महानगर'मध्ये पहिलं सदर लिहिलं. पुढं त्याचं पहिलं पुस्तकं प्रकाशित झालं. लेख हे नैमित्तिक असतात, असा माझा समज होता.

पुढं झटका आला म्हणून एक गोष्ट लिहिली. ती चांगली जमल्यावर आणखी ४-५ गोष्टी लिहून झाल्या. त्या काळात वाचलेल्या कथा-कादंबऱ्या, विशेषतः इंग्रजी साहित्य वाचल्यावर वाटे, यांनाच हे लिहायला कसं जमतं? त्यावर सतत विचार करताना वाटलं की, आपल्याला जमेल का? त्या शब्दधडपडीतून पहिल्या कादंबरीचा संकल्प सोडला. साडेपाच वर्षं लागली 'लॉक ग्रिफिन' पूर्ण व्हायला. मधल्या काळात वयोमानाप्रमाणं ट्रेकिंग कमी होत गेलं. गिर्यारोहण हा माझ्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्यातून मी पुढं आलो आहे. हाय प्लेसेस आणि इतर कामं सांभाळून मी 'लॉक ग्रिफिन' लिहित होतो. पुढं दुसरी कादंबरी लिहिली - 'विश्वस्त'.

**कादंबऱ्या लिहितानाही तुमच्यातला 'भटक्या' तुम्हाला स्वस्थ बसू देत नाही. त्यातूनच लेखणी थोडी बाजूला ठेवून तुम्ही 'हिमयात्रा' नावाची भन्नाट सफर नुकतीच केलीत. त्याविषयी...**


- हिमालयात जवळपास पन्नासेक वेळा गेलो आहे. हिमालय म्हटल्यावर दोन गोष्टी डोळ्यांसमोर येतात. एक काहीसा अध्यात्मिक आणि यात्रा. दुसरी पराक्रम - अमूक शिखर गाठायचं आहे वगैरे अशा अर्थानं. ही दुसरी गोष्ट बऱ्याचदा साध्य केली. त्यात ठरलेलं उद्दिष्ट साधायची घाई असायची. त्यामुळं हृषिकेश ते गंगोत्री या भागात काहीएक जाणं-येणं झालेलं आहे. तेव्हा तेव्हा जाणवलेलं आहे की इथून जवळ बघण्यासारख्या बऱ्याच गोष्टी राहिल्यात. पुन्हा केव्हातरी येऊ ही 'पुन्हा केव्हातरी'ची लिस्ट खूप वाढत गेलेली होती. गेल्या वर्षी जानेवारी-फेब्रुवारीच्या सुमारास आलेला विचार होता की, जाऊन येऊ आठ-दहा दिवस. हृषिकेशला जाऊ, गाडी भाड्यानं घेऊन निवांत फिरू. आखणी करायला बसलो तर नकाशा बघताना सिक्कीम ते लडाख जायचा विचार मनात डोकावला. आठ-दहा दिवस पुरणार नाहीत. अधिक काळ लागेल. एका अर्थानं ती मोठी मोहीम व्हायला लागली. आठ आठवड्यांच्या या मोहिमेसाठी आवश्यक गाडी, ड्रायव्हरचा विचार केल्यावर आणखी माणसं असतील तर मजा येईल असं वाटलं. सलग आठ नाहीत पण एकेक आठवडा आले तर? हा पर्याय निघाला आणि मित्रमंडळी जमत गेली. दर रविवारी आधीच्या मित्रजोडीचा प्रवास संपून जोडी बदलणार असं ठरलं. आयआयटी, डॉक्टर, कलावंत अशी विविध क्षेत्रांमधली ही माणसं होती.

**तुमच्या एकूणच प्रवासात तुमची पत्नी मृणाल कशी सामील झाली?**

मृणाल ओळखीची होती. १९८२पासून सोबत काम करायला लागली. लग्न-बायको-संसार हा ऑप्शनला टाकलेला विषय होता माझ्याबाबतीत. ती माझ्या मित्राची बायको. त्यांचं बिनसल्यावर डोक्यात विचार आला आपलं लग्न होऊ शकतं का. तेव्हा रेवती साडेसहा वर्षांची होती. तिला कसं सांगायचं, समजावायचं का एक अवघड प्रश्न होता. 'बाळ्याकाका' तिचा आवडता काका होता. तो प्रश्न सुटला. वयाच्या चाळीशीत मी लग्न केलं. एकमेकांना समजून घेण्यात काही त्रास झाला नाही. पंचवीस वर्षं झाली लग्नाला. स्वभावतः भिन्न होतो, पण ते स्वभाव पूरकच ठरले. तिला आऊटडोअर आवडतं पण ती गिर्यारोहक नव्हती. शास्त्रीय नृत्य, नाटक, कोरिओ-ग्राफी, गाणं इत्यादी कलाप्रकार तिच्या आवडीचे. तिनं घर उभारलं, गरुडमाची डिझाईन केली. आईकडून बऱ्याच गोष्टी रेवतीकडं आल्या आहेत. अभिनय क्षेत्रात तिची धडपड सुरू आहे. माझ्या कलंदर लाईफस्टाईल बघता हाय प्लेसेस, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी वगैरे गोष्टी कदाचित लग्न झालं नसतं तर झाल्याही नसत्या. सेटल होणं ही गोष्ट लग्नामुळं झाली.

**डोंगरदऱ्यांतली भटकंती आणि लेखणी या दोन्हींची सांगड कशी घालता?**

- ट्रेकिंग, माऊंटेनिअरिंग हे माझ्यासाठी एकाच चॅप्टरचे भाग आहेत. गड-किल्ले सर करायचे वगैरे गोष्टी आयआयटीच्या दिवसात सुरू झाल्या. कालांतरानं लक्षात आलं की, त्यासाठीचं प्लॅनिंग करणं वगैरे माझा आवडीचा विषय होता. प्रवासात काय काय लागणार आहे आणि प्रत्यक्ष डोंगराशी निगडित असणाऱ्या गोष्टी या दोन मुद्याकडं दुर्लक्ष बऱ्याचदा सहजपणं होऊ शकतं, जे माझं झालं नाही. डोंगर चढणं आणि त्यासाठीची बौद्धिक तयारी करणं या दोन्ही गोष्टी मला आवडतात. त्यामुळं असेल कदाचित बहुतेक मोहिमांचं नेतृत्व मी केलं. १९८५ मध्ये कोकणकडा सर केला, तेव्हा आयआयटीतून बाहेर पडलेलो होतो. क्लबला तसं सुचवणं, मी आणि तेव्हाचे आजी विद्यार्थी मिळून





**आपल्याला जमेल का? या शब्दधडपडीतून पहिल्या कादंबरीचा संकल्प सोडला. साडेपाच वर्षं लागली 'लॉक ग्रिफिन' पूर्ण व्हायला. मधल्या काळात वयोमानाप्रमाणं ट्रेकिंग कमी होत गेलं. गिर्यारोहण हा माझ्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्यातून मी पुढं आलो आहे. हाय प्लेसेस आणि इतर कामं सांभाळून मी 'लॉक ग्रिफिन' लिहित होतो. पुढं दुसरी कादंबरी लिहिली - 'विश्वस्त'.**





**ट्रेकर्सची संख्या वाढत असली तरी त्यातले संस्कार आणि सातत्य हळूहळू लयाला जात चालले आहेत. पर्यावरणाची काळजी घेणं वगैरे गोष्टी हा आपला विषय नाही, अशा पद्धतीनं तरुण मुलं जाताना दिसतात. व्यावसायिकीकरण झालेलं दिसतं. मात्र त्याबरोबर एक शिस्त यायला हवी, ती दुर्दैवानं नाही. कचरा वाढला आहे. संवर्धन वगैरे गोष्टींकडं कानाडोळा करून फक्त त्या गोष्टींचा उपभोग घ्यायची वृत्ती बळावलेली दिसते. सुरक्षेच्या महत्त्वाच्या मुद्याकडं दुर्लक्ष होतं आहे.**



त्या मोहिमेच्या आखणीचं काम मोठ्या उत्साहानं केलं होतं. अशा प्रकारच्या व्यवस्थापनाचीही आवड असावी लागते. आयआयटीतून बाहेर पडल्यावर पाच-दहा वर्षं माझ्यापेक्षा आईला ऐकायला लागायचं की, 'मुलगा फुकट गेला इथपासून ते सीट फुकट घालवली' इथपर्यंत. पण आयआयटीनं मूलभूत आणि तर्कसुसंगत विचार करायला शिकवलं. त्या विचारपद्धती कादंबरी लेखनातही वापरता येतात. कथानक डिझाईन करणं हे विचित्र वाटू शकतं ऐकायला. पण ते नसेल तर गोष्टी भरकटू शकतात. 'विश्वस्त'ची वेबसिरीज होऊ घातली आहे. ती प्रोसेस जवळून बघता येईल, हा माझा त्यातला स्वार्थ.

**आजच्या ट्रेकिंगविषयी काय वाटतं?**

– सध्या ट्रेकिंगचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. मी सुरुवात केली तो काळ आणि आत्ताचा काळ यात खूप अंतर आहे. लोकांची क्रयशक्ती वाढली असल्यामुळं ट्रेकिंगला जाणं सोपं झालं आहे. सोयी वाढल्या आहेत. इंटरनेट किंवा समाजमाध्यमांवर बरीच माहिती उपलब्ध आहे. त्याचा एक परिणाम त्यानिमित्तानं लोकं जमतात. ट्रेकिंगसाठी ट्रेकर्सची संख्या वाढत असली तरी त्यातले संस्कार आणि सातत्य हळूहळू लयाला जात चालले आहेत. पर्यावरणाची काळजी घेणं वगैरे गोष्टी हा आपला विषय नाही, अशा पद्धतीनं तरुण मुलं जाताना दिसतात. व्यावसायिकीकरण झालेलं दिसतं. मात्र त्याबरोबर एक शिस्त यायला हवी, ती दुर्दैवानं नाही. लोकं किल्ल्यावर रांगा लावून जात आहेत, हे दिसायला लागलं आहे. हॉटेल्स निघत आहेत. कचरा वाढला आहे. संवर्धन वगैरे गोष्टींकडं कानाडोळा करून फक्त त्या गोष्टींचा उपभोग घ्यायची वृत्ती बळावलेली दिसते. सुरक्षेच्या महत्त्वाच्या मुद्याकडं दुर्लक्ष होतं आहे. २५-३० वर्षांपूर्वी एक क्लब संस्कृती अस्तित्वात होती. सिनिअर्सकडून ज्युनिअर्सकडं अनुभव, संस्कार पास ऑन व्हायचे हा त्याचा फायदा होता. कुठंतरी त्या क्लब संस्कृतीचा ऱ्हास होत गेलेला आहे. नुकतंच गिरीप्रेमी क्लबनं कांचनगंगा सर केलं. त्यातही एक मुद्दा की या गोष्टीला ग्लॅमर आलं आहे. मोहीम, अर्थसाहाय्य आणि ग्लॅमर येणं या गोष्टी हातात हात घालून चालतात. पण त्यातून हिमालयातल्या छोट्या पण अवघड शिखरांकडं वळणं कमी होत चाललं आहे. तिथंही बऱ्यापैकी व्यावसायिकीकरण आलेलं आहे. पैसे टाकून एव्हरेस्ट सर करण्याचा प्रकार मला पटत नाही. आधी काही मोहिमा केल्यात आणि मग शिखर गाठणं ही वेगळी गोष्ट आहे.

**अप्पांनी 'दुर्गभ्रमणगाथा' लिहिली होती. तसं काही लिहिण्याचं डोक्यात आहे का?**

– अनेकांनी अनेकदा तसं सुचवलं आतापर्यंत. तसा विचारही येतो मनात. परंतु लिहिणं हा पंधरा वर्षांपूर्वी मला नव्यानं गवसलेला प्रकार आहे. त्यातल्या कादंबरी या प्रकाराचं आकर्षण अधिक आहे. त्यामुळं त्याहून वेगळ्या लिखाणाकडं इतक्यात वळण्याचा बेत नाही.

**पर्वत पालथे घालताना अडचणींचे डोंगरही पार करावे लागतात. त्यात कायकाय सर झालं?**

– कांचनगंगा सर करण्याचा माझा सर्वोच्च प्रयत्न होता. पण तो हातातून निसटला. एक मोहरा दगावला. यश हुकलं. त्यामुळं काही काळ मोहिमांना ब्रेक लागल्यासारखं झालं. इतर मोहिमांमध्ये बऱ्याच अडचणी आल्या. ठरवल्यापेक्षा भलत्याच गोष्टी घडल्या. हवामानामुळं निर्णय बदलावे लागले. आताच्या हिमयात्रेतही असा अनुभव आला. अशा वेळी केलेली आखणी बदलून झटपट निर्णय घेता येणं हे गिर्यारोहक म्हणून शिकायला मिळालं. हिमयात्रेचा साहसी भाग असा होता की कुठंही राहण्याचं बुकिंग केलेलं नव्हतं. पण प्रवास सुरू झाला आणि मग त्यातही मजा येऊ लागली. आमच्याकडं तंबू होते. जेवणाखाण्याचं सामान होतं. त्यामुळं आम्ही कुठंही राहू शकत होतो. मग पावसाचा अंदाज घेत एखाद्या पडवीत, घरात राहायला लागलो. राहायचं ठिकाण ठरलेलं नसणं ही या प्रवासातली गंमत होती. मला कुठंतरी एक भीती होती की, सगळं नीट होईल ना? त्यामुळं मी भरपूर काळजी घेत होतो. दोन-तीन आठवड्यांनी हे किंचितशा भीतीचं भूत गायब झालं. हिमालयाच्या कुशीत विसावणं, चांगलं-चुंगलं खाणं ही भारी गोष्ट होती. माझ्याच विचारांच्या पद्धतीतला बदल मला जाणवतो आहे. त्या त्या अनुभवांना अगदी रंगत आली नि हिमयात्रेचा प्रवास स्मरणीय झाला.

वसंत वसंत लिमये. भ्रमणध्वनी ९८२२१९०६४४
मृणाल देव-कुलकर्णी, भ्रमणध्वनी : ९८२००६६७२४
धनंजय गांगल, भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०



## ‘साद हिमालयाची’ पुस्तक गिर्यारोहणासाठी प्रोत्साहन देणारे : हरीश कपाडिया


गिर्यारोहणासाठी आणि छायाचित्रणासाठी ईशान्य भारतातील प्रदेशासांठीचे ‘इनरलाईन परवाने’ मिळणे किचकट आणि कटकटीचे होते. आता असे परवाने मिळणे सोयीचे झाल्याने पर्यावरणाला निश्चित चालना मिळेल, असा विश्वास प्रसिद्ध गिर्यारोहक हरीश कपाडिया यांनी व्यक्त केला. ‘ग्रंथाली’ प्रकाशनाच्या वतीने गिर्यारोहक वसंत वसंत लिमये यांच्या ‘साद हिमालयाची’ पुस्तकाचे प्रकाशन प्रभादेवीतील रवींद्र नाट्य मंदिरात कपाडिया यांच्या हस्ते झाले.

‘साद हिमालयाची’ पुस्तक अनेकांना गिर्यारोहणासाठी प्रोत्साहन देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अभिनेते सचिन खेडेकर म्हणाले, ‘एरवी सवयीचा नसलेला गिर्यारोहणाचा अनुभव अगदी वेगळा आहे. तो घेता आला याचा मला आनंद वाटतो.’ हिमालय फिरणे आणि अनुभवी लोकांसोबत हिमालय अनुभवणे या दोन भिन्न गोष्टी असल्याचे मत अभिनेत्री सुहिता थत्ते यांनी व्यक्त केले. पुस्तकाचे लेखक वसंत लिमये मनोगत व्यक्त करताना म्हणाले, की आपल्याकडे गिर्यारोहण ट्रेकिंगपुरते मर्यादित आहे. ‘साद हिमालयाची’ पुस्तकातून गिर्यारोहणासाठी अनेकांना पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# हिमालयातला वसंतोत्सव

**‘साद हिमालयाची’ या वसंत वसंत लिमये लिखित पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभात केलेलं भाषण...**

वसंत वसंत अर्थात बाळ्या! बाळ्याबद्दल हे असं फॉर्मल स्टेजवरून बोलणं फार कठीण आहे. आधी बसू, मग बोलू असं काहीसं वातावरण असेल तर आणि तरच बाळ्याशी किंवा बाळ्याबद्दल बोलता येतं. असाच आमचा तरी अनुभव आहे. तरीही एक प्रयत्न करूया. बाळ्या हे एक अद्भुत रसायन आहे. मी आयआयटीत त्याच्याच होस्टेलला होतो, पण बाळ्या मला खूप सिनिअर आणि पास-आउट झालेला होता. त्यामुळे आमची प्रत्यक्ष भेट कधी झाली नाही. बाळ्या नावाची मिथ मात्र होस्टेलवर जागृत होती. शिवाय आमचे ठाण्यातील सहकारी बाळ्याबद्दल काहीना काही चमत्कृतिपूर्ण बातम्या आणून हे त्यांचं देवस्थान जागृत राहील याची काळजी घ्यायचे. अगदी वसंत वसंत या नावापासूनच कुतूहल होतं. वडील जन्माआधीच गेले त्यामुळे त्यांची आठवण म्हणून वडिलांचंच नाव बाळ्याला दिलं - असाच सगळ्यांचा समज होता. नाहीतर आपलंच नाव आपल्या मुलाला ठेवण्याचा वेडेपणा कोण आणि कशाला करेल? पण सिनिअर वसंत यांनी तो केला. इतकंच नाही तर नावासोबतच




आपला वेडेपणाही या जुनिअर वसंतला देऊ केला. त्या वेडेपणाची फळं आपण आता भोगतोय! तेच आपलं प्राक्तन आहे. अर्थात चांगल्या अर्थानं!

शक्यतो बूड न हलवण्याच्या आणि शरीराला फारशी तोशीस न देण्याच्या माझ्या स्वभावामुळे पुढेही बाळ्याशी बराच काळ संबंध आला नाही. परंतु या जागृत देवस्थानाच्या बातम्या मात्र हस्ते-परहस्ते पोचायच्या. बाळ्या आयआयटीतून इंजिनीयर झाला. तिथेच त्याचं सह्याद्री, हिमालय यांच्याशी लव्ह-अफेअर झालं. मग स्कॉटलंडला जाऊन आऊटडोअर मॅनेजमेंट ट्रेनिंगचा कोर्स केला. त्यावेळी त्याचा व्हिसाचा काहीतरी प्रश्न निर्माण झाला. मग मोहन वाघांच्या नाट्यदौऱ्यासोबत जाण्याच्या बहाण्यानं तो त्यानं कसा मिळवला त्याचीही एक रोचक लहानशी कथा आहे. कांचनगंगा, रूट्स, गरुडमाची, हाय प्लेसेस अशी त्याची अनेक वळणं आपल्याला परिचित आहेत. अशाच एका वळणावर त्यानं चक्क लग्नही केलं! मग या त्याच्या बेफाम वळणांना थोडी ओढ प्राप्त झाली. पुढे तर एका टप्प्यावर बाळ्या लिहायला लागला. सुरुवातीला वर्तमानपत्रात लेख, मग गिरिभ्रमणाचा आनंद सांगणारी एक-दोन पुस्तकं! आणि एक दिवस चक्क तो 'लॉक ग्रिफिन'चं स्क्रिप्ट घेऊन भेटला. त्याचा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कॅनव्हास आणि त्यामागचा त्याचा रिसर्च स्तिमित करणारा होता. त्यापाठोपाठ तसाच प्रचंड कॅनव्हास असलेली 'विश्वस्त' ही इतिहासवजा कादंबरी! आणि बाळ्या आता खरोखरच प्रौढ होतोय की काय असं वाटत असताना - अचानक यू-टर्न घेऊन आणि आपल्या बाळ्यापणाला जागून तो 'झी मराठी'च्या अंकात मुलांसाठी गोष्ट लिहिता झाला! हाय प्लेसेस यशस्वीरीत्या सांभाळून हे सगळं करायला त्याला वेळ मिळतो कुठून? सगळंच अनाकलनीय.

एव्हरेस्ट पहिल्यांदा सर केलं ते १९५३ साली, एडमंड हिलरी आणि तेनसिंग यांनी. त्याआधीही एव्हरेस्ट सर करण्याच्या खूप मोहिमा झाल्या. त्यातलाच एक पुढे आख्यायिका बनून राहिलेला गिर्यारोहक म्हणजे जॉर्ज मॅलरी. १९२०-३०च्या दरम्यान तिबेटकडून एव्हरेस्ट चढण्याचे त्यानं अनेक अयशस्वी प्रयत्न केले. तिबेटकडून कारण त्यावेळी नेपाळमधून मार्ग खुला नव्हता. या जॉर्ज मॅलरीला एकदा विचारण्यात आलं - एव्हरेस्ट चढावं असं तुला का वाटतं? आणि त्यानं अगदी इनोसंट उत्तर दिलं - कारण ते तिथे आहे म्हणून! बाळ्याचा हा वेडेपणा, त्याच्या एक्स्पिडिशन्स आणि त्यामागची त्याची भावना ही अशीच इनोसंट असते. काहीतरी करून दाखवलं असा लवलेशही त्याच्यात नसतो. त्यानं खरंतर साठी पार केलेली आहे. मात्र एक खेळणं खेळून झालं की पुढचं खेळणं, अशा बालपणात तो मनापासून रमतो. असा अवखळपणा आपल्याला कसा जमत नाही म्हणून आपल्याला त्याचं अप्रूप वाटतं आणि हो असूयासुद्धा.

'टुमॉरो नेव्हर डाइज' या बॉण्डपटात मीडिया मुघल असलेल्या खलनायकाला बॉण्ड म्हणतो, You really are quite insane, Mr. Carver. तेव्हा कार्व्हर उत्तर देतो, You disappoint me Mr. Bond, The distance between insanity and genius is very thin and it is measured only by success! Success. बाळ्याच्या हाताला यश आहे. कारण बाळ्याचा ह्या वेडेपणामागे वसंत वसंत नावाचा जिनियस ब्रेन आहे. And of course there is a method behind his madness. वेस्टर्न मॅनेजमेंट - पाश्चिमात्य व्यवस्थापनात एक सूत्र आहे - Unless u measure u can NOT manage. सारखं मोजत राहा. Try quantifying everything even if it is qualitative in nature. आणि पूर्वेचं सूत्र आहे की प्रश्न कधी संपत नाहीत; नवीन निर्माण होतात, ते कोलाजसारखे सर्वत्र पसरलेले असतात - आपल्या जन्माआधीपासून ते होते, आता आहेत आणि पुढेही राहणार आहेत. तेव्हा मोजण्यात-मापण्यात वेळ घालवू नका. You manage by crisis - आता क्रायसिस कुठला आहे तेवढाच मॅनेज करा - तोही शक्यतो बाय हंच ऑर बाय गट फीलिंग! बाळ्याकडे या दोन्ही मॅनेजमेंटचं अफलातून मिश्रण आहे. And aditionally his attitude - he always wants to be a part of the solution and not become part of the problem! Of course, that is what the geniusness is all about.

'साद हिमालयाची' या पुस्तकामध्ये एक प्रवास आहे. त्या प्रवासामागे जो स्पार्क होता तो मोठा रोचक आहे. तो आहे delayed gratification चा. अनेकवेळा मोठमोठ्या कामांत, प्रवासात आपण लहान-सहान आनंद, काही स्थळं, जी अगदी आजूबाजूला सहज साध्य असतात, आपण टाळतो, नंतर कधीतरी बघू म्हणतो - पण तो नंतर कधीच येत नाही. यातल्या काही 'नंतर'ना बाळ्यानं एका माळेत गुंफायचं ठरवलं. आणि या माळेचे साक्षीदार खुद्द काही मोती इथे बसलेले आहेतच.

सार्त्रचं नाटक आहे No Exit म्हणून. त्याची

थोडक्यात कथा अशी – एकमेकांशी अनभिज्ञ २ स्त्रिया आणि एक पुरुष यांचा मृत्यू होऊन ते एकाच वेळेस स्वर्ग-नरकाच्या दरवाजात पोचतात. तिथे त्यांच्या पाप-पुण्याचा हिशेब होतो आणि त्यांना नरकात पाठवलं जातं. ख्रिश्चानिटीच्या कल्पनेप्रमाणे नरक म्हणजे गरम तेल, लालबुंद सळया वगैरे. जेव्हा यमदूत त्यांना खेचत घेऊन जाऊ लागतो तेव्हा अर्थातच भविष्यातील हालअपेष्टांचा विचार करत ते गर्भगळीत होतात, रडू लागतात, गयावया करू लागतात. तो यमदूत त्याकडे लक्ष न देता त्यांना एका खोलीत नेऊन टाकतो. बघतात तो काय, ती खोली सगळ्या सुखसोयींनी सज्ज असते! तुम्ही तिघं आता कायमचं या खोलीत राहायचं – तुम्हाला सगळं खाणंपिणं, मद्य, कपडे वेळोवेळी पुरवले जातील.... हीच तुमची शिक्षा असं तो यमदूत त्यांना दरडावून सांगतो. ''पण कोणी दुसऱ्याला जराही शारीरिक इजा केली तर मात्र त्याला या खोलीबाहेर काढून – खरोखरच्या नरकयातना देण्यात येतील!'' अशी पुस्तीही यमदूत जोडतो. आता गरम तेल, लालबुंद सळया कुठे आणि ही सुखद शिक्षा कुठे? हा नरक नाही खरंतर हाच स्वर्ग आहे! यमदूताच्या या यू-टर्नमुळे त्यांना हर्षवायू व्हायचाच बाकी राहतो. आठवडाभर ह्या स्टॉकहोम सिंड्रोममध्ये जातो. मग ते एकमेकांशी संवाद साधू लागतात तेही त्यांना सुखद वाटतं. मग हळूहळू आपल्या जीवनांबद्दल खरं, बरंचसं खोटं सांगू लागतात – आपल्यावर कसा अन्याय झाला ते रंगवू लागतात. पुढे, माझं दुःख मोठं की तुझं यावरून त्यांचे खटके उडू लागतात. सगळी सुखं हात जोडून त्या खोलीत असताना जसजसे दिवस जाऊ लागतात तसतशी त्यांची भांडणं वाढू लागतात. ते एकमेकांना मारण्याच्या धमक्या देऊ लागतात. प्रत्येकालाच उरलेल्या दोघांचा सहवास नकोसा होतो, पण काय करणार – देअर इज नो एक्झिट. आपल्याला नको असलेल्या व्यक्तींबरोबर राहणं हाच खरा नरक आहे. हे नाटक शब्दबंबाळ असल्यामुळे कदाचित, फारसं लोकप्रिय झालं नाही. पण पुढे ते milestone म्हणून मानलं गेलं. अनेक Versity च्या psychological dept ला reference म्हणून हे नाटक वापरलं जातं. तुम्हाला Big Boss आणि यामध्ये साम्य वाटत असेल तर आहेच, कारण Big Bossची कल्पना is indeed broadly based on this! ते असो. पण एक गंमत म्हणून विचार मनात येतोय – pls take it in stride. त्या उंचीवर oxygen कमी असतो आणि थकवा, चिडचिड पटकन होते हे सर्वांना ज्ञात आहे. पण, कदाचित या no exit!! situation चा विचार करूनच बाळ्याने आठवड्या-आठवड्याला एकेका टीमची एन्ट्री आणि एक्झिट प्लान तर केली नसेल!

कार्ल सेगनचं एक वाक्य आहे – Imagination will often carry us to worlds that never were. But without it we go nowhere. असे जगावेगळ्या कल्पना करणारे आणि ती प्रत्यक्षात उतरवणारे लोक जगाच्या दृष्टीनं वेडे असतात. वेडी माणसंच प्रगती करू शकतो. माणसाला जेव्हा एकाच गोष्टीचा ध्यास लागतो, वेड लागतं, तेव्हाच तो काहीतरी नवीन करू शकतो. चाकोरीबाहेरील जीवन जगू शकतो. अलौकिक कर्तृत्व प्रकट करतो. वेडे होणे हे जिवंतपणाचं लक्षण आहे. अशा वेड्या माणसांमुळेच हे जग जिवंत असतं, पुढे जात असतं.

या पुस्तकाबद्दल मी जास्त बोलणार नाही – हे सगळं, ज्यांनी ह्या पुस्तकातील कथन स्वतः अनुभवलंय त्यांच्याच तोंडून ते ऐकणं रोमांचकारी असेल. शिवाय एक नेहमीचंच असतं, की मी सगळं सांगितलं तर मग तुम्ही पुस्तक विकत घेणार नाही वगैरे वगैरे. खरं असं काही नसतं. परंतु सुदेशचा सतत आग्रह असतो की पुस्तक विकत घ्या, आज विशेष सवलत आहे म्हणून तरी घ्या असं सांग. आणि असं सरळ सांगायला awkward वाटत असेल तर निदान आडमार्गानी तरी सांग. तेव्हा पुस्तक विकत घ्या हे मी तुम्हाला ठासून सांगितलंय आणि ते तुम्हाला पटलंय असं मी गृहीत धरतो.

दिनकर गांगल यांनी बाळ्यावर 'थिंक महाराष्ट्र'च्या website वर अतिशय छान लेख लिहिलाय. त्यातलं आवडलेलं मार्मिक वाक्य सांगून थांबतो – श्री.ना. पेंडसे आणि बाळ्याचा परिचय असता तर 'अफाट बापू'नंतर 'बेफाट बाळ्या' ही कादंबरी त्यांनी नक्की लिहिली असती.

एक फॉर्मॅलिटी आहे. खरं तर विनोद पवार आणि महेंद्र पवार आमचे मित्र. त्यांचे वेगळे आभार काय मानायचे. या समारंभाचं देखणं आयोजन त्यांनी केलं. ऐन वैशाखात ही चैत्र चाहूल फारच सुखद आहे असं नमूद करतो आणि कृतज्ञता व्यक्त करतो.

**– धनंजय गांगल**

भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०



# आर्त उद्याच्या विश्वाचे

'पुरुषस्य भाग्यम्' ही म्हण दैववादी आहे. स्वकर्तृत्वावर मोठेपण मिळवलेल्या **दीपक करंजीकर** यांना ती लागू करणे गैर ठरावे. 'आजच्या विश्वाचे आर्त' या पुस्तकाने साहित्यिक वर्तुळात ओळख मिळालेले करंजीकर नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'घातसूत्र' या महाकादंबरीने प्रकाशझोतात आले आहेत. **डॉ. संजय देशमुख** यांनी घेतलेल्या या मुलाखतीतून त्यांची वैचारिक बैठक आणि भविष्यवेधी मांडणी स्पष्ट होते.

शब्दांकन : **डॉ. लतिका भानुशाली**

**डॉ. संजय देशमुख :** दीपक 'घातसूत्र' वाचल्याआधीच तुला भेटण्याची उत्सुकता होतीच. आज 'ग्रंथाली'ने या पुस्तकाच्या निमित्ताने तुझ्याशी गुजगोष्टी करण्याची मला संधी दिली. त्याबद्दल प्रथम आभार मानून आपल्या गप्पांना सुरुवात करतो. 'घातसूत्र'मध्ये जगाचा एकूणच जो आवाका तू मांडलाय तो वाचल्यापासून मला तुझ्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली, तुझ्यावर लहानपणापासून कोणाकोणाचा प्रभाव पडला, तुझ्या शिक्षणाच्या दिशा तू कशा ठरविल्यास हे ऐकून घेण्याची उत्सुकता वाढली आहे.

**दीपक करंजीकर :** सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रातील तुझ्यासारखं एक दिग्गज मला बोलतं करतो आहे ही आनंदाची गोष्ट आहे. कारण समविचारी परिघामध्ये असणाऱ्या माणसांमध्ये संवाद चांगलाच रंगतो.

माझा जन्म जरी पुण्याचा असला तरी ते माझं आजोळ. बालपण मात्र माझ्या धुळ्याला गेलंय. आई-वडील दोघेही शिक्षक, दोघांच्या शाळेला अनुदान नसल्याने पूर्ण पगारावर सही करून निम्मा पगार द्यायचा ही शाळेची पद्धत. त्यात आईला नव्वद रुपये तर बाबांना साडेतीनशे रुपये पगार! पण प्रत्यक्षात हातात मात्र काहीच नाही. अशा हलाखीच्या दिवसात बालपण गेलं. काटकसरीचं जीवन होतं. महिन्याच्या एक तारखेची वाट पाहण्याचं जीवन होतं. पण तरीही मी आणि माझे दोन भाऊ अशा तिघा भावंडांचे बालपण आनंदात गेले. कारण मला वाटतं, आनंद आणि आर्थिक परिस्थिती यांचा संबंध नाही. धुळे छोटं गाव होतं. तिथेच शालेय जीवन सुरू झालं. कधी कधी आई-बाबांचा पगार वेळेवर झाला नाही तर अक्षरश: खायला काही नसायचं. एकदा अशीच खडतर परिस्थिती असताना मित्राला ही गोष्ट सांगितली. तो पिठाच्या गिरणीत मजूर होता. चक्की साफ करताना चक्कीच्या दोन दगडांत अडकणारं पीठ त्याने प्रेमाने दिले. मग पुढचे चार-पाच दिवस मजेत गेले. घरात आधी लाईट नव्हतीच. मी चौथीत गेल्यावर ती आली. आम्ही अंगणात खाटेवर चांदणं, चंद्र पाहात झोपायचो. ते चांदण्यांनी भरलेलं भव्य आकाश डोळ्यांत साठवतच आम्ही झोपायचो. मला मग त्या आकाशासारखीच भव्य स्वप्नं पडायची. सायकलीवर आयुष्य जात असताना आकाशातील विमान पाहून आपण त्यात कधी बसू हा विचार मनात डोकावत असे. पण हेच वातावरण त्याकाळात बहुतांशी कुटुंबात होते. या वातावरणामुळे संघर्ष करायची जिद्द व्यक्तिमत्त्वात निर्माण झाली. कष्टाने पुढे जायचंय हे जाणलं. त्यासाठी शिक्षण घेणं भाग होतं.

मी लहानपणी पेपर टाकायचं काम करायचो. 'सोबत' नावाचं एक वर्तमानपत्र होतं. त्याची किंमत ७० पैसे होती. आम्हाला पेपरमागे साडेतीन पैसे मिळायचे. गिऱ्हाईकाची परवानगी घेऊन मी तो पेपर वाचायचो. या वाचनातून माझी वैचारिक बैठक घट्ट होत गेली. आपल्याकडे सुबत्ता नाही याची जाणीव झाली. आपल्याला पुढे गेलंच पाहिजे ही ईर्षा निर्माण झाली. म्हणूनच या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा मी ऋणी आहे. मी इंजिनियरिंगचा विद्यार्थी असून माझं मराठी चांगलं होतं. कारण शाळेतील शिक्षक, पुस्तकातील पाठ-कविता वर्गात जिवंत करत असत. भाषण करायला सुरुवातीला जमले नाही

तेव्हा वडिलांची थोबाडीत खाल्ली. मग मात्र भाषण कसं करायचं ते शिकलो. श्रीमंतांची घरं, त्या घरातील फळफळावळ, अन्नधान्य बघून नकळत मनात तुलना व्हायची आणि यातून बाहेर पडायचंय हे मनोमन ठरवलं.

**संजय देशमुख :** तू बालपणीचा पट मांडलास. पण मला सांग की शिक्षणाच्या दिशा कोणत्या असणार आहेत हे तू त्यावेळी ठरवलं होतंस का?

**दीपक करंजीकर :** नाही. असं काही प्लॅनिंग मी केलं नव्हतं. एकतर घरातील मोठा भाऊ असल्याने लवकर नोकरीला लागणं गरजेचं होतं. त्यामुळे बारावीनंतर डिप्लोमा केला तर लवकर नोकरी मिळेल हा साधा हिशोब होता. इंजिनिअरिंग करण्याइतपत परिस्थिती नव्हतीच. पण मी नंतर मात्र पदवी, पदव्युत्तर शिक्षण आवर्जून पूर्ण केलं. नोकरी मिळेपर्यंत बरीच भाषणं द्यायला लागलो होतो. अशा वेळी एकदा घरातून सामान आणायला बाहेर पडलो ते थेट भाषणामुळे पकडला जाऊन तुरुंगात गेलो. वडील सामानाच्या पिशव्या, पैसे घ्यायला पोलीस चौकीत आले. ते बघून मग खूप वाईट वाटले. शेवटी 'क्रॉम्प्टन'मध्ये नोकरी लागली. त्यांनी आधी फोन केला होता. पण ज्यांच्या घरचा नंबर दिलेला त्यांनी रॉंग नंबर सांगून फोन कट केला. मग क्रॉम्प्टनमधून तार घरी आली. पगार चक्क ७२५ रुपये. हा खूप मोठा आर्थिक आधार होता.

शाळेमध्ये माझ्या व्यक्तिमत्त्वामध्ये असलेला न्यूनगंड महाविद्यालयात गेला, कारण आपल्याला लोकांवर प्रभाव पाडणारे वक्तृत्व जमतंय हा शोध तोपर्यंत मला लागला होता. लोक ऐकतात म्हटल्यावर माझं भाषण अधिक समृद्ध असावं, आशयघन असावं म्हणून वाचनाचा सपाटा लावला. कादंबऱ्यांकडून नंतर वैचारिक पुस्तकांकडे वळलो. या सर्व वाचनाचा पुढे नोकरीत खूप उपयोग झाला. बूट-इन शर्ट या गोष्टी माहीत नसलेला मी हळूहळू नोकरीत मुरत गेलो. ज्या गोष्टी येत नव्हत्या त्या ज्ञात करून घेण्यासाठी संध्याकाळचे कोर्सेस लावले. म्हणजे गरजेतून शिक्षण घडत गेलं. इतकं शिक्षण झालं की परदेशात मला घेण्यासाठी लिमोझिन येत असे. इतक्या उंचीवर केवळ शिक्षणामुळे पोहचू शकतो.

**संजय देशमुख :** शिक्षणात तू खूप मोठी उत्तुंग भरारी घेतलीस. अनेक प्रकल्प-उपक्रम राबवलेस. त्यातले बरेचसे परदेशातच होते. भारत ते परदेश हा प्रवास कसा घडला?

**दीपक करंजीकर :** क्रॉम्प्टनला असताना मी डिझाईन डिपार्टमेंटमध्ये होतो. पण नंतर मला तेच तेच काम करण्याचा कंटाळा येऊ लागला. त्यापेक्षा लोकांशी सतत संपर्क येईल असे काम शोधायला मी सुरुवात केली. कॉर्पोरेट जगतातील ईर्षा, कुरघोड्या, क्रूरता, व्यावसायिकता, पैसा सगळं जवळून पाहिलं. मग मला मार्केटिंगची संधी मिळाली. अनुभव नसतानाही हे आव्हान मी स्वीकारले. कारण 'नाही' हा शब्द मला आवडतच नाही. मला उत्तम बोलता येते. मी कोणावरही सकारात्मक प्रभाव पाडू शकतो ही माझी ताकद मला माहीत होती. म्हणून हे आव्हान मी स्वीकारले. संगणकातील काहीही येत नव्हते. माझ्या हाताखालची तरुण मुलं हसायची पण जिद्दीने तेही ज्ञान आत्मसात केलं. एसीपीमध्ये मी लागलो आणि माझे जीवन बदलले. तिथे एस.एम. त्रेहान नावाच्या माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याने माझ्या क्षमता ओळखून मला संधी दिली आणि माझा परदेशप्रवास सुरू झाला. त्यामुळे एस.एम. त्रेहान माझे कॉर्पोरेट व्यवस्थापनातले तर राजकीय व्यवस्थापनातले प्रेरणास्थान प्रमोद महाजन.

**डॉ. संजय देशमुख :** दीपक तू 'रिलेशनशिप मॅनेजमेंट' अर्थात 'मानवीय संबंधांमधील व्यवस्थापन' असा नवीनच विचार मांडलाय. वास्तविक लोक व्यवस्थापन क्षेत्राचा अभ्यास करतात ते सुयोग्य मानवीय संबंध कसे प्रस्थापित करायचे हे शिकण्यासाठी. तू नेमके विरुद्ध विचार मांडतोयस. हे सगळं नेमकं काय आहे? तू सगळी आव्हानं समर्थपणे पेललीस. हे शिवधनुष्य तू कसं उचललंस?

**दीपक करंजीकर :** मी जेव्हा क्रॉम्प्टन कंपनीत काम करत होतो तेव्हा 'बिझिनेस प्रोसेस रिइंजिनिअरिंग' असा एक भाग शिकलो होतो. यात प्रामुख्याने, व्यवसाय करताना एखादी प्रक्रिया पुन्हा पुन्हा न्याहाळून त्यात आवश्यक व योग्य ते बदल घडविणे आणि त्यायोगे या संबंधित काम करणाऱ्या लोकांच्या कामात सकारात्मक बदल घडवून आणणे हा विचार केंद्रस्थानी होता. माझ्यासाठी हा अनुभव खूपच नवीन होता. वास्तविक अमेरिकेत काम



**लोक ऐकतात म्हटल्यावर माझं भाषण अधिक समृद्ध असावं, आशयघन असावं म्हणून वाचनाचा सपाटा लावला. कादंबऱ्यांकडून नंतर वैचारिक पुस्तकांकडे वळलो. या सर्व वाचनाचा पुढे नोकरीत खूप उपयोग झाला. बूट-इन शर्ट या गोष्टी माहीत नसलेला मी हळूहळू नोकरीत मुरत गेलो. ज्या गोष्टी येत नव्हत्या त्या ज्ञात करून घेण्यासाठी संध्याकाळचे कोर्सेस लावले. म्हणजे गरजेतून शिक्षण घडत गेलं. इतकं शिक्षण झालं की परदेशात मला घेण्यासाठी लिमोझिन येत असे. इतक्या उंचीवर केवळ शिक्षणामुळे पोहचू शकतो.**



**माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक पीळ शोधणे, त्याचे अंत:स्तर शोधणे हे मला कमालीचे आव्हानात्मक आणि रंजक वाटते. अशा प्रकारचा विचार हीच माझी मूलभूत प्रेरणा आहे. मग याच प्रेरणेतून मी माणसं शोधायला लागलो. उदा. एखाद्या माणसात ८० टक्के आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी असतात पण २० टक्के गोष्टी या वेगळ्या, चांगल्या असू शकतात. प्रत्येक माणसातील या वेगळ्या गोष्टीचा समुच्चय करून त्या सगळ्या गोष्टी एका माणसात रुजवता येतील का हा माझ्या विचारांचा गाभा होता. अर्थात तसा माणूस जन्माला घालणे मला अपेक्षित नाही. पण असे चांगले गुण एकत्र केले तर घडणारा माणूस कसा असेल याचे गणित मांडले. हे शिक्षणातून घडवता येईल असा विश्वास मला वाटू लागला.**

करण्याआधी मी ऑस्ट्रेलियात काम करत होतो. तिथे उपक्रम राबविण्याच्या निमित्ताने वेगवेगळ्या देशांतील लोकांशी सतत संबंध यायचा. यानिमित्ताने एका वेगळ्या स्वभावाच्या मानवीय समूहाचे मला दर्शन घडले. हा मानवी समूह भारतातील लोकांपेक्षा पूर्णपणे भिन्न होता. तो समूह शिस्तबद्ध होता. स्वयंशिस्त आणि सामाजिक शिस्त या दोन्हीचा अनोखा संयोग मला तिथे पाहायला मिळाला. नागरी जबाबदाऱ्या-कर्तव्य याचं भान या लोकांच्या अंगात पुरेपूर मुरलेलं होतं. त्यांच्या सामाजिक जाणिवा तीव्र होत्या. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे इतरांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणारा हा समूह होता. सर्व प्राणिमात्रांचा आदर राखत आशयसंपन्न आयुष्य जगणारा हा समाज बघून मी स्तिमित झालो. त्यांची शालीनता, संस्कारप्रियता, मला अचंबित करून गेली. भारतात या सगळ्याची सरमिसळ आहे. अर्थात हे चांगले की ते चांगले याचा उहापोह मी इथे करणार नाही पण या सगळ्या अनुभवातून माझ्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या हे मात्र अगदी खरंय! त्यावेळी मी माझ्या डायरीत एक शब्द लिहिला. तो शब्द होता 'पर्सनल रिइंजिनिअरिंग'. माणूस घडविण्यासाठी वापरावयाची तंत्रप्रणाली असं त्याचं वर्णन होऊ शकेल. व्यवसाय क्षेत्रात एखाद्या प्रक्रियेला नव्याने घडवलं जाऊ शकतं त्याचप्रमाणे माणूस नव्याने घडवला जाऊ शकतो का या विचारांचं भूत माझ्या मानगुटीवर बसलं. मी याविषयी मग सखोल चिंतन केलं. एखादा माणूस कधी बदलतो? आयुष्याचे निर्णय तो कोणत्या टप्प्यावर घेतो? त्यावेळी त्याच्या मनात कोणती वळणे असतात? ती वळणं प्रारंभीच्या टप्प्यावर त्याला ओळखता आली असतात का? या सगळ्या शक्यतांचा मी बारकाईने विचार करायला लागलो. परदेशात गेल्यावर प्रथम वेळ कशाला मिळाला तर वाचनाला. त्यामुळे वेद-उपनिषद यांच्यावर आधारित बऱ्याचशा पुस्तकांचं वाचन झालं. मग भेटणाऱ्या प्रत्येक माणसाकडे 'पर्सनल इंजिनिअरिंग'च्या लोलकातून पाहू लागलो. माणसं वरच्या पदापर्यंत काम करतात. त्यांचा हा प्रवास कुठून सुरू झाला याचा विचार करू लागलो. उदा. अंबेजोगाईसारख्या छोट्या खेड्यातून आलेल्या प्रमोद महाजनांचा 'पंतप्रधानपदाचे दावेदार' इथपर्यंतचा प्रवास कसा झाला? ते या पातळीपर्यंत कसे पोहचले? आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर त्यांचं आयुष्य बदललं? त्यांनी ही झेप कशी घेतली? या दृष्टिकोनातून मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहायला लागलो. 'पर्सनल इंजिनिअरिंग'मध्ये याच अनुषंगाने विचार केला जातो. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक पीळ शोधणे, त्याचे अंत:स्तर शोधणे हे मला कमालीचे आव्हानात्मक आणि रंजक वाटते. अशा प्रकारचा विचार हीच माझी मूलभूत प्रेरणा आहे. मग याच प्रेरणेतून मी माणसं शोधायला लागलो. उदा. एखाद्या माणसात ८० टक्के आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी असतात पण २० टक्के गोष्टी या वेगळ्या, चांगल्या असू शकतात. प्रत्येक माणसातील या वेगळ्या गोष्टीचा समुच्चय करून त्या सगळ्या गोष्टी एका माणसात रुजवता येतील का हा माझ्या विचारांचा गाभा होता. अर्थात तसा माणूस जन्माला घालणे मला अपेक्षित नाही. पण असे चांगले गुण एकत्र केले तर घडणारा माणूस कसा असेल याचे गणित मांडले. हे शिक्षणातून घडवता येईल असा विश्वास मला वाटू लागला. वयाची चाळिशी-पन्नाशी उलटलेली माणसे माझ्या प्रयोगाच्या दृष्टीने योग्य नव्हती. कारण या वयापर्यंत त्यांच्या विचारांचे पीळ एवढे घट्ट झालेले असतात की ते बदलणं शक्य नसतं. त्यामुळे हे प्रयोग महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर करता येऊ शकतात का याचा विचार करायला मी सुरुवात केली. अशा प्रकारे 'मानवीय संसाधन' या विषयाकडे मी वळलो.

'मनुष्यबळ' या संकल्पनेचा व्यापक पातळीवर विचार करताना असं लक्षात येतं की माणसाच्या सगळ्या प्रेरणा या निसर्गप्रेरित असतात. या प्रेरणांचं मूळ निसर्गात शोधता येतं. कोणत्या गोष्टी माणूस निसर्गातून उचलू शकतो हे आपण शोधलं पाहिजे असं मला प्रकर्षाने वाटू लागलं. उदा. झाड सडण्याची प्रक्रिया मुळापासून सुरू होत नाही तर झाडाच्या शेंड्यापासून सुरू होते. जिथे उंची आहे तिथं सडणं आहे हा निसर्गनियम झाला पण या नियमात मुळं मात्र तळाशी असतात. ती घट्ट जमिनीला धरून असतात. अशी माणसात कोणती मुळं असतात जी शेवटपर्यंत घट्ट राहतात हे पाहणं गरजेचं आहे. निसर्ग हा प्रेरणांचा स्रोत (Source) मानला तर माणूस हा साधन (Resource) ठरतो. 'व्यक्ती-सृष्टी-


समष्टी-पारमेष्टी' हे निसर्गाचे चार भाग आहेत. या सर्वांचा एकत्रित विचार केला तर लक्षात येते की वाघाने हरीण खाल्लं तर सृष्टीचे डोळे पाणावत नाहीत. ती तटस्थ असते. कारण दोन्ही गोष्टी तिच्याच गाभ्यातून उत्पन्न झाल्या आहेत. कुठलाही माणूस विकसित होताना ही तटस्थता त्याच्या व्यक्तिमत्त्वात येऊ शकते का? हा विचार मी महत्त्वाचा मानला. या विचारांतून माणसांच्या व्यक्तिमत्त्वाची वळणं मी ओळखायला शिकलो. याच विचारांना केंद्रस्थानी ठेवून देश-परदेशात हजारो लोकांना प्रशिक्षणे दिली. त्यात मी पारंपरिक पद्धती नेहमीच टाळली आणि नवीन पद्धती मांडली. म्हणजे नुसते विचार मांडण्यापेक्षा त्या विचारांचं उपयोजन कसं करता येईल याला मी महत्त्व द्यायला सुरुवात केली. कोणत्या माणसांना कुठे काम करायचंय? त्यांना कुठे वळवायचंय हे मला नेमकेपणाने ज्ञान होत गेलं. त्यामुळे व्यवस्थापन असू दे, प्रकल्प असू दे, अध्यापन असू दे, प्रशिक्षण असू दे की मानवी संसाधने असू दे. या सगळ्यात 'मनुष्य' हाच केंद्रस्थानी असला पाहिजे हे मला पटत गेलं. या मनुष्यांची सकारात्मक गुणांची बैठक जर पक्की असेल तर तो कुठल्याही क्षेत्रांतील आव्हाने सहज पेलू शकतो हे सत्य अधोरेखित झालं. माणसाचा कणा मजबूत हवा.

आणखीन एक उदाहरण मला इथे मुद्दामहून नमूद करावेसे वाटते. ते म्हणजे आमच्या अमेरिकन कंपनीतील एक माणूस लिंगबदल करून आला. माझ्यासाठी हा सांस्कृतिक धक्का होता. पण माझ्या वरिष्ठ सहकाऱ्याने त्या माणसाशी कसे वागायचे, बोलायचे याचे नियम समजावून सांगितले. मग माझे विचारमंथन सुरू झाले की ठीक आहे कार्यालयात आम्ही या माणसाचे समायोजन करून घेऊ पण घरीदारी त्याच्याबरोबर वावरणाऱ्या माणसांच्या विचारांत कसा बदल घडवून आणायचा या विचारांचा भुंगा माझ्या मनात पिंगा घालू लागला. ''त्या माणसाला रागवू नका'', ''त्याचा तिटकारा करू नका'', हे विचार मांडणे खूप सोपे आहे. पण हेच विचार मनातून मुळातच उत्पन्न होण्यासाठी माणसांना कसं घडवायचं यावर मी विचार करायला सुरुवात केली. त्यातूनच माझ्या पुस्तकात या विषयावरची दोन प्रकरणे मी लिहिली. हे सगळे विचार म्हणजेच 'पर्सनल इंजिनिअरिंग' होय!

विचारांचा हा कण जेव्हा मला सापडला तेव्हा मग मानवी व्यक्तिमत्त्वांच्या जडणघडणीमागची कारणमीमांसा मला सहज उलगडून दाखवता यायला लागली. त्याचा परिणाम अत्यंत परिणामकारक प्रशिक्षण वर्ग घेणं मला शक्य झालं. मला सापडलेल्या या गुरुकिल्लीचा परिणाम असा झाला की कोणत्याच कामाला कधीच नकार देत नाही.

हीच गोष्ट मी जेव्हा अभिनय करतो, दिग्दर्शन करतो तेव्हा कामाला येते. एखादं पात्र मी साकार करतो तेव्हा माझ्यातील दीपक करंजीकर मेलेला असतो. हे मला जमलं तरच मी भूमिकेला न्याय देऊ शकतो. माझे मूळ व्यक्तिमत्त्व सर्व पात्रांत दिसू लागले तर भूमिकेचा आत्माच हरवून जाईल. सगळे रोल एकाच पद्धतीने करणारे अनेक अभिनेते आपल्याकडे आहेत. त्यांची मूळ व्यक्तिमत्त्वं भूमिकेत डोकावत राहतात. मग तो अभिनय उपरा वाटायला लागतो. मीही सुरुवातीला ही चूक केली पण 'पर्सनल इंजिनियरिंग'मुळे व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल करता येतो हे मी अनुभवले होते. तो अनुभव मला इथेही कामाला आला. भूमिका जगणं म्हणजे काय हे समजलं तेव्हा अभिनय/दिग्दर्शन या दोन्ही गोष्टी माझ्यासाठी आनंदाचा सोहळा झाला. समोरचा माणूस कितीही खचलेल्या मानसिकतेत असला तरी आपण त्याला प्रेरणा देऊ शकतो. त्याच्या गाभ्याला हात घालून आपल्याला हवे ते बदल आपण त्याच्या व्यक्तिमत्त्वात घडवून आणू शकतो, हे मला दिग्दर्शन करताना लक्षात आलं. गुणांचा विकास होण्यासाठी कोणी कामच करत नाही. पूर्वी नकळतपणे जे संस्कार एकत्र कुटुंबव्यवस्थेत सहज व्हायचे ते आता होतच नाहीत. त्यातूनच चांगल्या गुणांचा वावरही सर्रास वाईट कामासाठी होताना दिसतो. उदा. उत्तम क्वतृत्वाच्या आधारे माणसांना फसवणारे अनेक महाभाग आपण पाहतोच की! मग या चांगल्या गुणांना रुजवण्याचे काम मी सुरू केलं. त्या अनुषंगाने माझे विचार मांडू लागलो. सांस्कृतिक (संस्कृती) मंत्रालयातील एक सदस्य म्हणून काम करताना माझे हेच विचार मी हिरीरीने मांडले. 'रक्त आणि श्वास जोपर्यंत शरीरात फिरतात तोपर्यंत शरीर पूर्ण क्षमतेने काम करते. या दोन गोष्टींना अडथळा आला तर कधी एखादा अवयव निकामी होतो किंवा जीवनच नष्ट होते. तसेच देशात कला-कलावंत सुखाने

**'पर्सनल इंजिनियरिंग'मुळे व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल करता येतो हे मी अनुभवले होते. गाभ्याला हात घालून आपल्याला हवे ते बदल आपण त्याच्या व्यक्तिमत्त्वात घडवून आणू शकतो, हे मला दिग्दर्शन करताना लक्षात आलं. गुणांचा विकास होण्यासाठी कोणी कामच करत नाही. पूर्वी नकळतपणे जे संस्कार एकत्र कुटुंबव्यवस्थेत सहज व्हायचे ते आता होतच नाहीत. त्यातूनच चांगल्या गुणांचा वावरही सर्रास वाईट कामासाठी होताना दिसतो. उदा. उत्तम क्वतृत्वाच्या आधारे माणसांना फसवणारे अनेक महाभाग आपण पाहतोच की! मग या चांगल्या गुणांना रुजवण्याचे काम मी सुरू केलं. त्या अनुषंगाने माझे विचार मांडू लागलो. सांस्कृतिक (संस्कृती) मंत्रालयातील एक सदस्य म्हणून काम करताना माझे हेच विचार मी हिरीरीने मांडले.**



नांदतील तर देश सुरळीत चालेल' हा विचार मी तिथे प्रामुख्याने मांडला. म्हणजे संगीताचा आत्मा ज्याला गवसलेला आहे तो मल्याळी माणूस काश्मीरमधील सुफी संगीताची भाषा माहीत नसताना आनंद घेऊ शकतो. अशी सांस्कृतिक व्यापकता आणि सर्वसमावेशकता सर्व देशांतील नागरिकांत निर्माण करता आली तर देश सुरळीत चालू शकतो, हा विचार घेऊन मी या मंत्रालयात काम करतो आहे.

**डॉ. संजय देशमुख :** दीपक तू आता तुझ्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन घडविलेस/ घडवतोस. हे सर्व ऐकत असताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे तू सतत स्वत:ला उत्क्रांत करत राहतोस. त्यासाठी नवीन ज्ञान, नवीन कौशल्य शिकतोस. नुसतं शिकत नाहीस तर तू त्या ज्ञानाचं, अनुभवांचं अत्यंत समर्थपणे उपयोजन करतो. ही गोष्ट तू प्रत्येक क्षेत्रात केली. त्यातूनच तू सामान्य माणसांच्या जीवनशैलीवर प्रचंड प्रभाव टाकतोस. तू रेल्वे महामंडळातील एक सदस्य म्हणून काम केलेस तेव्हाही तू असाच आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवलास. हे सगळं तू तिथे कसं साध्य केलंस?

**दीपक करंजीकर :** या प्रश्नाचा खोलात विचार करायचा असेल तर माझ्या जीवनाच्या मुळापर्यंत जाणे इष्ट ठरेल. धुळे इथल्या छोट्याशा गावी वास्तव्य, मग नाशिक आणि मग कॉर्पोरेट विश्वात प्रवेश. मग थेट परदेश प्रवास. माझं विश्व हे असं हळूहळू वैश्विक होत गेलं. याआधीही मी 'आजच्या विश्वाचे आर्त' हे पुस्तक लिहिलं होतं. देश-परदेशात खूप फिरताना मला जाणवलं की आपल्या जीवनाचं वस्तुकरण झालंय. माझे हे विचार मी भाषणात मांडायला सुरुवात केली. हे भाषण योगायोगाने तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी ऐकले आणि त्यांना मला रेल्वे बोर्डातील एक सदस्य म्हणून आमंत्रित केलं. माणसांच्या जगण्यात मूल्यात्मक-गुणात्मक बदल कसे करता येतील या दिशेने मी तिथेही माझे विचार मांडण्यास सुरुवात केली. त्यासाठी वेगवेगळी ध्येयं-धोरणं आखून ठरवली. आणि या गोष्टीचे सकारात्मक परिणाम दिसू लागले. मला अशा पद्धतीने काम करताना भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते विनय सहस्त्रबुद्धे यांनी पाहिलं आणि आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सोशल-इकॉनॉमिक टीम' यासाठी माझं नाव पुढे केलं. या अंतर्गत मला शेतीशास्त्र या विभागात काम देण्यात आलं. खरंतर मी शेतकरी नाही पण माझा या क्षेत्रातील आदर्श म्हणजे शेतकरी नेते शरद जोशी हे होय! त्यांच्या विचारांचा माझ्यावर खूप खोल परिणाम झाला होता. त्या विचारांचा मला या 'सोशल इकॉनॉमिक टीम'मध्ये खूप फायदा झाला. एकदा पंतप्रधान समोर बसलेले असताना मी विचार मांडले. "Eat what you can and can what you can't." माझ्या या बोलण्यावर मोदीजींनी प्रश्नांकित मुद्रा केली. ते म्हणाले, ''याचा अर्थ काय?'' तेव्हा या वाक्याचा अधिक विस्तार करताना मी असं मत मांडलं की आपण शेतीमधून खूप अन्नधान्य निर्माण केलं. पार हरितक्रांती केली. पण धान्यावर प्रक्रिया करून त्याची साठवणूक करणे मात्र आपल्याला तेवढ्या प्रमाणात जमलं नाही. वास्तविक अन्नपदार्थांवर प्रक्रिया करून त्यांना दीर्घकाळ टिकवून ठेवणे ही भारताची सामूहिक परंपरा आहे. आपण लोणची घालतो, दुधापासून दही-ताक-तूप-लोणी बनवतो. पण अन्नधान्याच्या बाबतीत प्रक्रिया करणे आपल्याला जमलेलं नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान होते. हे जेव्हा यशस्वीपणे करू तेव्हा देशातील शेतकऱ्यांचे अर्धे प्रश्न सुटलेले असतील.'' माझ्या या बोलण्यावर प्रधानमंत्री म्हणाले, ''अहो हे वाक्य तर कृषिमंत्रालयाचे घोष वाक्य हवे.'' मी नम्रपणे म्हणालो, ''हे वाक्य माझे नाही. शरद जोशी यांचे आहे.'' या विभागात मी अत्यंत निर्भयपणे, टोकदारपणे Produce ते process अर्थात निर्मिती ते प्रक्रिया या विषयावर माझी मते स्पष्टपणे मांडत गेलो. आपली मते योग्य ठिकाणी योग्य वेळी मांडली, राजकीय भान ठेवून आपण बोललो तर आपले विचार प्रचंड मोठ्या बदलाची नांदी ठरू शकतात असा माझा अनुभव आहे. तुझे गुरू श्री स्वामिनाथन यांनी या संदर्भात डोंगराएवढं काम केलं आहे. त्यातील एक टक्का जरी मी लोकांपर्यंत मांडू शकलो तर मी स्वत:ला धन्य समजेन. यासंदर्भात वैशिष्ट्यपूर्ण ध्येयधोरणं आखणं, दबावगट तयार करणे, वेगवेगळ्या घटकांने नियोजन करणे खूप गरजेचे आहे.

**डॉ. संजय देशमुख :** तुझ्या या विविध क्षेत्रातील अविस्मरणीय कामगिरीमुळे तुला अनेक ठिकाणी व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले जाते. तूही

**आपण शेतीमधून खूप अन्नधान्य निर्माण केलं. पार हरितक्रांती केली. पण धान्यावर प्रक्रिया करून त्याची साठवणूक करणे मात्र आपल्याला तेवढ्या प्रमाणात जमलं नाही. वास्तविक अन्नपदार्थांवर प्रक्रिया करून त्यांना दीर्घकाळ टिकवून ठेवणे ही भारताची सामूहिक परंपरा आहे. आपण लोणची घालतो, दुधापासून दही-ताक-तूप-लोणी बनवतो. पण अन्नधान्याच्या बाबतीत प्रक्रिया करणे आपल्याला जमलेलं नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान होते. हे जेव्हा यशस्वीपणे करू तेव्हा देशातील शेतकऱ्यांचे अर्धे प्रश्न सुटलेले असतील.**

अनेकांची भाषणे ऐकतोस. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे तू ज्यांच्याकडून जे विचार स्वीकारतोस त्या-त्या व्यक्तींना त्या विचारांचे श्रेय देतोस इतकेच नव्हे तर विचारांची समर्थपणे अंमलबजावणी करतोस. हे फार महत्त्वपूर्ण असं तुझ्या व्यक्तिमत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. यासाठी तू खूप प्रवास करतोस. कामाच्या निमित्ताने तू जगभर प्रवास करतोस. काय सांगशील तुझ्या या प्रवासाबद्दल?

**दीपक करंजीकर :** मी फिरतो. खूपच फिरतो. कामाच्या निमित्ताने जरी गेलो तरी काम संपलं आणि मी परत आलो असं होत नाही. कारण मला माणसं वाचायला, ओळखायला आवडतात. कामानिमित्त गेलो तरी मुद्दाम, मीटिंगमधला जरा मोकळेपणाने आपली मतं मांडणारा माणूस शोधतो, त्याच्याशी मैत्री करतो आणि त्याच्या घरी जाण्यासाठी आग्रह धरतो. स्वीडन-नॉर्वेसारख्या देशात तर माणसं फारसं बोलत नाहीत त्यांना आपलं जीवन सार्वजनिक करणे आवडत नाही पण याही माणसांच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांना बोलतं करणं मला सहज जमतं. माणसांचा देश भिन्न असला, धर्म भिन्न असला तरी त्यांच्या मूलभूत प्रेरणा जगाच्या पाठीवर सारख्याच असतात. या सार्वत्रिक सत्याचा मला अनुभव नेहमीच येतो, हे असे अनुभव मला संपन्न करतात. मी भारतातही खूप भटकलोय. हिमालयातील जवळपास सर्व खिंडी मी बाईकवर भटकून पार केल्या आहेत. थोरो नावाच्या एका समाजशास्त्रज्ञाचे वाक्य आहे की एकट्याने प्रवास केला तर आपल्याला आपल्या मनाचा आवाज ऐकता येतो. मीही या उक्तीला स्मरून बऱ्याचदा एकट्याने प्रवास करतो. या एकटेपणात मला माझ्या विचारांचे मंथन करता येते. नवीन योजना आखता येतात. त्यांच्या अंमलबजावणीसाठीची धोरणं ठरवता येतात. एकट्याने प्रवास करणं खूप संपन्न करणारं आहे.

**डॉ. संजय देशमुख :** तू हा प्रवास अगदी संगणक, इंटरनेट, मोबाईल या गोष्टींचा शोध लागायच्या आधीही केलाय आणि आताही करतोय. पण संसारात पडल्यानंतर जबाबदाऱ्या वाढतात. या वाढलेल्या जबाबदाऱ्या सांभाळत तू प्रवासाचं आव्हान कसं पेलतोस? यातील एकटेपणा कसा जपतोस?

**दीपक करंजीकर :** एक वाक्य नेहमीच माझ्या डोक्यात असते की 'मृत्यू हा शाश्वत आहे तर जीवन अशाश्वत आहे' हे जीवनाचे सत्य, मी मला मृत्यूची भीती वाटते म्हणून लक्षात ठेवत नाही तर वास्तवाची माझी जाणीव भक्कम असावी, यासाठी लक्षात ठेवतो. माझा आजचा दिवस हा माझ्या जीवनातील शेवटचा दिवस असेल, तर मी सर्वांशी कसा वागेन, कसा बोलेन या विचारातून माझे वर्तन मी करतो. तेच प्रवासाच्या बाबतीत. कारण एकटं होणं म्हणजेच एका अर्थाने लोकांबरोबर जोडलं जाणं. एकटेपणात माणूस स्वत:ला ओळखू लागतो आणि जो स्वत:ला ओळखतो तो लोकांनाही सहज ओळखू शकतो. म्हणूनच एकटेपणाकडे जाणे म्हणजे पर्यायाने लोकांकडे जाणे होय. ही संधी मला प्रवासात मिळते. प्रवासासाठी पैसा काय कसाही उभा करता येतो. पण संसाराच्या जबाबदाऱ्या ही खूप मोठी गोष्ट आहे. मला वाटतं पण या जबाबदाऱ्या सगळ्यांच्या असतात. प्रत्येकाने त्या समजून घेतल्या तर एकट्याने प्रवास करता येणं शक्य असतं. म्हणूनच थोर विचारवंत कृष्णमूर्ती यांच्या 'स्वत:कडे वळा' या उक्तीला स्मरून एकटा प्रवास करतो आणि स्वत:कडे वळतो.

**डॉ. संजय देशमुख :** आयुष्याचं खूप मोठं सार तू मांडलंस. माझा पुढचा प्रश्न वेगळा आहे. तू वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करतोस. व्याख्याने देतोस, ध्येयधोरणं आखतोस. प्रत्येक क्षेत्रांत तुझीही कोणी प्रेरणास्थानं असतीलच. मग ती व्यक्ती असेल, घटना असेल. तू निरीक्षण करून त्यातून स्वतःला घडवत जातो. मला सांग, सामान्य माणसांशी संवाद साधताना, कॉर्पोरेट विश्वातील लोकांशी संवाद साधताना किंवा सरकारी पातळीवरील माणसांशी संवाद साधताना तू या प्रेरणास्थानांचा वापर कसा करतोस?

**दीपक करंजीकर :** एकच एक माणूस आयुष्यभर आपल्या प्रेरणास्थानी असू शकत नाही. बुवा, बाबा, पंत यांना आयुष्यभर प्रेरणास्थान मानणाऱ्या लोकांत माझा समावेश होत नाही. मला खूप लोक प्रेरणा देतात. माझं पहिलं प्रेरणास्थान अर्थातच 'पुस्तकं'! त्यानंतर मग वेगवेगळी माणसं. मी जेव्हा प्रशिक्षण देतो तेव्हा समोरील प्रेक्षक हेच माझं प्रेरणा स्थान असते. हे प्रेक्षक सतत बदलत असतात. त्यांच्या कलांचा अंदाज घेऊनच मी प्रशिक्षण देतो. यात मला प्रश्नोत्तराचा सामना करावा लागतो. आपण कोणाला तरी जाब


**मला माणसं वाचायला, ओळखायला आवडतात. माणसांचा देश भिन्न असला, धर्म भिन्न असला तरी त्यांच्या मूलभूत प्रेरणा जगाच्या पाठीवर सारख्याच असतात. या सार्वत्रिक सत्याचा मला अनुभव नेहमीच येतो, हे असे अनुभव मला संपन्न करतात. थोरो नावाच्या एका समाजशास्त्रज्ञाचे वाक्य आहे की एकट्याने प्रवास केला तर आपल्याला आपल्या मनाचा आवाज ऐकता येतो. मीही या उक्तीला स्मरून बऱ्याचदा एकट्याने प्रवास करतो. या एकटेपणात मला माझ्या विचारांचे मंथन करता येते. नवीन योजना आखता येतात. त्यांच्या अंमलबजावणीसाठीची धोरणं ठरवता येतात. एकट्याने प्रवास करणं खूप संपन्न करणारं आहे. एकटेपणात माणूस स्वत:ला ओळखू लागतो आणि जो स्वत:ला ओळखतो तो लोकांनाही सहज ओळखू शकतो. म्हणूनच एकटेपणाकडे जाणे म्हणजे पर्यायाने लोकांकडे जाणे होय.**



**सामान्य लोकांना सामोरे जाताना कम्युनिकेशन (संवादात्मकता) महत्त्वाची ठरते तर कॉर्पोरेट विश्वाला सामोरे जाताना कमिटमेंट (वचनांची बांधिलकी) महत्त्वाची ठरते. पण सरकारी विश्वाला सामोरे जाताना कन्व्हिक्शन (धारणा) अर्थात दुसऱ्याचे म्हणणे समजून घेऊन योग्य निर्णय घेण्याची क्षमता महत्त्वाची ठरते. मी त्यासाठी त्या व्यवस्थेत मिसळून जाण्याचा प्रयत्न करतो. कारण बाहेरून विचार लादणे इथे शक्य नसते. म्हणून सरकारी पातळीवर काम करताना यंत्रणेचा भाग बनणे अत्यंत गरजेचे ठरते असं मला वाटतं.**

देणे लागतो ही भावना मला सतत नवीन ज्ञान घेण्यासाठी प्रोत्साहित करते. त्यामुळे मी वेगवेगळ्या पैलूंचा विचार करतो. वेगवेगळ्या शक्यता तपासून पाहतो. या प्रक्रियेत मीच तावून सुलाखून निघतो आणि माझी विचारप्रक्रिया बहुआयामी होत जाते. ज्याचा वापर सामान्य माणसांना सामोरे जाताना मला होतो. ही माणसं रेल्वे फलाटावरील गर्दीसारखी असतात. सतत बदलत असतात. अशा बदलत्या समूहाला मी एकाच साचेबद्ध विचारातून प्रशिक्षण देऊ शकत नाही. त्यामुळे सर्वांमधून एखादा सामान्य सामाईक घटक शोधून मग मी माझ्या प्रशिक्षणाची दिशा ठरवतो. समोरची माणसं कोणत्या स्तरातील आहेत हे प्रथम लक्षात घ्यावे लागते. त्यांना कुठे हसवायचे, कुठे विचारप्रवृत्त करायचे याचे पक्के आराखडे बांधावे लागतात. माझ्या भाषणाला वेळ असेल तर सभागृहातील लोकांच्या देहबोलीचा मी अंदाज घेतो. त्यांचा थांग शोधण्याचा प्रयत्न करतो. याचा मला मग भाषण करताना सहज उपयोग करता येतो.

कॉर्पोरेट विश्वाला सामोरे जाताना मला कीर्तनकाराची मानसिकता वापरून चालत नाही. तो विशिष्ट उद्देशाने एकत्र आलेला समूह असतो. त्यांच्या विचारांचा प्रवास एकरेषीय असतो. मी अशा समूहात जाताना नेहमी आधी अनौपचारिक चर्चा करतो. या चर्चेमध्ये त्यांना काय आवडते हे समजून घेतो. मग नेमके त्यांच्या विचारांना धक्का देणारे विचार मांडतो. उदाहरणार्थ, एकदा एका मोठ्या कंपनीत मला आमंत्रित केलं होतं. माझा विषय होता 'कमिटमेंट व्हॅल्यू' (वचनबद्धतेचं मूल्य!) मी त्यावेळी एक विधान केलं, ''Commitment and unattachment are the two sides of the same coin.'' या दोन्ही परस्पर भिन्न गोष्टी असल्याने एका प्रशिक्षणार्थीने या विधानाला आक्षेप घेतला. त्याचं म्हणणं बरोबर होतं. पण त्या विचारांतील गल्लत मी त्याला समजावून सांगितली. 'जर तुम्ही जीवनाच्या इतर व्यवधानापासून, पाशांपासून स्वतःला तोडू शकलात तरच दिलेल्या जबाबदारीचे काम तुम्ही समरसतेने करू शकाल. जर इतर गोष्टी काम करताना आठवत राहिल्या तर नक्कीच कामावर त्याचा विपरीत परिणाम होणार.' हे स्पष्टीकरण ऐकून त्या माणसाचे समाधान झाले. माझा विचार त्याला एकदम भावला. या अशा प्रकारच्या समूहाला सामोरे जाताना माझी मानसिकता–विचारसरणी स्पष्ट असते. इथे मी पैसे घेऊन गेलेलो असतो. त्यामुळे लोकांना काय आवडेल त्यापेक्षा कंपनीला अपेक्षित असणारे सकारात्मक वैचारिक बदल कर्मचाऱ्यांमध्ये कसे घडवता येतील यावर मी माझ्या विचारांचा केंद्रबिंदू ठरवतो.

संजय, तू सांगितलेली तिसरी पातळी म्हणजे सरकारी पातळी. ही पातळी एकरेषीय आहे आणि बहुरेषीय पण आहे. तिकडे एखादी गोष्ट घडावी आणि तीच गोष्ट घडू नये यासाठी अनेक दबावगट कार्यरत असतात. बोलणाऱ्याच्या मनात नेमके काय आहे याचा पत्ता लागणे कठीण असते. जणू तुम्ही फिरत्या रंगमंचावर काम करत असता. कधी कोण काय बदलेल सांगता येत नाही. हे विश्व अत्यंत धोक्याचं आणि निसरडं आहे. वेगवेगळ्या लोकांचे वेगवेगळे हितसंबंध इथे गुंतलेले असतात. त्यामुळे थेट वार करता येत नाही. म्हणजे सामान्य लोकांना सामोरे जाताना कम्युनिकेशन (संवादात्मकता) महत्त्वाची ठरते तर कॉर्पोरेट विश्वाला सामोरे जाताना कमिटमेंट (वचनांची बांधिलकी) महत्त्वाची ठरते. पण सरकारी विश्वाला सामोरे जाताना कन्व्हिक्शन (धारणा) अर्थात दुसऱ्याचे म्हणणे समजून घेऊन योग्य निर्णय घेण्याची क्षमता महत्त्वाची ठरते. मी त्यासाठी त्या व्यवस्थेत मिसळून जाण्याचा प्रयत्न करतो. कारण बाहेरून विचार लादणे इथे शक्य नसते. म्हणून सरकारी पातळीवर काम करताना यंत्रणेचा भाग बनणे अत्यंत गरजेचे ठरते असं मला वाटतं.

**डॉ. संजय देशमुख :** सामान्य माणूस, कॉर्पोरेट विश्व आणि सरकारी पातळी या तिन्ही पातळ्यांवर काम करताना कसे वेगवेगळे आराखडे बांधावे लागतात याचे खूप छान विवेचन तू मांडलेस. माझा पुढचा प्रश्न वेगळा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपण देशातील अनेक समस्या वेगवेगळ्या मार्गांनी सोडविण्याचा प्रयत्न केला. हरित क्रांती, धवल क्रांती ते नील क्रांती (ब्लू रेव्होल्यूशन) अशा वेगवेगळ्या संकल्पना राबवून यशस्वी करून दाखविल्या. जगाचा विचार केला तर दहा ते बारा टक्के लोकांकडे ८८ टक्के संपत्ती आहे. भारतातही ही विषमता दिसतेच. संपत्तीचं असमान वाटप हा भारताला लागलेला शाप आहे. विकास मोजण्याच्या आज वेगवेगळ्या मापन पद्धती

आहेत. उदाहरणार्थ, जीडीपी वगैरे. या सर्वांकडे तू कोणत्या दृष्टिकोनातून बघतोस?

**दीपक करंजीकर :** याचं उत्तर समजून घेताना आपल्याला दोन संस्कृतींची तुलना करणं गरजेचं आहे. एक कृषिसंस्कृती आणि दुसरी कारखानदारी संस्कृती. कृषिसंस्कृतीला हजारो वर्षांचा इतिहास आहे. ही संस्कृती परस्परपूरक होती. एकमेकांवर अवलंबून होती. कारण तिथे सगळ्यांचं जगणं एकमेकांशी जोडलेलं होतं. हा निसर्गनियमच आहे. निसर्गात ही परस्परावलंबिता आपल्याला सहज पाहायला मिळते. या कृषिसंस्कृतीत धन निर्माण झालं. उदाहरणार्थ, गोधन, पशूधन, मनुष्यधन वगैरे. हे धन स्थावर होतं. शाश्वत होतं. परस्परावलंबी होतं. कारखानदारी वाढली तेहा धनाचे द्रव्यात रूपांतर झाले. पूर्वीचं धन हे स्थिरस्थावर होतं. सर्वांना उपयोगी ठरणारं होतं. पण धन प्रवाही झालं, त्याचं द्रव्य झालं आणि जेव्हा एखादी गोष्ट प्रवाहित होते तेव्हा तिला मोजण्यासाठी मापनपद्धती अस्तित्वात येते. मापनपद्धती आली की मुबलकता निघून जाते. ही मुबलकता जगण्यातील असेल, वस्तूंमधील असेल किंवा शेतीमधील असेल. मापन आल्यावर मुबलकता संपली आणि साठवणूक सुरू झाली. त्यातून मग पुरवठ्यावरून मागणी नियंत्रित करण्याची कला विकसित झाली. कारण त्यात नफा होता. अशाप्रकारे धन-द्रव्य-चलन असा प्रवास सुरू झाला तेव्हा माणसाच्या जगण्याचं वस्तूकरण सुरू झालं. कारखानदारी युरोपमध्ये निर्माण झाली, औद्योगिक क्रांती त्यांनी घडवली हे जरी खरं असलं तरी ते कच्च्या मालासाठी आपल्या वसाहतींना लुटत होते. भारतातील शेतकऱ्याने पिकवलेल्या कापसावर मँचेस्टर तयार झाले हे ढळढळीत सत्य आहे. म्हणजे कारखानदारी संस्कृतीत परस्परावलंबिता मोडीत निघाली आणि एकरेषीय अवलंबितता तयार झाली. इथे फक्त घेणं होतं; देणं नव्हतं. निसर्गाकडून घेऊन, शेतीकडून घेऊन मानवनिर्मित माल तयार व्हायला लागला. नफा वाढू लागला. पण निसर्गाला, शेतीला त्यासाठी वेठीस धरले गेले. या पार्श्वभूमीवर मला 'निओ लिबरॅलिझम' ही संकल्पना चुकीची वाटते. करप्रणालीचा आपण या संदर्भात विचार करू. माझ्या मते कर कसा आणि किती असावा तर मधमाशी फुलातून मध गोळा करते तसा आणि तेवढाच! इथे मधमाशी-फूल एकमेकांशी देवाण-घेवाणीने जोडलेले आहेत. मधाच्या बदल्यात फुलांच्या परागकणांचे सिंचन मधमाशीच्या पायाच्या माध्यमातून होते. बरोबर या उलट करप्रणाली. आम्ही कर लादणार? तुम्ही गुपचूप तो भरणार. ही शोषण पद्धती आहे. हेच अर्थकारण आज जगभर चालते आहे. त्याचा परिणाम समस्त मानव जातीवर होतो. तसंच निसर्गाचं. एखाद्या देशाचा नैसर्गिक तोल ढासळला तर त्याचा जगावर परिणाम होतो. पण लोक हे लक्षात न घेता आपापल्या देशांपुरताच विचार करतात. हीच जगाची शोकांतिका आहे. भारतापुरते बोलायचे झाल्यास पाश्चात्य संस्कृतीने निर्माण केलेले विकासाचे मोजमाप अर्थात जीडीपी आपणही तसेच्या तसेच वापरतो. या जीडीपी मापनात वस्तू, सेवा, कृषी या तिन्हींचा अंतर्भाव होतो. पूर्वी जगभरात कृषी क्षेत्र आणि कारखानदारी ही प्रमुख क्षेत्र होती. त्यात आता सेवा क्षेत्राचा शिरकाव झाला. जीडीपी मोजताना वेगवेगळ्या सेवा गृहीत धरल्या जातात. उदाहरणार्थ, घरी-दारी, शेजारी-पाजारी माणूसकी धर्म म्हणून आपण जी सेवा एकमेकांना देतो ती सेवा सुद्धा या अंतर्गत मोजण्याची पद्धत आहे. तसंच काही देशांत कृषी क्षेत्र स्वतंत्र न मानता 'इतर व्यवसाय' या अंतर्गत मोजलं जातंय. म्हणून लोकांनी एकमेकांना दिलेली सेवा जर जीडीपी मोजताना गृहीत धरली तर आपला जीडीपी अमेरिकेपेक्षा जास्त होईल- तोही वास्तवात कोणताही विकास घडलेला नसताना. म्हणून मला विकास मापनाची ही पद्धतच मंजूर नाही. आपण आपल्या सामाजिक व्यवस्थेनुसार विकासाची नवीन मापन पद्धती शोधली पाहिजे. भारतात इतकी विविधता आहे की, आपला वेगवेगळ्या पातळ्यांवरचा विकास हा पाश्चात्यांच्या मापन पद्धतीने मोजता येणं शक्य नाही. आपल्याला त्यांचे इंडेक्स वापरणे भाग ठरते कारण तरच परकीय गंगाजळी आपल्याकडे येऊ शकते आणि या परदेशी पैशाकडे आपल्याला डोळे लावून बसावे लागते. कारण आवश्यक तेवढा देशांतर्गत पैसा आपण निर्माणच केला नाही. वॉल स्ट्रीट, दलाल स्ट्रीटवर संपत्ती निर्माण होत नाही. तो कागदी पैसा आहे. संपत्ती ही फक्त आणि फक्त शेती आणि कारखानदारी यातून निर्माण होते. त्यासाठी लागणारी मूलभूत व्यवस्था गेल्या सत्तर वर्षांत आपण उभारू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आपल्या सम

**मला विकास मापनाची ही पद्धतच मंजूर नाही. आपण आपल्या सामाजिक व्यवस्थेनुसार विकासाची नवीन मापन पद्धती शोधली पाहिजे. भारतात इतकी विविधता आहे की, आपला वेगवेगळ्या पातळ्यांवरचा विकास हा पाश्चात्यांच्या मापन पद्धतीने मोजता येणं शक्य नाही. आपल्याला त्यांचे इंडेक्स वापरणे भाग ठरते. परदेशी पैशाकडे आपल्याला डोळे लावून बसावे लागते. कारण आवश्यक तेवढा देशांतर्गत पैसा आपण निर्माणच केला नाही. वॉल स्ट्रीट, दलाल स्ट्रीटवर संपत्ती निर्माण होत नाही. तो कागदी पैसा आहे. संपत्ती ही फक्त आणि फक्त शेती आणि कारखानदारी यातून निर्माण होते. त्यासाठी लागणारी मूलभूत व्यवस्था गेल्या सत्तर वर्षांत आपण उभारू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे.**




ाजव्यवस्थेनुसार मोजमापाचे नवीन आयाम, नवीन मापनपद्धती आपण विकसित केल्या आणि हे गणित समजून घेऊन परस्परावलंबित्व निर्माण करणारी व्यापारी पद्धत शोधली, देशांतर्गत मागणी वाढविली तर जगातील मोठा देश म्हणून भारत उभा राहू शकतो. पण आपण आपल्या देशाचा अभ्यास करत नाही, विविध क्षेत्रांतील पद्धतशीर माहिती गोळा करत नाही, लोकसंख्येचा शास्त्रोक्त अभ्यास करत नाही, तोपर्यंत हे शक्य नाही.

**डॉ. संजय देशमुख :** दीपक, मघाशी तू बोलताना पर्यावरणाचा मुद्दा मांडलास. वाढती लोकसंख्या ही आपली मोठी समस्या आहे. या लोकसंख्येला शाश्वत आधार देईल अशी अर्थशास्त्रीय व्यवस्था–तीही पर्यावरणपूरक–आपल्याला निर्माण करता येऊ शकते का?

**दीपक करंजीकर :** मला असं वाटतं economics is a science of resources. थोडक्यात अर्थशास्त्र हे एक संसाधनांचं शास्त्र आहे. संसाधनं निसर्गातून येतात. ती जपणं म्हणजेच पर्यावरण जपणं होय. उदाहरणार्थ, साडेसहा कोटी किरकोळ विक्रेते (रिटेलर) असताना मॉल उभारण्याची गरज होती का? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. रस्त्यावर खरेदी करताना माल हाताळणे, घासाघीस करणे, विक्रेत्याशी किंमतीवरून हुज्जत घालणे या गोष्टी सामाजिक आनंदाचा भाग आहे. हा आनंद 'मॉल संस्कृती'ने हिरावून घेतला. साधं उदाहरण देऊन मी हा कार्यकारण संबंध समजावून देतो. मेक्सिकोमध्ये मक्याचं कणीस खुडण्यासाठी देण्यात आलेली यंत्रे वापरायला कामगारांनी नकार का दिला हे शोधण्यासाठी मी तिथे गेलो होतो. अनेकांनी सांगितलं की मशीन छान आहेत. पण हाताने मका खुडताना आम्ही गप्पा मारत गावभराची माहिती मिळवतो. यंत्राशी काय बोलणार? म्हणून आम्हाला यंत्र नको. थोडक्यात विकास करताना माणसांची भावनिक–मानसिक देवाण–घेवाण विचारात घेणे गरजेचे आहे. कमी लोकसंख्या असलेल्या देशात हे फंडे कामाला येतात. पण जास्त लोकसंख्या असलेल्या देशात नाहीत. मला वाटतं, १९९१ला आपण ग्लोबलायझेशन करताना सेवा क्षेत्राचे बोट धरले त्याऐवजी कारखानदारीचा विकास केला असता तर आज भारताचे चित्र वेगळे असते.

**डॉ. संजय देशमुख :** पुस्तकातून तुझ्या ज्या विचारधारणा तू व्यक्त करतोस त्यामागची नेमकी प्रेरणा काय आहे हे जाणून घ्यायला मला निश्चितच आवडेल. घातसूत्र वाचताना जाणवतं की तुझे विचार सूत्रबद्ध, सुसंगत आहेत, त्यात सातत्य आहे. वेगवेगळे प्रवाह त्याच्यात येतात. हे तुझं अलौकिक लेखन! नेमकं कोणत्या टप्प्यावर तुला हे सगळं लिखित स्वरूपात मांडावे असं वाटलं?

**दीपक करंजीकर :** 'घातसूत्रा'च्या आधी मी 'आजच्या विश्वाचे आर्त' नावाचं एक पुस्तक लिहिलं होतं. 'सकाळ'मध्ये त्याचे काही भाग प्रकाशित झाले. शब्दालयच्या सुमती लांडे यांचं सहकार्य यावेळी मला मिळालं. मी अनेक दिवाळी अंकांमध्ये लिहितो. वर्तमानपत्रात लिहितो. त्यामागे माझी अशी भावना आहे की जे जगाचं आकलन मला झालंय ते लिखाणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवणे. पूर्वी मला नेहमी वाटायचं की, का लिहावं? लोकांनी ते का वाचावं? पण लिहायला लागलो, लोकांच्या प्रतिक्रिया येत गेल्या. मग मला जाणवलं की, आपण जे सांगतोय ते लोकांसाठी नवीन आहे, त्यांना ते आवडतंय आणि सांगण्याची आवड मला होतीच. मग ती आणखीन फुलत गेली. हे पुस्तक लिहिण्यासाठी सात वर्षे लागली. या काळात तब्बल ४८१ पुस्तकं, हजारोंच्या संख्येने स्फुट लेख यांचं वाचन केलं. त्याच्या नोंदीने माझ्या ६०–७० डायऱ्या भरून गेल्या. मला जे आकलन झालं, ज्या घटनांची संगती मी लावायचा प्रयत्न केला, त्यामागची कारणं शोधली, तेव्हा आश्चर्यकारकरित्या मी पुन्हा पुन्हा एकाच प्रकारच्या माणसांकडे पोहचायचो, एकाच ठिकाणी पोहोचायचो. ही माणसं मूठभरच आहेत पण त्यांचा जगभर पहारा आहे हे मला जाणवलं. माझ्या विचारांना, निष्कर्षांना सिद्ध करण्यासाठी मी पुरावे शोधले. ते लोकांसमोर मांडले. माझे विचार अंतिम आहेत असा माझा दावा नाही. त्याला तुम्ही आव्हान देऊ शकता. वेगळी मांडणी करून तुमचे पुरावे देऊन वेगळे विचार सिद्ध करू शकता. मला हीच विचारांची प्रक्रिया अपेक्षित आहे.

भारत आणि जग यांच्या विचारप्रक्रियेच्या पद्धतीत फरक असा आहे की, आपण मंडण–


**मला जे आकलन झालं, ज्या घटनांची संगती मी लावायचा प्रयत्न केला, त्यामागची कारणं शोधली, तेव्हा आश्चर्यकारकरित्या मी पुन्हा पुन्हा एकाच प्रकारच्या माणसांकडे पोहचायचो, एकाच ठिकाणी पोहोचायचो. ही माणसं मूठभरच आहेत पण त्यांचा जगभर पहारा आहे हे मला जाणवलं. माझ्या विचारांना, निष्कर्षांना सिद्ध करण्यासाठी मी पुरावे शोधले. ते लोकांसमोर मांडले. माझे विचार अंतिम आहेत असा माझा दावा नाही. त्याला तुम्ही आव्हान देऊ शकता. वेगळी मांडणी करून तुमचे पुरावे देऊन वेगळे विचार सिद्ध करू शकता. मला हीच विचारांची प्रक्रिया अपेक्षित आहे.**

खंडण-संश्लेषण या पायऱ्यांवरून जातो तर जगात विश्लेषणाला महत्त्व दिले जाते. म्हणजे ॲनालिसिस ही आपली विचारपद्धती नाही तर सिंथेसिस ही आपली विचारपद्धती आहे.

मला हे का करावेसे वाटले, त्यामागचे मोठे कारण म्हणजे ९/११ च्या अमेरिकेच्या ट्वीन टॉवरवर झालेला आत्मघातकी हल्ला. सगळं जग या हल्ल्याने हादरलं असताना माझा एक मित्र, जो मुळात क्रूर नाही, तो शांतपणे म्हणाला, ''आपण डिझास्टर रिकव्हरी करणाऱ्या कंपनीचे शेअर घेऊ. आपल्याला खूप चांगला भाव मिळेल.'' मला धक्का बसला. जग दु:खात बुडालेलं असताना याला हा विचार कसा काय सुचू शकतो? कुठून आली ही विचारसरणी? मग लक्षात आलं त्याला ही विचार करायची पद्धत भांडवलशाही अर्थव्यवस्थेने शिकवली. मग यापेक्षा साम्यवाद किंवा समाजवाद बरा असू शकतो का हे समजून घ्यायला मी दोन्ही इझम (वाद) समजून घेतले. पण त्याचं सखोल वाचन केल्यावर लक्षात आलं की शेवटी हे तिन्हीही इझम एकाच ठिकाणी जातात म्हणजे साम्यवादाचं उदाहरण म्हणून चीन, समाजवादाचं उदाहरणं म्हणून रशिया आणि भांडवलशाहीचं उदाहरण म्हणून अमेरिका असे तिन्ही देश पाहिले तर तिन्ही देशांत एकूण परिस्थिती सारखीच आहे. या तिन्ही देशांत काही मोजक्या लोकांकडे अमाप संपत्ती आहे. म्हणजे शेवटी तिन्ही इझम अंतिमत: एकाच दिशेने जाताहेत हे लक्षात आलं. पण या राष्ट्रांनी आपला प्रवास सुकर व्हावा म्हणून अनेक देशांची; पर्यायाने अनेकांच्या आयुष्याची राखरांगोळी केली. त्यांनी जगभरात संघर्ष उभे केले. हे सगळं मी पाहिलं, अनुभवलं त्यामागची कारणमीमांसा शोधली. आणि हेच सूत्र मी 'घातसूत्र'मध्ये मांडलं. या पुस्तकात मी १९१२ ते २०१६ या एकशेचार वर्षांच्या कालावधीतील घटनाक्रम मांडलाय. या घटना घडविणारी माणसं, हा घटनाक्रम आणि त्या माणसांनी घडविलेल्या संरचना अशी त्रिस्तरीय रचना मी या पुस्तकात केली आहे. लोकांना हे आवडलं, कारण ते या प्रक्रियेविषयी, या सूत्रधारांविषयी अनभिज्ञ होते. त्यांच्या विचारांची प्रक्रिया या निमित्ताने सुरू व्हावी हीच माझी अपेक्षा या लिखाणामागे आहे. यांच्यानंतर मला 'मातसूत्र' लिहायचं आहे. यामध्ये 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून 'फॅमिलिझम' या संकल्पनेचा मला पुरस्कार करायचा आहे. ही संकल्पना राबवण्यासाठी भारत हा एक आदर्श देश आहे असे मला वाटते. इथले विविध प्रांत, विविध भाषा, बोली, संस्कृती हे सारं विलक्षण आहे. स्वातंत्र्यानंतर आपण या विविधतेला केंद्रस्थानी ठेवून विकास योजना बनवल्याही होत्या. पण नंतर त्यात भ्रष्टाचार आला आणि 'फॅमिलिझम'चं विशुद्ध रूप हरवून गेलं. त्याचं नव्याने पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे. कारण त्या पद्धतीत एकमेकांना ओरबाडणे नाही, संपत्तीचं केंद्रीकरण नाही, तर परस्परावलंबित्व आहे ज्यात सर्वांचा समान विकास होऊ शकतो. हाच माझ्या पुढच्या पुस्तकाचा विषय आहे.

**डॉ. संजय देशमुख :** दीपक तू आता जी मांडणी केली त्यातून लक्षात येतंय की जगाचा ताबा घेणारी काही व्यक्तींची साम्राज्यं कशी निर्माण झाली. ती निर्माण होण्यासाठी कोणती संरचना निर्माण केली गेली. ती संरचना राबवली कशी गेली? आणि सगळ्या घडामोडींचा २०० पेक्षा जास्त देशांवर परिणाम झाला. असं म्हणतात की दोन महायुद्धंही घडवली गेली. या सगळ्या प्रक्रियेत भारत नेमका कुठे आहे?

**दीपक करंजीकर :** भारत कुठे आहे हे समजून घेताना नेमकं काय घडलंय, काय घडतंय हे समजून घ्यायला पाहिजे. संघर्षाची पेरणी करत गेलो तर संघर्ष उभे राहतील, त्यात आपला फायदा होईल ही प्राथमिक विचारसरणी नंतर इतकी प्रबळ झाली की खरंच तशा संघर्षाच्या जागा निर्माण केल्या गेल्या. त्यासाठी कधी धर्म, कधी इझम, कधी जागतिकीकरण असे दोर खेचत गेले. त्यातून संघर्ष उभा राहिला. हे सगळं करणारी साम्राज्यं म्हणजे मॉर्गन, रॉक शिल्ड, रॉकफेलर तसेच वुलमन्ससारख्या धाकट्या पातीही होत्याच. त्यांनी आधी युरोपिअन चलनाचा ताबा घेतला. या देशांच्या मध्यवर्ती बँका या सरकारी बँका नाहीत. त्या खाजगी बँका आहेत. या बँका काही लोकांनी तयार केल्या आणि त्यामार्फत युरोपिअन चलनाचा त्यांनी प्रथम ताबा घेतला. बँका त्यांनी हत्यारं म्हणून वापरली. त्याद्वारे जगाची अमाप लूट केली. यातूनच स्पेन, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्लिश लोकांचे साम्राज्य मोडकळीस आले आणि अमेरिका या महासत्तेचा उदय झाला. 'One world order' हे या




**साम्यवादाचं उदाहरण म्हणून चीन, समाजवादाचं उदाहरणं म्हणून रशिया आणि भांडवलशाहीचं उदाहरण म्हणून अमेरिका असे तिन्ही देश पाहिले तर तिन्ही देशांत एकूण परिस्थिती सारखीच आहे. या तिन्ही देशांत काही मोजक्या लोकांकडे अमाप संपत्ती आहे. म्हणजे शेवटी तिन्ही इझम अंतिमत: एकाच दिशेने जाताहेत हे लक्षात आलं. पण या राष्ट्रांनी आपला प्रवास सुकर व्हावा म्हणून अनेक देशांची; पर्यायाने अनेकांच्या आयुष्याची राखरांगोळी केली. त्यांनी जगभरात संघर्ष उभे केले. हे सगळं मी पाहिलं, अनुभवलं त्यामागची कारणमीमांसा शोधली. आणि हेच सूत्र मी 'घातसूत्र'मध्ये मांडलं.**



महासत्तेचं धोरण आहे. कारण एकजिनसी जगात नफा कमावणं सोपं असतं. बहुविध समाज हा चहूअंगाने वाहणारा असतो. त्याला एका सूत्रात बांधणे कठीण असते. म्हणून जगण्यातील विविधता नष्ट करणे हे यांचे प्रमुख सूत्र असते.

तंत्रज्ञानाकडे अमेरिकेने लक्ष पुरवले ते रशियाने अवकाशात उपग्रह सोडल्यानंतर. मग नासा उभं राहिलं. पेंटागॉनने इंटरनेटचा शोध लावला. याने जागतिक व्यवहार सुकर झाले. पण जग सुखी झाले का तर या प्रश्नाचे उत्तर नाही असं आहे. एक माणूस हे सगळे अपेक्षित बदल घडवू शकत नाही. त्यासाठी प्रचंड मोठ्या संरचना उभ्या कराव्या लागतात. पायाभूत सोयी-सुविधा निर्माण कराव्या लागतात. त्यातूनच मग मोसाद, रॉयल सोसायटी बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट, सीआयए या संरचना तयार झाल्या. मग त्यांनी माध्यमांचा ताबा घेऊन अपेक्षित विचारसरणी लोकांवर लादली. अमेरिकेने १९५६ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आय.एम.एफ.) आणि जागतिक बँक (World bank) निर्माण केली तेव्हा त्यांना जगाच्या चलनाचा ताबा घ्यायचा होता. त्यांनी त्यांचे डॉलर आणि पेट्रोल यांची अशी काही सांगड घातली की १८ ते १९ ट्रिलियन राष्ट्रीय कर्ज त्यांच्या डोक्यावर असतानाही डॉलर हे जगातील मजबूत आणि विश्वासार्ह चलन म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी वापरले जाते.

हे सर्व घडवून आणण्यासाठी पहिल्या महायुद्धातच दुसऱ्या महायुद्धाच्या संघर्षाची बीजे पेरली गेली होती. त्यात त्यांना अपेक्षित असलेली युरोपची फेररचना झाली. युरोपला गेल्या ५० ते ६० वर्षांत नव्याने काहीच निर्माण करता आलेलं नाहीये हे सत्य आहे. त्यांची देदीप्यमान संस्कृती तशीच थांबली आहे. जगाचं एकजिनसीकरण सुरू झालं आहे. तेही अमेरिकेला हवे त्याच पद्धतीने. तंत्रज्ञान त्याच्या जोडीला आहेच. पण तंत्रज्ञान हे निती-निरपेक्ष असते. त्याला योग्य-अयोग्याची जाण नसते, ते वापरणाऱ्यावर अवलंबून असते, याचं भान आता सुटत चाललंय. यासाठी मी एकच उदाहरण देतो. नोबेल पारितोषिके देण्यास सुरुवात ज्याने केली, तो अल्फ्रेड नोबेल याने गणिती सूत्र वापरून सुरुंगाची निर्मिती केली. पण पुढे त्याचा वापर विकासासाठी न होता विनाशासाठी होऊ लागला तेव्हा त्याला पश्चात्ताप झाला. म्हणून त्याने गणित विषय सोडून सगळ्या विषयांसाठी नोबेल दिले. घातसूत्रात मी याचीच मांडणी केली आहे.

या सगळ्या घडामोडीत भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. विकासाची नवीन मापनपद्धती तयार करू शकतो. इथल्या विविधतेला, परंपरेला नजरेसमोर ठेवून आपण वेगळी परिमाणं जगाला देऊ शकतो. कारण भारत हा प्रचंड प्रस्तरांचा, प्रतलांचा देश आहे. चांगले राज्यकर्ते मिळाले, समाज जागृत झाला तर 'फॅमिलिझम' हा नवा इझम भारताची जगाला भेट होऊ शकते. कारण आताच्या युगात एखाद्या देशाला पारंपरिक युद्ध करून हरवणे आता शक्य नाही. युद्धाची आयुधं बदलली आहेत. जसं अमेरिका-चीन यांच्यात व्यापार युद्ध सुरू आहे. तशीच रणनीती आखून भारताला मार्गक्रमणा करायची आहे, असं मला वाटतं.

**डॉ. संजय देशमुख :** दीपक, अतिशय भयावह अशी जागतिक सूत्रांची मांडणी तू 'घातसूत्र'मध्ये स्पष्ट केलीस. या विवेचनात तू तंत्रज्ञानाचा उल्लेख केलास. तंत्रज्ञान नितीनिरपेक्ष आहे असं तू म्हणालास. पण लोकसंख्या जास्त असलेल्या भारतासारख्या देशात, विशेषत: शेतीवर ६५ टक्के जनता अवलंबून असताना या तंत्रज्ञानाच्या आधारे आपल्याला स्वयंपूर्णतेकडे जाता येईल का? जेणेकरून लोक जास्त सक्षम होऊन या घातसूत्राने निर्माण झालेल्या समस्यांवर मात करू शकतील?

**दीपक करंजीकर :** आतापर्यंत तंत्रज्ञानाचा उपयोग व्यापार, व्यवसाय यासाठी मोठ्या प्रमाणावर झाला. पण जीवनासाठी तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे हा माझा मुद्दा आहे. जेव्हा एखादा व्यवसाय प्राथमिक अवस्थेतून पुढे जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतो तेव्हा ते समर्थनीय आहे. पण त्या व्यवसायाचे स्वरूप काय आहे? कोणत्या व्यवसायाच्या सुलभीकरणासाठी तंत्रज्ञान वापरले जाणार आहे? त्याने माणसांचं जगणं नष्ट होणार नाही ना? मानवी जीवन धोक्यात येणार नाही ना? तसं होणार असेल तर ते तंत्रज्ञान उपयोगाचे नाही.

'घातसूत्र'मध्ये एक मानवजातीच्या भविष्याबद्दलचा विदारक शिलालेख दिला आहे, ***'एक मानवजात स्वैर, स्वच्छंदी आणि जैवविविधतेच्या नैसर्गिक कलाने जन्मली-वाढली-पसरली. ती मानवजात काही लोकांच्या खलबतांना ओलीस राहिली. सत्त्व नसलेल्या निरुपद्रवी आयुष्याच्या रिंगणात फिरत राहिली. या***

**पहिल्या महायुद्धातच दुसऱ्या महायुद्धाच्या संघर्षाची बीजे पेरली गेली होती. त्यात त्यांना अपेक्षित असलेली युरोपची फेररचना झाली. युरोपला गेल्या ५० ते ६० वर्षांत नव्याने काहीच निर्माण करता आलेलं नाहीये हे सत्य आहे. त्यांची देदीप्यमान संस्कृती तशीच थांबली आहे. जगाचं एकजिनसीकरण सुरू झालं आहे. तेही अमेरिकेला हवे त्याच पद्धतीने. तंत्रज्ञान त्याच्या जोडीला आहेच. पण तंत्रज्ञान हे निती-निरपेक्ष असते. त्याला योग्य-अयोग्याची जाण नसते, ते वापरणाऱ्यावर अवलंबून असते,**

*अवस्थेलाच आपले स्वातंत्र्य मानू लागली.'*

जीवनातील खरा आनंद तंत्रज्ञाना-मुळे निघून जाईल अशी मला भीती वाटते. उदा. व्हॉटसअपमुळे वाचन संपलं. मुद्याचं 'मंडण-खंडण-संश्लेषण' संपलं. त्याऐवजी निर्बुद्ध 'फॉरवर्डिंग' आलं. आपण आधी निर्माते होतो. आता व्हॉटसअप युगात संदेशाचे 'वाहक' झालो. हे जर सगळ्या क्षेत्रात घडले तर जगण्याचा आत्मा हरवून जाईल अशी रास्त शंका येते. म्हणजे तंत्रज्ञानाचे जगणं सोप्पं केलं, हे मला मान्य आहे. पण या 'कम्फर्ट झोन'मध्ये 'न निर्मितीचं', सर्जनशील नसण्याचं भय तयार झालंय. त्यातून निसर्गाशी तुटलेपण निर्माण झालं. मग शारीरिक दोष वाढले. नवीन नवीन रोग तयार झाले. जीवनातील अस्वस्थता वाढली. खरं तर तंत्रज्ञानाने आनंद निर्माण व्हायला हवा होता. पण आनंद ही मनाची अवस्था आहे. तंत्रज्ञान सुख देते, आनंद नाही. बालमृत्यू कमी झाले, सरासरी आयुर्मान वाढले; पण प्रतिकारशक्ती कमी झाली, विषमता वाढली, हेही तंत्रज्ञानाचेच शाप आहेत. मला वाटतं, तंत्रज्ञानाने आयुष्यातला फोलपणा दिला. देशाचा जीडीपी वाढला म्हणजे देशातील लोक आनंदी झाले असे होत नाही. 'हॅपिनेस इंडेक्स' ही वेगळी संकल्पना आहे. तंत्रज्ञानाने सुखाचा आभास दिला. पण गुणवत्तापूर्ण जगणं दिलं नाही. हे निसर्गाचं शहाणपण आपण दुर्लक्षित करतोय, याचा अभ्यास होणं गरजेचं आहे. भारतासारख्या निसर्गाधारित जीवनपद्धतीत हे शक्य आहे. ते देशाच्या व्यवस्थेने उभे केले पाहिजे, हे मी घातसूत्रमध्ये मांडले आहे.

**डॉ. संजय देशमुख :** या घातसूत्रामधून चांगलंही काही अनपेक्षितपणे घडलं आहे का ज्याचा जगाला फायदा झाला?

**दीपक करंजीकर :** हो, तशीही उदाहरणे निश्चितच आहेत. या दमनशक्तीला अनेकांनी प्रतिकार केला. त्यातून अपेक्षाही नव्हती अशी राष्ट्रं बलवान झाली. पण हे प्रतिकार क्षीण होतील अशी मला भीती वाटते. ते तसे होऊ नये म्हणून घातसूत्र!

**डॉ. संजय देशमुख :** तू जे विवेचन केलेस, भारताच्या संदर्भात तत्त्वज्ञानाची मांडणी केलीस त्यातून सुचलेला हा माझा शेवटचा प्रश्न. आपला इतिहास देदीप्यमान होता. अनेक आक्रमण पचवूनही एक खंडप्राय देश म्हणून आपण उभे आहोत. तर हा इतिहास भारताचं भविष्य घडवायला उपयोगी ठरू शकतो का?


**दीपक करंजीकर :** नक्कीच. कारण इतिहासातच भविष्य लपलेलं असतं. या प्रश्नाचं उत्तर तुला इतिहासाच्या आधारेच देतो. 'द्रौपदी वस्त्रहरण सुरू असताना तुम्ही गप्प का होतात', हा प्रश्न भीष्मराजांना अनेकांनी विचारला. त्यावर त्यांचे उत्तर होते 'अर्थस्य पुरुषो दासा' अर्थात पुरुष हा अर्थचा (पैसा-संपत्ती) दास असतो. म्हणूनच मी असं म्हणेन जो धर्म 'अर्थ' जाणत नाही तो मोक्षापर्यंत पोहचत नाही. या संदर्भात छत्रपती शिवाजीमहाराज यांचे उदाहरण मी उद्धृत करेन. त्याकाळी भारत हा एवढा मोठा खंडप्राय देश नव्हता. सुरत हे शहर स्वराज्यासाठी परमुलुख होतं. त्यावेळी महाराजांच्या राज्याचा महसूल होता १२ लाख आणि महाराजांनी सुरत लुटीमधून जी संपत्ती स्वराज्यासाठी आणली ती होती एक कोटी आठ लाख. म्हणजेच माझ्या राज्यातील लोकांचे जीवन सुखी हवे तर मला मजबूत 'अर्थ' पाठिंबा हवा हे महाराजांनी नेमके ओळखले होते. जगातल्या पहिल्या ५० मुत्सद्दी राजांची नावे घेतलीस तरी त्यातील एकही शिवरायांच्या पासंगालाही पुरत नाही. हे त्यांचे अर्थकारण इतिहासातून आपण का नाही उचलू शकत? त्यासाठी नवीन सरंचना मांडाव्या लागतील. नवीन तत्त्वज्ञान निर्माण करावे लागेल. अमेरिकेचा One world order (एकजिनसीपणाचा सिद्धांत) हाणून पाडावा लागेल. आपल्या विविधतेला साजेसे नवीन आकलन मांडावे लागेल. थोडक्यात इतिहासाचे उगाच उदात्तीकरण न करता त्याच्या पाऊलखुणांवर आपल्याला पुढे जावे लागेल. माझ्या लेखनातून ही प्रक्रिया सुरू झाली तर नक्कीच या पृथ्वीतलावरचा माझा जन्म सार्थक झाला असं मी समजेन.

**डॉ. संजय देशमुख :** धन्यवाद. अतिशय तर्कसंगत विचारांची मांडणी तू केलीस. त्यातून तुझा व्यासंग तर दिसतोच, पण एकूण मानवी जीवनाविषयी वाटणारी तुझी कळकळही अत्यंत श्रेष्ठ आहे. तुझ्या विचारांचा प्रभाव जगावर पडू दे, तुझं कार्य निरंतरपणे पुढे चालू राहू दे, या शुभेच्छा देऊन मुलाखत संपवतो. धन्यवाद.

दीपक करंजीकर, भ्रमणध्वनी : ९८८१५४६५७८
डॉ. संजय देशमुख, भ्रमणध्वनी : ९८२००९५०८५
डॉ. लतिका भानुशाली, भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८



**सुरत हे शहर स्वराज्यासाठी परमुलुख होतं. त्यावेळी महाराजांच्या राज्याचा महसूल होता १२ लाख आणि महाराजांनी सुरत लुटीमधून जी संपत्ती स्वराज्यासाठी आणली ती होती एक कोटी आठ लाख. म्हणजेच माझ्या राज्यातील लोकांचे जीवन सुखी हवे तर मला मजबूत 'अर्थ' पाठिंबा हवा हे महाराजांनी नेमके ओळखले होते. जगातल्या पहिल्या ५० मुत्सद्दी राजांची नावे घेतलीस तरी त्यातील एकही शिवरायांच्या पासंगालाही पुरत नाही. हे त्यांचे अर्थकारण इतिहासातून आपण का नाही उचलू शकत?**



# माझे बाबा

## श्रीहर्ष वसंत फेणे

**लेखक/लेखिका त्याला/तिला ज्या गोष्टी लहानपणी मनाला भिडतात त्या कुठेतरी आपल्या लेखनात उतरवतात. त्या आठवणींचे कवडसे 'कारवारी माती' कादंबरीत बरेच वेळा जाणवले/भावले. मला कुतूहल वाटते की हे असे लेखकाच्या बाल/तरुणपणातील स्वतःच्या आठवणीच त्यांच्या लेखनात येतात की तसे नसावे? एक सामान्य माणूस म्हणून मला कुतूहल आहे की सर्वसामान्य माणसांना आठवणी वयाच्या पाच-सहा वर्षांनंतरच्याच आठवतात, पण बाबांना अगदी शेवटपर्यंत अडीच वर्षांपासूनच्या आठवणी लख्खपणे आठवत असत. यामागचे कारण काय असावे?**

**मा**झे बाबा श्री. वसंत नरहर फेणे, मराठीतील लेखक, ६ मार्च २०१८ रोजी स्वर्गवासी झाले.

मृत्युवेळी बाबांचे वय ९१ वर्षे १० महिने २२ दिवस होते. तसे म्हटले तर बाबांना दीर्घायुष्य लाभले. बाबा शेवटपर्यंत एकट्यानेच आमच्या खारच्या घरात राहिले. शेवटचा एखादा महिना ते माझ्याकडे येऊन राहिले, तेसुद्धा त्यांना डॉक्टरांनी तोल जातो म्हणून चालताना काठी घ्यावयास सांगितले म्हणून! कारण बाबांच्या मते 'मी काठी घेऊन चालण्याच्या अधीन होईन' म्हणून! पण अधिक महत्त्वाची बाब म्हणजे अखेरपर्यंत लेखक म्हणून बाबा ॲक्टीव्ह होते.

शेवटी हॉस्पिटलातही ते एकूण साडेसतरा तासच होते आणि जेव्हा गुंगीच्या बाहेर येत तेव्हाही स्वतःची कामे करायला बघत आणि नर्सेसची चेष्टा-मस्करी करत. माझ्या बायकोला घरातील व्यवस्था व ती रात्री घरी परत कशी जाणार अशा चौकशाही करत.

'ग्रंथाली'मुळेच त्यांची बरीच रेंगाळलेली कादंबरी 'कारवारी माती' ही २ डिसेंबर २०१७ला मोठ्या सोहळ्याने प्रकाशित झाली- मृत्यूच्या तीन महिने चार दिवस आधी.

अशा ह्या वसंत नरहर फेणे यांच्याबद्दलच्या या काही आठवणी... त्या बाबा आणि मी किंवा आम्हा फेणे कुटुंबीयांच्या नसून बाबांच्या बालपणातल्या आठवणी; लख्खपणे शेवटपर्यंत येत, डोळ्यांसमोर दिसत अशा आठवणी व एक मोठेपणीची आठवण –

माझे बाबा हे एकूण दहा भावंडांपैकी नववे. त्यांच्या आणि त्यांच्या सर्वांत मोठ्या भावातील वयाचे अंतर सुमारे २२ वर्षांचे. बाबांचे सर्वांत लहान भाऊ अरविंद हे बाबांहून सुमारे अडीच वर्षांनी लहान.

बाबांची पहिली आठवण – अरविंद फेणेंच्या जन्मावेळची – २८ डिसेंबर १९२८. अरविंद फेणेंचा जन्म वाडिया हॉस्पिटलमध्ये झाला होता – बाबांचे वय २ वर्षे ८ महिने.

अरविंद झाला तेव्हा सगळे फेणे कुटुंबीय जोगेश्वरीला सरस्वती बागेत एक नंबरच्या घरात होते. बाबांचे सर्वात मोठे भाऊ दादा बाबांना म्हणाले, 'आपण बाबू बघायला जाऊ.' त्यावेळी बाबा दादा-काकांच्या मागून चालत होते. दादाकाकांनी धोतराचा छान काचा मारला होता व त्या त्यांच्या धोतराचे छान पंख बाबा मागून बघत होते. तिथे एक अगस्त्याच्या झाडाची फुलेही पडलेली होती. हे दृश्यही बाबांना शेवटपर्यंत आठवत असे.

पुढे बाबा वाडिया हॉस्पिटलमध्ये गेले. त्यांना दादाकाका किंवा अरविंदकाका यांची काही आठवण

नाही. परंतु आठवत असे ते वाडिया हॉस्पिटलमधील तीन बाजूचे पांढरे शुभ्र कर्टन्स व कॉटवर कुशीवर पहुडलेली त्यांची आई व तिच्या उजव्या गालावर दिसणारे 'खुबे' ज्यातून लाल-लाल दोन-तीन किरण बाहेर पडत होते. बाबांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना त्यांची आई इतकी सुंदर कधीही नंतर दिसली नाही.

बाबांची दुसरी आठवण - त्यांचे वडील नरहर साबाजी फेणे दिल्लीत विषमज्वराने आजारी असल्याच्या वेळची, म्हणजे साधारण एप्रिल/मे १९२९ मधील. बाबांचे वय ३ वर्षे.

अचानक बाबाचे वडिल दिल्लीमध्ये विषमज्वराने बरेच आजारी असल्याची बातमी कळल्यावर आमची आजी व तिची सगळी मुले दिल्लीला जावयास निघाली. सगळी लहान भावंडे आईबरोबर रेल्वेच्या लेडीज कंपार्टमेंटमध्ये होती व त्यांचे दोन वडीलबंधू- दादाकाका व भाऊकाका पुरुषांच्या कंपार्टमेंटमध्ये होते. वाटेत मधल्या स्टेशन्सवर हे दोघेही भाऊ (वय वर्षे २५ आणि २३), आई व इतर भावंडांना भेटायला काही खाण्याचे पदार्थ घेऊन येत व परत जाताना गाडी सुरू झाल्यावर धावत-धावत गाडीला लटकत जात असत. बाबांना ते दृश्य त्यांच्या शेवटच्या प्रवासातही बऱ्याच वेळा आठवत असे. बाबांना त्यांच्या मोठ्या भावांच्या पराक्रमाबद्दल मोठा अभिमान वाटत असे.

तिसरी आठवण म्हणजे ४ मे १९२९ रोजीची. ज्या दिवशी आमचे आजोबा दिल्लीत वारले तेव्हा बाबांचे वय - ३ वर्षे पूर्ण.

आमच्या आजोबांचा मृतदेह दिल्लीच्या पद्धती-नुसार उंटाच्या गाडीवरून आणला होता. माझे बाबा त्यांच्या कोणातरी नोकराच्या खांद्यावर बसून हे सगळे दृश्य बघत होते. बाबांची मोठी बहीण मालू (त्यावेळी वय वर्षे ९) बाबांना सांगत होती, 'वसंता, अण्णा गेलो रे!' बाबांना हीही आठवण शेवटपर्यंत अगदी लख्खपणे आठवत असे.

चौथी आठवण साधारण १९३०ची. बाबांचे वय वर्षे चार. आमची आजी सहा धाकट्या अपत्यांना घेऊन कारवारला पराभूत अशी होऊन आली तेव्हाची. आमचे आजोबा स्वतःच्या कर्तबगारीने मुंबई आणि दिल्लीमध्ये मोठ्या टेक्सटाईल मिलमध्ये अधिकारी होते. त्यांचा पगार त्यावेळी ५०० रुपये महिना होता (आजच्या जमान्यात पाच लाख). आमच्या आजोबांच्या मृत्यूपर्यंत आमची आजी एका तालेवार अधिकाऱ्याची पत्नी असल्यामुळे तिच्या माहेरच्या कुटुंबात मोठ्या तोऱ्यात वागत असे व तिच्या कुटुंबातले लोकही तिचा तसा मोठेपणाचा अधिकार जाणून तिचा मान-सन्मान करत. पण आता ती, माझ्या आजोबांच्या मृत्यूनंतर जवळ १० मुलांची जबाबदारी असलेली व कुठल्याही उत्पन्नाचे साधन नसलेली, पराभूत अशी विधवा होती. मुंबईमध्ये एक वर्ष काढल्यानंतर, मुंबई महाग असल्यामुळे ती आपल्या सहा लहान मुलांबरोबर कारवारला तिच्या बहिणीच्या- जिचे यजमान सामान्य शिक्षक होते- त्यांच्या, घरी राहावयास आली.


आल्याबरोबर, ओटीवर ठेवलेल्या बाकावर येऊन बसायची तिची नेहमीची पद्धत. पण यावेळी ती आली व बाकावर न बसता जमिनीवर बसून आपल्या लहान बहीण व तिच्या यजमानांसमोर बसून ढसाढसा रडू लागली. हे सगळे माझे बाबा व तिची इतर मुले बघत होती. बहिणीने व तिच्या यजमानांनी आमच्या आजीची समजूत काढली व तिला परत मोठ्या आदराने त्या बाकावर बसवले. हीही आठवण बाबांना शेवटपर्यंत लख्ख आठवत असे.

शेवटची म्हणजे कारवारच्या विहिरीवर. बाबांचे वय साधारण चार-साडेचार वर्षे. ह्या आठवणीचा उल्लेख त्यांनी त्यांच्या शेवटच्या कादंबरीत प्रस्ता-वनेतही केला आहे.

त्यावेळी माझी आजी विहिरीतून घागरीने पाणी काढून जवळच्या बादलीत ओतीत होती. आणि बाबांची एक नातलग बाई त्यावेळी धुवायचे कपडे त्या बादलीत खळबळावीत होती. तेव्हा त्यांच्या पंचायत्या चालल्या होत्या. तेव्हाचा त्यांचा एक संवाद बाबांच्या पक्का लक्षात राहिला. आजीनं तिला विचारलं होतं, 'तुगॅला घोव परत आयिल्लॉ गे?' (तुझा नवरा परत आला होता का गे?)

तेव्हा ती बाई उत्तरली होती, 'नाका गें, ताणें येवचेय् नाका आणि एक पॉर पदरात घालन् वचचेही नाका!' (नको गे, त्याने यायलाही नको आणि एक पोर पदरात घालून, जायलाही नको!)

हा संवाद बाबांच्या मनात घट्ट घर करून राहिला. जेव्हा बाबांनी पस्तिशीत लिहायला सुरुवात केली, तेव्हा बाबांना प्रकर्षाने वाटू लागले की, त्यांनी या बाईवर व तिच्या नवऱ्यावर लिहायला




**'तुगॅला घोव परत आयिल्लॉ गे?' (तुझा नवरा परत आला होता का गे?) तेव्हा ती बाई उत्तरली होती, 'नाका गें, ताणें येवचेय् नाका आणि एक पॉर पदरात घालन् वचचेही नाका!' (नको गे, त्याने यायलाही नको आणि एक पोर पदरात घालून, जायलाही नको!) हा संवाद बाबांच्या मनात घट्ट घर करून राहिला. जेव्हा बाबांनी पस्तिशीत लिहायला सुरुवात केली, तेव्हा बाबांना प्रकर्षाने वाटू लागले की, त्यांनी या बाईवर व तिच्या नवऱ्यावर लिहायला हवे आणि त्यांनी या प्रसंगावरून कादंबरी लिहिली- 'कारवारी माती'.**






**१९८६चे ‘मराठी साहित्य संमेलन’ मुंबईच्या ‘राजा शिवाजी विद्यालया’त विश्राम बेडेकरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. ईरीना ग्लुश्कोव्हा त्यावेळी बाबांच्या ‘सेंट्रल बस स्टेशन’ कादंबरीचे रशियनमध्ये भाषांतर करीत होत्या. एक प्रसिद्ध प्रकाशक–संपादक बाबांची ओळख करून देण्याऐवजी खांदे उडवून काहीतरी पुटपुटून ते पुढे गेले. बाबांना ही गोष्ट खूपच लागली होती. मृत्युच्या द्वारी असतानाही काही क्षणांसाठी त्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा त्यांच्यासमोर तरळून गेली होती. कुठेतरी हा त्यांच्या मनाला लागून राहिलेला अपमानच, मृत्यूच्या दारात असताना या व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिमेच्या तरळण्यामागे असावा.**

हवे आणि त्यांनी या प्रसंगावरून कादंबरी लिहिली– ‘कारवारी माती’.

१९८६मधील मराठी साहित्य संमेलनातील मुंबई येथील बाबांची आठवण. बाबांचे वय त्या–वेळी ६०च्या आसपास. बाबांची ‘ग्रंथाली’ प्रकाशित गाजलेली ‘सेंट्रल बस स्टेशन’ कादंबरी प्रकाशित होऊन साधारण सहा वर्षे झाली होती त्यावेळची.

बाबांच्या पहिल्या कथासंग्रहास, ‘काना आणि मात्रा’स, महाराष्ट्र शासनाचा १९७५चा पुरस्कारही मिळाला होता. म्हणजे बाबा तसे मराठीतले मान्यवर लेखक होते; परंतु ते त्या वेळच्या Establishmentचा भाग नव्हते.

१९८६चे ‘मराठी साहित्य संमेलन’ मुंबईच्या ‘राजा शिवाजी विद्यालया’त विश्राम बेडेकरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. बाबा, त्यांचे काही लेखक–मित्र हे संमेलनाच्या प्रवेशद्वारापाशी उभे राहून गप्पा मारत होते. ईरीना ग्लुश्कोव्हा त्यावेळी बाबांच्या ‘सेंट्रल बस स्टेशन’ कादंबरीचे रशियनमध्ये भाषांतर करीत होत्या. तेव्हा त्यांची मराठी साहित्यिकांची ओळख करून देण्यासाठी मराठीतील एक प्रसिद्ध प्रकाशक–संपादक व्यक्तिमत्त्व ईरीना ग्लुश्कोव्हाबरोबर संमेलनात आले. त्यांनी ईरीनाला त्यांच्या प्रकाशनाशी संबंधित असलेल्या एका प्रसिद्ध लेखकाशी, जे बाबांबरोबर उभे होते, त्यांची ओळख करून दिली व बाबांची ओळख करून देण्याऐवजी खांदे उडवून काहीतरी पुटपुटून ते पुढे गेले. नंतर सगळे जण तेथेच उभे राहून गप्पा मारू लागले. तेवढ्यात बाबांच्या दुसऱ्या कोणी साहित्यिक मित्राने लांबूनच बाबांना फेणे म्हणून हाक मारली. त्यावेळी ईरीनाने आश्चर्याने त्या प्रकाशक–संपादक व्यक्तिमत्त्वाला विचारले की, ‘वसंत नरहर फेणे ज्यांनी ‘सेंट्रल बस स्टेशन’ लिहिले आहे ते हेच का? व मी आपल्याला त्यांची ओळख करून देण्यास सांगितले असताना आपण ते का केले नाही?’ त्यावर त्या व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या पद्धतीप्रमाणे खांदे उडवून काहीतरी पुटपुटून वेळ मारून नेली.

बाबांना ही गोष्ट खूपच लागली होती. बाबांना १ सप्टेंबर १९८७ला जोरात हार्ट अॅटॅक आला होता व त्यावेळचा अनुभव त्यांनी ‘मृत्युचिये द्वारी’ या त्यांच्या ‘शब्द आणि अब्द’ या पुस्तकात लिहिला आहे. मृत्युच्या द्वारी असतानाही काही क्षणांसाठी त्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा त्यांच्यासमोर तरळून गेली होती. कुठेतरी हा त्यांच्या मनाला लागून राहिलेला अपमानच, मृत्यूच्या दारात असताना या व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिमेच्या तरळण्यामागे असावा. प्रा. प्र.ना. परांजपे यांनाही ती आठवण दोन–तीनदा सांगितली होती.

शेवटच्या महिन्यात बाबा माझ्याकडे राहत असतानाही त्यांनी एक–दोन वेळा या प्रसंगाचा उल्लेख केला. मी थोड्याशा रागानेच त्यांना म्हटलं, ‘कशाला ह्या तीस वर्षांपूर्वीच्या आठवणी परत परत काढता?’ त्यावर ते म्हणाले, ‘आता नाही बोलणार. परंतु ते माझ्या मनाला लागले आहे.’

बाबांना या सगळ्या आठवणी शेवटपर्यंत लख्खपणे आठवत असत. मला असे वाटते की, लेखक/लेखिका त्याला/तिला ज्या गोष्टी लहानपणी मनाला भिडतात त्या कुठेतरी आपल्या लेखनात उतरवतात. त्या आठवणींचे कवडसे त्यांच्या ‘कारवारी माती’ कादंबरीचे प्रूफ रिडिंग करताना मला बरेच वेळा जाणवले/भावले.

मला कुतूहल वाटते की हे असे लेखकाच्या बाल/तरुणपणातील स्वतःच्या आठवणीच त्यांच्या लेखनात येतात की तसे नसावे?

हे बहुधा बऱ्याच लेखक–कवींच्या बाबतीत घडत असावे आणि त्यांची कोवळी मने ती त्याक्षणी टिपत असावेत व जेव्हा केव्हा ते कथा/कादंबऱ्या/कविता लिहित असावे तेव्हा तेव्हा त्या बाल/तरुण/वृद्धपणाच्या आठवणी ज्या मनाच्या कोपऱ्यात रुतून बसतात त्या त्या वेळी त्या बाहेर येत असाव्यात.

असो. असे हे माझे बाबा वसंत नरहर फेणे आणि त्यांची आठवणी.


एक सामान्य माणूस म्हणून मला कुतूहल आहे की सर्वसामान्य माणसांना आठवणी वयाच्या पाच–सहा वर्षांनंतरच्याच आठवतात, पण बाबांना अगदी शेवटपर्यंत अडीच वर्षांपासूनच्या आठवणी लख्खपणे आठवत असत. यामागचे कारण काय असावे?

हे झाले एका मुलाचे त्यांच्या बाबासंबंधीचे काळजात खुपलेले म्हणून लेखनात उतरलेले काही विचार!

**– श्रीहर्ष वसंत फेणे**
भ्रमणध्वनी : ९८३३९४००३१

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या डॅलस येथील अधिवेशनानिमित्त रसिकांना
हार्दिक शुभेच्छा!

# डॉ. नीना सावंत व संजीव सावंत









# 'ग्रंथाली'ची नवी प्रकाशने

| अनु. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | किंमत | सवलत |
|---|---|---|---|---|
| १. | नदीष्ट | मनोज बोरगावकर | २०० | १२० |
| २. | मु. पो. आई (नवीन आवृत्ती) | संपादन – संदीप काळे | २५० | १५० |
| ३. | र 'स्व'च्या शोधात... | विदुर महाजन | १०० | ६० |
| ४. | उजळले स्मृतींचे दिवे | मुक्ता केणेकर | २५० | १५० |
| ५. | राघवशेला | डॉ. विजयकुमार देशमुख | १०० | ६० |
| ६. | सृजनशील जगन्मित्र | शुभांगी नितीन मुळे | २५० | १५० |
| ७. | प्रश्न आणि प्रश्नचिन्ह? | नरेंद्र लांजेवार | १८० | ११० |
| ८. | संगणकक्षेत्रातले काही प्रज्वलित दिवे | डॉ. अनंत लाभसेटवार | २०० | १२० |
| ९. | उत्कृष्टतेचा ध्यास | डॉ. रा. द. लेले | ४०० | २५० |
| १०. | अविश्रांत | अचला मच्याडो | २५० | १५० |
| ११. | प्रीत पाखंडी | दत्ता सावंत | १८० | ११० |
| १२. | चाहूल उद्याची | दत्ता सावंत | १०० | ६० |
| १३. | गाऊ जंगलगाणी | लीला शिंदे | ६० | ४० |



# आग व्हेनेझुएलात; झळ भारताला!

**मोहन द्रविड**

**दक्षिण अमेरिका खंडातील उत्तर किनाऱ्यावर असलेल्या व्हेनझुएला या देशात एक अभूतपूर्व – ज्याला खरोखर ऐतिहासिक म्हणावे लागेल – असे नाट्य गेले चार महिने चालू आहे. भारतात याच सुमारास लोकसभांच्या निवडणुकीची धामधूम असल्यामुळे इतर जगात काय घडामोडी चालल्या होत्या इकडे लक्ष द्यायला आपल्याला फारशी सवड नव्हती. त्यातील काही गोष्टींचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात आणि दूरगामी असा परिणाम होणार आहे. व्हेनझुएलातील धामधूम ही त्यातील एक.**

**ज**गात सर्वात जास्त तेलाचे साठे कुठे असा प्रश्न विचारला तर सौदी अरेबिया किंवा इराणी आखातातील आणखीन कुठला तरी देश असं उत्तर मिळण्याची शक्यता दांडगी. पण त्या प्रश्नाचे योग्य उत्तर आहे व्हेनझुएला. या देशाची राजधानी असलेले कराकस हे बंदर अमेरिकेतील मायॅमी या शहरापासून फक्त हजार किलोमीटर अंतरावर. त्यामुळे अमेरिकेला या देशाबद्दल खास 'जवळीक' वाटत असल्यास आश्चर्य नाही. शिवाय ज्या देशात तेल आहे त्या देशाबद्दल अमेरिकेला खास आपुलकी वाटते हे सर्वश्रुत आहे.

कोलंबसला अमेरिकन जगत सापडल्यानंतर काही दशकातच स्पॅनिश लोक सबंध दक्षिण अमेरिका खंडात पसरले. त्यातल्या कुणाला तरी व्हेनझुएला पाहून इटलीमधल्या व्हेनिस शहराची आठवण झाली आणि त्याने त्याप्रमाणे या नवीन प्रदेशाचे बारसे केले. गोऱ्या लोकांनी इथल्या मूळ रहिवाशांची मोठ्या प्रमाणात कत्तल केली. त्यानंतर आफ्रिकेतले निग्रो गुलाम आले. त्यांचीही मिश्रणात भर पडली. मिश्रित लोकांना स्पॅनिश शब्द 'मेस्तीझो'. मेस्तीझो यांच्यात रंगाच्या सर्व प्रकारच्या छटा आहेत.

भारतासारखे व्हेनझुएलामध्ये कातडीच्या रंगाचे आणि जातीव्यवस्थेचे मोठे माहात्म्य आहे. (इंग्लिशमधला caste हा शब्द स्पॅनिशमधल्या casta वरून घेतला आहे.) जेवढा माणूस गोरा तेवढा तो श्रेष्ठ. शुद्ध युरोपियन सर्वश्रेष्ठ! पण तसे लोक कमी असल्याने युरोपीयनमध्ये एकअष्टमांश 'अशुद्ध रक्तमिश्रित' असलेल्यांना ते गोरे म्हणून चालवून घेतात. असे गोरे साधारण ४० टक्के आहेत तर निग्रो ३ टक्के आणि इंडियन ५ टक्के. बाकी मेस्तीझो. व्हेनझुएलाची वस्ती तीन कोटीच्या आसपास आहे. (क्षेत्रफळ त्यामानाने जास्त, जवळजवळ पाकिस्तानएवढे!)

हे सर्व एवढ्या तपशिलात द्यायचे कारण व्हेनझुएलामधल्या माणसाची आर्थिक परिस्थिती, त्याची राजकीय प्रणाली आणि त्याचा राजकीय पक्ष त्याच्या कातडीच्या रंगावरून ठरतो. ऊगो चाव्हेज या सावळ्या रंगाच्या क्रांतिकारकाने गोऱ्या लोकांची मक्तेदारी मोडून १९९८ साली अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. अर्थातच गोऱ्यांचा जळफळाट झाला आणि ते रस्त्यावर उतरले. जाळपोळ केली. अमेरिककडे धाव ठोकली. शेवटी २००२ मध्ये सूत्रं हलली आणि व्हेनझुएलाच्या सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याला पदच्युत केले.

पण दोन दिवसांतच चाव्हेजचे बारा लाख समर्थक – यांना चाव्हिस्टा म्हणून संबोधतात – व्हेनझुएलाच्या राजधानीवर चालून आले आणि लष्कराच्या अधिकाऱ्यांना दाती तृण घेऊन चाव्हेजकडे सत्ता परत द्यायला लागली. त्यानंतर चाव्हेज शहाणा झाला. त्याने आपली माणसे सैन्यात घुसवली. शिवाय चाव्हिस्टांची पंधरा लाखाची स्वतंत्र अशी स्वयंसेवी सशस्त्र सेना (militia) उभी केली. त्यात निम्म्या स्त्रिया आहेत. चाव्हिस्टांचे शत्रू कशाला घाबरून असतील तर या militia ला.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चाव्हेजने

गावोगावी communes बनवले. असे ३०००च्या आसपास communes संपूर्णपणे स्वावलंबी आहेत. त्यांत छोटेमोठे उद्योग आहेत, शेतं आहेत, गाईगुरं आहेत, पोल्ट्री आहेत, बेकरी आहेत, पतपेढ्या आहेत, पाळणाघरे आहेत, आणीबाणीत उपयोगी पडावीत म्हणून धान्याची कोठारे आहेत. एकेका communes मध्ये चार ते दहा हजार कुटुंबे असतात. गेली अनेक वर्षे अमेरिकेने नाकेबंदी केली तरी देश खंबीरपणे उभा आहे, याचे कारण ही communes. तृणमूल लोकशाही म्हणतात ती ही!

चाव्हेजने पेट्रोलियम रिफायनरींचे राष्ट्रीयीकरण केले आणि आतून मिळणारे उत्पन्न कल्याणकारी योजनात घातले. बेघर लोकांसाठी थोडथोडकी नव्हे तर पंधरा लाख घरे बांधली. थोडक्यात म्हणजे समाजवादी समाजरचनेसाठी प्रयत्न केले. दारिद्र्यात राहणाऱ्यांची संख्या साठ टक्क्यावरून दहा टक्क्यावर आली. या सर्वाच्या जोरावर २००६ आणि २०१२ मध्ये चाव्हेज राष्ट्राध्यक्ष म्हणून प्रचंड बहुमतांनी निवडून आला.

२०१३ मध्ये चाव्हेज कॅन्सरमुळे मृत्युमुखी पडला आणि उपाध्यक्ष असलेला निकोलास मदुरो त्या वर्षी घेतलेल्या खास निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आला. (मदुरो हा सत्यश्रीसाईबाबांचा भक्त आहे, हे किती जणांना माहीत आहे? २००५ साली तो सपत्नीक बाबांना भेटायला आला होता.) पण मदुरो चाव्हेजइतका लोकप्रिय नसणार अशा समजुतीखाली विरोधकांनी दंगा करायला सुरुवात केली. २०१८ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीवर बहिष्कार घातला. तोपर्यंत आंतरराष्ट्रीय – विशेषत: अमेरिका खंडातल्या स्पॅनिश भाषिक राष्ट्रातील – राजकारणात बदल व्हायला लागले होते. क्युबा आणि निकराग्वा हे दोन सोडून दक्षिण आणि मध्य अमेरिकेतली इतर सर्व देशांतील डाव्या पक्षांची सरकारे कोसळली.

आता पाळी व्हेनझुएलाची. तेव्हा अमेरिकेने व्हेनझुएलाच्या नाड्या आवळायला सुरुवात केली. असाच एक प्रयोग (Operation Condor) अमेरिकेने १९७०च्या दशकात केला होता. पारग्वाय, अर्जेंटिना, चिले, ब्राझील, उरुग्वाय, बोलिव्हिया, ग्वाटमाला या देशांतील निवडून आलेली सरकारे पाडून त्या जागी लष्करी किंवा कडव्या उजव्या पक्षांची राज्ये आणली होती. क्युबाचं सरकार पाडायचे प्रयत्न गेले साठ वर्षं चालू आहे. पण त्याला यश नाही. निकराग्वात मोठा रक्तपात झाला आणि डावे सरकार गेले. पण आश्चर्य म्हणजे २००६ साली डाव्या पक्षाची मंडळी परत सत्तेवर आली ती आजतागायत.

यावेळी क्युबा, निकराग्वा आणि व्हेनझुएला यांना 'जुलमी त्रिकुट' (Troika of Tyranny) ही संज्ञा बहाल करून त्यांची आर्थिक नाकेबंदी करायचे ठरले. ती प्रयोगाची पहिली पायरी. मग जनक्षोभाच्या आगीत तेल ओतणे ही दुसरी. हे काम स्थानिक तसेच इंग्लंड–अमेरिकेची प्रसारमाध्यमे करतात. आणि शेवटी सरकार उलथवणे. आता क्युबा व निकराग्वा ही जुनी गिऱ्हाईके. ती काही दाद देत नाहीत. नाही तर राहू दे. त्यांच्याकडे आहे तरी काय? व्हेनझुएलात तेल आहे, सोनं आहे, युरेनियम आहे.

निकोलास मदुरोच्या निवडणुकीनंतर अमेरिकेने नाकेबंदी चालू केली. व्हेनझुएलातल्या महागाईने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलं. विरोधी पक्षांनी जाळपोळ करायला सुरुवात केली. मोर्चे काढले. वर्गयुद्ध पेटले. विरोधकांच्या मोर्च्यात उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गीय किंवा वरच्या वर्गातील गोऱ्या लोकांचा भरणा जास्त तर मदुरोचे समर्थक काळेसावळे, झोपडपट्टी (Barrio) मधले.

विरोधकांचा आणि त्यांच्या प्रचारकाचा मुख्य रोख समाजवादावर आहे. समाजवादामुळे ही झोपडपट्टीमधली मंडळी शेफारली आहेत, आळशी झाली आहे, यांना काम न करता सगळं फुकट पाहिजे. त्यामुळे देशाचे नुकसान होते. समाजवाद्यांचं म्हणणं की समाजवाद व्हेनझुएलात आलाच नाहीय. एक पेट्रोलियम सोडून सर्व उद्योगधंदे खाजगी क्षेत्रात आहेत. शिवाय १९८० साली सुद्धा जेव्हा तेलाच्या किंमती झपाट्याने खाली आल्या तेव्हाही अशीच परिस्थिती होती. तेव्हा तर समाजवाद नव्हता.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेने पाऊल उचललं. २००२ साली फसलेल्या कटानंतर पुढील १७ वर्षे अमेरिकेने व्हेनझुएलात अंतर्गत बंडाळी माजवण्यासाठी विरोधकांना कोट्यवधी डॉलर्स दिले गेले. या सर्वांचा पाहिजे तसा परिणाम दिसेना. पुन्हा एकदा कट (coup) करायचा आणि यशस्वी करून दाखवायचा असे अमेरिकेने ठरवले. परराष्ट्रखाते, CIA यांचे हात तर शिवशिवत होतेच. पण अध्यक्ष ट्रंप यांना आणखीन एक आकर्षण

**२००२ साली फसलेल्या कटानंतर पुढील १७ वर्षे अमेरिकेने व्हेनझुएलात अंतर्गत बंडाळी माजवण्यासाठी विरोधकांना कोट्यवधी डॉलर्स दिले गेले. या सर्वांचा पाहिजे तसा परिणाम दिसेना. पुन्हा एकदा कट (coup) करायचा आणि यशस्वी करून दाखवायचा असे अमेरिकेने ठरवले. परराष्ट्रखाते, CIA यांचे हात तर शिवशिवत होतेच. पण अध्यक्ष ट्रंप यांना आणखीन एक आकर्षण होते. ट्रंप यांचा असा अंदाज आहे की २०२० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत सँडर्स हा त्यांचा प्रतिस्पर्धी असेल. सँडर्स स्वत:ला समाजवादी समजतो. व्हेनझुएलाच्या निमित्ताने समाजवादाची आणि सँडर्सची भरपूर टिंगल करता येईल, असा ट्रंप यांचा डावपेच होता.**

होते. ट्रंप यांचा असा अंदाज आहे की २०२० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत सँडर्स हा त्यांचा प्रतिस्पर्धी असेल. सँडर्स स्वत:ला समाजवादी समजतो. व्हेनझुएलाच्या निमित्ताने समाजवादाची आणि सँडर्सची भरपूर टिंगल करता येईल, असा ट्रंप यांचा डावपेच होता.

२२ जानेवारी २०१९ रोजी अमेरिकेने जाहीर केले– आजपासून व्हान ग्वाइडो हा ३८ वर्षांचा विरोधी पक्षाचा तरुण नेता व्हेनझुएलाचा हंगामी अध्यक्ष. तो कालांतराने निवडणुका वगैरे घेईल. सर्व काही ठीक होईल. अमेरिकेच्या हाताला हात लावून युरोपमधल्या देशांनी 'मम' म्हटले आणि व्हान ग्वाइडोला अध्यक्ष म्हणून मान्यता दिली. क्यूबा आणि निकराग्वा हे दोन देश सोडून पश्चिम गोलार्धातल्या सर्व राष्ट्रांनीही मान्यता दिली.

अमेरिकेने जंगजंग पछाडले तरी बाकी कोणतेच देश त्यांच्या गोटात सामील व्हायला तयार होईनात. तेव्हा संतापून अमेरिकेने व्हेनझुएलाचे त्यांच्या तेलाच्या विक्रीतून आलेले बँकेतले पैसे जप्त केले. वीज प्रकल्पात घातपात करून देशाची वीज दोन–तीन वेळा बंद पाडली. इंग्लंडने व्हेनझुएलाचे टनभर सोने जप्त केलं. व्हेनझुएलाशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवलात तर खबरदार अशी तंबी अमेरिकेने सर्वांना दिली. (त्यात आपणही होतो. आणि काही खळखळ न करता आपण शरणही गेलो!) आफ्रिका खंड, रशिया, इराण, चीन हे मात्र खंबीरपणे मदुरोच्या मागे उभे राहिले. रशियाने सैन्य आणि विमानं पाठवली. चीननं औषधं. युनो या संस्थेने मदुरो सरकारची मान्यता काढून घ्यायला नकार दिला.

**लोकशाही, मानवी हक्क अशी कारणं अमेरिकेने पुढे केली असली तरी अमेरिकनांना शेवटी खरी गोडी तेलात आहे. आजच्या दुसऱ्या ज्वलंत प्रश्नाचं– इराण – मूळही तेलात आहे. या दोन्ही प्रश्नांचा आपल्याला प्रचंड त्रास होणार आहे. व्हेनझुएलाचा प्रश्न अजूनही अधांतरी आहे. इराणचा 'जलवा' अजून चालू व्हायचा आहे. दोन्ही देशाकडून तेल घ्यायला आपल्याला बंदी आहे. तेव्हा तेलाची बिलं वाढणार आहेत. डॉलरमधला खर्च त्याहूनही वाढणार आहे. इकडे आड तिकडे विहीर अशी आपली परिस्थिती आहे.**

व्हेनझुएलातील सहा महत्त्वाच्या वर्तमानपत्रांपैकी चार विरोधी पक्षांची आहेत. विरोधी पक्ष मोर्चे काढतात, सभा घेतात. सभेत चाव्हेझ आणि मुदरो यांचा काळी माकडे असा उल्लेख असतो. कोणताही वक्ता उभा राहिला की भाषणाची सुरुवात 'मदुरोच्या आईची xx' अशी करतो, आणि त्याला हशा आणि टाळ्यांची साथ मिळते. हे सर्व असताना मी हुकुमशहा कसा, असा मदुरोचा प्रश्न आहे. व्हान ग्वाइहो हा देशभरच काय पण देशाच्या बाहेरही फिरत असताना मदुरोने त्याला कटाक्षाने हात लावला नाही. एका अर्थी मदुरोला व्हान ग्वाइडो हा तुरुंगाच्या आत असण्यापेक्षा बाहेरच हवा आहे. आत टाकला तर अमेरिकेला निमित्तच मिळेल. उलट बाहेर याची विदुषकी जगजाहीर होते.

शेवटी ज्याच्या हातात पोलीस आणि सैन्य त्याचे राज्य. त्यांना फोडण्यासाठी डॉलरच्या खोक्यांची आमिषं दाखवण्यात आली. पण त्यांच्यात जवळजवळ फितुरी झाली नाही. ३० एप्रिल २०१९ रोजी व्हान ग्वाइडोने देशात उठाव करायचे आवाहन केले. पण त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. जॉन बोल्टन, माइक पाम्पेओ आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष पेन्स यांनी भरपूर डरकाळ्या मारल्या. वेळप्रसंगी मी काहीही करेन असं ट्रंपसाहेब म्हणाले खरे. व्हान ग्वाइडोने अमेरिकन लष्कराला हस्तक्षेप करायची विनंती केली होती. पण ट्रंपसाहेबांनी त्याचा नाद सोडून दिला असं दिसतंय. त्यांना अमेरिकेत अंतर्गत विरोध होतोय अशातला भाग नाही. दुसऱ्या देशाची संपत्ती राजरोस लुटण्यास दोन्ही पक्षांना काहीही गैर वाटत नाही. तरी पण ट्रंपना दुसरं व्हिएतनाम नकोय.

मध्यंतरी (३ मे २०१९) त्यांचे आणि पुतिनसाहेबांचे फोनवर काहीतरी गुफ्तगू झाले. त्यांच्या चांगल्या दीड तासाच्या संभाषणात नक्की काय बोलणे झाले हे कुणीच स्पष्टपणे सांगत नाहीय. पण व्हेनझुएला हा एक विषय नक्की असणार. अमेरिकेचा परराष्ट्रमंत्री रशियाच्या परराष्ट्रमंत्र्याला रशियात जाऊन भेटला. मदुरोने त्याच्या विरोधकांबरोबर नॉर्वेमध्ये बोलणी चालू केल्याची बातमी आहे. सिरीयाप्रमाणे अमेरिकेला व्हेनझुएलामध्येही नांगी टाकावी लागेल असं दिसतंय.

लोकशाही, मानवी हक्क अशी कारणं अमेरिकेने पुढे केली असली तरी अमेरिकनांना शेवटी खरी गोडी तेलात आहे. आजच्या दुसऱ्या ज्वलंत प्रश्नाचं– इराण – मूळही तेलात आहे. या दोन्ही प्रश्नांचा आपल्याला प्रचंड त्रास होणार आहे. व्हेनझुएलाचा प्रश्न अजूनही अधांतरी आहे. इराणचा 'जलवा' अजून चालू व्हायचा आहे. दोन्ही देशाकडून तेल घ्यायला आपल्याला बंदी आहे. तेव्हा तेलाची बिलं वाढणार आहेत. डॉलरमधला खर्च त्याहूनही वाढणार आहे. बरं, अमेरिकेचं ऐकलं नाही तर immigration च्या प्रश्नावर अमेरिका आपले राडे करणार. आपली डॉलरची कमाई बरीचशी remittance वर अवलंबून. इकडे आड तिकडे विहीर अशी आपली परिस्थिती आहे.

**– मोहन द्रविड**

भ्रमणध्वनी : ९८२०५६३१३०

POSCO MAHARASHTRA

पोस्को ही दक्षिण कोरियातील जागतिक दर्जाची स्टील उत्पादन करणारी कंपनी आहे. कंपनीचे मुख्यालय सेऊल, दक्षिण कोरिया येथे आहे. पोस्कोची स्थापना १ एप्रिल १९६८ रोजी औद्योगिकीकरणाचे राष्ट्रीय उद्दिष्ट ठेवून केली. पोस्को ही कोरिया- तील पहिली इंटिग्रेटेड स्टील मिल आहे आणि ती वर्षातून ४१ दशलक्ष टन कच्चे स्टील उत्पादन करते. पोस्को ही जगामध्ये विविध व्यवसायांमध्ये कार्यरत आहे आणि सध्या जगातील ५३ देशांमध्ये उत्पादन आणि विक्री करत आहे. पोस्को तंत्रज्ञानाच्या व मानवजातीच्या विकासासाठी मोठे योगदान देत आहे आणि जगातील सर्वात स्पर्धात्मक स्टील निर्माती कंपनी बनली आहे. 'कॉर्पोरेट सिटीझनशिप बिल्डिंग अ बेटर फ्युचर टूगेदर' या व्यवस्थापन तत्त्वज्ञानाच्या आधारावर लोकांच्या दृष्टीने पोस्को ही एक विश्वसनीय आणि प्रतिष्ठित कंपनी आहे. आपल्या दैनंदिन वापरत आढळून येणाऱ्या घरगुती उपकरणे, वाहनउद्योग, जहाजबांधणी, बांधकाम, ऊर्जा इत्यादीसाठी लागणारे स्टील, तंत्रज्ञान आणि गुणवत्ता याचा अवलंब करून पोस्को कंपनी स्टीलचे उत्पादन करते.


पोस्को ही आज रोजी जगातील सर्वात मोठी पाचव्या क्रमांकाची स्टील मेकर कंपनी असून, जगातील अग्रगण्य स्टील संस्था वर्ल्ड स्टील डायनॅमिक्स यांनी पोस्को कंपनीस त्यांची उच्च मूल्यवर्धित उत्पादने, प्रक्रियाखर्च, तंत्रज्ञान यासाठी न्यू यॉर्क येथे झालेल्या १७ जून २०१९ रोजीच्या विश्लेषणपरीक्षण मीटिंगमध्ये गौरवलेले आहे व असा पुरस्कार सलग १० वर्षांपासून मिळत आहे. वर्ल्ड स्टील डायनॅमिक्सच्या विश्लेषणान्वे स्पर्धात्मकतेच्या दृष्टीने पोस्को कंपनी जागतिक स्तरावर प्रथम स्थानावर आहे, ग्राहकांना प्रथम स्थानी ठेवून पोस्को स्टील ग्राहकांना नेहमी उच्च दर्जाच्या स्टील उत्पादनांची पूर्तता करीत आहे.

५० वर्षांहून अधिक काळासाठी अनेक नव्या-जुन्या स्टील उत्पादनांसह पोस्कोने जगभरात ग्राहकांना आकर्षित केले आहे तसेच आता कंपनीने भारतामध्येदेखील उद्योग उभारलेला आहे. पोस्को महाराष्ट्र स्टील ही पोस्को कोरियाची उपकंपनी भारतामध्ये विविध प्रकारच्या इंटिग्रेटेड सेवा पुरवण्यासाठी भारतात आली आहे. महाराष्ट्रामध्ये गॅल्वनाइज्ड, गॅल्वनील्ड, कोल्ड रोल्ड आणि इलेक्ट्रिकल स्टील अशा विविध प्रकारच्या उत्पादनांचा यात समावेश आहे; ज्यात घरगुती उपकरणे, बांधकाम, वाहनउद्योग यासारख्या सर्व प्रकारच्या उद्योगांना लागणाऱ्या स्टीलचा समावेश आहे.


पोस्को महाराष्ट्र स्टील ही कंपनी सामाजिक बांधिलकीअंतर्गत नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असते त्याबरोबरच आसपासच्या भागाचाही विकास करणे या ध्येयधोरणाने काम करते. त्यामध्ये स्वच्छताअभियान, रक्तदानशिबिराचे आयोजन, वृक्षारोपण, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये प्रत्येक वर्षी २ कोटींची मदत, स्थानिक लोकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय उपचार, 'लेक वाचवा लेक शिकावा'अंतर्गत दरवर्षी कंपनी ग्रामपंचायत हद्दीतील जन्मलेल्या प्रत्येक मुलींच्या नावे रु. ५०,०००/- बँकेत मुदतठेव, जिल्हापरिषद शाळेचे बांधकाम, अंगणवाडी व मराठी शाळांना इ-लर्निंग सॉफ्टवेअर पुरविणे, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे इत्यादी उपक्रम राबवते.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी 'ग्रंथाली'कडून मराठी भाषा व ग्रंथप्रसार, तसेच समाजात वाचनाची आवड निर्माण होणेसाठी राबवत असलेल्या विविध उपक्रमांस हार्दिक शुभेच्छा देते.


॥ग्रंथाली॥




**राघवशेला**
मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.




**शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!**
मूल्य ८० रु.
सवलतीत ५० रु.




**फक्त सैल झालाय दोर**
मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.




# एकविसाव्या शतकात आर्थिक साक्षरतेसाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग

**आ**ज भारतासारख्या लोकसंख्येने प्रचंड असलेल्या देशात जिकडे १०० कोटी लोकांहून अधिक लोक मोबाईल फोन वापरतात तिथे आर्थिक साक्षरता करण्यासाठी नवनवीन साधनांचा वापर होणे गरजेचे आहे. या परिवर्तनात बरीच नवनवीन साधने वापरून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. या लेखातून आपण अशाच काही साधनांची ओळख करून घेणार आहेत.

१) फेसबुक – अल्पावधीत लोकप्रिय झालेले माध्यम. (सोशल नेटवर्किंग साईट)

अमेरिकेच्या मागोमाग भारतामध्ये २१ कोटी ३० लाख जनता फेसबुकचा वापर करते. फेसबुकवरती अभ्यासपूर्ण पोस्ट टाकणे सहज शक्य आहे आणि आपल्याला हव्या असलेल्या लोकांपर्यंत ही पोस्ट पाठवणे शक्य आहे. जितके तुमचे नेटवर्क शक्तिमान तेवढे तुम्ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकता. यात तुम्ही टाकलेली पोस्ट जितके लोक लाईक करतील तेवढी ती जास्तीत जास्त मंडळीपर्यंत पोहोचेल. यात व्हिडिओ पोस्ट करण्याची सोय असून छोटे व्हिडिओ जर पोस्ट केले तर ते जास्ती बघितले जातात. बहुतेक कंपन्या आता फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सचा उपयोग ब्रँड बिल्डिंग करण्यासाठी तसेच आपल्या प्रॉडक्ट्सची जाहिरात करण्यासाठी करत आहेत. त्यामुळे भारतातील बऱ्याच ब्रोकिंग कंपन्या, म्युच्युअल फंड एएमसी फेसबुकवरून आपला प्रचार करत आहेत. फेसबुक मार्फत सोशल मार्केटिंग करण्यासाठी शुल्क आकारले जाते आणि बरेचसे छोटे–मोठे उद्योजक आज या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपली प्रॉडक्ट्स पोहोचवायचा प्रयत्न करतात.

२) व्हाट्स ॲप – कानामागून आले आणि तिखट झाले असे म्हणता येईल असे लोकप्रिय झालेले माध्यम. २० कोटी लोकसंख्या आज हे



माध्यम वापरून आपले मनोरंजन, प्रबोधन करून घेत आहेत. यात आपण आपल्या परिचयाच्या लोकांना पोस्ट पाठवून नवनवीन माहिती अवगत करून देऊ शकतो. छोटे व्हिडिओ, चुटकुले, कविता यांच्या जोडीने मोठे लेख सुद्धा पीडीएफ फाईल करून शेअर करू शकतो. छोट्या छोट्या परंतु माहितीपूर्ण स्लाइड यात पाठवणे सहज शक्य आहे. जी माहिती देण्यासाठी मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करून मग ती पोहोचवायची त्यापेक्षा व्हाट्स ॲपसारख्या माध्यमातून देणे सोपे झाले आहे. हल्ली लग्नपत्रिका सुद्धा या माध्यमामार्गे देणे लोक पसंत करत आहेत. तसेच आता उभयतांना आशीर्वाद सुद्धा असे द्यायची पद्धत सुरू होत आहे. व्हाट्स ॲपमध्ये एक ब्रॉडकास्टिंग ग्रुप करून एकाच वेळी असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्याची सोय होऊ शकते. तेव्हा अशाच विविध मार्गातून आर्थिक साक्षरतेचा प्रचार करणे आता अपरिहार्य झाले आहे. व्हाट्स ॲपवर येणारी चित्रे ही बऱ्याचदा मोबाईल कंपन्या बनवून वाचकांसमोर आणत असतात. जेवढे आपण ते डाऊनलोड करू, तेवढा मोबाईल कंपन्यांना फायदा होत आहे.

३) ट्वीटर – आज भारतामध्ये जपानच्या मागोमाग ट्वीटर वापरणारी मंडळी आहेत. ज्यांची संख्या २२ कोटीच्या पुढे गेलेली आहे.



प्रसिद्ध व्यक्तींनी टाकलेली ट्वीट शेयर करून त्याच्यामार्फत मार्केटिंग करणे असा यात एक प्रकार आहे. हळूहळू फेसबुकवरील मंडळी ट्वीटरकडे वळत असल्याचा कल वाढताना दिसत आहे. आर्थिक बाबतीत मार्गदर्शन ही कडू गोळी आहे. पण तेच जर आज अमिताभ बच्चन यांच्या तोंडी एखादे वाक्य लोकांनी ऐकले तर त्यांचा त्यावर लवकर विश्वास बसतो. त्याचप्रमाणे राकेश झुनझुनवाला, रमेश दमानी, रामदेव अगरवाल आज काय ट्वीट करतात याकडे गुंतवणूकदार लक्ष ठेवून असतात.

४) वेबिनार – जसे पूर्वी सेमिनार होत असत आणि अजूनही होतात पण यात लोकांना गोळा करणे आता सोपे राहिले नसून वेबिनार मार्फत एकाच वेळी बऱ्याच जणांशी संपर्क साधणे आता शक्य झाले आहे. या प्रकारात तुम्ही तुमच्या ऑफिसमध्ये बसून एखाद्या प्रसिद्ध गुंतवणूक



तज्ञाची मुलाखत घेतली किंवा त्याचे भाषण ठेवलेत तर एकाच वेळी ३ ते ५ हजार दर्शक ते ऑनलाईन बघू शकतात. शिवाय वक्त्यांनी केलेल्या भाषणावर प्रश्नही विचारू शकतात.

हल्लीच आमच्या कंपनीने एका खाजगी बँकेसोबत असा वेबिनार केला, तेव्हा त्यांनी ५ लाख लोकांना ई-मेल द्वारे तो बघण्याची विनंती केली तेव्हा १२०० लोकांनी तो ऑनलाईन बघितला. परंतु याचा एक मोठा फायदा म्हणजे ह्या वेबिनारचे रेकॉर्डिंग नंतर कधीही वेबसाइटवर बघण्याची सोय बँकेने केली असून त्यांचे ग्राहक तसेच त्यांची वेबसाईट बघणारे कोणीही हा वेबिनार नंतर सुद्धा आपापल्या सवडीने बघू शकतात. वेबिनार रेकॉर्ड करण्यासाठी फार मोठे तंत्रज्ञान लागत नाही आणि एका सिंगल कॅमेऱ्याने शूटिंग करून ते लाईव्ह दाखवता येते. याचा खर्चही मर्यादित आहे आणि पेपरमध्ये जाहिरात करून किंवा पारंपरिक पद्धतीने बॅनर लावून किंवा पत्रके वाटून लोकांना आमंत्रित करण्यापेक्षा यात जास्ती गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचता येईल असे वाटते.

५) रेडिओ जिंगल्स – जी रेडिओ चॅनेल्स जास्त लोकप्रिय आहेत त्यांच्यावर कमी शब्दात चांगली चाल लावून जिंगल बनवून



प्रसारीत केली तर ती ऐकणाऱ्या लोकांना प्रभावित करते. तसेच रेडिओवरील आरजे जेव्हा आपल्या दमदार आवाजात एखाद्या प्रॉडक्टची जाहिरात करतो तेव्हा ती प्रभावशाली ठरते. कित्येक लोक अजूनही गाडी चालवताना रेडिओ ऐकत असतात आणि कॉलेजचे विद्यार्थी रेडिओ मिरचीसारखी चॅनेल्स ऐकत असतात. अशा वर्गाला आकृष्ट करण्यासाठी तसेच त्यांनी कमी वयात गुंतवणूक SIP च्या स्वरूपात सुरू करावी म्हणून बरेचसे म्युच्युअल फंड प्रयत्नशील आहेत. अजूनही ग्रामीण भागात टीव्ही बघणारे तसेच रेडिओ ऐकणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी रेडिओ जिंगल्स हे उत्कृष्ट साधन आहे.

६) शॉर्ट फिल्म्स – हल्लीच (AMFI) म्हणजेच असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस् ऑफ इंडिया ह्या संस्थेने 'म्युच्युअल फंड सही




है' असा एक कॅम्पेन सुरू केला. याद्वारे काही छोट्या फिल्म्स बनवून त्या टीव्हीवर तसेच थिएटरमध्ये मुख्य चित्रपट सुरू होण्याआधी तसेच इंटरव्हलमध्ये दाखवतात. यांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. तसेच या छोट्या असल्याने लोकांना त्या आवडतात. अशा फिल्म्सच्या माध्यमातून गुंतवणूक करताना कोणकोणते पर्याय आहेत आणि त्यापैकी म्युच्युअल फंड किंवा जर तुम्हाला एकरकमी पैसे गुंतवायचे नसतील तर SIP च्या माध्यमातून गुंतवणूक करणे कसे शक्य आहे याची माहिती देता येते.

७) यूट्यूब – हे सुद्धा एक प्रभावी माध्यम असून यात छोट्या फिल्म्स बनवून त्या अपलोड करणे शक्य आहे. गुंतवणूकदार एखादा कार्यक्रम २ तास बनून ऐकायला कंटाळतात परंतु यूट्युबवर अशा फिल्म्स बघणे पसंत करतो. यामध्ये सामान्य व्यक्तींचे चित्रण करून प्रभावी फिल्म्स करणे आता सहज शक्य आहे. तसेच ॲनिमेटेड फिल्म्स सुद्धा बनवून त्या अपलोड करता येतात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्व मंडळी आता यूट्यूबवर आपल्या आवडीचे शो, गाणी बघत आणि ऐकत असतात. अशाच लोकप्रिय कार्यक्रमामध्ये सुद्धा आपल्या कंपनीच्या प्रॉडक्ट्सची जाहिरात करता येते.

८) मोबाईल ॲप्लिकेशन्स – आज मोबाईलचा प्रचार खूप वाढल्याने त्यावर आपल्या कंपनीचे ॲप्लिकेशन जर डाउनलोड करता



आले, तर त्याचा फायदा आपला सेल वाढविण्यासाठी करता येतो. गुंतवणूकदारांना आपल्या कार्यालयात यायची गरज न पडता ते सर्व व्यवहार मोबाईलवरून ॲप द्वारा करण्याची सोय आता करता येते. बऱ्याचशा बँक्स आणि म्युच्युअल फंड amc यांनी अशी ॲप्लिकोन्स लाँच करून जास्तीत जास्त ग्राहकांचा फायदा करून दिला आहे. फंडस ट्रान्सफर, म्युच्युअल फंडस युनिट्सची ऑनलाईन खरेदी विक्री या सर्व गोष्टी आता सहज शक्य झाल्या आहेत.

९) एटीएम डिस्प्ले – जिथे जिथे ग्राहक जास्त प्रमाणात येतो तेथून आपल्या प्रॉडक्ट्सची माहिती देणे आता सर्व बँकांना गरजेचे



वाटत असून एटीएम मशीन द्वारा सुद्धा आपल्या सुविधांची माहिती बँक्स देताना दिसतात. तसेच एटीएम मशीनद्वारे बँकेत लोकांनी न येता बरेचसे व्यवहार करावेत अशा दृष्टीने बँक्स प्रयत्नशील आहेत.

विद्यमान सरकारने आता शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल करावीत अशी सूचना सर्व युनिव्हर्सिटींना केली असून लवकरच सर्व विद्यार्थ्यांना आपली प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात ठेवणे शक्य होणार आहे. या विद्यार्थ्यांची संख्या करोडोमध्ये असून त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी वरील उल्लेखलेल्या मार्गांचा वापर करणे गरजेचे आहे.

तसेच आर्थिक शिक्षण आता डिजिटल करणे गरजेचे झाले असून अधिकाधिक गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचण्यासाठी वरील सर्व मार्गांचा अवलंब करणे आता अपरिहार्य आहे. जी मंडळी यात मागे पडतील ती लोकांच्या विस्मरणात जातील. यामुळे अशा प्रकारे प्रोमोशन्स करणाऱ्या कंपन्या सध्या तेजीत असून त्या आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर विविध मार्गांनी लोकांच्या मनात आणि खिशापर्यंत पोहोचत आहेत.



# थोर लोकांचे काही सामान्य गुण

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**संगणकक्षेत्रात जागतिक पातळीवर आपली मुद्रा उमटवलेल्या, हातावर मोजता येतील एवढ्या 'प्रज्वलित दिव्यां'च्या यादीत दोन भारतीयही आहेत. सर्वसामान्यांपेक्षा या व्यक्ती निराळ्या आहेत हे माझ्या लक्षात आलं. या वेगळेपणामुळे त्या थोर झाल्या की थोरपणामुळे त्यांच्यात वेगळेपण आलं हे सांगणं कठीण. तरी त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यानं आपण बरंच काही शिकू शकतो हे नि:शंक.**

**मा**झ्या नवीन पुस्तकात (**संगणकक्षेत्रातले काही प्रज्वलित दिवे,** ग्रंथाली, मुंबई २०१९) मी बिल गेट्स, स्टीव्ह जॉब्ज, ॲमेझॉनचा जगात श्रीमंत जेफ बेझोझ, ट्रॅव्हिस उबरचा काळनिक, गुगलचे (आता अल्फाबेट कंपनी) लॅरी पेज व सर्गे ब्रिन, फेसबुकचा मार्क झकरबर्ग व अलिबाबा कंपनीचा जॅक मा, या जगावर आपली मुद्रा उमटवून मानवी जीवन पार बदलणाऱ्या व्यक्तींचा आत्मचरित्रात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न केला. या यादीत दोन भारतीयांचाही (सुंदर पिचाय व सत्या नाडेला) समावेश केला. या थोर लोकांना प्रज्ञावंत म्हणणं चुकीचं ठरेल कारण स्टीव्ह जॉब्जनं म्हटल्याप्रमाणे व्हॅलीतल्या लोकांनी फारशी ज्ञाननिर्मिती केलेली नाही. उलट त्यांनी दुसऱ्यांनी निर्माण केलेलं ज्ञान मानवी जीवनात परावर्तित करण्यास वापरलं.

ते जवळजवळ सगळे स्वयंप्रेरणेनं वर आलेले. अनेकांना गुरू असा नव्हताच किंवा नाही. म्हणून त्यांना महर्षी म्हणणंच योग्य ठरेल. सर्वसामान्यांपेक्षा या व्यक्ती निराळ्या आहेत हे माझ्या लक्षात आलं. या वेगळेपणामुळे त्या थोर झाल्या की थोरपणामुळे त्यांच्यात वेगळेपण आलं हे सांगणं कठीण. तरी त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यानं आपण बरंच काही शिकू शकतो हे नि:शंक. मानवी जीवन बदलण्याचा ध्यास लागलेल्यांच्या मार्गातही अनेक अडचणी येतात. त्यामुळे खचून न जाता या व्यक्ती दुप्पट जोमानं प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतात. अपयशामुळे ते मुळीच निराशाग्रस्त झाले नाहीत. बिल गेट्सची विंडोज ही कार्यप्रणाली दोनदा बाजारात फसली. त्याला दशलक्षावधी डॉलरचं नुकसान झालं. पण म्हणून त्यानं काम बंद केलं नाही. शेवटी तिसरा प्रयत्न यशस्वी ठरला. आज जगातली ९५ टक्के संगणकयंत्रं या कार्यप्रणालीवर चालतात.

म्हणून या थोर व अनभिषिक्त व्यक्तींचे विशिष्ट गुण कोणते याचा शोध लावणं आवश्यक आहे.

### विक्षिप्तपणा

कुठल्याही थोर व्यक्तीत थोडाफार विक्षिप्तपणा असतो हे नाकारता येणार नाही. जगप्रसिद्ध चित्रकार व्हॅन गोह् (Gogh) एवढा विक्षिप्त की अनेक लोक त्याला पिसं लागलं असं समजत. शिल्पकार मिकीलँजिनो इतका कंजूष की तो तेच कपडे व जोडे नेहमी घालत असे. आपली कमाई तो खाटेखाली लपवून ठेवी. एखाद्या फकिरासारखा राहणारा कलावंत कालवश झाला तेव्हा तो श्रीमंत होता असं आढळून आलं. या ऐतिहासिक व्यक्तींना शोभेल अशा विक्षिप्तपणानं माझ्या पुस्तकातले अनेक थोर प्रतिभावंत एकमेकांना जोडलेले आहेत असं मला

आढळून आलं.

बिल गेट्सला बैठक रंगली असता अचानक उठून हवेत उडी मारण्याची सवय असे. ते बघून सुरुवातीला लोक अचंबित होत. पुढे ते त्याचा हा विक्षिप्तपणा स्वीकारू लागले. गुगल कंपनीचा सोव्हिएट युनियनमधे जन्मलेला सहसंस्थापक-सर्गे ब्रिन तर विक्षिप्तपणाच्या बाबतीत शिखरस्थ आहे. त्याला चारघौघांत संवाद कसा साधायचा हे ठाऊक नाही ही एक विक्षिप्त बाब झाली. पण त्याचं वेगळेपण सांगणारी, आपले डोळे विस्फारणारी दुसरी गोष्ट म्हणजे बैठक सुरू असता त्याला मधूनच व्यायाम करण्याची हुक्की येते. तो पाय हवेत फेकून हातावर चालतो. ऑफिसला सूटबूट न चढवता पोहण्याचे वस्त्र घालतो. सर्वसामान्य कर्मचाऱ्यानं असं केलं तर त्याला दरवाजा दाखवण्यात येईल. परंतु सर्गे कंपनीचा संस्थापक व अब्जाधीश. त्याला 'नको' कोण म्हणणार?

चीनमधल्या जॅक मा यानं अलिबाबा कंपनी स्थापन करून महाजालावर वस्तूंप्रमाणे सेवा विकण्यास सुरुवात केली. रोखविरहित व्यवहार करण्याच्या वित्तक्षेत्रात ही कंपनी अग्रणी समजण्यात येते. एवढी मोठी कंपनी चालवताना तणाव उद्‌भवणारच. म्हणून तो हिंदू धर्मातला प्राचीन उपाय वापरतो. हातात जपमाळ घेऊन बैठकीला जातो. चित्तशांतीसाठी आधुनिक गोळ्या फस्त न करता त्यानं परधर्मीय मार्ग अवलंबला यात विक्षिप्तपणा नसला तरी वेगळेपण आहे हे निश्चित.

आता गुगलचा अध्यक्ष सुंदर पिचाय घ्या. त्याला सारखे निर्णय घेऊन योजना मार्गी लावाव्या लागतात. त्याची स्मरणशक्ती एवढी दांडगी की मित्रांचे व निकटवर्तीयांचे सर्व फोन नंबर त्याच्या लक्षात राहतात. अहवालातली बारीकसारीक माहिती तो विसरत नाही. बैठकीत प्रकल्प सादर केल्यावर निर्णय घेण्याची वेळ आली की पिचायमहाराज खोलीबाहेर जाऊन विचारमग्न होतात. त्या चिंतनात निर्णय घेऊन परत आला की तो जाहीर करतो. भारतीय बाबूचा विलंब करण्याचा रोग त्याला जडलेला नाही.

ॲमेझॉनचा संस्थापक व मुख्य जगात सर्वात श्रीमंत म्हणून ओळखला जातो. त्यानं बिल गेट्सवर केव्हाच बाजी मारली. तो एवढा हुशार की नुकत्याच झालेल्या घटस्फोटात बायकोला अर्धी संपत्ती न देता सुमारे एकतृतीयांश देऊन सुटला. त्यामुळे त्याचं जगातला सर्वाधिक श्रीमंत म्हणून कमावलेलं स्थान अबाधित राहिलं. त्याचं वेगळेपण असं की तो नेहमी हसत असतो. हे सहजहास्य दिलखुलास व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती की आतल्या तणावावर ओढलेलं पांघरूण हे सांगण कठीण. परंतु ते विशिष्ट वाटतं हे मात्र निश्चित. खिशात जवळजवळ १०० अब्ज डॉलर खुळखुळत असता त्याला 'विक्षिप्त' म्हणण्याची कुणाची काय ताकद?



**पारंपरिक शिक्षणावर हरताळ**

सर्वसामान्यांच्या विचारांची जडणघडण शिक्षणातून होते. आपल्या देशात तर मनुष्याच्या नावासमोर जेवढ्या जास्त पदव्यांची रांग असते तेवढा तो हुशार समजण्यात येतो. या पुस्तकी ज्ञानाला व्हॅलीमध्ये शून्य महत्त्व देण्यात येतं. इथे चाकोरीबाहेर विचार करणाऱ्यांचा आदर होतो. तोच वर येतो. त्यामुळे इथे पीएच.डी. पदवीधारकांची डाळ शिजत नाही. त्यापेक्षा मिसरूड फुटण्याऐवजी मतं फुटणाऱ्यांचं जास्त स्वागत करण्यात येतं. या संगणकमहर्षींमधल्या अनेकांना विद्यापीठीय शिक्षण म्हणजे वेळेचा अपव्यय वाटला. स्टीव्ह जॉब्ज, बिल गेट्स व मार्क झकरबर्गनी तर शिक्षण अर्धवट सोडून आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यास सुरुवात केली. अशा लोकांजवळ पदवी नसल्यामुळे त्यांच्याजवळ भारताच्या तिजोरीपेक्षा जास्त पैसे असले तरी चपराशाची साधी नोकरीदेखील मिळणार नाही. उच्चशिक्षणाचा नवनिर्मितीशी काहीएक संबंध नाही हे या व्यक्तींनी सिद्ध करून दाखवलं. पारंपरिक शिक्षण विद्यार्थ्यांना मळलेल्या वाटेनं प्रवास करण्यास शिकवतं, पण क्रांती करण्यासाठी अशी वाट सोडून स्वतंत्र मार्ग शोधण्याची आवश्यकता असते.


**द्रष्टेपणा**

या व्यक्तींमध्ये दूरदर्शीपणाचा गुण प्रखरतेनं आढळतो. आपण केलेल्या संगणकक्रांतीचे दूरगामी परिणाम काय होतील हे हेरण्याची एक अद्‌भुत कला या लोकांना लाभलेली आहे. १९७४ मध्ये बिल गेट्सनं जेव्हा हार्वर्डच्या महासंगणकावर टेबलावर मावणाऱ्या संगणकयंत्रासाठी कार्यप्रणालीचं (operating system) मंत्रणालेखन केलं तेव्हा आपण एक निराळं क्षेत्र स्थापन करून नवीन संस्कृतीला आव्हान देत आहोत याची त्याला कल्पना होती. विशेष म्हणजे त्यानं हे काम चोरून केलं, कारण त्याला हार्वर्डच्या

**सर्वसामान्यांच्या विचारांची जडणघडण शिक्षणातून होते. आपल्या देशात तर मनुष्याच्या नावासमोर जेवढ्या जास्त पदव्यांची रांग असते तेवढा तो हुशार समजण्यात येतो. या पुस्तकी ज्ञानाला व्हॅलीत शून्य महत्त्व देण्यात येतं. इथे चाकोरीबाहेर विचार करणाऱ्यांचा आदर होतो. तोच वर येतो. त्यामुळे इथे पीएच.डी. पदवीधारकांची डाळ शिजत नाही. त्यापेक्षा मिसरूड फुटण्याऐवजी मतं फुटणाऱ्यांचं जास्त स्वागत करण्यात येतं. या संगणकमहर्षींमधल्या अनेकांना विद्यापीठीय शिक्षण म्हणजे वेळेचा अपव्यय वाटला.**


जॅक मा


सुंदर पिचाय


स्टिव्ह जॉब्ज

संगणकावर काम करण्याची परवानगी नव्हती. आपल्या कामाचं महत्त्व ओळखण्याएवढा द्रष्टेपणा त्याच्यामध्ये होती.

बहुतेक उद्योजक सर्वेक्षण करून ग्राहकांच्या पसंतीनुसार उत्पादनं तयार करतात. त्यामुळे त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो. पण स्टीव्ह जॉब्सची उत्पादनं सर्वस्वी नवीन, कधीही न बघितलेली आणि क्रांतिकारक. त्याविषयी ग्राहकांची पसंती कशी आजमावणार? म्हणून सर्वेक्षणाच्या धोपट मार्गाचा स्टीव्ह जॉब्जनं त्याग केला होता. त्यानं दूरदर्शीपणा वापरून उपभोक्त्यांची स्वीकारार्हता अचूकपणे हेरली. त्यामुळे 'ॲपल' कंपनी कमालीची यशस्वी झाली. त्यात चूक झाली तर कंपनीवर कसे दूरगामी हानिकारक परिणाम होतात हे ॲपल व मायक्रोसॉफ्टच्या सहसंस्थापकांच्या दूरदर्शीपणावरून कळतं. बिलनं कंपनीची बांधणी करताना त्यावेळी उद्यास येणाऱ्या महाजालाचं महत्त्व ओळखलं नाही. स्टीव्ह जॉब्जनं मात्र ते हेरलं व त्यानुसार 'ॲपल'ची उपकरणं तयार केली. ही चूक मान्य करून अनवधानामुळे आपल्या कंपनीचं अब्जावधी डॉलरचं नुकसान झालं असं बिल गेट्सनं अनेक ठिकाणी सांगितलं. 'ॲपल'नं सगळी बाजारपेठ काबीज केल्यावर मायक्रोसॉफ्टला स्पर्धात्मक उपकरणं बाजारात (Surface लघुसंगणक-यंत्रं, पॅड्स, फोन वगैरे) आणण्याचं सुचलं. त्यावेळी स्टीव्ह बालमर कंपनीचा मुख्य व बिल चेअरमन होता. 'ॲपल'च्या अतियशस्वी आयफोनशी स्पर्धा करण्यासाठी मायक्रोसॉफ्टनं अनेक अब्ज डॉलर खर्च करून स्वीडनची नोकिया कंपनी विकत घेतली. तो सौदा कंपनीला महाग पडला. त्याचे फोन्स बाजारात आपटले आणि जवळजवळ सर्व किंमत निर्लेखित करावी लागली.

अलिबाबा कंपनीचा जॅक मा १९९५ मध्ये प्रथमच अमेरिकेला आपल्या मित्राकडून उसने दिलेले पैसे वसूल करण्यास आला तेव्हा त्यानं त्याला बंदूक दाखवली. मात्र सर्वच वाया गेलं नाही. जॅक मा यानं आयुष्यात प्रथमच टेबलावर भावणारं (Laptop) संगणकयंत्र बघितलं आणि त्याच्या कल्पनेनं भरारी घेतली. इतर लहान कंपन्यांचा माल विकून विपणनाचा नवीन मार्ग उपयोगात आणू शकतो हे त्यानं आपल्या दूरदृष्टीनं ओळखलं व चीनमध्ये परतल्यावर नातेवाईकांकडून पैसे गोळा करून अलिबाबा कंपनी स्थापन केली. आज तो चीनमधला दुसऱ्या नंबरचा श्रीमंत म्हणून ओळखला जातो. कंपनी उमेदीत असताना या वर्षीच वयाच्या ५४व्या वर्षी त्यानं राजीनामा देऊन आपल्या दुसऱ्या स्वप्नाचा पाठपुरावा करण्याचं ठरवलं. त्याला मास्तरकीचा पेशा सुरुवातीपासूनच आवडत होता.

## कामसू वृत्ती

आपल्या स्वप्नांना वास्तवात उतरण्यासाठी भगीरथ प्रयत्न करण्याची, अहोरात्र कष्ट उपसण्याची जी वृत्ती लागते ती या सर्व थोर मंडळींत मला दिसून आली. हार्वर्डमध्ये असताना बिल गेट्स रात्री चोरून संगणक प्रयोगशाळेत जाऊन काम करे व थकून गेल्यावर तिथेच जमिनीवर झोपे. तो एक साफसफाई करणारा कृश मुलगा असं समजून त्याच्या चौर्यकर्माकडे कुणी गांभीर्यानं बघितलं नाही. एका सुखवस्तू घरात जन्मल्यामुळे त्याला या खडतर जीवनाची सवय नव्हती. पुढे मायक्रोसॉफ्ट प्रस्थापित झाल्यावर त्याच्या कामाचा उपसा कमी न होता वाढला. तो कंपनीतील कर्मचाऱ्यांनाही रात्रंदिवस काम करण्यास भाग पाडे. त्यामुळे त्यानंच नव्हे तर अधिकाऱ्यांनी सामाजिक जीवन (Social Life) असं अनुभवलं नाही. स्पर्धा करणाऱ्या इतर कंपन्या टिकल्या नाहीत. कसंही करून त्याच्या कामाचा वेग कमी व्हावा म्हणून त्या प्रार्थना करू लागल्या. काही वर्षांनंतर त्याला प्रतिसाद मिळाला. बिलचं लग्न झालं. त्यामुळे तो रात्री-बेरात्री कंपनीत वेळ खर्च करू शकला नाही. तरीही त्यानं स्वप्नपूर्तीसाठी तेवढा त्याग केला. स्टीव्ह जॉब्जनं एकाच वेळी दोन सार्वजनिक कंपन्यांचा (ॲपल व पिक्सार) मुख्य होऊन विक्रम केला. त्या कामाचा व्याप व तणाव एवढा की त्याची तब्येत बिघडली. तरीही तो नियमित ऑफिसमध्ये जात होताच.

जॅक मा व त्याची बायको कामात एवढी मग्न की त्यांना आपल्या लहान मुलाची काळजी घेण्यास वेळ नव्हता. म्हणून त्यांनी आपल्या अपत्याला बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवलं. लवकरच त्यांना आपण पितृ-मातृप्रेमाला मुकलो याचं भान आलं व मुलाची काळजी घेण्यास आई घरी बसली. जॅकनं मात्र सलगपणे काम सुरूच ठेवलं. मनुष्य कितीही हुशार असला, त्याची संकल्पना कितीही क्रांतिकारक असली आणि गुंतवणूकदारांनी कितीही आर्थिक

पाठिंबा दिला तरी संस्थापकाच्या अहोरात्र, अव्याहत व अविश्रांत कष्टांशिवाय कंपनी यशस्वी होऊ शकत नाही. घाम गाळल्याशिवाय दाम मिळत नाही हे जुनं तंत्र आहे. यशाचे घटक म्हणजे ९९ टक्के घाम व १ टक्के बुद्धी असं अनेक शोध लावून मानवी जीवन सुखकर करणाऱ्या थॉमस एडिसननं म्हटलं होतं. ते संगणकक्षेत्राच्या बाबतीतही खरं आहे. आत्मविश्वास, आडमुठेपणा, जिद्द, द्रष्टेपणा, कर्तव्यतत्परता व अडचणीमुळे खचून न जाण्याची वृत्ती हे गुण या महर्षींमध्ये विपुल प्रमाणात सापडतात. ते सर्व उद्दिष्ट वास्तवात उतरवण्याच्या कल्पनेनं झपाटले होते.

याबाबतीत पुन्हा स्टीव्ह जॉब्जचं उदाहरण मार्गदर्शक ठरेल. स्वादुपिंडाचा (Pancreas) कर्करोग आपल्याला आहे हे कळल्यावर सर्वसामान्य माणूस आयुष्याला रामराम ठोकून ज्ञानेश्वरीपठण करेल. त्याला कुठलंच काम करण्यात रस वाटणार नाही. त्याचा सर्व दृष्टीनं शक्तिपात होईल, पण त्या रोगाच्या आहारी न जाता स्टिव्हनं काम सुरूच ठेवलं आणि आयफोन जगाला दिला व क्रांती घडवून आणली. आज न्यू यॉर्कच्या टाइम्स स्क्वेअरमध्ये जा की मुंबईतल्या रिक्षावाल्यांच्या अड्ड्याला भेट द्या, तिथले अर्धेअधिक लोक कानाला आयफोन किंवा त्याचा स्वस्त अवतार भिडवून जीभ चालवताना दिसतात. थोर आणि सामान्य माणसात हा जो फरक आढळतो तो आपल्या यशासाठी अनुकरणीय आहे.

या पुस्तकातल्या १० महर्षींचं व्यक्तिगत जीवन वेगवेगळं असले तरी ती काही सामान्य धाग्यानं जोडलं आहे, हे मला या अभ्यासावरून आढळलं. म्हणून ती कुणालाही प्रेरणादायी वाटावीत अशीच आहेत.


**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)


**मनुष्य कितीही हुशार असला, त्याची संकल्पना कितीही क्रांतिकारक असली आणि गुंतवणूकदारांनी कितीही आर्थिक पाठिंबा दिला तरी संस्थापकाच्या अहोरात्र, अव्याहत व अविश्रांत कष्टांशिवाय कंपनी यशस्वी होऊ शकत नाही. घाम गाळल्याशिवाय दाम मिळत नाही हे जुनं तंत्र आहे.**

## नक्षत्रांचे देणे...!!

दिवस आजि सोनियाचा, अमृते पाहिला
शताब्दी सोहळा होई साजरा, महाराष्ट्र अवघा मुदित जाहला
पहाटेच्या मंगल प्रहरी, १९१९ वर्ष उदयले
पृथ्वीच्या प्रांगणी, नक्षत्रांचे आगमन झाले
सुधीर फडके, स्नेहल भाटकर, ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे
अनमोल रत्नांचा जन्म झाला, महाराष्ट्र पावन झाला
बाबुजी, स्नेहल, पुल गदिमांनी, नक्षत्रांचे देणे दिले
महाराष्ट्राच्या संस्कृतीवर, कलेचे संस्कार केले
साधी सोपी सरळ नव्हती, वाट होती काटेरी
जिद्द मेहनत चिकाटीने, त्यांनी बनविली मखमली
विविध दालने साहित्याची, अलंकारिली प्रतिभेने
अजरामर कलाकृतींनी, भाषेला विभूषित केले

गदिमांच्या लेखणीने, गीतरामायण रचले
बाबुजींच्या स्वरसंगीताने अजरामर केले
गदिमा पुलंच्या शब्दांनी, मराठी साहित्य समृद्ध झाले
बाबुजी स्नेहलच्या संगीताने रसिकांना धुंद केले

इंद्रायणी काठी, समाधी लागली ज्ञानेशांची
प्रतिभा गदिमांची, मराठी भाषेच्या अस्मितेची
पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा
गदिमा सांगत असती अर्थ जीवनाचा

सुखाच्या धाग्यात, बाबुजींनी संगीत गुंफले
कानडा पंढरीचा, सुरांचा राजा ठरले
बाबुजींचे सूरसंगीत, अनादि अनंत असे
देहाच्या तिजोरीत, स्वरांचा ठेवा वसे

रचनेतील सात्त्विकतेने, सुरात आर्तता आली
विचारातील प्रासादिकतेने, अध्यात्माची छाया पडली
भाटकरांच्या भावभक्तीने, विठ्ठल समोर ठाकला
रूप पहाता लोचनांनी, जीव कृतार्थ झाला

व्यक्ती आणि वल्लीतील, नारायण मनाला भावला
बटाट्याच्या चाळीत, मराठी माणूस रंगला
पुलंच्या विनोदाने, महाराष्ट्र हसला
शब्दकोटींच्या दुनियेत आकंठ बुडाला


**– मेघना अशोक वर्तक**
भ्रमणध्वनी : ९७१-५०-४२६-३७१४

# पुस्तक पुरस्कार

## कवी गणेश घुले यांच्या ‘सुंदर माझी शाळा’ बालकवितासंग्रहाला पुणे महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार प्रदान
## ‘सुंदर माझी शाळा’ बालकविता संग्रहाला मिळालेला हा सलग पाचवा राज्यस्तरीय पुरस्कार




कवी गणेश घुले यांच्या सुंदर माझी शाळा या बालकवितासंग्रहाला ‘महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे’चा वि. वि. बोकिल उत्कृष्ट बालवाङ्मय स्मृती पुरस्कार गुजरात येथील सरस्वती सन्मान प्राप्त ज्येष्ठ लेखक सितांशु यशचन्द्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे, पुणे मसापचे प्रा. मिलिंद जोशी, सुनीता राजेभोसले, उद्धव कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख रक्कम, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून पुणे मसाप च्या ११३व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, २६ मे २०१९ रोजी, सायं. ६ वाजता पुणे येथील निवारा सभागृहात यशचन्द्र यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## संगीता अरबुने यांच्या ‘मनीमानसी’ या ललित लेखसंग्रहाला
## मराठी वाङ्मय परिषद बडोदा तर्फे प्रथम पुरस्कार




संगीता अरबुने यांच्या ‘ग्रंथाली’ प्रकाशित ‘मनीमानसी’ या ललितलेखसंग्रहाला मराठी वाङ्मय परिषद बडोदा तर्फे ललित लेखसंग्रहासाठीचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार कवी, लेखक आणि बडोदा येथील सयाजीराव विद्यापीठाचे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सचिन केतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर सोहळा बडोदा येथे महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कलादालनात नुकताच पार पडला. यावेळी व्यासपिठावर डॉ. सचिन केतकर यांच्यासह मराठी वाड्मय परिषद बडोदाचे अध्यक्ष मा. दिलीप खोपकर, विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख मा. डॉ. संजय करंदीकर उपस्थित होते. संगीता अरबुने यांच्या ‘मनीमानसी’ या ललित लेख संग्रहाला मिळालेला हा तिसरा पुरस्कार. रोजच्या जगण्यातील विषय, विषयाची सहज सुलभ मांडणी आणि ओघवती भाषाशैली ही या संग्रहाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.


# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

**मराठी स्त्रीची बदलती अस्मिता**

**नीलिमा भावे**




**तुफानातील दीपगृहे**

'स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव द्यायचा की दडपून टाकायचे, हे पुरुष ठरवत आले आहेत – घरातही आणि समाजातही, कालही आणि आजही. स्त्रीमुक्तीच्या विचारांशी बांधिलकी असो किंवा नसो, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही आणि स्त्रिया गरज पडेल तेव्हा पुढे होऊन कठीण परिस्थिती सावरतात आणि सुधारतात. घरातही आणि समाजातही, कालही आणि आजही! हीदेखील वस्तुस्थिती आहे.' ही वस्तुस्थिती कुणालाही नाकारता येत नाही, येणार नाही, परंतु केवळ मत मांडून या वस्तुस्थितीला न्याय दिला असे होत नाही, त्यासाठी आजपासून मागे भूतकाळाची पाने चाळणे आवश्यक आहे. त्यातली उदाहरणे, प्रसंग, घटना, व्यक्ती यांचा शोध घेणे आवश्यक आहे. आणि त्यांच्या उदाहरणासह, पुराव्यासह ते मत व्यक्त करणे आवश्यक आहे. तेव्हाच या मताच्या कसाला झळाळी प्राप्त होऊ शकते. ते झळाळी देण्याचे उत्तम उदाहरण समोर ठेवले आहे 'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता' या पुस्तकाने.

महाराष्ट्र आणि इथला शिवाजीपूर्वकाळ, शिवाजीकाळ आणि शिवाजीनंतरचा काळ, असा एक विस्तारलेला पट या विषयासाठी निवडलेला आहे. शिवाजीच्या उदयापूर्वी यादव, मोगल, आदिलाही, निजामशाही, बरीदशाही यांचा अंमल या भूमीवर होता. शिवाजीनंतर पेशवे, इंग्रज यांचा अंमल होता. यात संभाजी, राजाराम, शाहू यांचाही समावेश आहे. या संपूर्ण कालखंडाचा आवाका आणि त्या–त्यावेळी असलेल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीत असलेली 'स्त्री–अस्मिता' हा या पुस्तकाचा गाभा आहे. साधारणपणे अडीचशे वर्षांच्या या पटावर साठ स्त्रियांचा संदर्भ कोरलेला दिसून येतो. या स्त्रिया राजघराण्याशी संबंधित असल्याने त्यांचे स्वभाव, महत्त्वाकांक्षा, आक्रमकता, कारस्थानीपणा, क्रौर्य, शौर्य, समयसूचकता, धाडस, दूरदर्शीपणा, मुत्सद्दीपणा, औदार्य, त्याग या सगळ्यांचा परिचय कर्तृत्वाबराबेरच होत जातो.

आदिलशाही घराणातल्या पूँजी खातिम, बडी बेगम, शहरबानू, चांदबीबी यांचे कर्तृत्व आदिलशहाइतकेच लक्षात येणारे आहे. शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी अफझलखानाला सर्व सामग्रीसह व सल्लामसलत करून रवाना करण्यात या बडी बेगमचा पुढाकार उल्लेखनीय होता. काफिरांच्या हल्ल्यापासून मुसलमानांचा बचाव करणारी निजामशाहीतील मलिका–इ–जहाँ बीबी अमीना, निजामशाहीचा कारभार स्वत:च्या हातात घेणारी खूँजा हुमायूँ यांचे कर्तृत्व चांदबीबीइतकेच मुत्सद्दी व समयसूचकता दर्शवणारे आहे.

जानी बेगम ही औरंगजेबाचा मुलगा अझीमशहाची पत्नी व दारा शिकोहची मुलगी, संभाजीच्या फौजेने धारूर येथे छावणीवर हल्ला केला तेव्हा पडदा काढून घोड्यावर स्वार झाली. अग्रभागी उभी राहून मराठ्यांच्या सैन्याशी लढून तिने ही फौज मागे परतवून लावली.

जिजाबाई, सईबाई, सोयराबाई यांच्या मुत्सद्दी दूरदर्शीपणाची नोंद शिवाजीच्या एकूण कारकिर्दीतून वेगळी करणे इतिहासाला शक्य नाही. येसूबाई, ताराबाई यांच्या कर्तृत्वाचा वारसा, त्यांच्यातील गुणांचा उजळपणा मराठी राज्याचा स्वाभिमान उंचावणारा आहे. शाहूमहाराजांच्या सकवारवाई व सगुणाबाईंचा कारभारातील हस्तक्षेप आणि वचक, माहूरचे देशमुख उदाराम चव्हाण यांची पत्नी रायबागनचे शौर्य, जिजाबाई भोसले यांच्या मातोश्री म्हाळसाबाई यांची समयसूचकता, हिंमत व राजकीय दृष्टी, निंबाळकर घराण्यातली द्वारकाबाई हिचा मुत्सद्दीपणा, मल्हारराव होळकरांची सून अहिल्याबाई, दौलतराव शिंद्याची बायको बायजाबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, पेशव्याच्या गोपिकाबाई, अशा काही निवडक स्त्रियांचा राजकारभारातील सहभाग याविषयी या पुस्तकात आलेली उदाहरणे, तो संपूर्ण कालखंड उभा करतात.

स्त्रियांना मिळणारे स्थान हे त्या त्या कालखंडातील सामाजिक व्यवस्था, आर्थिक परिस्थिती, राजकीय परिस्थितीशी निगडित होते, तसे शिक्षण, लग्न, वडिलोपार्जित संपत्तीतून मिळणारा वारसा, यांचेही संदर्भ महत्त्वाचे ठरतात. मुसलमान, मराठा, ब्राह्मण या स्त्रियांचे एकूण स्थान आणि अन्य समाजातील स्त्रियांचे स्थान यात असलेला फरक, त्यांनी जपलेली अस्मिता आणि त्यांना मिळालेला वाव याचेही विवेचन यात होते.

'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता' या विषयाचा आवाका मोठा आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक घडामोडी आणि चालीरीती या सगळ्यांचे भान ठेवून, त्याचे परिणाम, बदलणारी परिस्थिती, अनिश्चितता, अस्थिरता, आक्रमणे, बदलणारे शासक व त्यांची धोरणे यातून 'अस्मितेचा' शोध घेणे, ही अवघड जबाबदारी लेखिकेने स्वीकारली आणि ती लीलया पेलली आहे. मोगल ते इंग्रज, बुडालेल्या 'शाह्या', बुडालेली मराठी–पेशवेशाही, यांची पाने उलगडून नेमका सार शोधण्यासाठी प्रचंड अभ्यासाची गरज होती. ती साधने मिळवणे, त्यांची संगती लावणे, आणखीच कठीण कर्म. परंतु लेखिकेने चिकाटीने, मेहनतीने या सगळ्यांवर मात केलेली आहे. नेमकेपणाने, विषयवार सुसंगत असे खंड करून विषयावरील पकड घट्ट ठेवलेली आहे. लिखाणात जो कसदारपणा असावा लागतो तो त्यांच्याकडे आहे, तसेच विषयावर जी हुकमत असावी लागते, ती त्यांच्या व्यासंगावरून लक्षात येते. त्यामुळे एक चांगले संदर्भमूल्य असलेले पुस्तक आपण वाचले याचा वाचक म्हणून आनंद आहेच, शिवाय ज्यांना या कालखंडाचा अभ्यास करायचा असेल त्यांच्यासाठी हे पुस्तक वाटाड्याचे काम नक्की करील, असे ठामपणे म्हणता येते.

या पुस्तकात विषयप्रवेश आणि प्रस्तावना यांचे मोल पुस्तकातील संदर्भाइतकेच महत्त्वाचे आहे. शेवटी नकाशे आणि संदर्भसूची दिलेली आहे. अभ्यासकांनी जरूर तिची नोंद घ्यावी. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. अस्मितेचे प्रतीक कसकसे बदलत गेले, चंद्राच्या वेळेप्रमाणे, त्याची सुरेख योजना मुखपृष्ठावर केलेली आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

# ग्रंथपान




**अस्वस्थतेचे प्रतिबिंब उद्रेकाला कवेत घेणारे**

इथं काळ्या तव्यांवर भाजले जातात
चणेफुटाणे पानिपतासारखे
अशावेळी आपणच पेटवावीत लाकडे ढणढणा
मरीन लाईनच्या समुद्राला आग लावण्यासाठी

ही आहे कविता 'मुंबई...बंबई...बॉम्बे' या संग्रहातली. डॉ. बाबासाहेब लबडे यांचा हा कवितासंग्रह. ग्रंथालीने प्रकाशित केलेला, रसिक वाचक आणि चोखंदळ समीक्षक यांच्या पंसतीला उतरलेला. डॉ. बाबासाहेब लबडे हे स्वत: उत्तम समीक्षक आहे. रसास्वाद घेताना त्याकडे चहुबाजूंनी आत्मसात करावे लागते, तेव्हा त्या साहित्यकृतीतला गाभा सापडतो. लबडे असा गाभ्याचा शोध घेणारे समीक्षक आहेत तसे साहित्यिकही आहेत. त्यांची प्रकाशित झालेल्या साहित्याची यादी पाहिली तर, या विधानाला पुष्टी मिळते. कविता : महाद्वार, कविता गुहागरच्या, अभंग स्वरूप आणि चिकित्सा खंड १ व २, ग्रामीण साहित्य आणि एसईझेड अशी बारा पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. ज्यांची दखल जाणकारांकडून घेतली गेली, काही अभ्यासक्रमात स्वीकारली गेली. त्याच जाणत्या लेखक-कवीची ही साहित्यकृती म्हणजे 'मुंबई...बंबई...बॉम्बे' होय.

मागील पूर्ण वर्ष या कवितासंग्रहावर सातत्याने लिहून येत होते, चर्चा होत होत्या. त्यामुळे प्रकाशनापासून आजपर्यंत हा कवितासंग्रह चर्चेच्या पातळीवर सतत रसिक वाचकांच्या तोडीचा होता. त्यामुळे या संग्रहाविषयीची उत्सुकता आणि कुतूहल मोठे होते. त्याच उत्सुकतेपोटी हा संग्रह घेतला, वाचला आणि भावला, जसे तो आला त्याने पाहिले आणि त्याने जिंकले, अशी गत. मुंबई हे शहर कॉस्मोपॉलिटन शहर म्हणून ओळखले जाते. याला अनेक कंगोरे आहेत, पैलू आहेत. एखादी गूढ गुहा असावी जंगलाच्या मध्यभागी, तसे हे शहर आहे. दिसताना ते सिमेंटच्या इमारती, झोपडपट्टी, रस्त्यांचे जाळे, अनेक प्रकारची वाहने आणि उद्योगधंदे अशा भौगोलिक स्वरूपात दिसते. चारी बाजूंनी समुद्र दिसतो, या शहराला कवेत घेणारा, हे त्याचे भूषण म्हणता येईल. परंतु ही काही या शहराची खरी ओळख नाही. हा सांगाडा आहे, जो अभ्यासासाठी लॅबोरेटरीत वा प्रयोगशाळेत ठेवल्यासारखा दिसतो. ज्यालाच लोक जिवंतपणाची उपमा देतात. ही भाबडी समजूत असू शकते, पण ती नाकारता येत नाही. लोक हिलाच मुंबई म्हणून ओळखतात, हे सत्य आहे.

कवितेत आलेल्या कवितांचे सूक्ष्म अवलोकन केले तर लक्षात येते, मुंबईचा खरा गाभा कोणता आहे. वरलिया रंगाला न भुलता खरे अंतरंग कोणते आहे. जगणारी जितीजागती मुंबई कोणती आहे. ती दाखवली आहे कवी लबडे यांनी, त्यांना दिसली भावली, मनोमन खात्री देत त्यांच्या अंतरंगात उतरली ती मुंबई, जिचे नाव आहे मुंबई...बंबई...बॉम्बे!

ठाणे-मुंब्रा इथपासून मुंबईची हद्द सुरू होते. मग ती कुलाबा, मुंबई सेंट्रल, लालबाग, चैत्यभूमी, वांद्रे, अंधेरी, बीकेसी, सायन कोळीवाडा, वरळी असा सगळा बेटांचा भाग ही कविता आपल्या कवेत घेते. याच्या अंतरंगात राहणारा माणूस शोधून काढण्याचा प्रयत्न ही कविता करते. सतत घड्याळाच्या काट्यामागे धावणारा, माणुसकीला पारखा झालेला माणूस, घामाने तसा रक्ताने माखलेला माणूस, गिरणी बंद पडल्याने चळवळीबाहेर फेकला गेलेला, मूक-म्यान झालेला माणूस, संडास-मुतारी-गटार-नाल्याच्या सोबतीने राहणारा माणूस, संडास साफ करण्याच्या अटीवर राबणारा माणूस, स्वत:चे माणूसपण हरवलेला माणूस, गिऱ्हाईक होऊन वावरणारा माणूस... अशा असंख्य रूपांत वावरणारा माणूस या कवितेच्या केंद्रस्थानी आहे.

इथं जगणाऱ्या माणसाची अस्वस्थता, तगमग, टिकून राहण्याची धडपड, अठरापगड राज्यांतून आलेल्या माणसांनी स्थानिकाच्या अस्तित्वालाच नख लावले, त्याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी धडपड, जमेल त्याच्या भाषेशी जुळवून घेत स्वत:चे जगणे पुढे रेटण्याची धडपड, या चक्रात माणूस हरवत चाललेला आहे. त्याविषयीची चीड, विषमतेची चीड, ही कवीला अस्वस्थ करते. हे सगळे पाहताना त्याच्या मनाची प्रचंड घालमेल होते. पाहावे तिथे ही अस्वस्थता त्यांना वेढून टाकते. जिथे जातो तिथे... अशी अवस्था. ते सारे कवीने आपल्या कवितेतून उद्रेक रूपाने व्यक्त केले आहे.

कवीचे निरीक्षण खूप तरल, खोल आणि आरस्पानी आहे. मुंबई सेंट्रलच्या रेडलाईट एरियात उभी असणारी, लालबाग-परळमध्ये नारायण सुर्वे, अण्णाभाऊ साठे यांची म्यान झालेली, सायन कोळीवाड्यात परप्रांतीयांना हुसकावू लावू पाहणारे स्थानिक, धारावीत वळवळणारे, राजाभाई टॉवर, मंत्रालय येथे टेबल लावून बसलेले, या सगळ्यात जगणे, व्यवहार, भ्रष्टाचार, आक्रमण, असहायता यांचे ओझे घेऊन वावरणारी अस्वस्थ माणसेच आहेत. त्यांचे वास्तववादी चित्रण अतिशय मार्मिकपणे कवितेत आले आहे. यात कवीच्या संवेदनशील मनाचा परिचय होतो, तसा त्या मनाचा कोंडमारा आणि त्यातून काही आशेची किरणे दाखवण्याचा प्रयत्न स्तुत्यच म्हणायला हवा. एकशे चौदा कविता, अभंग, काही लयबद्ध तर काही मुक्तछंदातील. या कविता केवळ वर्णन करत नाही, त्या चित्रणाचे घर वाचकाच्या मनात रुजवतात. बाबाराव मुसळे, सुनील कर्णिक यांनी केलेले कवी आणि कवितेचे कौतुक, कवीने स्वत: केलेले निवेदन या संग्रहाची भूमिका समजून घेण्यास उपयुक्त ठरते. राजू बावीस्करांनी केलेले मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे या संग्रहाच्या उठावदारपणात भर घालतात.

**मूल्य १६० रु. सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**नदीष्ट**

**मनोज बोरगावकर**



**नदीकडे माय म्हणून पाहणारे मन**

''उन्हाळा–एन्ड टू–पावसाळा या कालावधीत रोडावलेली नदी उगीच अस्वस्थ करीत राहते. या दिवसांत तिथे अविरतपणे वाळूचा उपसा चालू असायचा... नदीच्या गाभ्यापर्यंत जखम करणारा. किती खोलवर इजा होत असेल नदीला? अबॉर्शनमुळे स्त्रीला होणाऱ्या इजेसारखीच! आपल्याला स्त्रीच्या गर्भापर्यंत जाता आले, पण गाभ्यापर्यंत कुठे जाता आले? स्त्रीच्या उदरात राहता आले, पण तिच्या काळजापर्यंत कुठे पोहोचता आले? म्हणूनच वाटते आपल्यासाठी आई असते कलेजाचा तुकडा, पण आईसाठी मात्र आपण अख्खे काळीज! एवढाच काय काळीजभर फरक आपल्या अन् आईच्या प्रेमात! त्या काळजाएवढ्या फरकातच केवढे काही दडले आहे.''

प्रा. मनोज बोरगावकर यांची ही कादंबरी. शीर्षक काहीसे गूढ आणि थोडेसे आकलनाची वाळू उकरायला लावणारे, तरी अतिशय समर्पक! अर्थात त्यासाठी या कथानकाच्या अंतरंगात उतरण्याची गरज आहे, नदीच्या प्रवाहात उतरण्यासाठी. या कथानकात अनेक व्यक्तिरेखा आहेत, परंतु त्या सगळ्यांना एकत्र आणणारी, जोडून घेणारी, नाते निर्माण करणारी व्यक्तिरेखा आहे गोदावरी नदी. ही तुडुंब भरून वाहणारी, आपली वेगवेगळी रूपे दाखवणारी नदी कधी आईच्या रूपात सगुण रूप धारण करते, तर कधी सर्व सोसत संथपणे निर्गुण रूपात विरक्त आत्ममग्न होत जाते. तिच्या अंगाखांद्यावर खेळणारा, तिच्याशी एकरूप होऊन तिच्या अंतरंगात स्वत:ला झोकून देणारा नायक, अशा या दोन व्यक्तिरेखांचा हा सजीव प्रवास म्हणजे नदीष्ट.

नदीचा परिसर, घाट, येणारी माणसे, मंदिर, झाडे, प्राणी ही दृश्ये आपल्या परिचयाची असतात. परंतु त्यांना सजीव रूप कथानकाच्या अंगाने लाभते, तेव्हा ही दृश्ये आपल्या संकल्पनांना छेद देत जातात. नदीत पोहणे ही कला आवडीशी जोडलेली असून भागत नाही. तिच्यात जिद्द, ध्यास, झोकून देण्याची वृत्ती असावी लागतेच, त्याचबरोबर त्या नदीशी तुमचे नाते मायलेकराचे असावे लागते. 'मायची वल्ली माया कधी मिळाली नाही पण गोदामाय मात्र रोज वल्लं करून अंगभर माया करते. इथं आल्यावर गोदामायच्या कुशीत उतरल्याशिवाय कधीबी परत जाऊ नका. बाबांनो, तिलाबी लेकराला जवळ घ्यावं वाटत असलंच की.' असं सांगणारा दादाराव हा नायकाचा पोहणे शिकवणाराच नव्हे तर नात्यातले नाते सांगणारा गुरू आपल्याला अंतर्मुख करून जातो. नदीकडे पाहण्याची दृष्टी आणि भाव बदलून टाकतो.

नदीशी नाते सांगणारा बामनवाड, मासे पकडणारा भोई नदीकाठी झालेला बलात्कार टाळू शकत नाही. स्वत:च्या कमजोरपणा आणि नदीविषयी तो भावना व्यक्त करतो, 'तिच्या डोळ्यांतल्या पाण्यापरीस नदीचं पाणी मला कमजोर वाटलं... गोदामायम्होरं इज्जत लुटताना त्यायला काई म्हणता काई वाटलं नाही... जिंदगीभर पोटापाण्याची सोय करणाऱ्या गोदामायलाबी माह्याविषयी काय वाटलं असल? तीबी बाईमानूसच हाय की!''

दादाराव आणि बामनवाड हे नदीच्या विषयीचे वेगळे तत्त्वज्ञान सांगतात. हे तत्त्वज्ञान त्यांच्या अनुभव व चिंतनाचे सार आहे. माणसाची लोभी, स्वार्थी आणि पापी वृत्ती यांना पोटात घेणारी नदी कधी रौद्ररूप धारण करते तेव्हा त्यापाठीही वेगळे तत्त्वचिंतन असते, हे या व्यक्तिरेखांच्या द्वारेच मांडले आहे.

सर्पमित्र प्रसाद याचे धाडशीपण प्रसंगी जिवावर बेतू शकते. त्यांच्या ठायी सापाविषयीचे असलेले ज्ञान आणि इजा न पोचवता त्याची करावयाची सुटका, याचे अनुभव आश्चर्यचकित करणारे आहेत. नदीच्या काठावर असलेल्या जंगलात माकड आणि हरीण यांच्यातला संघर्ष हा जीवनसंघर्ष जसा आहे तसा डार्विनच्या सिद्धांताची तीव्र प्रकटताही समजून सांगणारी आहे. कालूभैया आणि पुजारी यांचे नायकाशी असलेले नाते दूरस्थ असूनही जवळीक निर्माण करणारे आहेत. मांजरीविषयी असलेला राग व तिटकारा यातून भलताच प्रसंग ओढवला आणि सारे आयुष्यच उद्ध्वस्त झालेला भिकाजी याच नदीकिनारी भेटतो. सगुणा नावाची तृतीयपंथी याच नदीकिनारी तिच्या आयुष्याची परवड नायकासमोर मोकळेपणाने उघड करते. तिच्या आईचे गाव याच नदीच्या किनारी आहे. आईला भेटण्याची इच्छा आता ही नदीच्या दर्शनातून पूर्ण होईल, अशी भोळीभाबडी इच्छा ती व्यक्त करते, तेव्हा माणसाच्या जागी नदीच जवळची वाटते.


या सगळ्या व्यक्तिरेखा नायकाला नदीकाठी भेटतात. त्यांचे प्रत्येकाचे जगणे, वैशिष्ट्ये, भवताल यांचे वर्णन करताना लेखकाने केवळ त्या व्यक्तिरेखांचा आलेख साकारला असे नाही, त्यासोबत नदी ही व्यक्तिरेखा जोडून घेतली आहे. नदीचे बाह्यरूप आणि अंतरंग याच्याशी जोडून घेताना मानवी मन, भावना यांची सांगड घातलेली आहे. नदीचे ऐसपैस असे पात्र, त्यात असलेली व्हर्जिन जागा, त्या ठिकाणची वाळू काढण्यासाठी प्रयत्न, हे सारे दृश्यचित्रणात येते, परंतु त्याचवेळी लेखक नदीच्या अंतरंगाइतकाच मानवी मनाचा शोध घेत आहे. त्यातले प्रवाही, नितळ, गूढपण शोधण्याचा प्रयत्न करत आहे असे यातून दिसून येते. सतत वेळी–अवेळी, कुठल्याही ऋतूत नदीवर पोहायला जाणारा नायक पोहण्याच्या ओढीने जातो असे म्हणण्यापेक्षा एक लेकरू मायेच्या ओढीने आईकडे जाते, असेच म्हणावे लागेल. या ओढीत जशी आत्मीयता आहे तशी लेखक म्हणून प्रा. मनोज बोरगावकर यांच्याकडे चिंतन, तत्त्वज्ञान, अभ्यासू, अनुभव आणि भावना यांची गुंफण सुरेखपणे करण्याची प्रतिभादेखील आहे. त्यामुळेच अतिशय सुंदर चित्रण वास्तवाचे भान देत एका भावबंधनाशी आणून पूर्ण केले आहे. तरी त्यांचा प्रवास अजून पुढे आहे, असा संकेत यातूनच मिळतो. एक चांगले लेखन वाचल्याचा आनंद देणारे हे पुस्तक आहे, तशी लेखकाची ग्वाही देणारेही आहे. नयन बारहाते यांचे मुखपृष्ठ आणि मांडणी आशयसंपन्न आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

**उत्कृष्टतेचा ध्यास**
**डॉ. आर.डी. लेले**




**ध्यासाचा आकृतिबंध**

''एकदा आपण तन्मयतेनं एखादी गोष्ट मनावर घेतली तर आपला स्वाभाविक कल त्याकडं असो किंवा नसो, त्या कामात आपण यशस्वी होतोच. वैद्यकीय क्षेत्रातलं एक महत्त्वाचं तत्त्व म्हणजे तुम्हाला माणुसकीचा गहिवर असला पाहिजे. तुम्ही माणूसघाणे असाल आणि माणसांबद्दल सहसंवेदना नसेल तर तुम्ही रोगाचं निदान करू शकता, पण चांगले डॉक्टर होऊ शकत नाही. म्हणून वैद्यकीय क्षेत्रात जाण्यासाठी माणूसकीचा दृष्टिकोन आणि सहवेदना असणं आवश्यक आहे.'' (पृ. क्र. ११)

आत्मकथनाकडे नेहमी एक दस्तऐवज म्हणून पाहिले जाते. यातून त्यावेळची सामाजिक, राजकीय परिस्थिती समजून घेण्यास मोठी मदत होते. आहे त्या परिस्थितीतून वाट काढीत स्वत:ला सिद्ध करणाऱ्याच्या कसबाची लागलेली कसोटी इतरांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. असामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तीचे कथन असेल तर ते नेहमीच प्रेरणादायी असू शकते. डॉ. रा.द. लेले यांचे आत्मकथन हे यात चपखल बसणारे आहे. वैद्यकीय क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या आणि सध्या याच क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्वांना हे आत्मकथन मार्गदर्शक आहेच परंतु ते प्रेरणादायी देखील आहे.

हैद्राबाद ही निजामशाहीची राजधानी. स्वातंत्र्यपूर्वकाळात येथे निजामाची सत्ता होती. मराठवाडा, तेलंगणा, आंध्र असा मोठा भूभाग या राज्यात समाविष्ट होता. स्वातंत्र्यानंतरही हे राज्य स्वतंत्र ठेवण्याचा निजामाचा अट्टाहास होता. तो नंतर भारत सरकारने लष्करी बळाने मोडून काढला. या काळात झालेले मुक्तिसंग्राम, निजामाची भूमिका, स्वामी रामानंद तीर्थ यांसारखे स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणारे नेते, चळवळी, विद्यार्थ्यांचा यात असलेला सहभाग, त्यावेळचे उर्दू भाषेतून दिले जाणारे शिक्षण, असा रंजक इतिहास डॉ. लेले यांनी थोडक्यात वाचकांसमोर ठेवलेला आहे. डॉ. लेले यांचे बालपण आणि एमबीबीएसपर्यंतचे शिक्षण हैद्राबादमध्ये झालेले. त्यामुळे त्यावेळचे प्रत्यक्ष अनुभवलेले सामाजिक, शैक्षणिक, राजकीय वातावरण त्यांच्या चरित्राचा व्यापणारा एक भाग आहे, तो त्यांनी इथे दिलेला आहे. उर्दू भाषा याचबरोबर मराठी, इंग्रजी, हिंदी, तेलगू या भाषाही त्यांना अवगत आहेत. वैद्यकीय व्यवसायात भाषेचे महत्त्व त्यांनी विषद केलेले आहे, ''रुग्णाला डॉक्टरबद्दल विश्वास वाटायला हवा असेल तर भाषा ही अतिशय महत्त्वाची आहे. तुम्ही वैद्यकीय व्यवसाय करत असाल तिथली प्रादेशिक भाषा येणं अतिशय गरजेचं आहे.'' (पृ. क्र. ३२)

अणुऊर्जेचा उपयोग वैद्यकीय उपचारासाठी करणे शक्य आहे, आणि तो भारतात शक्य आहे, यासाठी जे प्रयत्न झाले, त्यात डॉ. लेले यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. 'न्यूक्लियर मेडिसिन' ही संकल्पना भारतात प्रथम प्रत्यक्षात आणणारे डॉ. लेले या थिएरीचे जनक ठरले आहेत. मुंबईत जसलोक हॉस्पिटल हे या दृष्टीने परिपूर्ण असे हॉस्पिटल आहे, त्याचे श्रेय डॉ. लेले यांच्याकडे आहे. अर्थात या अणुऊर्जेचे श्रेष्ठत्व सांगताना डॉ. होमी भाभा यांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या संशोधनाचा ते अभिमानाने उल्लेख करतात.

हैद्राबाद, औरंगाबाद, मुंबईतील जेजे, जसलोक, लीलावती आणि परदेश असा त्यांचा प्रवास झाला. ग्रामीण भाग, ग्रामीण रुग्णालये ते जसलोक अशा शासकीय, निमशासकीय रुग्णालयांशी ते जोडलेले राहिले. तरी येथे उत्तमातले उत्तम असे जे जे करणे शक्य आहे, ते त्यांनी केलेले आहे. त्यामुळे ही रुग्णालये सर्व सुविधांनी युक्त झाली आहेत. त्यांच्या उत्कृष्टतेच्या ध्यासाची, उत्तम उपचारांची, व्याख्यानांची, शिकवण्याची अंगभूत जी वैशिष्ट्ये आहेत, त्यामुळे केवळ ते हॉस्पिटल एवढ्याच मर्यादेत राहिलेले नाहीत. त्यांनी भाषा, संगीत, क्रिकेट, लेखन, संशोधन अशा हॉस्पिटलच्या मर्यादेपलीकडील गुणांचीही जोपासना अतिशय उत्साहाने आणि रसिकतेने केलेली आहे.

रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील संबंध, कॅन्सर, हृदयरोग यासारखे आजार, डॉक्टरांवर होणारे हल्ले आणि त्यासाठी असलेले कायदे, मेडिकल कौन्सिल, अनिष्ट प्रथांची लागण, अशा विषयांची सामान्य वाचकाला, रुग्णाला वाटणारी उत्सुकता व कुतूहल यांचे समाधान डॉ. लेले यांनी उत्तराच्या स्वरूपात केलेले आहे.

डॉ. लेले यांनी आतपर्यंत लिहिलेल्या पुस्तकांची संख्या बारा आहे. ही सर्व वैद्यकशास्त्रांशी संबंधित आहेत, परंतु त्यांची वैशिष्ट्ये आणि उपयुक्तता ही केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही सिद्ध झालेली आहेत. त्यांचा समावेश अभ्यासक्रमात देखील आहे. सतत संशोधन, त्यात असणारी उत्कृष्टतेची आत्मीयता, या क्षेत्राविषयी असणारी दूरदृष्टी आणि रुग्णाविषयी असणारी अपार आपुलकी याची दखल 'पद्मभूषण' या सन्मानाने घेतली आहे.


एक चांगलं आत्मकथन डॉ. राजेंद्र आगरकर, चंद्रकांत मेंहेदळे, राधिका कुंटे आणि मेधा आलकारी यांच्यामुळे वाचकांसमोर आले आहे. हे शब्दांकन असून यात या मंडळींची कुशलता दिसून येते. डॉ. लेले स्वत: हेच याचे लेखक आहेत याचे भान कुठेही सुटलेले नाही. लेखनातला प्रवाहीपणा, मांडणी, उपशीर्षके, आवश्यक तिथेच इंग्रजी शब्द, फोटो, परिशिष्टे यामुळे एक चांगले आत्मकथन साकारल्याचा आनंद मिळतो. एका तपस्वी व्यक्तित्वाशी परिचित झाल्याचा आनंद मिळतो. उत्कृष्टतेचा ध्यास म्हणजे काय त्याचा सप्रमाण आकृतिबंध म्हणजे डॉ. रा.द. लेले, त्यांचे छायाचित्र घेऊन सतीश खानविलकर यांनी सुरेख मुखपृष्ठ सजविले आहे.

**मूल्य ४०० रु.   सवलतीत २५० रु.**


ZEE मराठी
॥श्री॥
तुमचं आमचं जमलं
महाराष्ट्रातील प्रत्येक
लग्न संस्कृतीसाठी
अस्सल मराठमोळं पोर्टल!
तब्बल २ लाख स्थळांनी नोंदवली नावे आणि दिवसागणिक होतेय नवीन १००० स्थळांची नोंदणी.
'तुमचं आमचं जमलं'च्या साथीने निवडा तुमच्या आयुष्यातील सुयोग्य जोडीदार!
सुयोग्य जोडीदार शोधण्यासाठी आजच Login करा.
www.tumchaaamchajamla.com वर किंवा Download करा तुमचं आमचं जमलं App.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




**Forex services made easy by Saraswat Bank**

**Facilitating Foreign Exchange for 40 years**

**Saraswat Bank**

**Saraswat Co-operative Bank Ltd.**
(Scheduled Bank)

- NRI Deposit (NRO, NRE & FCNR(B), RFC Accounts)
- Remittances
- Travel Currency Card*
- NRI Loans (Personal Loan & Home Loan)
- Attractive Exchange Rates
- Trade Finance

*In association with Axis Bank / Thomas Cook.

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.